म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 2083



# खांडेकरांचे समाज-चिंतन

REFBK-0022615
REFBK-0022615

वि. य. कुलकर्णी
कृ. पं. देशपांडे

८१६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 MAY 1979

12 SEP 1979

13 FEB 1980

(क्रु.मा.प.)

निबंध
२२९१५
३१।३।७९
संदर्भ
२०७३

# खांडेकरांचे समाज चिंतन

२२९१५
निबंध २०७३

लेखक

डॉ. वि. य. कुलकर्णी
एम. ए. पी. एच्. डी.

कृ. पं. देशपांडे
एम्. ए.

REFBK-0022615

प्रस्तावना

डॉ. भालचंद्र फडके

चारुदत्ता प्रकाशन, पुणे ३०

चारुदत्ता प्रकाशन : ४५
पहिली आवृत्ती १४ जानेवारी १९७९ ( मकर संक्रांत )

(C) लेखकाधीन

किंमत : वीस रुपये

मुद्रक :
म. वा. बर्वे
पेपको प्रेस,
३७६ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२

प्रकाशिका :
सौ. शैलजा स. पराडकर
चारुदत्ता प्रकाशन,
१५१८ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

## अनुक्रमणिका


१ एका ध्येयवादी मनाची पार्श्वभूमी

२ खांडेकरांच्या दृष्टिकोनातून सामाजिक व राजकीय इतिहास

३ विसावे शतक

४ गांधीवाद : समाजवाद

५ दुःखाची कारणमीमांसा

६ धर्मचिंतन

७ स्त्री-जीवन

८ कला आणि समाज-जीवन

# भूमिका

आमच्या या छोटया प्रबंधाचा विषय 'खांडेकरांचे समाज चिंतन' हा आहे. विषयाचे नाव ऐकून आमच्या काही मित्रांनी आश्चर्य व्यक्त केले. परंतु असे आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे ? कै. भाऊसाहेब हे ध्येयवादी लेखक होते ही गोष्ट सर्वच मान्य करतात. तेव्हा त्यांच्या त्या ध्येयवादीत्वाचा, तळमळीचा, चिंतनशीलतेचा स्वतंत्र रीतीने मागोवा घेणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. बऱ्याच वेळेला टीकाकार ललित वाङमयाची चिकित्सा करीत असताना ही गोष्ट विसरतात. कै. खांडेकरांचे वाङमय कलेच्या दृष्टीतून कसे उरतले आहे हा अभ्यासाचा एक विषय आम्ही मान्य करतो. परंतु ज्या तळमळीने खांडेकरांनी लेखणी उचलली त्या त्यांच्या समाज चिंतनाकडे दुर्लक्ष केले जाऊ नये असे आम्हाला वाटते. म्हणून आम्ही या छोटया प्रबंधात त्यांच्या चिंतनशीलतेचा यथाशक्ती परामर्ष घेतलेला आहे.

या प्रबंधाचा विषय आम्ही सुरुवातीला मोघे प्रकाशन, कोल्हापूर यांचे पुणे येथील व्यवस्थापक कै. प्र. ज. पाध्ये यांच्यासमोर मांडला आणि त्यांना हा विषय फारच आवडला त्यामुळे त्यांनी प्रकाशनाची जबाबदारीही आनंदाने स्वीकारली होती. दुसरी गोष्ट अशी की, त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली त्यावेळी कै. भाऊसाहेबांना ज्ञानपीठाचे पारितोषिक मिळालेले नव्हते. हा प्रबंध, भाऊसाहेबांना पारितोषिक मिळाल्याचा जो समारंभ झाला त्या दिवशी प्रकाशित व्हायचा होता. पण योगायोग विचित्र असतात. त्या समारंभापूर्वीच पाध्ये यांचे देहावसान झाले; आणि त्यानंतर या पुस्तकाचे काम लांबणीवर पडले. इतके की, दरम्यानच्या काळात भाऊसाहेबही आपल्याला सोडून गेले. पूर्वनियोजित संकल्पा-

प्रमाणे पुस्तक झाले असते तर आम्हाला आनंद झाला असता. कै. पाध्ये आणि कै. भाऊसाहेब यांचे संबंध लक्षात घेता हा प्रबंध त्याच वेळी व्हावयास हवा होता. त्यामुळे आम्हाला कै. भाऊसाहेबांचा आशीर्वाद आणि त्यांचे मतही कळू शकले असते. कै. पाध्यांच्याबद्दलही कृतज्ञता व्यक्त करणे एवढेच आता आमच्या हाती आहे.

हा प्रबंध लिहीत असताना अनेकांचे सहाय्य झाले. प्रबंध लेखनाला प्रामुख्याने ग्रंथांचे सहाय्य लागते. ते सहाय्य नू. म. वि. प्रशालेचे ग्रंथालय आणि किताब मिनार या ग्रंथालयांचे झाले. नू. म. वि. चे ग्रंथपाल श्री. वि. अ. जोशी आणि किताब मिनारचे ग्रंथपाल श्री. बोडस यांनी दिलेल्या अमोल सहाय्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

केवळ वरील कारणामुळेच लांबलेल्या या ग्रंथ प्रकाशनाची जबाबदारी नव्यानेच या व्यवसायात पदार्पण करणाऱ्या श्री. पराडकर यांनी स्वीकारली याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. या व्यवसायात असणाऱ्या व्यक्तींना हे माहीतच आहे की, टीकात्मक ग्रंथ प्रकाशित करणे हे फार मोठे धाडस आहे. व्यवसायाच्या प्रारंभ काळीच श्री. पराडकर यांनी हे धाडस दाखविल्याबद्दल आम्हाला त्यांचे कौतुक वाटते.

डॉ. भालचंद्र फडके यांच्यासारख्या मान्यवर व्यक्तीने या ग्रंथाला प्रस्तावना लिहून ग्रंथाचे मोल वाढविले आहे. आमच्यासारख्या नवीन लेखकांना त्यांच्यासारख्यांचे प्रोत्साहन मिळाल्याने मोठा हुरूप आला. त्यांचे आभार शब्दातीत आहेत.

चित्रकार श्री. सालकर, पेपको प्रेसचे श्री. म. वा. बर्वे व मनिषा मुद्रणालयाचे मुद्रक श्री. श्री. ग. हरपुडे यांच्या सहकार्यानेच ग्रंथ सर्वांग सुंदर बनला. त्या सर्वांचेही आभार.

चिंतनशील वाचक या ग्रंथाचे स्वागत करतील असा आम्हास विश्वास वाटतो.

विजया दशमी<br>शके १८९९<br>२१ ऑक्टोबर १९७७

वि. य. कुलकर्णी<br>कृ. पं. देशपांडे

# प्रस्तावना

डॉ. विनायक य. कुलकर्णी आणि श्री. कृ. पं. देशपांडे या दोघा अभ्यास-कांनी ' खांडेकरांचे समाजचिंतन ' या सिद्ध केलेल्या ग्रंथाला लिहिताना माझ्या-समोर अनेक प्रश्न, अनेक अडचणी उभ्या आहेत. ग्रंथाची भलावण करणारी प्रस्तावना लिहिणे मला प्रशस्त वाटत नाही. या ग्रंथाच्या निमित्ताने कै. वि. स. खांडेकरांच्या लेखनामागील प्रेरणा शोधाव्यात, त्यांच्या लेखनाचा पुर्नविचार करून पहावा असे मात्र वाटले. या ग्रंथात जी भूमिका स्वीकारली आहे, जी मते वा अभिप्राय जागोजागी व्यक्त केलेले आहेत. त्या सर्वांशी सहमत होणे निदान मला तरी कठीण वाटते; कारण " खरे म्हणजे ललित लेखकापेक्षा त्यांना समाज-चिंतक समजणे हाच त्यांच्या अंतरंगाचा खरा परिचय आहे. " हे या ग्रंथाच्या लेखकांचे विधान कसे मान्य करता येईल ? ही गोष्ट खरी आहे. की वि. स. खांडेकरांच्या लेखनामागे सामाजिक जाणीव आहे, एक विशिष्ट वाङमयीन भूमिका आहे. ललितलेखक एखादी भूमिका घेऊन लेखन करू शकतो. त्याच्या लेखनात त्याची चिंतनशीलता प्रत्ययास येते असेही म्हणता येईल. या दोन्ही लेखकांनी भाऊ-साहेबांनी ज्या विविध प्रस्तावना लिहिल्या आणि वेगवेगळ्या संमेलनाच्या व्यास-पीठावरून जी व्याख्याने दिली त्यांच्या आधारे खांडेकरांचे समाजचिंतन कोणत्या स्वरूपांचे आहे त्याची चिकित्सा केली आहे. डॉ. कुलकर्णी आणि श्री. देशपांडे या दोन्ही लेखकद्वयांचे त्यांनी केलेल्या परिश्रमाबद्दल व चिकित्सापूर्वक केलेल्या लेखना बद्दल कौतुक केले पाहिजे.

आणखी एक असे की, डॉ. वि. य. कुलकर्णी व श्री. कृ. पं. देशपांडे यांची भूमिका समजावून घेतली पाहिजे. त्यांना प्रामाणिकपणे वाटते की, भाऊसाहेब खांडेकर चिंतनशील, ध्येयवादी लेखक आहेत. आणि म्हणून ध्येयवादी खांडेकरांच्या मनाची काहिली, त्यांची रुखरुख, त्यांची प्रस्तावनेतील समजावणी दुर्लक्षित झाली आहे. प्रस्तुत ग्रंथातील या दोघांच्या विवेचनामुळे ' समाजचिंतक'ही खांडेकरांची प्रतिमा मराठी माणसासमोर उभी राहील अशी माझी खात्री आहे. मला समजू शकते की ललित लेखकाला त्याची अशी विशिष्ट वाङमयीन भूमिका असते. तसेच त्या मागे विविध तत्त्वांचे चिंतन असते. पण कथा कादंबरी इ. ललित लेखनांतून ज्या व्यक्ती वावरतात. त्या केवळ लेखकाच्या विचारांच्या वाहक नसतात. कादंबरीच्या पटावर स्वतंत्र स्थान असते. त्यांचे विचार, त्यांची कृती ही त्यांची आहे. असा आभास लेखकाला निर्माण करता आल

पाहिजे. "खांडेकरांचे ध्येयवादी मन जीवनाचे चित्रण करीत नाही, चिंतन करते." असे जे या लेखकद्वयांचे म्हणणे आहे. (पृ. ६) त्या ऐवजी खांडेकरांच्या ललितकथेतील जीवन चित्रणामागे त्यांचे चिंतन आहे असे म्हणणे युक्त ठरेल.

दुसऱ्या प्रकरणात त्यांनी खांडेकरांच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्राचा राजकीय व सामाजिक इतिहास स्पष्ट करून सांगितला आहे. त्यांनी साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे. हे सूत्र मनी बाळगले आहे. येथे एका इंग्रजी विधानाची सहज आठवण होते. **Literature holds the mirror to you. If your face needs washing not white washing ; Go for soap and water.** साहित्य समाजाला अंतर्मुख करीत असते. कृतिप्रवण करीत असते. अशी श्रद्धा असणारी एक भूमिका आहे. खांडेकर आपल्या ललित कृतीतून जे चित्र रेखाटतात. त्यामुळे वाचकाने अंतर्मूख व्हावे अशी त्यांचीही अपेक्षा आहे. खांडेकरांनी मांडलेल्या विचारांच्या आधारे या दोन्ही लेखकांनी जो निष्कर्ष काढला तो अतिशय महत्त्वाचा आहे. ' मध्यमवर्ग ' हेच या चिंतनाचे केंद्र आहे. हे त्यांचे म्हणणे कोण नाकारील ? " पण सुशिक्षित मध्यम वर्गाचा इतिहास हीच या चिंतनाची मर्यादा आहे." हे त्यांचे विधान मला बरोबर वाटले नाही. अव्वल इंग्रजी काळापासून ते आजतागायत मध्यम वर्ग कसा पालटत गेला ते खांडेकर बरोबर चित्रित करतात. त्यांना म्हणावयाचे आहे की उदात्तापेक्षा क्षुद्राची, चिरंतनापेक्षा क्षणिकाची आणि भावनेपेक्षा वासनेची जिथे अधिक उघड पणे पूजा केली जात आहे त्या कालखंडात ' मध्यमवर्ग ' दुबळा ठरतो आहे आणि त्याला या हजार हाताच्या भीषण आक्टोपसाला थोपविता येणार नाही याचे खांडेकरांना दुःख आहे.

भाऊसाहेबांच्या विचारांची जडण घडण गांधीवादामुळे आणि समाजवादामुळे कशी झाली आहे, याचा मागोवा अतिशय व्यवस्थितपणे या लेखकद्वयांनी घेतला आहे. आणि खांडेकरांनी दुःखाचा जो वेध घेतला त्याचे स्वरूप या दोघांनी परिश्रमपूर्वक विशद केले आहे. या ग्रंथांतील "दुःखाची कारण मीमांसा" या प्रकरणाकडे वाचकांचे लक्ष मी मुद्दाम वेधतो. तसे दुःखाचा शोध घेणे ललित लेखकाला आवडते. मानवी दुःखाची रूपे अनंत आहेत तशी ही दुःखे वेगवेगळ्या पातळीवर शोधण्याचा लेखकाचा प्रयत्न असतो. लेखकद्वय म्हणतात त्याप्रमाणे दुःखाचे पहिले कारण आर्थिक विषमता हे आहे. त्यानंतरचे दुःख कारण म्हणजे सामाजिक विषमता लेखकांच्या मते अंध आत्मनिष्ठा किंवा अहंकार हे जगातील सर्व दुःखाचे मूळ आहे असे खांडेकर सांगतात. त्यांचे म्हणणे खोटे नाही. या प्रकरणाचा समारोप करताना लेखकद्वय म्हणतात, " मध्यम वर्गात भावनात्मक अराजक

निर्माण झाले या खांडेकरांच्या निदानानंतर आपण या युगात अत्यंत तरल, पार्थिव संकुचित, शरीर केंद्रित तत्त्वज्ञान निर्माण केले असून त्याचा परिणाम केवळ भोगवादात झाला आहे, असे त्यांना वाटले, जीवनाची पातळी बदलावयाची असेल तर जीवनमूल्ये श्रेष्ठ, व्यापक, अपार्थिव असलीच पाहिजेत. यासाठी सामाजिक दृष्टी 'आकाशाकडे व व्यक्तीचीदृष्टी आत्म्याकडे हवी' (पृ. ६४) खांडेकराचे समाज चिंतन तत्त्वचिंतनाकडे वळलेले आहे. हा त्यांचा दावा खरा आहे. मध्यम वर्गावर भाष्य केल्यानंतर ' ययाती ' चे लेखन त्यांनी केले आणि त्यांत मूळ महाभारत कथेला मुरड घालून विकसित आत्मा म्हणून कचाची व्यक्तिरेखा आणली ही बाब अर्थपूर्ण आहे.

पुढील प्रकरणात ते खांडेकरांच्या धर्म–चिंतनाची वैशिष्टये सांगतात जीवन व तत्त्वज्ञान यांत सुसंगती हवी आणि त्याची जाणीव नाही हेच सामाजिक दुःखाचे कारण आहे हे लेखकांना जाणवलेले पाहिले वैशिष्टच ! आपली परंपरागत जीवन दृष्टी इहवादापेक्षा परलोकवादाला अत्यधिक केन्द्रित झाली आहे आणि परलोक वादाला या विसाव्या शतकात स्थान राहिलेले नाही हे भाऊसाहेबांचे आग्रहाचे सांगणे आहे. लेखक म्हणतात. त्याप्रमाणे ते चार्वाकाचे तत्त्वज्ञान सांगत नाहीत. पण माणूस हा सात्त्विक शक्तीचे भांडार असे ते मानतात. धर्म अर्थ व काम या तीन पुरुर्थाचे प्रणेते गांधी, मार्क्स व फराइड हे आहेत व जीवनाचे तत्त्वज्ञान या तीन पुरुषार्थावर आधारलेले असावे असे खांडेकर सांगतात पण ' भोक्षा'ची चर्चा करीत नाहीत. त्यांना अपेक्षित असा मानवतावाद ' ईश्वरनिष्ठा व मोक्ष ' या शिवाय पुरा होऊ शकणार नाही असा या लेखकांचा निष्कर्ष आहे. कारण ' मोक्ष म्हणजे विश्वात्म होऊन राहणे ' असा अर्थ ते स्वीकारतात.

'स्त्री'चा शोध स्त्रियापेक्षा पुरुष अधिक घेतात. इंग्रजी राजवटीत स्त्री-दास्य विमोचनाची चळवळ सुरू झाली. स्त्रीचे घडलेले दर्शन ललित कथा–कादंबऱ्यांतून होत गेले. खांडेकरांनी स्त्री-जीवनाचे विविध पैलू कसे चित्रित केले आणि त्याचबरोबर स्त्री–जीवनातल्या विविध समस्यांची चर्चा कशी केली. ते या लेखकांनी सविस्तर सांगितले आहे. खांडेकरांचे स्त्री–जीवन चिंतन मध्यम वर्गीय स्त्रियांच्या पुरतेच मर्यादित आहे. असे एका अर्थाने लेखक म्हणतात तसे म्हणता येईल (पृ. १०१) पण या लेखकांनीच एके ठिकाणी खांडेकरांचे म्हणणे ' आठ जून' या कथेच्या संदर्भात सांगितले आहे ते लिहितात, ' आजच्या स्त्रीला केवळ आर्थिक स्वातंत्र्य, केवळ पतिसुख किंवा केवळ अपत्यसुख असल्याने समाधान होणार नाही व्यक्तिविकास, पतिसुख व अपत्यसुख यांचा जेव्हा संगम होईल. तेव्हाच स्त्रीचे जीवन खरोखर पूर्ण होऊ शकेल " आता हे म्हणणे विचारात घेतले तर स्त्री कोणत्याही स्तरातील असली तरी तिला हेच सर्व हवे असते.

‘कला व समाज जीवन’ या प्रकरणात या दोघा लेखकांनी आपली भूमिका तपशीलवार खांडेकरांच्या विचारांचा आधार देत मांडली आहे. कलेने लोक-मानसावर संस्कार होतात. म्हणून कलावंताजवळ व्यापक सामाजिक जाणीव हवी हे या भूमिकेतील प्रमुख सूत्र आहे. सौ. कुसुमावती देशपांडेदेखील म्हणत की थोर साहित्यात जे जे अवतरत असते ते ते समाज जीवनात स्पंद पावत असते म्हणून साहित्य आणि समाजजीवन यांच्यातील दूरीभावाचा परिणाम म्हणजे सांस्कृतिक मरणच. निरामय सौहार्द आणि अक्षोभ चिन्तन यावर समाज जीवनाचा विकास अवलंबून असतो. या दोन शक्तींचे मूलस्रोत लेखकाच्या अंतःकरणात वाहत असतात. भाऊसाहेब खांडेकर हे असेच एक लेखक ! त्यांच्या ‘समाज चिंतना’चे स्वरूप नीट उकलल्याबद्दल डॉ. कुलकर्णी आणि श्री. देशपांडे या माझ्या मित्रांना मी धन्यवाद देतो.

या ग्रंथाचा परिचय करून दिल्यावर प्रस्तावना लिहिण्याच्या निमित्ताने मला भाऊसाहेबांच्या ललित लेखनामागच्या प्रेरणा शोधावयाच्या आहेत, आणि या प्रेरणेनुसार त्यांच्या ललित लेखनाचे स्वरूप समजावून घ्यायचे आहे. त्यामुळे या दोघा लेखकांच्या ‘समाज चिंतना’ला माझ्या लेखनाची जोड मिळेल असे वाटते.

भाऊसाहेबांचे लेखन १९१९ पासून सुरू झाले कथा, कविता, कादंबरी, नाटक, समीक्षा, लघुनिबंध इत्यादी अनेक क्षेत्रात त्यांनी लेखन केले. ‘केशव–सुतांचा संप्रदाय’ या माडखोलकरांच्या लेखाला “तुतारी वाङमय व दसरा’ या लेखाने त्यांनी उत्तर दिले आणि त्यांचा पहिला टीकालेख १९१९ च्या ‘नवयुग’ मासिकाच्या ऑगस्टच्या अंकात प्रसिद्ध झाला. त्याच अंकात त्याची ‘होळी’ ही पहिली कविता ‘कुमार’ या टोपण नावाने छापून आली. याच वर्षी ‘श्रीमत्कालिपुराण’ ही त्यांची विनोदी लेखमाला ‘आदर्श’ या टोपण नावाने ‘उद्यान’ मासिकात प्रसिद्ध झाली. ‘वैनतेय’ साप्ताहिकातून ‘रानफुले’ या मथळ्याखाली त्यांनी ललित लेखांची माला गुंफिली. १९२३ साली ‘महाराष्ट्र–साहित्य’ या मासिकाच्या ऑगस्ट अंकात ‘घर कुणाचे ?’ ही पहिली लघुकथा प्रसिद्ध झाली. म्हणजे त्यांच्या लेखनाचा आरंभ १९१९ पासून सुरू होतो. मराठी वाङमयेतिहासातील १९२० ते ४० या कालखंडात खांडेकरांचे लेखन वेगाने प्रकाशित झाले. १९४१ साली संमेलनाध्यक्षपदाचा मान त्यांना मिळाला हा त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव होता आणि ही त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष होती. महा-युद्धोत्तर कालखंडात कथा, कादंबरी, कविता, नाटक, लघुनिबंध इ. क्षेत्रात वृत्यंतरे आणि स्थित्यंतरे घडून आली तरी खांडेकरांची लोकप्रियता ओसरली नाही, तर ती नित्य वाढतच गेली.

ललितलेखनाचे स्वरूप निश्चित करीत असता त्या लेखनामागाच्या प्रेरणा जशा विचारात घ्याव्या लागतात तसे त्या लेखकाच्या संवेदन स्वभावाचे वा प्रकृतिधर्माचे विशेषही लक्षात घ्यावे लागतात. एखाद्या लेखकाच्या संवेदन स्वाभावाची वा प्रकृतिधर्माची जडणघडण कशी होते ? एकतर ती त्याच्या संवेदनशीलतेवर (**Sensibility**) त्याच्यावर झालेल्या वाङमयीन संस्कारावर, तो ज्या वर्गात वाढला त्या वर्गाच्या जाणिवांवर आणि तत्कालीन वाङमयीन अभिरुचीवर अवलंबून असते. भाऊसाहेबांनी जे ललितलेखन केले त्याचे स्वरूप निश्चित करताना त्यांच्या संवेदन स्वभावाची वा प्रकृतिधर्माची वैशिष्टचे कोणती ती शोधली पाहिजेत.

'चांगले ललित साहित्य हा नेहमीच लेखकाच्या आत्म्याचा उद्‌गार असतो " असे सांगून भाऊसाहेब म्हणतात "तो आत्मा कधी जगातले दु:ख पाहून कळवळतो कधी अन्यायाविरुद्ध बंडखोरपणांने लढचाला उभा राहतो, कधी जीवनातल्या क्षुद्रतेची आणि मूर्खपणाची हसून कीव करतो आणि प्रसंगी ते सुधारावे म्हणून धडपडतो. या आत्म्याचे उद्‌गार बहुविध असतात. ते नाना प्रकारची सुंदर रूपे धारण करून प्रकट होतात. पण असा हा प्रत्येक आत्मा ललितलेखन हा आपला धर्म मानतो, धंदा मानीत नाही. हुकमेहुकम लिहिणे ठराविक साचे तयार करून लिहिणे अमुक प्रकारचे वाङमय बाजारात खपते म्हणून ते लिहीत सुटणे समाजात जे अमंगल असेल तेवढेच निवडून वास्तववादाच्या नावाखाली ते चिवडीत बसणे हे अशा प्रकारच्या आत्म्याला रूचत नाही. याचा अर्थ लेखकाने विपुल लिहू नये असा नाही त्याने हवे तितके लिहावे पण ते लेखन उमाळचाचे असावे, जिव्हाळचाचे असायला हवे, नुसत्या जिनगरी बाहुल्यांची निर्मिती त्याने करीत बसू नये त्याच्या लेखनाचा भरपूर मोबदला त्याने घेऊ नये असेहा नाही. ललितलेखक हा समाजाचे रंजन, उदबोधन आणि उन्नयन करणारा फार मोठा मित्र आहे. अशा मित्राला जगवणे हे समाजाचे कर्तव्यच आहे आपला समाज या बाबतीत फारसा कर्तव्य तात्पर नाही हे कटू सत्य सर्वांना ठाऊक आहे' म्हणजे खांडेकरांना ललितलेखक हा केवळ रंजनार्थ लिहितो ही भूमिका अमान्य आहे आपले स्वत:चे लेखन आपण म्हणूनच वृत्तिगांभीर्याने (**Scincerely**) केले आहे असे ते वारंवार सांगतात. म्हणूनच ते कथा कादंबऱ्यांना जाणिवपूर्वक विवेचक प्रस्तावना जोडतात त्यांचे म्हणणेच आहे की कलाकृतीतकडून प्रस्तावनेकडे जाणें आणि नंतर प्रस्तावनेतून कलाकृतीत प्रवेश करणे अशा दुहेरी व्यापारात कलाकृती सर्वांगांनी समोर येते. परंतु हे त्यांचे प्रस्तावने बाबतचे म्हणणे समीक्षकांनी लक्षात घेतलेले नाही.

एखाद्या लेखनकृतीचा विचार करताना त्या लेखकाची अनुभव घेण्याची आणि अनुभव व्यक्त करण्याची रीत लक्षात घेतली पाहिजे. अनुभव घेणाऱ्या लेखकाची संवेदन क्षमता (**Sensitivity**) हा महत्त्वाचा गुण होय. प्रत्येक जण

संवेदनक्षम असतो पण हळूहळू माणसे संवेदनक्षमता गमावून बसतात. नित्याच्या अवलोकने जन पहा होती किती आंधळे ' असे केशवसुतांप्रमाणे म्हणता येईल. भाऊसाहेबांचे मन सतत संवेदनक्षम आहे. ते लिहितात, "शिरोड्याला दत्तक घरी गेल्यानंतर बाहेरील सामाजिक परिस्थितीचे जे विदारक दृश्य नजरेस आले त्यामुळे मी अस्वस्थ झालो तेथील माणसांची दैन्यावस्था पाहून माझी झोप उडाली. त्यातूनच माझ्यातील लेखक जागा झाला." मास्तर म्हणून शिरोड्यात वावरत असताना खांडेकरांच्या समोर अनेक प्रश्नचिन्हे उभी राहिली. माध्यमिक शाळा हे खेड्यातल्या केवळ शिक्षणाचं नव्हे तर संस्कृति–प्रसाराचं केन्द्र व्हायला पाहिजे. यासारख्या अनेक सुंदर कल्पना. स्वप्ने उराशी बाळगून हा ध्येयवादी शिक्षक लेखन करीत होता. त्यावेळी त्यांच्या मनात येत होतं. " का भौतिक समृद्धीची प्रेरणाच त्यांच्या मनातून नाहीशी झाली आहे ? देवानं जन्माला घातलंय म्हणून जगायचं. ज्याला सुबत्तेचा सुवास नाही, संस्कृतींची सावली नाही, आनंदाचा आधार नाही अशा प्रकारचं जिणं जगायचं ते कशासाठी ? का म्हणून ? असल्या जीवनक्रमाविरुद्ध ही माणसं बंड का करून उठत नाहीत ? अष्टौप्रहर गर्जना करणारा विशाल सागर उशाशी घेऊन झोपणारी ही माणसं, पण यांच्या आकांक्षा विशाल का नाहीत ? यांच्या वाणीत गर्जनेचं सामर्थ्य कां नाही. ? बुद्धिभ्रंश झाल्याप्रमाणे ही माणसं शिळेसारखी अचेतन का झाली आहेत ? " खांडेकरांच्या समोर हे प्रश्न होते. म्हणून हे आवतीभवतीचं जग हा त्यांच्या कुतूहलाचा विषय होता. कोकणातलं अज्ञान आणि अठरा–विश्वे दारिद्र्य यांनी त्यांना अस्वस्थ करून सोडलं होतं. पांढरपेशा ब्राह्मण समाज हा हरिभाऊंचा कुतूहल विषय होता. या ब्राह्मण समाजातील भावबंध, त्यांची दुःखं हरिभाऊंनी चित्रित केली. हरिभाऊ वामनरावांच्या वाङ्मयाचे संस्कार जसे त्यांच्यावर होत होते. तसे कल्पनाचमत्कृती कोटिबाजपणा, अलंकार–प्रियता इ. गुणांनी नटलेल्या कोल्हटकर–गडकऱ्यांचे लेखनादर्श त्यांच्यासमोर होते. १९३० पर्यंत खांडेकरांनी कविता, नाट्यछटा, परीक्षणे, लघुनिबंध, कथा इ. लेखन केले. १९३० पर्यंत खांडेकरांच्या ' संवेदन स्वभावाची ' जडण घडण होत होती. प्रकृतीचं अस्वास्थ्य, आर्थिक विवंचना, दत्तक बहिणीचं प्रेम गोरगरिबांचे अश्रू पुसण्यासाठी तत्पर असलेले डॉ. देव, शिरोड्यातला सौंदर्यानं निथळलेला निसर्ग, तेथील अज्ञान, दारिद्र्य आणि धर्मभोळेपणा, हरिभाऊ केशवसुत–आगरकर इत्यादींच्या साहित्याने उत्पन्न झालेली सामाजिकजाणीव कोल्हटकर–गडकऱ्यांच्या लेखनांचा प्रभाव इत्यादी अनेक गोष्टींमुळे त्यांच्या संवेदन स्वभावा'ची जडण घडण होत होती, हे सवेदन स्वभावाचे रूप त्यांच्या लेखनामागे आहे. १९३० पर्यंतचे लेखन त्यांच्या उमेदवारीच्या काळाचे निदर्शक आहे. १९३०मध्ये त्यांचा ' नवमल्लिका ' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आणि त्याच

वर्षी त्यांची ' हृदयाची हाक ' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. १९३० ते ४२ च्या दरम्यान भाऊसाहेबांनीं कथा, कादंबरी आणि लघुनिबंध हे तीन लेखन प्रकार प्रामुख्याने हाताळले.

१९३० ते ४२ पर्यंतचे त्यांचे कथा-कादंबऱ्यादी ललितलेखन जेव्हा आपण विचारात घेतो तेव्हा प्रथम जाणवते ते हे की त्यांचा कुतूहलविषय मध्यमवर्ग-पांढरपेशा मध्यम वर्ग हाच होता. या वर्गाची सुख दुःखे, त्यांची स्वप्ने, त्यांच्या आशा-आकांक्षा. त्यांचे भ्रम, त्यांचे पराभव, त्यांचे ग्रह आणि आग्रह यांचे भाऊसाहेबांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतून चित्रण केले. आणि असे घडणे अपरिहार्यच होते. पांढरपेशा वर्गाच्या पलीकडं जाऊन, श्रमजीवी वर्गाचं चित्रण करावं असे त्यांना वाटत नव्हते असे नाही. पण तेच म्हणतात त्याप्रमाणे, कोणत्याहीं चित्रणाला आवश्यक असलेली मोहक अथवा दाहक अनुभूती वरवरच्या संपर्कातून लाभत नाही. केवळ सहानुभूती बाळगून मध्यमवर्गीय लेखक श्रमजीवी वर्गाविषयी लिहू लागला तर त्याचे लेखन दुबळे होईल. म्हणून खांडेकर लिहितात, थोडयाफार फरकात बोलल्या जाणाऱ्या कोकणी बोली, विविध श्रमजीवी वर्गाचं कौटुंबिक व दैनंदिन जीवन, त्यांच्या चालीरीती, खाणंपिणं, घराच्या किंवा झोपडीच्या चार भिंतींनाच ठाऊक असणारी ' सुखदुःखं ' यांच्याशी माझा इतका अल्प परिचय होता की, माझ्या अनुभवाने घालून दिलेल्या लक्ष्मणरेषेबाहेर मी गेलो असतो तर अपयशाखेरीज माझ्या पदरात काहीच पडलं नसतं.' हे म्हणणे खरंच होते. म्हणून तर ' हृदयाची हाक ' पासून ते ' क्रौंचवध ' या (१९४२) कादंबरीपर्यंत त्यांनी मध्यमवर्गच चित्रित केला आहे.

शहरात राहून सुखासीन जीवन जगण्यापेक्षा खेडयात जाऊन राष्ट्रसेवा करीत राहणारा सुधाकर (कांचनमृग) देशसेवेच्या प्रेरणेने भारावून जाऊन, सतेज वृत्ती मरगळून जाव्यात अशा खेडयात मास्तरकी करीत राहणारे भाऊसाहेब (उल्का) एकमेकांशी प्रेमाचा काडीमात्र संबंध न ठेवणाऱ्या गरीब श्रीमंताच्या दोन जगांत मोकळेपणानी जर कुणी संचार करू शकतील तर तो मध्यमवर्गच अशी भावना बाळगणारी सुलभा (हिरवा चाफा), हरतऱ्हेच्या विषमतेची पूजा करणारी समाजव्यवस्था ही सर्वांत मोठी राक्षसीण आहे असे सांगणारा अभय (पांढरे ढग) कालिदास-भवभूती, कन्या आणि सतार यांच्या विश्वात रंगलेले, भूतकाळाशी नाते असलेले दादासाहेब (क्रौंच वध) इत्यादी पात्रे मध्यमवर्गातीलच! मध्यमवर्गात भिन्नभिन्न स्तर आहेत. त्यापैकी एका स्तराला वाटते आहे की, आपण अगदी वेगळे आहोत. पाश्चिमात्य विद्या, पाश्चिमात्य आचार-विचार यांच्या प्रभावाखाली असलेला हा स्तर वेगळेपणाची भावना जोपाशीत आहे तर एक स्तर अतिशय निष्क्रीय आहे. त्याला सुरक्षिततेची हमी हवी. या परंपराप्रिय,

येईल त्या परिस्थितीशी जुळवून घेणाऱ्या स्तराला नवे काही नकोच आहे. आणि आणखी एक स्तर आहे तो ध्येयवाद्यांचा, दारिद्रय पूजकांचा. त्याला मूल्यांची जपणूक करावी असे वाटते. जे परिवर्तन घडून येत आहे त्यामुळे 'माणूसकी' नष्ट होत आहे, मूल्ये कोसळली आहेत असे या स्तराला वाटते. म्हणून तर 'अश्रू' कादंबरीतील शंकर मध्यमवर्गातील विशिष्ट स्तरांचा प्रतिनिधी म्हणून येतो. ते लिहितात, "शंकर गरीब आहे, दुबळा आहे." आजच्या व्यवहारी जगाशी टक्कर मारण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी नाही. पण तो मध्यमवर्गाचा खराखुरा प्रतिनिधी आहे. अनेक शतकांच्या संस्कृतीचा सुगंध हृदयात जपून ठेवून तो वावरत आहे. भोवताली जीवनाला आलेली बाजाराची कळा पाहात आहे. या बाजारात देशभक्तांपासून व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांनी आपापली मोठी दुकाने थाटलेली त्याला दिसत आहेत. पण तो स्वतःचे दुकान तिथे मांडू इच्छित नाही. असे दुकान मांडणाऱ्याला तिथे आज ना उद्या आपला आत्माही विकावा लागतो हे त्याला पुरेपूर ठाऊक आहे. जीवनावरील श्रद्धा ढासळावी असे अनेक अनुभव त्याला येतात. पण तो मनाशी सारखे घोकीत आहे–'मनुष्य स्वप्नांवर जगतो. मनुष्य ध्येयांवर जगतो. अन्नाइतकीच ही श्रद्धाही आवश्वक आहे." खांडेकर मनाने या स्तरातील माणसात गुंतले आहेत. त्यामुळे त्यांच्या कथा–कादंबऱ्यांतून या 'स्तरां'तील जी माणसे आढळतात ती ती खांडेकरांचा आत्मप्रत्यय, त्यांची विचारपद्धती स्वीकारूनच कथा-कादंबऱ्यांच्या पटावरून वावरू लागतात. कथा-कादंबरीतील पात्रांना स्वतंत्रपणे जगू द्यावे विचार करू द्यावे ही अपेक्षा आजची. पण या कालखंडातील लेखन त्या त्या लेखकाच्या विचाराचे, भावनांचे वाहक बनत असे. या कालखंडातील कथा-कादंबरीचा तो सहजधर्म होता. म्हणून तर खांडेकरांचे ललितलेखन वाचीत असताना वाटत राहते की खांडेकर या 'स्तरा'शी नाते ठेवून हा जीवनव्यवहार न्याहाळीत आहेत. मध्यमवर्गातील या विशिष्ट 'स्तरा'चा त्यांना अभिमान आहे.

हरिभाऊंनीही पांढरपेशा मध्यमवर्गीय कुटुंबाचे चित्रण केले. त्यांनी स्त्रीची परवशता आणि स्त्रीदास्य विमोचनाची आवश्यकता लक्षात आणून दिली. रघुनाथ (पण लक्षात कोण घेतो), भाऊ (मी), चंद्रशेखर (कर्मयोग) इत्यादी नायक त्यांच्या कादंबऱ्यांतून आढळतात. ते सगळे ध्येयवादी आहेत. आपला समाज आहे त्यापेक्षा अधिक सुंदर आणि सुखी बनविण्याची धडपड हा त्यांच्या आत्मिक जीवनाचाच नव्हे तर व्यावहारिक जीवनाचा भाग आहे. इंग्रजी अंमलापासून १९२० पर्यंत मध्यमवर्गाला प्रतिष्ठा होती. नवसमाजरचनेचे सुकाणू त्यांच्या हाती होते. विद्येकरिता विद्यासंपादन करावयाची पण तिचा उपभोग उपभोगाकरिता करावयाचा नाही अशी व्रतस्थ वृत्ती या वर्गाजवळ होती. टिळक आगरकरांचा

स्वार्थत्यागाचा व ध्येयवादाचा आदर्श या वर्गाजवळ होता. पण १९२० नंतर मध्यमवर्ग हळूहळू विसकटत चालला. आता हे खरे आहे की १९२० पासून १९४२ पर्यंतच्या कालखंडात अखंड धगधगत राहिलेल्या यज्ञकुंडात ज्यांनी पैशाची, प्रतिष्ठेची, संसारसुखाची किंबहुना सर्वस्वाची आहुती दिली ते सर्व तरुण या मध्यमवर्गातलेच. पण दुसऱ्या महायुद्धानंतर ही स्थिती पार पालटली. संकुचितपणाचे घरटे सोडून पांढरपेशा मध्यमवर्गीय माणसांनी गरिबांची सेवा करण्यासाठी, दीन-दुबळ्यांचे अश्रू पुसण्यासाठी अफाट जगात उडी घेतली होती. त्या सर्वांना एका विचित्र भावनेने घेरले. दुसऱ्या महायुद्धानंतर महागाई भडकली आणि मध्यमवर्गाचा ध्येयवाद या धगीत होरपळून गेला. समाजाच्या बौद्धिक आणि नैतिक विकासाचा केन्द्रबिंदू असलेला, समाज पुरुषाचा कणा असलेला हा वर्ग दुःखांनी, मनोभंगांनी पार पोखरला. मध्यमवर्गाचे एकसंध रूप एकेकाळी होते ते अनेक स्तरीय झाले आणि या स्तरास्तरातच विसंवाद निर्माण झाला. तरी देखील मध्यमवर्गातील एक स्तर असा होता की त्या वर्गाला काही जपावे, मूल्यनिष्ठा आवश्यक आहे असे वाटत होते. खांडेकरांच्या 'अश्रू' मधील शंकर याच 'स्तरां'तून वाढलेला आहे. ते म्हणतात, "स्वतःच्या चिमुकल्या ध्येयवादाच्या धगीने शंकराचे हात होरपळतात. त्या दुःखाने त्याच्या डोळ्यांतू अश्रू ठिबकतात. पण ते अश्रू हेच तो आपले वैभव मानतो. त्या ध्येयवादाची धास्ती घेऊन तो पळून जात नाही." हे जरी खरे असले तरी मध्यमवर्ग आर्थिक दृष्टया आणि सांस्कृतिक दृष्टया विघटित झाला होता यात शंका नाही. या विघटित मध्यमवर्गाच्या एका 'स्तरा'ची वेदना खांडेकरांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतून रंगविली आहे. हे चित्रण अप्रमाणिकपणें केले आहे असे कुणालाच म्हणता येणार नाही.

१९४२ पर्यंतच्या मध्यम वर्गाच्या या विशिष्ट स्तराच्या वेदना वेगळ्या होत्या. या वर्गाला वाटत होते आपण आपले संकुचित जीवन सोडून समाजसेवेचे नवे व्रत स्वीकारले पाहिजे. आपल्या जीवन विषयक आणि समाजविषयक सर्व कल्पना पांढऱ्या ढगासारख्या झाल्या आहेत. याची जाणीव या वर्गाला झाली होती. म्हणून त्याला वाटत होते की, आता 'पांढरे ढग' होण्याऐवजीं 'जीवन' देणाऱ्या काळ्या ढगांची भूमिका केली पाहिजे. या वर्गाच्या हेही लक्षात आले की, समाज सेवेचे व्रत स्वीकारणाऱ्या व्यक्तीला कौटुंबिक पाश, आर्थिक जबाबदाऱ्या, प्रीतिपाश जखडून ठेवतात. एका अर्थाने या मध्यमवर्गाच्या मर्यादा आहेत. 'पांढरे ढग' या कादंबरीत 'अभय'ची व्यक्तिरेखा निर्माण करून खांडेकरांनी मध्यमवर्गीय वेदनेला मुखर केले आहे. हाच अभय ओळखीचा वाटत नाही. अशीं सौ. कुसुमावती देशपांडे यांची तक्रार होती. पण खांडेकरांचा प्रश्न असा होता की "अभय का ओळखीचा वाटू नये ?" कारण त्यांच्या मते अभय हा मध्यम वर्गातील ध्येयप्रवण

येईल त्या परिस्थितीशी जुळवून घेणाऱ्या स्तराला नवे काही नकोच आहे. आणि आणखी एक स्तर आहे तो ध्येयवाद्यांचा, दारिद्र्य पूजकांचा. त्याला मूल्यांची जपणूक करावी असे वाटते. जे परिवर्तन घडून येत आहे त्यामुळे 'माणूसकी' नष्ट होत आहे, मूल्ये कोसळली आहेत असे या स्तराला वाटते. म्हणून तर 'अश्रू' कादंबरीतील शंकर मध्यमवर्गातील विशिष्ट स्तरांचा प्रतिनिधी म्हणून येतो. ते लिहितात, "शंकर गरीब आहे, दुबळा आहे." आजच्या व्यवहारी जगाशी टक्कर मारण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी नाही. पण तो मध्यमवर्गाचा खराखुरा प्रतिनिधी आहे. अनेक शतकांच्या संस्कृतीचा सुगंध हृदयात जपून ठेवून तो वावरत आहे. भोवताली जीवनाला आलेली बाजाराची कळा पाहात आहे. या बाजारात देशभक्तांपासून व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांनी आपापली मोठी दुकाने थाटलेली त्याला दिसत आहेत. पण तो स्वतःचे दुकान तिथे मांडू इच्छित नाही. असे दुकान मांडणाऱ्याला तिथे आज ना उद्या आपला आत्माही विकावा लागतो हे त्याला पुरेपूर ठाऊक आहे. जीवनावरील श्रद्धा ढासळावी असे अनेक अनुभव त्याला येतात. पण तो मनाशी सारखे घोकीत आहे–'मनुष्य स्वप्नांवर जगतो. मनुष्य ध्येयांवर जगतो. अन्नाइतकीच ही श्रद्धाही आवश्वक आहे." खांडेकर मनाने या स्तरातील माणसात गुंतले आहेत. त्यामुळे त्यांच्या कथा–कादंबऱ्यांतून या 'स्तरां'तील जी माणसे आढळतात ती ती खांडेकरांचा आत्मप्रत्यय, त्यांची विचारपद्धती स्वीकारूनच कथा-कादंबऱ्यांच्या पटावरून वावरू लागतात. कथा-कादंबरीतील पात्रांना स्वतंत्रपणे जगू द्यावे विचार करू द्यावे ही अपेक्षा आजची. पण या कालखंडातील लेखन त्या त्या लेखकाच्या विचाराचे, भावनांचे वाहक बनत असे. या कालखंडातील कथा-कादंबरीचा तो सहजधर्म होता. म्हणून तर खांडेकरांचे ललितलेखन वाचीत असताना वाटत राहते की खांडेकर या 'स्तरा'शी नाते ठेवून हा जीवनव्यवहार न्याहाळीत आहेत. मध्यमवर्गातील या विशिष्ट 'स्तरा'चा त्यांना अभिमान आहे.

हरिभाऊंनीही पांढरपेशा मध्यमवर्गीय कुटुंबाचे चित्रण केले. त्यांनी स्त्रीची परवशता आणि स्त्रीदास्य विमोचनाची आवश्यकता लक्षात आणून दिली. रघुनाथ (पण लक्षात कोण घेतो), भाऊ (मी), चंद्रशेखर (कर्मयोग) इत्यादी नायक त्यांच्या कादंबऱ्यांतून आढळतात. ते सगळे ध्येयवादी आहेत. आपला समाज आहे त्यापेक्षा अधिक सुंदर आणि सुखी बनविण्याची धडपड हा त्यांच्या आत्मिक जीवनाचाच नव्हे तर व्यावहारिक जीवनाचा भाग आहे. इंग्रजी अंमलापासून १९२० पर्यंत मध्यमवर्गाला प्रतिष्ठा होती. नवसमाजरचनेचे सुकाणू त्यांच्या हाती होते. विद्येकरिता विद्यासंपादन करावयाची पण तिचा उपभोग उपभोगाकरिता करावयाचा नाही अशी व्रतस्थ वृत्ती या वर्गाजवळ होती. टिळक आगरकरांचा

स्वार्थत्यागाचा व ध्येयवादाचा आदर्श या वर्गाजवळ होता. पण १९२० नंतर मध्यमवर्ग हळूहळू विसकटत चालला. आता हे खरे आहे की १९२० पासून १९४२ पर्यंतच्या कालखंडात अखंड धगधगत राहिलेल्या यज्ञकुंडात ज्यांनी पैशाची, प्रतिष्ठेची, संसारसुखाची किंबहुना सर्वस्वाची आहुती दिली ते सर्व तरुण या मध्यमवर्गातलेच. पण दुसऱ्या महायुद्धानंतर ही स्थिती पार पालटली. संकुचितपणाचे घरटे सोडून पांढरपेशा मध्यमवर्गीय माणसांनी गरिबांची सेवा करण्यासाठी, दीन-दुबळ्यांचे अश्रू पुसण्यासाठी अफाट जगात उडी घेतली होती. त्या सर्वांना एका विचित्र भावनेने घेरले. दुसऱ्या महायुद्धानंतर महागाई भडकली आणि मध्यमवर्गाचा ध्येयवाद या धगीत होरपळून गेला. समाजाच्या बौद्धिक आणि नैतिक विकासाचा केन्द्रबिंदू असलेला, समाज पुरुषाचा कणा असलेला हा वर्ग दुःखांनी, मनोभंगांनी पार पोखरला. मध्यमवर्गाचे एकसंध रूप एकेकाळी होते ते अनेक स्तरीय झाले आणि या स्तरास्तरातच विसंवाद निर्माण झाला. तरी देखील मध्यमवर्गातील एक स्तर असा होता की त्या वर्गाला काही जपावे, मूल्यनिष्ठा आवश्यक आहे असे वाटत होते. खांडेकरांच्या 'अश्रू' मधील शंकर याच 'स्तरां'तून वाढलेला आहे. ते म्हणतात, "स्वतःच्या चिमुकल्या ध्येयवादाच्या धगीने शंकराचे हात होरपळतात. त्या दुःखाने त्याच्या डोळ्यांतू अश्रू ठिबकतात. पण ते अश्रू हेच तो आपले वैभव मानतो. त्या ध्येयवादाची धास्ती घेऊन तो पळून जात नाही." हे जरी खरे असले तरी मध्यमवर्ग आर्थिक दृष्ट्या आणि सांस्कृतिक दृष्ट्या विघटित झाला होता यात शंका नाही. या विघटित मध्यमवर्गाच्या एका 'स्तरा'ची वेदना खांडेकरांनी आपल्या कथा-कादंबऱ्यांतून रंगविली आहे. हे चित्रण अप्रमाणिकपणे केले आहे असे कुणालाच म्हणता येणार नाही.

१९४२ पर्यंतच्या मध्यम वर्गाच्या या विशिष्ट स्तराच्या वेदना वेगळ्या होत्या. या वर्गाला वाटत होते आपण आपले संकुचित जीवन सोडून समाजसेवेचे नवे व्रत स्वीकारले पाहिजे. आपल्या जीवन विषयक आणि समाजविषयक सर्व कल्पना पांढऱ्या ढगासारख्या झाल्या आहेत. याची जाणीव या वर्गाला झाली होती. म्हणून त्याला वाटत होते की, आता 'पांढरे ढग' होण्याऐवजीं 'जीवन' देणाऱ्या काळ्या ढगांची भूमिका केली पाहिजे. या वर्गाच्या हेही लक्षात आले की, समाज सेवेचे व्रत स्वीकारणाऱ्या व्यक्तीला कौटुंबिक पाश, आर्थिक जबाबदाऱ्या, प्रीतिपाश जखडून ठेवतात. एका अर्थाने या मध्यमवर्गाच्या मर्यादा आहेत. 'पांढरे ढग' या कादंबरीत 'अभय'ची व्यक्तिरेखा निर्माण करून खांडेकरांनी मध्यमवर्गीय वेदनेला मुखर केले आहे. हाच अभय ओळखीचा वाटत नाही. अशीं सौ. कुसुमावती देशपांडे यांची तक्रार होती. पण खांडेकरांचा प्रश्न असा होता की "अभय का ओळखीचा वाटू नये ?" कारण त्यांच्या मते अभय हा मध्यम वर्गातील ध्येयप्रवण

तरुणांचा प्रतिनिधी आहे. वडील माणसांच्या समाधानासाठी किंवा कुटुंबाचा डोलारा सांभाळण्यासाठी आपल्या ध्येयाचा चोळा मोळा करायला तो तयार नाहीं. नाही. उलट अभयला जिने लहानाचे मोठे केलेले असते, प्रकृतीची पर्वा न करता त्याला शिक्षण दिलेले असते, त्या अक्काला-तिच्यापेक्षा अधिक प्रिय व्यक्ती जगात नसूनही–सोडून अभयला दूर जावे लागते. कुटुंब हा जसा नकळत तरुण पिढीचा तुरुंग होऊ शकतो. तशा निर्जीव संस्था तरुणांना कैदखान्यासारख्या वाटतात. नवे विचार मांडण्यासाठी अभयला संस्थांच्या बुरसट बेड्या तोडून मुक्त व्हावे लागते. यौवनसुलभ प्रीतीचे फूलही खुडून टाकावे लागते. आपल्या जीवनात आलेल्या लता, माला. प्रमिला या तिन्ही तरुणींची जगे निराळी आहेत हे लक्षात घेऊन अभय ही प्रीतिबंधने तोडून टाकतो. 'पांढरे ढग' मध्ये जसा अभय तसा 'क्रौंचवध' या कादंबरीत 'दिनकर' आपल्याला भेटतो. प्रीती, कीर्ती बाजूला सारून दिनकर रामगड संस्थानच्या चळवळीत भाग घेतो, शेतकरी–मजुरांचे नेतृत्व करतो आणि तुरुंगवासही भोगतो. 'अश्रू' मध्ये खांडेकरांना मध्यमवर्गाच्या अंतःकरणात सलत असलेली पराभवाची व्यथा जाणवते, ते लिहितात, 'अश्रू' ही एक साधीसुधी कहाणी आहे. आजकालच्या मध्यमवर्गात घरोघर घडणारी याना त्या रूपाने बहुतेक पांढरपेशांच्या अनुभवाला येणारी. गेल्या दहा बारा वर्षात या वर्गाची जी दुर्दशा झाली आहे तिचे चित्रण करणारी प्रामाणिकपणे जगू इच्छिणाऱ्या आजच्या माणसाच्या मानसिक कुचंबणेवर प्रकाश टाकणारी " मध्य-वर्गाच्या पराभवाचे स्वरूप तरी काय आहे ? जीवनाचे कोणतेही क्षेत्र घ्या तेथे मूल्यनिष्ठेला, ध्येयवादाला काहीच अर्थ उरला नाहीं. तत्त्वनिष्ठ आणि ध्येय वादी व्यक्तींची संख्या घटत चालली आहे. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यापासून वंचित झालेल्या या वर्गाला मानसिक कुचंबणा सोसावी लागते आहे, आर्थिक बळाभावी त्यांच्या आकांक्षांना मर्यादाच पडल्या आहेत. भाऊसाहेब लिहितात. " गेल्या दहा बारा वर्षांतल्या कुचंबणेने मध्यम वर्गात एक निराळचाच प्रकारचा नास्तिक जन्माला आला आहे. त्याचा देवावर विश्वास नाही, त्याची माणसावर श्रद्धा नाही. त्याला परलोक पटत नाही. इहलोकात काही राम आहे. असे वाटत नाही. जीवनाचे, त्यागाचे, प्रीतीचे तो पावित्र्य जाणीत नाही. एक प्रकारचा सर्वव्यापी नास्तिकवाद (**nihilism**) बहुसंख्य तरूणांना ग्रासू पाहात आहे " ( अश्रू पृ. ३०७ ) याचा अर्थ मध्यमवर्ग सर्व क्षेत्रात पराभूत झाला आहे. त्या पराभवाचे शल्य त्यांच्या मनाला खुपत राहाते. खांडेकरानाही ते खुपते. त्यांना वाटते की भूतकालात गुंतून राहण्याऐवजी मध्यमवर्गाने वर्तमानाला सामोरे जायला हवे आणि नव्या काळाची आव्हाने स्वीकारली पाहिजेत. मध्यमवर्गालाही बदलत्या काळाची पावले ओळखूनच पुढे जायला हवे अन्यथा 'शंकर'प्रमाणे त्याच्याही वाटचाला दुःखे येणे क्रमप्राप्त आहे.

तसे खांडेकर मध्यमवर्गाच्या अनुभवविश्वाचे प्रामाणिकपणे चित्रण करीत आहेत. ' हृदयाची हाक ' पासून ' अश्रू ' पर्यंतच्या कादंबऱ्या वाचताना किंवा ' नवमल्लिका ' पासून ते ' ढगाआडचं चांदणं ' पर्यंतचे कथासंग्रह वाचताना खांडेकर ' मध्यमवर्गा'ला भोगाव्या लागलेल्या दुःखांची, पराभवाची मीमांसा करीत आहेत असे वाटते. मध्यमवर्गाची मानसिक आणि आर्थिक दुरवस्था, कुटुंब व्यवस्थेतील मोडतोड, तरुण पिढीची दिशाहीनता, जुन्या श्रद्धास्थानांचा विध्वंस, नव्या पूजास्थानांचा अभाव, निराधारपणा, अगतिकता इ. विकोपाला गेलेल्या मध्यमवर्गाच्या दुखण्यांचे चित्रण त्यांनी कथा–कादंबऱ्यातून जाणीवपूर्वक केले आहे. मध्यमवर्गाचे भाष्यकार भाऊसाहेबच ! त्यांची मध्यमवर्गाच्या भूमिकेबद्दल व समाजरचनेतील स्थानाबद्दल एक निश्चित कल्पना आहे. आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टया विघटित झालेल्या मध्यमवर्गाने माणुसकीचा दिवा पिढयान्‌पिढया हातात धरला आहे. आणि तो विझू न देण्याची जबाबदारीही त्याचीच अशी त्यांची भावना आहे म्हणून ते म्हणतात, " माणुसकीचा आधार एकच आहे. तो म्हणजे संस्कृतीची सारी मूल्ये सांभाळण्याकरता धडपडणारा, तडफडणारा सामान्य माणूस, ज्याला विशेष चांगले असे काही करता येत नाही, पण वाईट करताना ज्याचा हात कचरल्याशिवाय राहणार नाही असा सामान्य माणूस, असा माणूस भारतीय संस्कृतीने निर्माण केला. त्याची परंपरा मध्यमवर्गाने चालविली. बाह्यरूप कितीही बदलले तरी ती परंपरा अखंड ठेवणे आणि विकसित करणे यातच त्याच्या आयुष्याचे सार्थक, समाजाचे कल्याण आणि मानवतेचे अंतिम हित आहे."

मध्यमवर्गाने आपले बुद्धि–बळ समाजहितार्थ वेचावे, मूल्ये जपावीत, मूल्यनिष्ठा वाढवावी ही एकदा भूमिका स्वीकारली की आपल्या लेखनातून ' सनातनमूल्यांचा पुरस्कार करणे त्यांना अपरिहार्य वाटले. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून मूल्ये बाळगून जगणारी माणसे अधिक आढळतात. तसेच कथा–कादंबरी गुंफताना त्यांनी जे विशिष्ट प्रमेय किंवा सूर निवडलेले असते ते प्रमेय किंवा सूत्र त्यांच्या मूल्यकल्पनेशी संबद्ध असते., ' उल्का ' या कादंबरीत मुख्य सूत्र आहे ते असे ' कुठलीही ध्येये म्हणजे उदात्त स्वप्ने आणि असली स्वप्ने सहजासहजी सत्यसृष्टीत अवतरत नाहीत. त्यामुळे त्या स्वप्नांत गुंगून जाणाऱ्याच्या वाटयाला या नाही त्या रूपाने दुःख येतेच येते' चंद्रकांत, उल्का आणि भाऊसाहेब यांच्या वाटयाला दुःख येतेच. फक्त त्याचे स्वरूप भिन्न भिन्न आहे. ध्येयासाठी भाऊंना दारिद्र्याबरोबर संसार करावा लागतो, मानहानी सोसावी लागते. चंद्रकांताला गोरगरिबांचे दु.ख वेशीवर टांगण्यासाठी दुःख भोगावे लागते. ' क्रौंचवध ' या कादंबरीचे सूत्र आहे की उद्याचे नवे जग सुखी व्हायचे असेल तर जीवनात भोग आणि त्याग, काव्य आणि कृती, बुद्धी आणि भावना यांचा सुंदर मेळ साधला

पाहिजे. हा मेळ नसला की जीवन भेसूर होते. दादासाहेब, सुलोचना, दिनकर आणि भगवंतराव यांच्या परस्परसंबंधातून कथा फुलवीत नेत असता त्यांना या सूत्राचा कधीच विसर पडत नाही. जुन्या काळातील ' ययाती'ची कथा निवडली असली तरी त्यांच्यासमोर आजचाच ' ययाती ' आहे.

आजचा 'ययाती' विविधसुखे मिळूनही अतृप्त आहे यात शंकाच नाही. तो नवनव्या सुखांच्या मागे आंधळेपणाने धावत आहे. सुख आणि आनंद यांच्यातील फरक त्याला कळत नाही. सुख– क्षणभर मिळणारे शरीरसुख हेच चिरंतनसुख नानून ते सतत कसे मिळेल याचे तो चिंतन करीत आहे. त्याच्या भावविश्वात अन्य कुठलेही मूल्य नाही. केवळ 'कादंबरी' एखाद्या सूत्राभोवती गुंफिलेली असते असे नव्हे तर त्याची कथादेखील एखादे ' सूत्र ' स्पष्ट करीत असते. सत्ता आणि संपत्ती यांच्यातले हालाहल पचवायला यतिवृत्तीची माणसे लागतात पण आज माणसे आहेत ती सत्ता आणि संपत्ती यांची लूट आरंभिणारी ! हे सूत्र स्पष्ट करण्यासाठी ते ' अस्थी ' ही कथा लिहितात. त्यातला संपतराव तरुणपणी अंतः प्रेरणेने चळवळीत पडला आहे पण सत्ता आणि संपत्ती हाती येताच तो भोगलोलुप, स्वार्थी बनतो. ' सांजवात ' कथेतील आई म्हणते " हवा तो देव तू मान. पण ज्याला देव म्हणशील त्याच्याबर भाव ठेव " मूल्यनिष्ठा ही त्यांच्या लेखना-मागची प्रेरक शक्ती आहे. ' जर जवळ सांगण्यासारखे काही नसले तर मग लिहायचे तरी कशाला ' अशी त्यांची भूमिका आहे. त्यामुळे त्यांच्या कथा-कादंबरीला प्रयोजन आहे. तिला प्रयोजनवती कादंबरीचे रूप (**Novel of purpose**) प्राप्त झाले आहे तसे प्रत्येक कृतीला स्वतःचे असे एक प्रयोजन असतेच असते. 'पण प्रयोजनवती कादंबरी' या संकल्पनेला एक निराळा अर्थ अभिप्रेत आहे. या प्रकारच्या कादंबरीत लेखक स्वतःशी आपल्याला सांगावयाचे आहे तो विचार निश्चित करतो आणि तो परिणामकारकपणे मांडता यावा अशाच व्यक्ती तो उभ्या करतो आणि असेच प्रसंग रंगवितो.

खांडेकरांनीच एके ठिकाणी म्हटले आहे, " जीवन जसे आहे तसे रंगवून माझं समाधान होत नाही. ते कसं असावं याचं चित्रणही मला तितकच आवडतं. हरिभाऊंची कादंबरी लेखनामागील भूमिकाही वेगळी नव्हती. पण त्यांना ' माणसांत ' रस होता. यमू, रघुनाथ, शंकरमामंजी, श्रीधरपंत, भावानंद, यशवंतराव, रामराजा, मेहेरजान, नानासाहेब इ. कितीतरी व्यक्ती विविध प्रकृती असलेल्या, विविध प्रवृत्ती असलेल्या ! पण त्यातले माणूसपण हरिभाऊंना सहज गवसते. खांडेकरांना व्यक्तीपेक्षा ते जो विचार मांडतात त्यात अधिक ' रस ' आहे आणि या पात्रांनी मांडलेला विचार हा अखेर खांडेकरमास्तरांचाच विचार आहे. कोकणातले भयंकर अज्ञान व अठरा विश्वे दारिद्र्य पाहून अस्वस्थ झालेल्या

खांडेकरांना वाटले की, शिक्षणाशिवाय अज्ञान दूर होणार नाही आणि समतेवर आधारलेल्या कोणत्यातरी प्रकारच्या संस्कृतीशिवाय गरिबी हटणार नाही खांडेकरांचे हे विचार त्यांची पात्रे सांगत राहिली. ' दोन मने 'मधील श्री म्हणतो, " तळ्यात एवढं पाणी असताना हरिजनांना प्यायला सुद्धा चांगलं पाणी मिळत नाही. समाजातले सारे अन्याय असेच आहेत ! ते नाहीसे करायचे म्हणजे गुलामांनी आपल्या हक्कांकरिता लढले पाहिजे " 'पांढरे ढग' मध्ये अभय सांगतो, " प्रगती म्हणजे सुखवाद आणि ध्येयवाद यांच्या युद्धात रक्तबंबाळ झालेल्या ध्येयाला मिळणारा विजय " किंवा ' क्रौंचवध ' मधील दिलीप म्हणतो " आमचा आजचा बुद्धिवाद हे सुखवादाचे गोंडस नाव आहे हेच खरे, बुद्धिवादी म्हणविणारा वर्ग गांधीजींच्या चळवळीपासून नेहमी अलिप्त राहिला याचे कारण हेच आहे. गांधीजींच्या तत्त्वज्ञानात सुखवादाला जागा नाही; ही व या तऱ्हेची कादंबरीतील विविध व्यक्तींची भाषणे पाहिली की त्यामागचे खांडेकर साहजिकच जाणवतात. ही सांगण्याची हौस खांडेकरांच्या ठायी असल्यामुळे त्यांच्या कादंबरीच्या रूपावरही त्याचा परिणाम झाला आहे. एकतर त्यांची पात्रे त्यांच्या विचाराची वाहक बनतात आणि दुसरे असे की ते 'संवादा'पेक्षा निवेदनावर भर देतात. मग ही निवेदने त्या पात्रांच्या पत्रांतून वा दैनंदिनीमधील नोंदीमधून केली जातात. या निवेदनात राजकारण, समाजकारण, गांधीवाद, समाजवाद, कला प्रेम इत्यादी कितीतरी विषय आलेले असतात. पत्रे दैनंदिनी यांना खांडेकरी कादंबरीत एका आगळेच स्थान असते.ही पत्रे वा दैनंदिनीतील उतारे ऐसपैस असतात ती योगायोगाने सापडतात आणि त्यामुळे कादंबरीच्या प्रवाहाला वेगळीच कलाटणी मिळते. काही वेळा ही पत्रे पाद्र्याजवळ दिलेल्या कबुली जबाबासारखी असतात 'पांढरे ढग' या कांदबरीत तर एका प्रकरणाचे नावच आहे 'सहा महिने आणि सहा पत्रे ' या वेगळ्या कादंबऱ्यांतून जी पत्रे येतात त्यात दडविलेली रहस्ये असतात, पापाचा पाढा वाचलेला असतो आणि जीवनाविषयक भाष्येही केलेली असतात. सौ. कुसुमावती देशपांडे यांनी खांडेकरांच्या कादंबरीला होल्डऑलची उपमा दिली आहे. तर उषा हस्तकांना त्यांची कादंबरी डिपार्टमेंटल स्टोअरसारखी वाटते. खांडेकरांच्या कादंबरीत सांगण्यासाठी असलेला भाग कादंबरीच्या कलात्मक रूपाला बाधक ठरतो हे कबूल करावेच लागेल. खांडेकरांच्या कादंबरीची रचनाच मुळी एखाद्या सूत्राचे किंवा प्रमेयाचे स्पष्टीकरण करण्यासाठी झालेली असल्यामुळे त्यांच्या कादंबरीला असे रूप लाभणे अपरिहार्य होते.

खांडेकरांनी ज्या कथा–कादंबऱ्या लिहिल्या त्यामागे त्यांची विशिष्ट अशी वाङ्मयीन भूमिका आहे. तसे ते कलावादी भूमिकेचे विरोधक नाहीत. पण काय सांगायचे यापेक्षा कसे सांगायचे अशी भूमिका एखाद्या ललित लेखकाने घेतली

तर त्याचा अर्थ तो ' तंत्राला' कारागिरीला महत्त्व देतो असाच केला पाहिजे. तंत्राच्या चौकटीत आशय गुदमरून जातो हे खांडेकरांना मान्य आहे. पण तंत्र हे कलाकृतीचे सर्वस्व नव्हे कलाकृतीने जीवनाचे प्रामाणिक दर्शन घडविले पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे ' मी का लिहितो ? ' या प्रश्नाचे उत्तर देताना खांडेकरांनीं म्हटले आहे, ' मी चित्रपट लिहितो ते पोटासाठीं, लघुनिबंध व रूपककथा लिहितो त्या स्वतःच्या आनंदासाठी आणि टीका निबंध, लघुकथा, कादंबऱ्या लिहितो त्या त्या कलेच्या द्वारे जीवनाची सेवा करण्याच्या तत्त्वावर माझी श्रद्धा आहे म्हणून " हे म्हणणे विचारात घेतले तर आपल्या लक्षात येते ते असे कला आणि जीवन यात अतूट संबंध आहे. कलाकृती जीवनाचे दर्शन घडवीत असते, जीवनावर सतत प्रकाश टाकीत असते. म्हणून कलाकृती जीवनाचे अस्सल प्रामाणिक चित्रण करते, ती विकृत चित्रण करीत नाही. अशी ते भूमिका घेतात जीवनाचा दुःख हा अरिहार्य भाग आहे असे ते मानतात आणि या दुःखाचे चित्र ललितकथातून उमटावे अशी त्यांची अपेक्षा आहे. ते म्हणतात, " मनुष्याला पशूहून अधिक उच्च अशा जीवनानुभवाच्या पातळीवर नेणाऱ्या दुःख या घटकाची ज्याच्या वाङमयात सखोलपणे दखल घेतली जात नाही त्या लेखकाला कलेचे संपूर्ण दर्शन झाले आहे असे म्हणता येणार नाही. मनुष्य अंतर्मुख होतो तो जीवनातल्या विविध दुःखांच्या जाणिवेमुळे सोफोक्लिसपासून इब्सेनपर्यंत आणि व्यास वाल्मिकीपासून टॉलस्टॉय डोस्टोव्हस्कीपर्यंत बहुतेक श्रेष्ठ कलावंतांच्या कृती शोकान्तच आहेत; याचे कारण हेच आहे अभिजात, अमर ललित लेखकाच्या कृतीत दुःखाची ही जाणीव सतत प्रतिबिंबित झालेली असते.' ( अभिषेक –पृ.२७) हे तर खरेच आहे की माणूस दुःखचक्रात गरगरत आहे. मानवाचे दुःख चित्रीत करणे हे सगळ्याच कलावंताना आवडते. दुःखाची रूपे विविध आहेत. एका माणसाचे दुःख दुसऱ्यामाणसाच्या दुःखासारखे नसते. काही दुःखे मानवी स्वभावातून उद्‌भावतात तर काही वेळा नियतीच्या लहरीमुळे मानवाला दुःख भोगावे लागते. माणसांच्या दुःखांचे मूळ विशिष्ट समाजरचनेतही असू शकते तर काही वेळा एखाद्या माणसाच्या जीविताशी आपले जीवित जखडलेले असते म्हणूनच केवळ दुःख भोगावे लागते. दुःख लहान मोठे कसेही असो त्याला कलावंताचा स्पर्श झाला की त्याला आगळेच रूप प्राप्त होते.

भाऊसाहेबांना मनुष्याच्या वाट्याला येणारे दुःख सतत आवाहन करीत असते. ध्येयवाद्यांच्या नशिबी दुःखच लिहिलेले असते, या सत्याचा प्रत्यय भाऊसाहेब चंद्रकान्त (उल्का) अभय (पांढरे ढग) दिनकर (क्रौंचवध) इत्यादी व्यक्तिरेखा अभ्यासताना येतो. ' दोन ध्रुव ' मधील वत्सलेला जिकडे तिकडे ध्रुवाच्या जोड्या दिसू लागतात. कला आणि जीवन, पांढरपेशा व कामकरी, भोग आणि त्याग इत्यादी

कितीतरी ध्रुवांइतके भयंकर अंतर असलेल्या जोडचा. या भयानक अंतरामुळेच सर्व दुःखे उत्पन्न झाली आहेत. असे खांडेकरांचे म्हणणे आहे. जे दुर्लभ आहे, त्याचा ध्यास घेतल्यामुळे दुःखाशिवाय दुसरे काय वाटचाला येणार ? परंतु लहानमोठी स्वप्नें पुरी होत नाहीत याचेही दुःख असतेच. दुःखाचे चित्रण करणारी खांडेकरांची कादंबरी शोकात्मिकेच्या पातळीवर जात नाही. ‘ अश्रू ’ पर्यंत खांडेकर ध्येयवादामुळे भोगाव्या लागणाऱ्या दुःखाचे वर्णन प्रामुख्याने करीत होते. ‘ अश्रू ’मध्ये शंकरच्या दुःखाचा विचार करताना त्यांना वाटते की आपण येथे सामान्य. दुबळचा, पराभूत झालेल्या माणसाचे दुःख वर्णन करीत आहोत. त्याच्या दुःखाचे स्वरूप त्यांना जाणवते ते वेगळे आहे. शंकर जे दुःख भोगतो आहे त्याला तो जबाबदार नाही. कारण झपाटचाने बदलू लागलेल्या समाजरचनेचा आणि जीवनमूल्यांच्या विविध संकटाचा तो परिपाक आहे. ते लिहितात, “ येऊ घातलेली क्रान्ती झाडाच्या ज्या फांद्यावर कुऱ्हाड चालवीत होती, त्याच्यावर आम्ही ऐटीत बसून राहिलो, राजकीय संघर्षाची धुंदी, भूतकालाचा अवास्तव अभिमान, जगाचे आणि जीवनाचे स्वरूप वेगाने पालटवून टाकणाऱ्या यंत्रयुगाविषयीचे पुसट ज्ञान इतर समाजातल्या नाना प्रकारच्या घडामोडी व त्यांचे कार्यकारणभाव याबाबत अंगवळणी पडलेली बेफिकिरी अशा अनेक गोष्टींमुळे मध्यम वर्ग असा वागला असेल.” खांडेकरांची दुःखचिकित्सा अचूक आहे. शंकरचे दुःख हे मध्यमवर्गाचे दुःख आहे. त्यामुळे ‘ अश्रू ’ कादंबरीतील दुःख चित्रणाला एक वेगळा सामाजिक संदर्भ प्राप्त होतो. ‘ अश्रू ’नंतर ‘ ययाती ’ लिहीत असताना खांडेकरांच्यासमोर एक वेगळाच प्रश्न उभा होता. ‘ ययाती ’ लिहिण्यामागचे सूत्र कोणते ? संयमाचे सामर्थ्य आणि सौंदर्य हेच ते सूत्र. मन हे पिसाट अश्वाप्रमाणे धावते. पण त्याला संयमाच्या लगामांनीच आवरावे लागते. हे सूत्र योजून ययातीचे लेखन खांडेकर करू लागतात तेव्हा त्यांच्याच लक्षात येते की आपण पुराण कथा घेऊन कादंबरीला रूपकात्मकादंबरीचा धाट देत आहोत. ययाती–शर्मिष्ठा–देवयानी–कच यांच्या परस्परसंबंधातून फुलत गेलेली पुराणकथा कवचासारखी फुटते आणि त्यातून व्यक्त होतो तो खांडेकरांना जाणवलेला वर्तमान ! ते लिहितात, ‘ आजचा मनुष्य केवळ अंध स्वैर आणि क्रूर कामवासनेला बळी पडत आहे असे नाही. त्याचे सर्वच मनोविकार अनिर्बंध आणि अनियंत्रित होऊ पाहात आहेत. त्याच्या विविध वासना उच्छृंखल होत आहेत. यांत्रिक जीवनाने त्याचे समाधान नष्ट केले आहे. महायुद्धाच्या भीषण छायेखाली वावरणाऱ्या जगात तो राहात असल्याकारणाने सुरक्षितपणाच्या भावनेने त्याच्या मनातून पळ काढला आहे. त्यामुळे चोवीस तास कुठल्या ना कुठल्या तरी फुसक्या सुखात मन गुंतवून ठेवण्याखेरीअ आनंदाचा दुसरा मार्ग त्याला आढळत नाही. ” म्हणून त्यांना सुचवावेसे वाटते की मनुष्याची कुठलीही

वासना सदव वासना स्वरूपातच राहिली तर तिचे उन्मादात रूपांतर होण्याचा संभव असतो. तिला कोणत्या तरी बाजूने उदात्ताचा स्पर्श झाला पाहिजे. वर्तमानाचे भान आणून देतांना खांडेकरांनी ययातीची कथा परिवेष म्हणून स्वीकारली आहे. केवळ एक सरळ नीतिपर विचार मांडण्यासाठी ते ययाती–देवयानी शर्मिष्ठेची पुराण कथा निवडीत नाहीत. किंवा या पुराणकथेतील 'ययाती'चे एक वेगळे आकलन या कादंबरीतून मांडीत नाहीत. ते त्यांचे उद्दिष्टही नसावे. मूळ महाभारत कथेत नसलेला कच येतो तोही खांडेकरांची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ! परिचित पुराणकथेचे कवच गळून पडल्यावर वर्तमान पुढे यावा हीच भाऊसाहेबांची इच्छा दिसते. असे नसते तर ययातीला जाळीत सुटलेल्या अतृप्तीच्या दुःखाला व्यापक पटावर भव्य रूप देता आले असते. ही खांडेकरांच्यासारख्या अनेक लेखकांची मर्यादा आहे त्यामुळे हेमिंग्वेला जसे (**old man and the sea**) या कादंबरीतून ' मनुष्याचा नाश होईल पण त्याचा पराभव होणार नाही ' हे जीवन सत्य मांडता आले आणि या कादंबरीला एक तात्त्विक संदर्भ देता आला तसा भाऊसाहेबांनी 'ययाती'ला एक व्यापक तात्त्विक संदर्भ दिला असता तर एक श्रेष्ठ कादंबरी म्हणून तिला मराठी साहित्यात स्थान मिळाले असते. आज तिचे एक चांगली कादंबरी म्हणून जे श्रेय आहे ते हिरावून घेता येणार नाही.

'हृदयाची हाक ' पासून ' अमृतवेल ' पर्यंतच्या कादंबऱ्या वाचीत असताना अनेक प्रश्न उभे राहतात. पहिला प्रश्न असा की ' खांडेकरांची कादंबरी' स्वरूपतः रंजनवादी कादंबरी आहे काय ? प्रा. नरहर कुरुंदकरांचे असे म्हणणे दिसते की आपण बोधवादी आहोत असे म्हणत म्हणत आणि हा बोध रोचक, रंजक करण्याचे काम आपण करीत आहो अशी ' पोज ' घेत खांडेकरांची कादंबरी पुन्हा रंजनात्मक आहे. (धार आणि काठ-पृ. १४८) प्रत्येक कालखंडात रंजनाविषयीच्या कल्पना वेगळ्या असतात. अव्वल इंग्रजी कालखंडात 'मुक्तामाला मंजुघोषा ' धर्तीच्या कादंबऱ्यांचे अमाप पीक आलेले होते, या कालखंडातील वाचकाला पुढे काय ? पुढे काय ? ते जाणून घेण्यासंबंधीचे कुतूहल होते आणि त्याला ' कादंबरीच्या जगात ' आपण वावरत आहोत असा आभास हवा होता. हरिभाऊंनी हे चित्र पालटून टाकले. त्याला अवतीभवतीच्या स्त्री–पुरुषात आणले स्त्री–पुरुषांचे मूळ, तो लेखक मनाने कोणत्या विश्वात वावरत होता त्या विश्वात असणे आवश्यक होते. श्रीमती रमाबाई रानडे यांनी ' पण लक्ष्यात कोण घेतो ?' ही कादंबरी वाचून ही तर आम्हा स्त्रियांची गोष्ट 'अशा आशयाचे जे उद्गार काढले ते विचारात घेतले तर एक गोष्ट स्पष्ट होईल आणि ती म्हणजे वाचकांना आपण पुन्हा तेच जगत आहोत असा अनुभव आणून देणारी कादंबरी रंजक वाटत होती. वामन मल्हारांच्या कादंबरीत देखील पांढरपेशांचे बौद्धिक चर्चेत ' रस

घेणारे जग हे वाचकांचे परिचित जगच होते. फडक्यांनी जी कादंबरी रचली तिचा उद्देशच हा होता की वाचकांसमोर वास्तवात नसलेले पण वास्तवाचे समाधान लाभेल असे कादंबरीकाराच्या किमयेने उभे राहिलेले जग सिद्ध करावे. या संसारात यशापेक्षा अपयश अधिक वाटयाला येते, मानापेक्षा अपमान अधिक सोसावा लागतो, सुखापेक्षा दुःख अधिक भोगावे लागते म्हणून कादंबरीकार वाचकांना प्रतिभेच्या पंखावर आरूढ होऊन एका अपरा सृष्टीत घेऊन जातो आणि या ' अपरासृष्टी'च्या अंगी त्याला तृप्तीचे समाधान देण्याचे सामर्थ्य असते. यामुळे वाचकाला अपरासृष्टीत खेचून नेणाऱ्या शैलीला महत्त्व आले. या अपरा सृष्टीचे कायदे कानू निराळे होते. फडक्यांच्यापेक्षा भाऊसाहेबांची ' अपरासृष्टी ' वेगळी होती. या ' अपरासृष्टीची रचना भाऊसाहेबांची जीवनदृष्टी, त्यांची विचार त्यांची मूल्यनिष्ठा यांच्याशी संवादी आहे. वाचकाला ज्या विश्वाची जाणीव होती तेच विश्व एका वेगळ्या रंगात दृग्गोचर झाले होते. हा ' रंग ' खांडेकरांच्या कल्पनाशक्तीचा रंग होता हे लक्षात घेतले तर खांडेकरांच्या कथा-कादंबऱ्यातील स्त्री–पुरुषांच्या वर्तणुकीचा अन्वयार्थ लागेल.

खांडेकरांच्या कादंबरीतील स्त्रीं–पुरुष कशाची तरी अभिनिवेशाने 'वकिली' करीत असतात, ते जरी पांढरपेशा वर्गातील असले तरी पांढरपेशांच्या कृती उक्तींचा उपहास करीत असतात, किंवा गरिबांच्याविषयी कळवळा व्यक्त करीत असतात आणि ते कृतिशून्य असतात. अशी टीका उषा हस्तकआदी समीक्षकांनी केली आहे. कारण खांडेकरांनी आपल्या कथा–कादंबऱ्यांतून जी ' अपरासृष्टी ' उभी केली आहे. तिची जडण घडण या समीक्षकांनी जाणून घेतलेली नाही· खांडेकरांच्या कादंबऱ्यांच्या घडणींचे घटकतत्त्व ' उदात्तीकरण ' हे आहे. या कालखंडातील मराठी कादंबरीत उदात्तीकरणाची हौस किती मोठ्या प्रमाणात आहे ते सहज तपासून पाहता येईल. या उदात्तीकरणाच्या प्रवृत्तीतून जन्माला आलेल्या व्यक्तींचे जग कादंबरीतून जेव्हा आपल्या समोर येते तेव्हा वाचकांना हवे ते मिळाल्याचे समाधान लाभते. खांडेकरांच्या कादंबरीला म्हणूनच लोकप्रियता लाभते. ' क्रौंचवध' मधील दादासाहेब संस्कृतचे लोकप्रिय प्राध्यापक! त्यांची विद्वत्ता त्यांचे चारित्र्य, त्यांची लोकप्रियता, त्यांचा वचक इत्यादींमुळे त्यांचे चित्र उदात्त वाटते.

" कॉलेज हे सरस्वतीचे मंदिर आहे, आठवड्याचा बाजार नाही " असे मुलांना बजावणारा प्रोफेसर देशसेवेसाठी वैयक्तिक सुखाचा होम करणारा दिनकर नवी दृष्टी आल्यावर नोकरी आणि पैसा यांच्यावर लाथ मारून विद्येचा उपयोग समाजसेवासाठी करण्यासाठी नव्या क्षेत्रात पदार्पण करणारे भगवन्तराव, ' आई

हो ' या संदेशातील गर्भितार्थ आचरणात आणणारी सुलू ही पात्रे उदात्तीकरणाच्या प्रवृत्तीतून जन्माला आली आहेत. हे कुणालाही मान्य होईल. त्यामुळे या व्यक्तींच्या परस्परसंबंधाचे चित्रण असलेली ही कादंबरी वाचताना वाचक जाणीवपूर्वक उभ्या केलेल्या या ' अपरासृष्टी'चा स्वीकार करतो. त्याला हे अवास्तव आहे असे वाटत असले तरी अशा माणसांचे एक जग असावे असे वाटते. त्यामुळेच तो खांडेकरी कादंबरीचा स्वीकार करतो. जे प्रत्यक्षात नसते अशा सृष्टीची तार्किक व्यवस्थाच निराळी मानावी लागते. असे असताना देखील आपण खांडेकरांच्या कादंबरीची वास्तवतेच्या निकषावर चिकित्सा करू लागतो. त्यांच्या कादंबरीतील ' व्यक्ती ' इहलोकातील आहेत की नाहीत, या विषयी मन साशंक होते.

वस्तुत: या सगळ्या व्यक्ती आहेत त्या खांडेकरांच्या मानवसृष्टीतील ! त्यांचे ' चैतन्य ' त्या सृष्टीपुरते त्यांची कादंबरी वाचताना कोणत्याही स्वरूपाचा आनंद होत नाही असे का म्हटले जाते कुणास ठाऊक ? उलट 'एका उदात्त अपरा सृष्टी'चे दर्शन घडल्याचा आनंद लाभत असेलच. म्हणून एक लक्षातच ठेवले पाहिजे की खांडेकरांची कादंबरी ही विशिष्ट कालखंडाची कादंबरी आहे त्या कालखंडातील कादंबरी लेखनाचे गुणदोष खांडेकरांच्या कादंबरीतही आढळणार या कालखंडातील कथा, कविता. कादंबरी, नाटक इ. लेखन स्वप्नरंजनात्मकच होते. भयाण, दाहक वास्तवाचे भान निर्माण करणे या कालखंडातील ललित लेखनाच्या आवाक्याबाहेरचे होते. अश्रू, ययाती, अमृतवेल या कादंबऱ्यांचे लेखन महायुद्धोत्तर कालखंडातले असले तरी प्रवृत्तीने या कादंबरीचे स्वरूप महायुद्धपूर्व कालखंडाशीच संवादी आहे.

उमाचा सद्‌गदित अंतकरणानं निरोप घेणारा शंकर म्हणतो–"न रडण्यापेक्षा रडण्यात अधिक माणुसकी आहे. उमा. माणसानं फार तर स्वत:साठी रडू नये पण दुसऱ्यासाठी त्यानं रडायलाच हवं ! जगात प्रीति, भक्ती, सेवा, त्याग जे जे काही चांगलं पिकतं ते कशामुळं ? कुणा ना कुणाच्या डोळ्यातून हा पाऊस पडत राहतो म्हणूनच ना ? तशीच वेळ आली तर देवाला मी म्हणेन माझी दृष्टी घेऊन जा. पण माझे अश्रू मात्र माझ्यापासून हिरावून घेऊ नकोस." किंवा ययाती मधील देवयानी पुरूला म्हणते–'पुरु हे प्रेम करायला तुला कुणी शिकवलं ? मला हे कुणी लहानपणी शिकविलं असतं, तर फार बरं झालं असतं आता तुझ्यापासून मी ते शिकणार आहे. वडिलांचं वार्धक्य तू आनंदानं घेतलंस, भावासाठी सिंहासनावरचा आपला हक्क तू आनंदानं सोडलास. पुरु, मला दुसरं काही काही नको तुझं हे प्रेम करण्याचं बळ तेवढं मला दे". 'अश्रू'तील ' शंकर ' ' ययाती'तील पुरु ो सगळी उदात्त माणसं ! अशा व्यक्तींचे जग पाहताना वाचक **Sentimental**

बनतो खांडेकरांच्या कादंबऱ्यांच्या लोकप्रियतेचं रहस्य अशा भावविवशप्रिय लेखन पुन्हा पुन्हा वाचणाऱ्या वाचकात शोधता येईल. कारण आज बहुसंख्य माणसांचा अनुभव अगदी निराळा आहे. मनाची शांती म्हणून कुणालाच नाही. सगळीकडे भगभग आणि स्वास्थ्यासाठी चाललेली वणवण. स्वतःच्या दुःखांना कुरवाळीत राहण्याचे वेड त्यांना आहे. क्षुद्र-क्षणिक सुखाच्या मागे धावून धावून थकलेली ही माणसे. यांना खांडेकर कादंबरीच्या अपरासृष्टीत घेऊन जातात. तेथे त्यांना समाधान लाभते, अर्धसत्य वाटतील अशी सुभाषिते धन म्हणून लाभतात.

खांडेकरांच्या कादंबरीचे हे रूपच ओळखले पाहिजे. भाऊसाहेबांनी जया दडकर यांना एक पत्र लिहिले आहे (एकलेखक एक खेडे (पृ.२७–२८) त्याला उत्तर देताना त्यांनी म्हटले आहे, एखादा भाविक भक्त देवळातल्या मूर्तीकडे ज्या भावनेनं पाहातो तीच भावना आयुष्यभर मी साहित्या विषयी बाळगली आहे '' वाचकांनी त्यांच्या साहित्याकडे देवळातील मूर्ती म्हणून भाविकतेनेच पाहिलेले आहे. हे लक्षात न घेता खांडेकरांच्या कादंबऱ्यावर प्रखर हल्ला झाला तो त्यांना अन्याय करणारा आहे.

ललितकथांत जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले असते असे आपण म्हणतो. याचा अर्थ कलावंताला जाणवलेल्या जीवनाचे प्रतिबिंब असा केला पाहिजे. स्वतःचा ठसा व्यक्त न करता जीवनाचे प्रतिबिंब देण्याचे जे लेखक प्रयत्न करतात ते यशस्वी होत नाहीत. कारण जीवनाचे जे दर्शन घडवावे असे त्याला वाटत असते त्या दर्शनात लेखकाचा रंग मिसळलेला असतो. खांडेकर आपल्या कादंबरीतून जे चित्र रेखाटतात ते त्यांच्या अनुभवविश्वातून उमलले आहे. ते सांगतात, ''सर्वजण जीवन जगत असतात. पण प्रत्येकजण आपल्या प्रकृतीप्रमाणे शोध घेतो, अनुभव आत घेतो, मनात रूजवतो. प्रत्येकाच्या पिंडाप्रमाणे त्याला काही गोष्टी भावतात, काही भावत नाहीत. प्रत्येक लेखकाच्या प्रतिभेला या मर्यादा असतात. फडके शृंगारकथा लिहून वाचकांची मनं जिंकीत होते. तसं करण्यामध्ये आर्थिक फायदा-सुद्धा होता पण तो प्रकार मला हाताळता आला नाही किंवा हाताळावा असं वाटलं नाही' (ललित फेब्रुवारी १९७०) प्रत्येक लेखकाला जर अशा मर्यादा असतील तर खांडेकरांच्या मर्यादा असणारच. आपल्या मर्यादांचे भांडवल करू नये. खांडेकरांनी तसे भांडवल केलेले दिसत नाही. आपल्या भूमिकेशी ते प्रामाणिक आहेत त्यांना ललित लेखकाजवळ सामाजिक दृष्टी असणे आवश्यक वाटते. अशी सामाजिक दृष्टी बाळगूनच त्यांनी लिहिले. जीवनाचे दर्शन जसे घडले तसेच कथा कादंबरीतून घडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. महायुद्धानंतर नव्या जाणिवा व्यक्त करणारे साहित्य त्यांनी आवडीने वाचले. पण या वाटेने जाणे त्यांच्या प्रकृतीतच

नव्हते. जे नव्या वाटेने जात होते त्यांचे कौतुक करण्यात ते मागे नव्हते. अशा लेखकाचे व्यक्तिमत्व खुजे आहे असे कसे म्हणता येईल. आपल्या मर्यादांची ज्याला जाणीव आहे आणि श्रेष्ठ जातिवंत लेखनाच्या सामर्थ्याचे ज्याला आकलन होते तो एक संपन्न व्यक्तिमत्व असलेला लेखक होय. प्रा. गोकाकांनी म्हटले आहे' सृष्टीच्या आरंभी शब्द होता आणि शब्द म्हणजेच परमेश्वर असे बायबलमध्ये म्हटले आहे. मला त्यात थोडीशी भर घालावीशी वाटते सृष्टीच्या आरंभी मनुष्य होता व सृष्टीच्या अंती ज्याच्या हृदयात परमेश्वर असेल, असा मनुष्यच असेल. मनुष्याच्या हृदयातील परमेश्वराला जागृत करणारे वाङमयच समाजाचे कल्याण करील' अशा वाङमयाची निर्मिती करणाऱ्या लेखकांची दिंडी निघाली तर त्यात खांडेकरांचा निश्चित समावेश करता येईल.

**भालचंद्र फडके**

१

# एका ध्येयवादी मनाची पार्श्वभूमी

२२६१५ ग्रिं

## खांडेकरांच्या अंतरंगाचा परिचय

श्री. वि. स. खांडेकर यांचे 'समाज–चिंतन' हा या छोटया प्रबंधाचा विषय आहे. एक थोर साहित्यिक या नात्याने ते महाराष्ट्रालाच नव्हे तर उभ्या भारताला सुपरिचित आहेत. त्यांच्या अनेक कथा–कादंबऱ्या अनेक भारतीय भाषांत अनुवादित झाल्या आहेत. तेव्हा ललित-लेखक या नात्याने विख्यात असणाऱ्या या लेखकाच्या संदर्भात एखादा प्रबंध लिहिला जात असता काही अपेक्षित विषय डोळयांसमोर सहज तरळून जातात– खांडेकरांचे नायक, खांडेकरांच्या नायिका, कथाकार खांडेकर, पाश्चात्य साहित्याचा खांडेकरांवर परिणाम, असे काही विषय समजण्याजोगे आहेत. पण खांडेकरांना 'समाजचिंतक' या नात्याने फारसे कुणी ओळखत नाही. खरे म्हणजे ललित–लेखकापेक्षा त्यांना समाज–चिंतक समजणे हाच त्यांच्या अंतरंगाचा खरा परिचय आहे.

## खांडेकरांच्या ललितकृती हे समाजचिंतनच आहे

खांडेकरांनी ललित–लेखन केले ही गोष्ट खरी आहे. कथाकार, कादंबरीकार, लघुनिबंधकार, चित्रपट कथा–लेखक या नात्याने ते प्रसिद्ध आहेत. टीकाकार म्हणूनही ते गाजले. परंतु हे सारे साहित्य वाचीत असताना त्यांच्या ध्येयवादी अंत:करणाची तळमळ समजावून घेणे आवश्यक आहे. ललित–लेखक म्हणून त्यांचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरते काय, कला बोधवादी असावी काय, कलेने सहेतुक रचना करावी काय, खांडेकरांचे ललित–लेखक या नात्याने मराठी साहित्यात स्थान कोणते, हे सारे प्रश्न त्यांच्या हृदयाशी विसंवादी आहेत. तुकारामाने पांडुरंगाला आर्ततेने हाक मारावी आणि आपण त्या आर्त

उद्गारातील काव्य कितपत साधले आहे याचीच चर्चा करावी तसे हे आहे. त्यांचे समाजचिंतन कलेच्या माध्यमातून व्यक्त झाले. या माध्यमाला महत्त्व आहे, त्याची चिकित्सा करणे योग्य व अपरिहार्य आहे. पण अनेक ठिकाणी केवळ या माध्यमाचीच चिकित्सा झालेली आहे. खांडेकरांच्या तळमळणाऱ्या ध्येयवादी अंतःकरणाचा, त्यांच्या जीवन–चिंतनाचा, त्यांच्या समाज–चिंतनाचा कोणी फारसा विचारच केलेला नाही. खांडेकरांचा केवळ कलावंत या नात्याने घडलेला हा परिचय त्यामुळेच एकांगी झालेला आहे. त्यांच्या हृदयाची स्पंदने ऐकण्याचा प्रयत्न झालेला नाही.

चिपळूणकर, आगरकर, सावरकर, टिळक, परांजपे, केळकर, माटे इत्यादि निबंधकारांनी त्याकाळात सामाजिक व राजकीय निबंध लिहिले. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर ' निबंधांतून राष्ट्रनिर्मिती केली ! ' कारण या निबंधकारांनी राजकीय व सामाजिक क्रांतीचा पुरस्कार केला. त्यामुळे या निबंधकारांना समाजचिंतक म्हटले तर आपण समजू शकतो. परंतु ज्या लेखकांनी बुद्धीऐवजी समाजाच्या भावनेला आवाहन केले– त्या लेखकांची भावना आणि त्यांनी डोळ्यासमोर ठेवलेले क्रांतीचे स्वरूप समजावून घ्यावयास नको काय ? ज्या अत्यंत थोड्या ललित–लेखकांनी सामाजिक क्रांतीचे ध्येय डोळ्या-समोर ठेवून कलाकृती निर्माण केल्या त्यांत खांडेकरांना अग्रपूजेचा मान द्यावयास हवा. म्हणून खांडेकरांच्या साहित्याचा विचार करताना ललित–लेखक या दृष्टीने मूल्यमापन करणे हा एक भाग आहे. तर दुसरा– व त्यापेक्षा अधिक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांचे समाजचिंतक या नात्याने मूल्यमापन करणे हा होय. खांडेकरांच्या ललित कृती या समाजचिंतनच होत, ही गोष्ट दृष्टिआड करून चालणार नाही.

## समाज-चिंतन हेच प्रमेय

खांडेकरांच्या बाबतीत त्यांच्या ललितकृतींपेक्षा या प्रमेयांनाच अधिक महत्त्व आहे. " श्री. खांडेकर ' परिस्थिती ' मांडणारे कलावंत नाहीत तर चिंतन देणारे प्रतिभावंत आहेत. त्यांची आपल्या कलादृष्टीच्या द्वारे होणाऱ्या जीवनदर्शनावर अढळ निष्ठा आहे. ती त्यांच्या कलानिर्मितीला प्रेरक झाली आहे. खांडेकरांनी जे साहित्य लिहिले– प्रामुख्याने कादंबरी– ते या प्रेरणेतून होय. आपल्याला एखादी कलाकृती निर्माण करावयाची आहे, अशा प्रेरणेने त्यांनी कादंबरी लिहिलेली नाही, त्यांना समाजाच्या ( आणि स्वतःच्याही ) प्रकृतीला अनुलक्षून काही प्रमेये मांडावयाची होती, म्हणजे प्रमेये प्रथम होती, कलाविचार नंतरचा आहे. त्याचा शक्य त्या जागी कुठे सांधा जुळवता आला तर तसा आवर्जून प्रयत्न आहे. मात्र समाज–विचार बाजूला सारून हा प्रयत्न होत नाही."[१]

खांडेकरांच्या बाबतीत ' नंतरचा ' विचार आधी केला गेला आणि तोही ' समाज-विचार बाजूला सारून ' केला गेला, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. तत्त्वचिंतक खांडेकरांची दखल कोणी कशी घेतली नाही याचे मोठे आश्चर्य वाटते. खरे म्हणजे पंडितांना हे ठाऊक आहे की, ' ते चिंतनशील ध्येयवादी साहित्यिक आहेत. अशा वर्गातील साहित्यिक कलाकृतीचा अवलंब साधन म्हणून करतात··· समाजविचार सोडायचा नसतो, कारण तो मांडायचाच असतो; पण तो रूक्षतेने येऊन उपयोग नसतो, कलेच्या विचाराची महिरप त्यासाठी जरूर असते. तारेवरच्या या कसरतीने खांडेकरांसारख्या ध्येयवादी कलावंताची कुचंबणा होते··· (कलेत) सगळेच सांगणे होत नाही; क्वचित जमते. पण उरलेले सांगितल्याखेरीज मनाची काहिली शमत नाही. कलाकृतीने आपल्यापरीने पूर्णता मिळविलेली असते. मग उरलेली त्याची रुखरुख, राहिलेली त्याची समजावणी प्रस्तावनांतून पुरी होते. ···यातून ' ध्येयवादी खांडेकर ' ' कलावादी खांडेकरांची ' पूर्तता करतात.' [२]

बहुतेक समीक्षकांनी ' कलेच्या महिरपीची ' चिकित्सा केली, परंतु 'ध्येयवादी खांडेकरांच्या' 'मनाची काहिली ' त्यांची रुखरुख ' ' त्यांची समजावणी दुर्लक्षित केली आहे ! हे ' मागील उणे ' कुणीतरी फेडणे आवश्यक होते. ऊर्ध्व बाहू उभारून मारलेली तळमळीची हाक कुणी ऐकलीच नाही; किंबहुना कुणाला कळलीही नाही; असे खांडेकरांना व त्यांच्या असंख्य चाहत्यांना वाटू नये म्हणून हा प्रबंधाचा प्रपंच करणे आवश्यक झाले आहे. साहित्य-समीक्षेच्या वा कला समीक्षेच्या गडबडीत त्यांच्या प्रमेयाचाच विसर पडला. म्हणून त्या प्रमेयाचा स्वतंत्र अभ्यास करण्याचे ठरविले आहे.

## सर्वत्र विखुरलेले समाजचिंतन

खांडेकरांचे समाज–चिंतन त्यांच्या सर्व साहित्यभर विखुरलेले आहे, किंबहुना ' कला पाठी अवतरे ! चिंतन आधी ' असे ज्ञानदेवांचे शब्द बदलून त्यांचे वर्णन करणे शक्य आहे. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांतून स्त्रियांचे प्रश्न मांडले आहेत, ' सर्वसामान्य माणसाचे दुःखी जीवन, अस्पृश्यांच्या अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी मारलेल्या आर्त हाका, स्त्रियांचे दास्य, त्यांचे सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य, शोषक व शोषित यांच्यातील संघर्ष, शेतकरी–मजूर-कामकरी यांच्या हक्कांच्या जपणुकीचे झगडे, जीवन सुरेख व्हावे यासाठी मन, बुद्धी आणि मूल्ये यांची राखावयाची निगा–अशा अनेक प्रश्नांभोवती खांडेकरांचे मन रुंजी घालताना आढळते.'[३] त्यांच्या कादंबऱ्यांची कथानके ही जशी सामाजिक समस्यांची चित्रणे करणारी आहेत तशा त्यांच्या ' प्रस्तावना ' वा ' पार्श्वभूमी ' सामाजिक समस्यांचे विश्लेषण व तत्त्व–चिंतन करणाऱ्या आहेत. त्यांच्या लघुनिबंधातून आणि कथासंग्रहांच्याही प्रस्तावना

वा पार्श्वभूमीतून त्यांचे जीवनचिंतन प्रकट झाले आहे. किंबहुना त्यांचे सारे साहित्य त्यांच्या चिंतनशील हृदयाचा उद्‌गार आहे. 'या दशकातील (१९३१ ते ४१) कोणत्याही कथाकारापेक्षा खांडेकरांच्या कथेत तत्कालीन सामाजिक मनाची स्पंदने, त्या पिढीचीसुखदु:खे आणि आशा-आकांक्षा यांचे चित्रण अधिक उत्कटत्वाने केलेले आढळेल. विशेषतः या व या अगोदरच्या पिढीतील ध्येयवादाचे चित्रण त्यांच्या कथांतून ज्या तळमळीने केले गेले ती तळमळ केव्हाही उपेक्षणीय ठरणार नाही,[५]' हे श्री. अदवंत यांचे उद्‌गार केवळ कथावाङ्मयापुरते मर्यादित नाहीत. खांडेकरांच्या सर्वच साहित्याला ते लागू पडणारे आहेत.

## ध्येयवादी मनाची पार्श्वभूमी

खांडेकरांसारख्या हळुवार, भावनाशील व संवेदनाक्षम व्यक्तीला शिरोड्याने चिंतनशील बनविले. ' शिरोड्यातला एकेक दिवस हे कुणीही न वाचलेल्या एका विचार–प्रवर्तक ग्रंथाचे पान होते.' [६]

या विचार–प्रवर्तक ग्रंथाच्या पानावर त्यांना कोणता मजकूर वाचायला मिळाला ?– " शिरोड्याच्या परिसरातील निसर्ग सुंदर होताच, पण तिथला सर्व सामान्य माणूस ? शिक्षणाचा त्याला गंध नव्हता, आणि त्याबद्दल त्याला खंतही वाटत नव्हती. पोटाची खळगी कशी भरायची, याच विवंचनेत तो आयुष्यातील दिवस ढकलीत होता. पोट सदाचं पाठीशी लागल्यामुळं वर्तमानकाल हेच ज्याच्या दृष्टीनं सत्य होतं, त्या बिचाऱ्याला उद्याची सोनेरी स्वप्नं तरी कशी पडणार ?··· धर्मभोळेपणाची काळसर सावली सर्वांच्या मनावर सतत पसरलेली दिसायची. जीवनाला वाहतेपण असं कुठंच नव्हतं···परंपरागत धंदे करीत आणि परंपरागत दारिद्र्याचे चटके सोशीत जगावं, असा सारा मामला होता ·· हे सारे जीवन काठावर उभं राहूनसुद्धा मी पाहिलं नव्हतं. मास्तर होऊन शिरोड्याला आलो. प्रथम त्याच्या गुडघाभर पाण्यात शिरलो···त्याच्या गढूळपणाची प्रथम मला शिसारी आली. पण तेच गढूळ पाणी शेकडो अडाणी गोर–गरीब माणसं पिढ्यान् पिढ्या पीत राहिली आहेत, ही कल्पना येताच अंगावर काटा उभा राहिला. या परिस्थितीत सापडलेल्या माणसांविषयी एक प्रकारची कणव निर्माण झाली. ती मला स्वस्थ बसू देईना. हे सारं पाहून माझ्या मनात विचारांचं चक्र सुरू होई···"[७]

इतर सारी खेडी तसेच शिरोडे ! शिरोड्याचे जीवन तसे लोकविलक्षण थोडेच होते ? खांडेकरांनी ते भावपूर्णतेने पाहिले इतकेच !

"लज्जा रक्षण" करण्याएवढेसुद्धा वस्त्र नाही म्हणून घराबाहेर न पडणारी श्रमजीवी स्त्री मी शिरोड्यालाच प्रथम पाहिली. वर्षानुवर्षे पेज जेवून शाळेत येणारा आणि उपासमारीमुळे मृत्यूच्या दारी जाऊन पोचलेला बुद्धिमान विद्यार्थी

शिरोड्यालाच प्रथम माझ्या नजरेस पडला. नरकचतुर्दशीच्या दिवशी मूठभर पोहयाकरिता पांढरपेशांच्या दारात दातांच्या कण्या करणारे अस्पृश्य मी शिरोड्यालाच प्रथम पाहिले. असली असंख्य दृश्ये पाहून माझ्या मनात अनंत मुके कढ उठू लागले. विद्यार्थीदशेत 'वंदे मातरम्' म्हणताना 'त्रिसप्तकोटिकंठ कृतनिनाद कराले' ही ओळ मी मोठ्या अभिमानाने म्हणत असे. त्या एकवीस कोटी म्हणा, तीसकोटी म्हणा, पस्तीस कोटी म्हणा, माझ्या देशबांधवातले हजारो जीव शिरोड्यात माझ्याभोवती वावरत होते.'[८]

खांडेकरांचे हृदय फत्तराचे नव्हते, त्यांनी म्हटले आहे–' शिरोड्याला दत्तक घरी गेल्यानंतर बाहेरील सामाजिक परिस्थितीचे जे विदारक दृश्य नजरेस आले त्यामुळे मी अस्वस्थ झालो. तेथील माणसांची दैन्याबस्था पाहून माझी झोप उडाली. यातूनच माझ्यातील लेखक जागा झाला.'[९]

आजूबाजूच्या परिस्थितीकडे डोळे-झाक करून वासनात बरबटलेल्या अपवादात्मक विकृत व्यक्तींची चविष्टपणाने चित्रणे करणारे, समाजाच्या आशा-आकांक्षांचे सोयर-सूतक न पाळणारे, पाश्चात्य साहित्याच्या दाराशी दीनवाणी भीक मागून त्या भीकेवर कुबेराचा माजोरी दिमाख दाखविणारे, स्वत:ला कलावंत म्हणवणारे लेखक आपणाकडे गल्ली बोळीत झाले आहेत. खांडेकर अशा भाग्यशाली कलावंतापैकी नाहीत. भारतीय समाजाच्या सुख–दु:खांशी ते तादात्म्य पावतात. त्यांच्या अंत:करणाला पीळ पडतो. ते चिंतनशील बनतात. आपल्यापरीने परिस्थितीचे विश्लेषण करतात. त्यांच्या अंत:करणात विचारांचे वादळ उठते.

' …असं का व्हावं ? आपली स्थिती पालटावी, आपण चांगलं खावं प्यावं ल्यावं, आपली मुलं शिकावीत, विद्वान व्हावीत, आपल्या मुली सुख-वस्तू घरी पडाव्यात असं या माणसांना वाटत नसेल काय ? का भौतिक समृद्धीची प्रेरणाच यांच्या मनातून नाहीशी झाली आहे ? देवानं जन्माला घातलंय म्हणून जगायचं ज्याला सुबत्तेचा सुवास नाही, संस्कृतीची सावली नाही, आनंदाचा आधार नाही अशा प्रकाराचं जिणं जगायचं ते कशासाठी ? का म्हणून ? असल्या जीवनक्रमा-विरुद्ध ही माणसं बंड करून का उठत नाहीत ? अष्टौप्रहर गर्जना करणारा बिशाल सागर उशाशी घेऊन झोपणारी ही माणसं, पण यांच्या आकांशा विशाल का नाहीत ? यांच्या वाणीत गर्जनेचं सामर्थ्य का नाही ? बुद्धिभ्रंश झाल्याप्रमाणे ही माणसं जड शिळेसारखी अचेतन का झाली आहेत ? …असे अनेक प्रश्न मनात उभे राहतात."[१०]

खांडेकरांच्या ध्येयवादी मनाला अशा रीतीने शिरोड्याची पार्श्वभूमी लाभली आहे. त्यांच्या कथा कादंबऱ्यांना या पार्श्वभूमीने विषय पुरवले.

## कादंबरी म्हणजे ललित समाज-चिंतन

खांडेकरांना कादंबऱ्यांचे विषय सामाजिक समस्यांतून आणि त्यांच्या विश्लेषणातून स्फुरलेले आहेत. त्यांचे ध्येयवादी मन जीवनाचे चित्रण करीत नाही, चिंतन करते.

'शहरांची सुधारणा करून देशाची उन्नती करू पाहणे हा 'कांचनमृग' आहे. खेडी सुधारतील तेव्हाच देश सुधारेल,' (' कांचनमृग ') 'समाजात दाहक परिस्थिती आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय तरुणीला विदारक अनुभव येतात' (उल्का). समाजात गरीब व श्रीमंत हे दोन ध्रुव आहेत. पण कला व जीवन, पांढरपेशा व कामकरी, भोग आणि त्याग अशा जिकडे तिकडे ध्रुवांच्या जोडया आहेत. (' दोन ध्रुव '). ' उद्याचे जग ध्येयनिष्ठेने व प्रेमभावनेवर उभारावयास हवे. '( हिरवा चाफा ' ). पशुत्व व देवत्व, भोगासक्ती व उदात्तता यांचा समतोल साधणे हेच यशस्वी जीवन (' दोन मने '). स्त्रीला स्वतःचे असे काही मूल्य आहे. तिची पूजा व्हायला हवी ( ' रिकामा देव्हारा '). प्रेमशक्ती ही स्वत:सकट अनेकांचे जीवन उजळून टाकते (' सुखाचा शोध ' ). मध्यमवर्ग सत्त्वशून्य व ध्येयशून्य होत चालला आहे ( ' पांढरे ढग ' ). पहिले प्रेम असफल झाले तर त्यात जीवनाचा वीट येण्यासारखे काही नाही ( पहिले प्रेम ). उदात्त प्रीतिभावना मानवी संबंध जपते, वाढवते ( ' जळलेला मोहर ' ). जीवनाला बुद्धिप्रमाणे भावनेचीही जोड असावी ( क्रौंचवध ). प्रामाणिकपणे जगू इच्छिणाऱ्या माणसाची मानसिक कुचंबणा होत आहे (' अश्रू '). आजचा मानव ययातीप्रमाणे नवी नवी सुखे मिळवण्याच्या धडपडीत चिरंतन मूल्ये तुडवीत आहे ( ' ययाती ' ). अशा कोणत्या ना कोणत्या सूत्राभोवती खांडेकरांनी कथानकांची रचना केली आहे.

या कादंबऱ्यांतील सामाजिक वातावरण आता बदललेले आहे त्यामुळे या कादंबऱ्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहास या दृष्टीनेही अभ्यासता येण्याजोग्या आहेत. परंतु सामाजिक वातावरण बदलल्यानंतर या ' इतिहासाचे ' तादृश महत्त्व काय राहाणार ? खांडेकरांची बरीचशी कथानके तत्कालीन समाजस्थितीवरून घेतलेली असल्याने आता ती कलेचा आनंद देऊ शकतील, तत्कालीन सामाजिक–सांस्कृतिक इतिहास सांगू शकतील पण सामाजिक क्रांतीचे त्यांचे कार्य होऊन गेले आहे. आगरकरांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला, बालविवाह बंद व्हावे म्हणून प्रखर जळजळीत निबंध लिहिले. आज ती क्रांती झाली आहे. आगरकरांचे निबंध आता ' भाषा ' म्हणून वाचता येतील. ' सांस्कृतिक इतिहास ' म्हणून वाचता येतील, परंतु त्यातील ' ध्येयवाद ' आता जुनाच वाटणार ! खांडेकरांच्या कादंबऱ्यांच्या बाबतीत तसेच म्हणता येईल. कालचा ध्येयवाद आजच्या जीवनाचा निर्माता असल्याने त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे शक्य आहे; पण तो उद्याचा स्फूर्तिदाता ठरू शकत नाही; म्हणून त्याचे नेतृत्व स्वीकारता येत नाही.

खांडेकरांबद्दल असे म्हणता आले असते, पण सुदैवाने ‘ कलावंत ’ खांडेकर मागे पडले तरी ‘ तत्त्वचिंतक ’ खांडेकर आजच्या समाजाला स्फूर्ती देण्याइतके, मार्गदर्शन करण्याइतके पुढे चाललेले आहेत. खांडेकरांच्या प्रस्तावना व पार्श्वभूमी यांतील तत्त्वचिंतन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहासच नाही. तर आजही समाजाला अंतर्मुख बनविण्याइतके समर्थ व सकस आहे !

## खांडेकरांचे समाजचिंतन व्यापक आहे

खांडेकरांच्या समाज चित्रणाला शिरोडयाची पार्श्वभूमी असली तरी समाज-चिंतनाला प्रादेशिक मर्यादा नाही. खांडेकरांचे चिंतन तत्कालीन सामाजिक समस्यांतून प्रारंभ होत असले तरी त्यांच्या चिंतनाला शाश्वत मूल्य आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा त्यांनी ऐतिहासिक आढावा घेतला असला तरी भविष्याचा वेध घेण्याचे सामर्थ्यही त्यांनी प्रकट केले आहे. त्यामूळे खांडेकरांच्या समाज–चिंतनाला व्यापकता लाभली आहे. आगरकर, सावरकर, माटे इत्यादि निबंधकारांच्या रांगेत खांडेकरही बसतात. राष्ट्रनिर्मितीचे वा सामाजिक क्रांतीचे ध्येय ठेवूनच खांडेकरांनीही प्रास्ताविकांमध्ये निबंध–रचना केली. आपल्या विचारांना त्यांनी कलेच्या माध्यमाने दृश्य-रूप दिले. अरूपाचे रूप दाखविण्यासाठी त्यांनी कथा-रचना केली; एका अर्थी खांडेकरांचे निबंध विचारांचे व कथेचे अशी द्विविध रूपे घेऊन अवतरले. सगुण–निर्गुण अशी दोन्ही रूपे त्यांच्या ध्येयवादी मनाने घेतली. पण सगुणाची चर्चा करताना व्यापक निर्गुणाचे चिंतन राहून गेले.

खांडेकरांनी सामाजिक आणि राजकीय जीवनाचा आढावा घेतला आहे, गांधीवाद, समाजवाद इत्यादि सामाजिक विचारसरणींवर आपली मते प्रकट केली आहेत, स्त्री–जीवनाचा केवळ सांस्कृतिक इतिहासच सांगितलेला नाही, तर भावी काळातील स्त्री–शक्तीचे स्थान दिग्दर्शित केले असून त्या शक्तीला आवाहन केले आहे, विसाव्या शतकातील नव्या प्रेरणांचे मूल्यमापन केले आहे, धर्मचिंतन केले आहे आणि साहित्य व कला याबरही मौलिक विचार प्रकट केले आहेत. या सर्व तत्त्वचिंतनाला स्वतंत्र महत्त्व आहे. त्याला काळाची मर्यादा नाही. या तत्त्वचिंतनाला काही मर्यादा पडल्या आहेत, हे मान्य करावे लागेल. पण म्हणून खांडेकरांच्या समाजचिंतनाचे मूल्य कमी होत नाही.

याचसाठी ‘ खाडेकरांचे समाजचिंतन ’ हा या प्रबंधाचा विषय झाला आहे.

## संदर्भ-टीपा

१. खांडेकर व्यक्ती आणि साहित्य – डॉ. एस्. एस् भोसले. प्रथमावृत्ती, १९७५, मोघे प्रकाशन, पुणे. पृ. १६४–१६५.

२. कित्ता. पृ. १६५.

३. कित्ता. १६१.

४–५. कित्ता. २७८.

६. फुले आणि काटे – खांडेकर – पृ. ३०.

७. एक लेखक आणि एक खेडे – खांडेकर–मौज – दिवाळी अंक. १९७१. पृ. २२.

८. उल्का. (आवृत्ती ४.) – खांडेकर – पृ. १३.

९. दैनिक ' लोकमान्य '– २४–६–७४.

१०. एक लेखक एक खेडे – खांडेकर – मौज. दिवाळी अंक, १९७१. पृ. २४.

# २

# खांडेकरांच्या दृष्टिकोनातून राजकीय व सामाजिक इतिहास

**क्रांतियुगाचा अवतार झाला होता**

खांडेकरांचा जन्म १८९८ मधील. म्हणजे त्यांच्या बालपणी भारतात– विशेषतः महाराष्ट्रात– एका क्रांतियुगाचा प्रारंभ झाला होता. ही क्रांती अनेकमुखी होती. इंग्रजांचे राज्य स्थिरावले असले. तरी चिपळूणकरांनी राजकीय, आकांक्षा जागृत केली होती. दुसऱ्या बाजूला इंग्रजी शाळांमुळे नव्या साहित्याचा, विचारांचा व संस्कृतीचा परिचय होत होता. त्यामुळे मराठी साहित्याला नवे आकाश उपलब्ध झाले होते. नव्या साहित्याबरोबर नव्या शास्त्रीय ज्ञानाचा उदय झाला होता. पाश्चात्य साहित्याच्या व शास्त्रांच्या परिचयाने आपला धर्म, आपले आचार विचार, आपली समाज–रचना, आपली शास्त्रे, या सर्वांकडे चिकित्सक बुद्धिवादी दृष्टिकोनातून निर्भयपणे पाहण्यास सुरुवात झाली. पाश्चात्य जगात अवतरलेल्या विज्ञानयुगाचे व औद्योगिक क्रांतीचे पडसाद इकडे स्पष्ट ऐकू येऊ लागले होते. थोडक्यात म्हणजे राजकीय, सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक अशा सर्व क्षेत्रात प्रचंड उलथापालथ होत होती. खांडेकरांच्यासारख्या एका कलावंताच्या दृष्टीसमोर हा ‘ इतिहास घडत ’ होता.

एखाद्या घटनेकडे कोण पाहात आहे, आणि कोण निवेदन करीत आहे, याला फार महत्त्व आहे. एकाच घटनेकडे मुत्सद्दी, योद्धा, शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ शत्रुपक्षीय आणि कलावंत वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात. त्याच घटनेचे अन्वयार्थ वेगवेगळे लावतात. थोडक्यात म्हणजे घटनेच्या निवेदनात व्यक्तिमत्त्व

मिसळलेले असतेच. खांडेकरांसारख्या कलावंताच्या दृष्टीसमोर जो राजकीय व सामाजिक इतिहास घडला. त्याचा त्यांनी लावलेला अन्वयार्थ पाहाणे मोठे उद्‌बोधक होणार आहे.

## महाराष्ट्रातील राजकीय क्रांतीचा इतिहास

'ते दशक ( १८९८ ते १९०८ ) हे महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत खळबळीचे, नव्या नव्या राजकीय संघर्षाचे आणि आपापल्या उज्ज्वल स्वप्नांच्या मागून धावणाऱ्या टिळक, कर्वे, गोखले, सावरकर, विजापूरकर, हरिभाऊ आपटे, रँग्लर परांजपे, सेनापती बापट, शिवरामपंत परांजपे, कृ. प्र. खाडिलकर इत्यादि ध्येयवाद्यांचे दशक होते. रँडचा खून, चाफेकर बंधूंची फाशी, लो. टिळकांवरील राजद्रोहाचा खटला, बंगालच्या फाळणीमुळे ज्वालामुखीच्या स्फोटाप्रमाणे देशभर उसळलेला असंतोष, सुरतचे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन व त्यात झालेली दुफळी, लो. टिळकांवरील पुन्हा झालेला राजद्रोहाचा खटला, त्यांना झालेली सहा वर्षे हद्दपारीची शिक्षा, आणि ती शिक्षा ऐकून त्यांनी दिलेले अमर बाणेदार उत्तर,"[१] हे सारे जिवंत नाटय त्याकाळी घडत होते.

या काळात राजकीय क्रांतीचे पेटलेले यज्ञकुंड स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत तसेच धगधगत राहिले होते. १९२० साली टिळक युग संपले आणि गांधीयुग सुरू झाले. त्या काळात क्रांतिकारकांचे कार्यही चालू राहिले. हा उत्तरार्धही अनेक घटनांनी भरलेला होता. स्वातंत्र्यप्रेरणेने भारलेला होता. या साऱ्या घटनांचे संस्कार तत्कालीन समाजावर होत होते.

'१९२० ते ४० या काळात जन्मलेल्या आणि वाढलेल्या मुलांनी लहानपणी वडील माणसांकडून गोष्टी ऐकल्या त्या 'सावरकरांनी बोटीतून उडी मारून फ्रान्सचा किनारा कसा गाठला,' उतार-वयात सहावर्षांची हद्दपारीची शिक्षा झाल्यावरही टिळक शांतपणाने कसे झोपले, गांधीजींनी आफ्रिकेत आणि चंपारण्यात सत्याग्रहाचे नवे शस्त्र परजून त्याच्या बळावर अन्याय दूर करण्याचे प्रयत्न कसे केले, या व अशा प्रकारच्या ! वाचायला यायला लागल्यावर रटफ करीत वर्तमानपत्रातल्या ज्या बातम्या ती वाचीत त्या त्यांच्या अंगावर रोमांच उभे करीत. टेकायच्या काठीखेरीज ज्यांच्या हातात दुसरे कुठलेही दृश्य शस्त्र नव्हते, असा पंचा नेसलेला आणि साठीच्या घरात आलेला एक वृद्ध बलाढ्य ब्रिटीश साम्राज्याला आव्हान देऊ शकतो, कायदेभंग पुकारतो, तुरुंगवास स्वीकारतो आणि शेवटी त्या साम्राज्याला नाक घाशीत तडजोड करायला लावतो, हे बालमनाला अत्यंत अद्‌भुतरम्य वाटणारे असे नाटय होते. सहभोजनासारख्या साध्या सामाजिक चळवळीपासून थेट बेचाळीसच्या साहसी भूमिगत चळवळींपर्यंत या कालखंडात अनेक आंदोलने झाली.[२] या सगळ्याचा परिपाक म्हणजे स्वातंत्र्य मिळाले. एक ध्येय साध्य झाले.

खांडेकरांनी आपल्या प्रस्तावनांतून घेतलेला हा राजकीय इतिहासाचा, आढावा अत्यंत धावता आणि त्रोटक आहे. तत्कालीन क्रांतिकारक सावरकर, सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याचा उल्लेख क्वचितच येतो. त्यांचे कारण असे आहे की, खांडेकरांचा पिंड राजकीय घटनांचा अन्वयार्थ लावणाऱ्याचा नव्हता. सामाजिक क्रांतीपेक्षा राजकीय क्रांतीचे स्वरूप अधिक भडक आणि म्हणून आकर्षक असले तरी त्यांची मोहिनी त्यांना पडली नाही. त्यांनी राजकीय घटनांवर आधारित एकही कादंबरी लिहिली नाही. तो त्यांचा मार्गही नव्हता. त्यांचा मूळचा पिंडच समाज–चिंतकाचा होता. टिळक, सावरकरांच्यापेक्षा आगरकरांशी त्यांचे नाते अधिक जवळचे होते. ते मानत होते की, सुखी समाज–जीवन निर्माण्याचे, राजकीय स्वातंत्र्य हे एक साधन आहे. राजकीय क्रांती समाज–परिवर्तन कितपत घडविते हाच त्यांच्या चिंतेचा विषय होता. म्हणून राजकीय इतिहासाच्या आढाव्याकडे त्यांचे दुर्लक्ष होणे हे अगदी स्वाभाविक होते.

## सामाजिक क्रांतीची उपेक्षा

राजकीय क्रांतीचे वारे वाहात असताना सामाजिक क्रांतीसाठीही प्रयत्न होणे जरूर होते. तथापि, तत्कालीन समाज राजकीय गुलामगिरीच्या शृंखला तोडण्याविषयी जेवढा क्रियाशील होता, उत्सुक होता, तेवढा सामाजिक क्रांती विषयी नव्हता. म्हणून ' राजकीय क्रांतीच्या जोडीने अगदी तिच्या हातात हात घालून सामाजिक क्रांती अवतरली, तरच अनेक शतके कपाळाला हात लावून बसलेल्या अभागी भारतमातेच्या मुखावर हास्य विलसू लागेल.' [३] ही कल्पना त्या काळात मूळ धरू शकली नाही.

## मध्यम वर्गीय तरुणाने डोळे मिटले होते.

' वास्तविक, प्रत्येक सामाजिक संघर्षात मध्यम–वर्गीयांचा पुढाकार ही महाराष्ट्राची परंपरा होती. संस्कृत भाषा सामान्य जनांना समजत नाही. म्हणून तिचे जोखड फेकून देऊन मराठीत काव्य आणि तत्त्वज्ञान सांगणारे ज्ञानदेव; गोदावरीच्या वाळवंटात, रणरणत्या उन्हात, एका लहान बालिकेला पाहून, ब्राह्मण्याचे कृत्रिम पाश तोडून तिला वात्सल्याने खांद्यावर घेऊन पाणी पाजणारे एकनाथ, निर्घृण रूढींनी समाजाचे शरीर सडते आहे, त्यांच्या आत्म्याला गंज चढतो आहे हे पाहून त्या शृंखला तोडून टाकण्यासाठी, हातातल्या लेखणीला तलवारीचे तेज बहाल करणारे आगरकर, हे सारे मध्यमवर्गाचे प्रतिनिधी होते.'[४] ही जिद्द, ही तळमळ, कार्यावरील ही निष्ठा, नंतरच्या मध्यमवर्गीय

तरुणात दिसली नाही. सामाजिक क्रांतीसाठी तळहातावर शिर घेऊन लढणारे तरुण मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले नाहीत. त्या ध्येयाने ते भारावून गेले नाहीत.

तत्कालीन तरुणांनी डोळसपणे अवती भोवती पाहिले असते, खेड्यापाड्यातून दृष्टी टाकली असती तर तेथील दैन्य, दारिद्र्य, दु:स्थिती दर्शविणारी अनेक दृश्ये दिसली असती. 'उकिरड्यावर टाकलेल्या बेवारशी पोराप्रमाणे माणसासारखी माणसे अगतिक होऊन पडली आहेत, पशूपेक्षाही वाईट अशा स्थितीत, ती जीवन कंठीत आहेत, टीचभर पोटासाठी जन्मभर धडपडून सुद्धा ती अर्धपोटी राहात आहेत.'[५] हे पाहून त्यांची मने क्षुब्ध झाल्याशिवाय राहिली नसती. त्यांच्याच मनात विचार उफाळले असते--

'ह्याच का सुख, संपत्ती आणि संस्कृती यांच्या संगमाने एके काळी जगाच्या अग्रभागी मिरविणारा तुझा भारत ? जनावराप्रमाणे जगणारी ही कोट्यावधी दीन दुबळी दलित जनता हेच का त्या वसिष्ठ विश्वामित्रांचे आणि चंद्रगुप्त विक्रमादित्यांचे वंशज ? कैदखान्यावरल्या अधिकाऱ्यांच्या झोपेचा भंग होऊ नये म्हणून पायातल्या बेड्यासुद्धा वाजणार नाहीत अशी दक्षता घेणारे लाखो गुलाम हेच का त्या हर्षवर्धन आणि शिवछत्रपती यांचे वारस ? धर्म, संस्कृती आणि इतिहास यांच्या जुन्या पुराण्या गोड गोड गप्पांनी जगात कुणाचा उद्धार झाला आहे ? त्याग आणि शास्त्रज्ञान यांच्या पायावर रशियासारख्या मागासलेल्या देशात नवी सुंदर समाज मंदिरे बांधली जात असताना आपल्या जुन्या पडक्या देवळांत रहाण्याचा अट्टाहास हे चाळीस कोटींचे राष्ट्र आणखी किती दिवस करणार ? क्षयाने क्षीण होत असलेल्या मनुष्याला मलमपट्ट्या लावून कुणी बरे केले आहे का ? भयंकर रोगावर तितकेच तीव्र उपचार करायला नको का ?'[६]

परंतु तरुण अंतर्मुख बनला नाही ! क्रियाशील बनला नाही. समाज क्रांतीसाठी वेळ पडल्यास सुशिक्षित तरुणांनी आपल्या कुटुंबसुखावर निखारे ठेवले पाहिजेत, आर्थिक सुबत्ता याचा मोह टाळला पाहिजे, एवढेच नव्हे तर तारुण्य-सुलभ प्रीतिभावनेकडे हसतमुखाने पाठ फिरविली पाहिजे ! पण हे त्यावेळी घडले नाही. कारण त्यावेळेच्या तरुणाचे वैचारिक विभाजनच झाले होते !

## महाराष्ट्राचे वैचारिक विभाजन

१९०० सालानंतर राजकीय असंतोषाच्या ज्वाला वर्षावर्षाला भडकत चालल्या होत्या. भावनाशील माणसाचे मन पेटून उठले होते. अशा स्थितीत राजकीय सुधारणेइतकीच सामाजिक सुधारणाही न्यायाची आणि निकडीची आहे ही गोष्ट जाणवत नव्हती, पटत नव्हती. शिवरामपंतांच्यासारखे प्रतिभाशाली लेखकसुद्धा

हाती असलेले उपहासाचे अणकुचीदार हत्यार टोचून सामाजिक सुधारकांना डिवचण्यात, चिडवण्यात आपल्या शक्तीचा व्यय करीत होते. त्यांच्यासारख्या लेखकासमोरसुद्धा पारतंत्र्याच्या शृंखलातून मुक्त झालेल्या मातृभूमीशिवाय कोठलीच बंधमुक्त मूर्ती नव्हती.

१९२० पर्यंतच्या महाराष्ट्राचे एक प्रकारे वैचारिक विभाजन झाले होते. ‘जो राजकीय बाबतीत जहाल, तो सामाजिक बाबतीत सनातनी, आणि जो सामाजिक गोष्टीत सुधारक तो राजकारणात मवाळ, अशी जणू काही तेव्हा महाराष्ट्रातल्या विचारांची विचित्र विभागणी झाली होती. या एकांगीपणामुळे महाराष्ट्राच्या बौद्धिक विकासात, जीवनविषयक तत्त्वज्ञानात आणि व्यावहारिक प्रगतीत जे गोंधळ निर्माण झाले ते अजूनही पुरे नाहीसे झालेले नाहीत. सावरकर हे शिवरामपंताचे अनेक दृष्टीनी शिष्योत्तम ठरतील. त्यांच्यात टिळकांच्या राजकारणातील जहालपणा आणि आगरकरांच्या समाजकारणातला तीव्रपणा यांचा संगम प्रथम आढळून आला; पण सावरकरांचे ऐन कर्तृत्वाचे सर्व आयुष्य अंदमानात गेल्यामुळे त्यांच्या या दुहेरी श्रद्धेचा फायदा महाराष्ट्राला मिळू शकला नाही.’[७]

टिळक युग संपले आणि गांधी युगाला सुरुवात झाल्यानंतर, समाजकारण आणि राजकारण या संबंधात जे वैचारिक विभाजन झाले होते. त्याची धार बोथट होऊ लागली. समाजाच्या प्रगतीला या दोन्ही गोष्टींची आवश्यकता आहे हे थोडयाफार प्रमाणावर पटू लागले. ही कृत्रिम विभागणी हळूहळू मागे पडू लागली. ‘राजकीय क्रांती आणि सामाजिक क्रांती ह्या जुळ्या बहिणी आहेत, किंबहुना जिला आपण प्रगती म्हणतो, तिचे स्वरूप जरासंधासारखे असते.’[८] हे पटू लागले आणि त्यादृष्टीने पावले पडू लागली.

खांडेकर म्हणतात त्याप्रमाणे, टिळकयुगात सावरकरांचे बरेचसे आयुष्य अंदमानात गेले ही वस्तुस्थिती आहे. परंतु गांधीयुगात सावरकरांनी आपल्या ‘दुहेरी श्रद्धेचा फायदा’ महाराष्ट्राला मिळवून दिला आहे. सावरकरांनी बुद्धिनिष्ठा आणि विज्ञाननिष्ठा यांचा हिरीरीने पुरस्कार केला, रूढी आणि जातिभेद यांच्यावर प्रखर हल्ला चढविला, एवढेच काय पण ज्याला खांडेकर ‘जुळ्या बहिणी’ वा ‘जरासंधी’ स्वरूपाची क्रांती म्हणतात, त्या क्रांतीचे व्यापक स्वरूप सावरकरांनी स्पष्ट केले होते.

‘केवळ राजवट बदलणे म्हणजे क्रांती नव्हे ! नवी राजवट येऊन तिने समाज–जीवनाचे अधोगामी झालेले तत्त्वज्ञान नष्ट करून सर्व जीवनाची घडण नव्या तत्त्वावर केली तरच क्रांती झाली असे म्हणतात. नवे जीवन तत्त्वज्ञान, नवे ध्येय व त्यांचा अवलंब करणारी नवी राजसत्ता प्रस्थापित करणे याचा अर्थ क्रांती असा आहे. सावरकरांना हाच अर्थ अभिप्रेत होता.’’[९]

सावरकरांइतकी क्रांतीची सुस्पष्ट व्याख्या कोणी केली नाही. समाजकारण राजकारण व धर्मकारण यांचे परस्पर संबंध इतक्या रेखीव शब्दात कोणी मांडले नाहीत. परंतु गांधीयुगातील सावरकरांच्या सर्वंकष क्रांतिकार्याकडे खांडेकरांचे दुर्लक्ष झाले आहे. खांडेकरांच्या क्रांतिकल्पनेत ' समाजकारण व राजकारण ' या जुळया बहिणी विचारात घेतल्या आहेत. सावरकरांच्या क्रांतिकल्पनेत ' धर्मकारण ' ही येते ! खांडेकरांना ते त्या काळी तरी जाणावलेले दिसत नाही. त्यांच्या मते 'जुळया बहिणीच' समाजात वावरू लागल्या होत्या.

## राजकीय लढ्याचा सामाजिक परिणाम

राजकीय अथवा सामाजिक लढा ज्यावेळी तीव्रतर होतो त्यावेळी त्याचा परिणाम समाजात दृगोचर होऊ लागतो. टिळकांच्या काळात केवळ राजकीय लढ्याला जरी प्राधान्य असले तरी त्या लढ्याचे समाजावर परिणाम होत होते. टिळक – आगरकरांनी स्वार्थत्यागाचा आणि ध्येयवादाचा कित्ता घालून दिला तो लोकांच्या डोळ्यासमोर होता.

या कालखंडात आणखी एक गोष्ट विशेषत्वाने जाणवत होती, ती म्हणजे आर्थिक विवंचनेचे सावट मध्यमवर्गाच्या संसारावर कधी आले नाही. अविभक्त कुटुंब पद्धतीच्या आतासारख्या चिंधड्या झालेल्या नव्हत्या. 'एखाद्या भावाने खेड्यात राहून तिथली जमीन सांभाळायची, बाकीच्यांनी शिकून नव्या नव्या बौद्धिक धंद्यात आपले बस्तान बसवायचे, त्यातल्या एखाद्याला देशभक्तीचे अथवा समाजसेवेचे आकर्षण वाटले तर त्याने तिकडे वळायचे, अशा प्रकारचा जमाना होता तो.' [१०] खर्चही बेताचा असल्याने कनिष्ठ मध्यमवर्गातली माणसेसुद्धा समाजकारण, राजकारण साहित्य इत्यादि गोष्टीत भरपूर रस घेत होती. मध्यमवर्गाचे जीवन एकसंध, ध्येयवादी असे होते.

पहिल्या महायुद्धापर्यंत हे जीवन समाजाच्या अंगवळणी पडले होते. याला पहिला हादरा बसला तो पहिल्या महायुद्धाने ! तरीही तो फारसा जाणवला नाही. गांधीयुगाचा अवतार झाला आणि समाजात पुन्हा चैतन्य खेळू लागले. ' ज्या राजकीय आणि सामाजिक आकांक्षा मध्यमवर्गाच्या मनात रुजल्या होत्या, त्यांना खतपाणी लाभले. असहकारिता, कायदेभंग आणि चलेजाव असल्या चळवळीतून लढाऊ समाजमनाला सतत आवाहन मिळत राहिले. गांधीजींच्या व्यक्तित्वामुळे व कर्तृत्वामुळे स्वातंत्र्याची चळवळ समाजाच्या तळापर्यंत जाऊन पोहोचली एवढेच नव्हे तर समाजाच्या शिखरावर संपत्तीचा उपभोग घेत बसलेल्या मूठभर मंडळींवरही या चळवळीची मोहिनी पडली.' [११]

विपन्न बहुजन समाजाबरोबरच संपन्न वरिष्ठवर्गही या चळवळीत ओढला गेला. १९२० ते ४० या काळात क्रांतीचे यज्ञकुंड धगधगत असताना ज्यांनी आपल्या प्रतिष्ठेची, पैशाची आणि प्रसंगी प्राणाचीही आहुती दिली त्यातले बरेचसे तरुण मध्यमवर्गातले होते. ध्येयवादाची पूजा हा मध्यमवर्गाचा स्वभावधर्म होऊन बसला होता !

त्याकाळी होणाऱ्या प्रत्येक चळवळीत या वर्गाची धडपड दिसून येत होती. त्यागही निःसंशय होता, म्हणूनच ' मध्यम वर्गाची ध्येयवादाची सरिता, या काळात सतत वाहत राहिली..... साहजिकच या काळात जी पिढी वाढली तिच्यावर या ध्येयवादी वातावरणाचे संस्कार झाले. शाळांत, कॉलेजात, वृत्तपत्रांत, साहित्यांत, व्यासपीठावर, फार काय व्यापाऱ्यांच्या पेढीवरसुद्धा देशभक्तीच्या आणि सामाजिक सुधारणेच्या गोष्टी त्या काळी ऐकू येत.....ते प्रतिध्वनी अनेक तरुणांच्या कानात सतत घुमत राहिले. आपला आयुष्यक्रम आखताना तो आवाज जिकडे नेईल तिकडे जायचे त्यांनी ठरविले.' [१२-अ] जीवनाची निश्चिती करताना या वातावरणाचा प्रभाव पडल्याने तरुणांना एक दिशा मिळत होती. लो. टिळक, स्वा. सावरकर, म. गांधी यांच्यासारख्या धुरंधर राजकारणपटूंच्या कार्याने तरुणांच्या डोळ्यासमोर भावी जीवनातील साहसी राजकीय क्षेत्र तरळू लागले, तर म. फुले, आगरकर, कर्वे, यांच्यासारख्या समाजसेवकांच्या कार्याने तरुणांच्या डोळ्यासमोर भावी जीवनातील समाजसेवेची नवी क्षेत्रे स्वच्छ दिसू लागली. मध्यमवर्गीय तरुणांच्या ध्येयवादी मनाची घडण या सामाजिक वातावरणाने घडविली, तशीच त्या काळच्या ललित-साहित्यानेही घडविली

## कलेने इतिहास घडविला आहे

समाजात होणाऱ्या स्थित्यंतराचे पडसाद साहित्यात उमटत असतात तर या उलट साहित्यिकांच्या द्रष्टेपणाने, समाज-चिंतनाने आणि समाज-साधनेने समाज घडत असतो, बदलत असतो. १८८० पासून स्वातंत्र्य-प्राप्तीपर्यंतच्या साहित्यातही याची प्रचिती आल्याशिवाय राहात नाही. आगरकर, हरिभाऊ, 'शारदाकार' देवल, कोल्हटकर, वामन मल्हार आणि नंतर खांडेकर यांच्या साहित्यातून तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब पडलेले आढळेल. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजाची केवळ तत्कालीन स्थिती न रंगवता द्रष्टेपणाने भावी आदर्श समाजाची दिशाही दिग्दर्शित केली आहे. केवळ समाज चिंतन न करता समाज-साधनाही केली आहे. म्हणूनच त्यांच्या साहित्याचा समाजावर परिणाम झाला. त्यांच्या साहित्याने घडविलेले मानसिक परिवर्तन, पालटलेले आचार-विचार यांचा आढावा घेणे; त्यांनी सामाजिक मनावर कोणते संस्कार केले, किती रूढींची शल्ये बोथट

केली, किती नव-कल्पना रुजवल्या, मध्यवर्गाचे कौटुंबिक जीवन किती रम्य आणि मोकळे केले याचा अभ्यास मोठा उद्‌बोधक होण्यासारखा आहे.

त्याकाळच्या अनेक ललित साहित्यिकांनी जे समाजचिंतन केले, जे समाज-चित्रण केले, त्याचप्रमाणे ध्येयवादी तरुणांच्यापुढे जी उद्दिष्टचे ठेवली अथवा समाजाच्या भावनिक क्रांतीसाठी जे कलात्मक संस्कार केले त्या सर्वांचा साकल्याने अभ्यास करणे, हे आवश्यक असले तरी आपल्या सीमेबाहेरचे आहे. आपण केवळ खांडेकरांच्या ललित वाङमयात आलेले समाजचित्रण व समाजचिंतन पहात आहोत. त्या दृष्टीने खांडेकरांनी मध्यमवर्गीयांचा जो सामाजिक इतिहास रेखाटला आहे, तो पाहणे औचित्याचे ठरेल.

## इंग्रज पूर्वकालातील मध्यम वर्ग

इंग्रज पूर्वकालात ' मध्यमवर्ग ' हा शब्दप्रयोग आजच्या अर्थाने रूढ नव्हता. प्राचीन काळी विद्या आणि सांस्कृतिक मूल्ये सांभाळण्याकरता जो पिढचान् पिढचा धडपडत राहिला त्याने मध्यमवर्गाचे कर्तव्य पार पाडले असे म्हणायला हरकत नाही. या वर्गाला याच कारणामुळे अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले होते. ' प्राचीन काळापासून विद्येला वाहून घेतलेला आणि संस्कृतीचा सांभाळ करणारा मध्यमवर्ग हा केवळ मेंदूचे काम करून पोट भरणारा वर्ग नव्हता. समाजाच्या बौद्धिक आणि नैतिक विकासाचा तो केंद्रबिंदू होता. समाज-पुरुषाच्या पाठीचा तो कणा होता. परिस्थितीने नेमून दिलेल्या कामाच्या पाटचा टाकायच्या व त्या टाकल्यावर जे पोटाला मिळेल ते मुकाटचाने खात बसायचे असा त्याचा जीवनक्रम कधीच नव्हता. समाजातले इतर थर केवळ वर्तमानकाळात जगू शकतात. पण ज्याच्यावर सामाजिक मार्गदर्शनाची आणि संस्कृतीच्या जोपासनेची जबाबदारी आहे तो वर्ग वर्तमानाइतकाच भूत आणि भविष्य यांच्याशी जोडला जातो. भूतकाळातले जे चांगले असेल ते भविष्यकाळापर्यंत नेऊन पोचविण्याचे काम महाराष्ट्रात याच वर्गाने केले. जुन्या निरुपयोगी झालेल्या गोष्टी झुगारून देऊन त्यांच्या जागी नव्या गोष्टी रूढ करण्याची धडपड करणारे बंडखोर याच वर्गातून निर्माण झाले.' [१२]

## अव्वल इंग्रजी आमदानीतील मध्यमवर्ग

या जुन्या मध्यम वर्गाला इंग्रजी राजवटीने जोराचे हादरे दिले. सुरुवातीला विविध सुखसोयींच्या झगमगाटात ते जाणवले नाहीत. समाज त्या सुखसोयींनी दिपून गेला; पण ' इंग्रजी अंमल जसजसा दृढ आणि सुस्थिर होऊ लागला तसतसा या

वर्गाचा एकजिनसीपणा मोडला. त्यांच्या परंपरागत निष्ठा द्विधा झाल्या. वर्तमान हा भूत आणि भविष्य यांना जोडणारा पूल असतो या गोष्टीचा त्याला विसर पडला. सभोवतालच्या क्रांतीचे त्याला नीट आकलन होईना.'[१३] अशा स्थितीत, साहजिकच इंग्रजी शिक्षण घ्यायचे, चांगली अंमलदाराची नोकरी पत्करायची आणि भरपूर पैसा मिळवून सुखी व्हायचे, एवढेच ध्येय त्यांच्यापुढे राहिले.

वरकरणी झालेला हा फरक एवढ्यावरच न थांबता, मध्यमवर्गात पुढे मानसिक परिवर्तनही झाले. अगदी थोड्या लोकांना पारतंत्र्याचे शल्य टोचत असले तरी बहुसंख्य समाज मात्र आपल्याच सुखात रममाण झाला. ' इंग्रजी आमदानीतली आबादानीची पहिली भुलभुलावणी ही घटोत्कचाची माया होती. त्या राक्षसी मायेच्या आड एक रक्त–शोषक राज्यपद्धती आपले काम पद्धतशीरपणे करीत उभी आहे याची जाणीव सुशिक्षितांना व्हावी असा तो काळच नव्हता.'[१४] इंग्रजी राजवट एक प्रकारचा वर आहे असे समजण्यापर्यन्त या लोकांची मजल गेली होती.

' सुशिक्षित समाजसुद्धा स्वप्नाळू बनला होता. आपल्या पायांतल्या गुलामगिरीच्या शृंखला हे मोठे सुंदर अलंकार आहेत, असा त्याला भास होत होता. जो तो आपल्या पायापुरते पाहात होता. पुढारलेला पांढरपेशा वर्ग, मुन्सफ मामलेदार होण्याचे मनोराज्य करण्यात आणि मुलाला इंग्लंडला पाठविले किंवा मुलगी आय्. सी. एस्. ला दिली म्हणजे घोडे गंगेत न्हाले असे मानण्यात दंग होऊन गेला होता साऱ्या समाजपुरुषाला जणू काही कुंभकर्णाची झोप लागली होती. त्याला पारतंत्र्याची शल्ये टोचत नव्हती. गुलामगिरीच्या पोटी येणारे भेसूर भवितव्य भेडसावीत नव्हते. त्याला भूतकाळ दिसत नव्हता. भविष्यकाळ पाहण्याची इच्छा नव्हती वर्तमानात अगदी संकुचित अशा जीवनाच्या तुकड्यात आणि चतकोर भाकरीच्या विवंचनेत किंवा आनंदात जो तो गढून गेला होता. इंग्रजी राज्यातल्या वरपांगी सुव्यवस्थेने सर्वांचे डोळे दिपून गेले होते. परकीय सत्तेचे हे सोज्वळ स्वरूप म्हणजे साम्राज्यरूपी मायावी राक्षसाने धारण केलेला कांचनमृगाचा अवतार आहे, याची जाणीव बहुतेकांना नव्हती.'[१५]

या मनोवृत्तीमुळे मध्यमवर्गाचा जीवनक्रम ठरून गेला होता. कॉलेज शिक्षण, त्यातून पदवीप्राप्ती, पदवी हातात पडताच जास्त पगाराची नोकरी मिळविण्यासाठी धडपड; मग सरकारची इमाने इतबारे नोकरी करावयाची, पोराबाळांसाठी भरपूर पैसा मिळवायचा कीर्ती मिळवावीशी वाटल्यास चार लेख लिहायचे; आणि हा जीवनक्रम अगदीच आळणी वाटला तर टिळकांचा ' केसरी ' वाचायचा ! पण तोही उपरण्याखाली झाकून आणून ! आतल्या खोलीत कडी लावून !

सी. आय्. डी. ने पाहिले तर फुकट नोकरी जायची ! बस्स, या वर्तुळाबाहेर कोणी जात नव्हता ! जायची इच्छा नव्हती !

## भारतीय असंतोषाचा जन्म

पहिल्या महायुद्धानंतर ही पिढ़ी संपली. नव्या उगवत्या पिढीवर लहानपणी टिळकांचा आणि तारुण्यात गांधींच्या देशभक्तीचे संस्कार होऊ लागले. या काळात मुलांच्या कानावर गोष्टी पडत त्या सावरकरांनी बोटीतून उडी मारून फ्रान्सचा किनारा कसा गाठला, टिळकांना हद्दपारीची शिक्षा झाली तरी ते रात्री शांतपणे कसे झोपले, गांधीजींनी सत्याग्रहाचे शस्त्र परजून आफ्रिकेतला अन्याय कसा दूर केला. त्याचबरोबर महात्माजींच्या राजकीय चळवळीच्या लाटा कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत थाड थाड आपटत होत्या. अशातच जीवनकलहाचे चटके मध्यमवर्गीयांना तीव्रतेने जाणवू लागले. त्यामुळे संसारी मध्यमवर्गीय लोक डोळे उघडून भोवताली पाहू लागले. यातून काही लोक गांधीजींच्या कार्यात सहभागी झाले. याच पिढीने गांधीजींना कर्तबगार अनुयायी दिले असले तरीही ' मध्यमवर्गाच्या या पिढीला देशाच्या पायातल्या आणि आपल्या हातातल्या शृंखलांची पूर्ण कल्पना आली तरी त्या तोडण्याकरिता निकराचा झगडा मात्र ती करू शकली नाही. एकीकडून गांधीवाद आणि दुसरीकडून समाजवाद बहुजनसमाजाकडे तिला ओढून नेत होता. पण परंपरेच्या मोहाने असो, पांढरपेशाच्या पोकळ अभिमानाने असो, अथवा आपले लयाला जाऊ लागलेले मोठेपण पुन्हा उदयाला येईल, या खोट्या आशेला बळी पडल्यामुळे असो, या पिढीने विचारक्रांतीच्या लाटांचा खळखळाट तेवढा केला पण आचारात ती अगतिकच राहिली.'[१९]

या पुढची पिढी मात्र अगदी निराळी झाली. बदलली. या काळातल्या पिढीवर सतत ध्येयवादी वातावरणाचे संस्कार झाले होते. त्याचे प्रतिध्वनी सगळीकडे उमटत होते, घुमत होते. हा आवाज नवीन पिढीच्या कानात सतत घुमत होता. आयुष्याचे ध्येय ठरविताना हा आवाज त्यांना दिशा दाखवत होता. तरुण ध्येयवादी मनाची जडण-घडण होत होती.

## हरिभाऊंची पिढी

समाजाच्या बदलाचे परिणाम तरुण मनावर होत असतात. भोवतालचे वातावरण जसे असेल तसे तरुण घडतात. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचे अवलोकन केले तर तत्कालीन तरुण मनाचे चित्र दिसू शकेल.

हरिभाऊंची पिढी आर्थिक आणि आत्मिक या दोन्ही दृष्टींनी अत्यंत भाग्यवान होती. इंग्रजी शिकणाऱ्यांना नवीन क्षेत्रे उपलब्ध होती. मध्यमवर्ग जुने

जीवनक्रम सोडून नव्या धंद्याकडे हिरीरीने वळले. त्यातल्या विचारी आणि ध्येयवादी लोकांच्यापुढे राजकीय आणि सामाजिक प्रश्न होते; पण वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवनाच्या दृष्टीने ती पिढी सुस्थिर होती. साहजिकच तरुण मन आशावादी होते. याची प्रचीती हरिभाऊंच्या कादंबऱ्यातील नायकांच्याकडे पाहिले की येते. त्याचे नायक ' पराक्रमी आहेत, आशावादी आहेत. सत्प्रवृत्त असून भांबावलेला, शिक्षित असून अगतिक झालेला, कर्तव्यनिष्ठ असून निराशेने ग्रासलेला नायक हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यात मिळणार नाही.[१७]

' आर्थिक कुचंबणेने मध्यम वर्गातल्या माणसाच्या साऱ्या पुरुषार्थावर पाणी पडू शकते; त्याचे जीवन कोमेजून काळवंडून जाते, काजळी धरलेल्या ज्योतीसारखे ते उदास वातावरण निर्माण करते आणि जीवनविषयक निष्ठांना धरणीकंपासारखे धक्के बसू लागतात, असे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांत आढळणार नाही त्यात मध्यमवर्गीची गरिबी आहे पण ती लढाऊ आहे. या कादंबऱ्यात दारिद्र्यामुळे होणारा मनाचा कोंडमारा आहे, पण ते मन एखाद्या किल्ल्यात बंदीवान करून ठेवलेल्या वीर पुरुषाचे मन आहे, तटावरून घोडा उडवून शत्रूची फळी फोडून जाण्याची हिंमत त्याच्या ठिकाणी आहे.'[१८] हरिभाऊंच्या नायकांची मने ही अशी ध्येयवादी होती. ती मध्यम वर्गातल्या सुशिक्षित तरुणांची पहिली पिढी होती. केवळ भोवतालची परिस्थिती पाहून गप्प न बसता अंतर्मुख होऊन तिच्यात इष्ट बदल कसे घडवून आणता येतील याचा विचार करणारी होती. त्यांना पारतंत्र्याइतकीच किंबहुना त्यापेक्षा जास्त सामाजिक विषमता बोचत होती. टोचत होती. अधिक बेचैन करीत होती.

त्यानंतरच्या पिढीचे मन मात्र बदलले. इंग्रजी शिक्षणाच्या दोन तीन पिढ्या उलटून गेल्या होत्या. स्त्री शिक्षणाचाही प्रसार बराच झाला होता. शिक्षणाने पैसा आणि त्यातून भौतिक सुखे मिळत होती. तरुण मन कल्पनारम्य बनले. सौन्दर्याने वेडावले; प्रणयपूजेने भारावले.

## स्त्री-शिक्षणामुळे भावना-क्रांती

थोड्याफार सामाजिक सुधारणांच्यामुळे आणि स्त्री-शिक्षणाच्या थोड्याफार प्रसारामुळे सुशिक्षित कुटुंबाच्या कल्पना बदलत होत्या. आकांक्षा वाढत होत्या. ' आपली पत्नी शिकलेली असावी, सामाजिक वादविवादात आणि वाङ्मयाच्या रसास्वादात थोडाफार भाग घेण्याची कुवत तिच्या ठिकाणी दिसावी, नवऱ्याबरोबर संध्याकाळी फिरायला किंवा रात्री नाटकाला जाण्यात काही विशेष काव्य आहे. असे मानणारी ती असावी, अशा इच्छा सुशिक्षित तरुणांच्या मनात बळावू लागल्या होत्या ...... त्या काळातल्या तरुण-पिढीची मने कल्पनारम्यता, सौंदर्यनिष्ठा,

आणि प्रणयपूजा यांनी भारली होती. ज्याला सर्व दृष्टींनी 'रोमँटिक' हे विशेषण लावता येईल. असा हा कालखंड होता.'[१९] अर्थात असे चित्र असले तरीही देश, समाज यांच्या प्रगतीविषयी विचारही त्यांच्या मनात निर्माण होत होते ! पण कृती बेताचीच होती.

## चाळीस सालातील तरुण-मने

पहिल्या महायुद्धाच्यावेळी जन्माला आलेली आणि दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी तारुण्यात पदार्पण करणारी तरुण–मने मात्र अगदी निराळी होती; निराळी बनली होती. 'या तरुणांची महत्त्वाकांक्षा परीक्षेतल्या यशाला तुच्छ लेखते, पदवीमुळे येणाऱ्या मोठेपणाचे तिला कवडीइतकेही महत्त्व वाटत नाही, आणि सुंदर बायको व टुमदार बंगला यांच्या गोड गोड स्वप्नात रंगून जाण्याइतकी तिची वृत्तीही क्षुद्र राहिली नाही. जगातल्या भयानक आणि स्फूर्तिदायक घडामोडींचे पडसाद तिला पदोपदी ऐकू येत आहेत. स्पेन आणि चीन यांच्यासारख्या देशात जनतेने प्राणपणाला लावून केलेले लढे तिला आकर्षित करीत आहेत, पंचवीस वर्षांपूर्वी रशियात जे झाले ते उद्या आपल्या प्रिय मातृभूमीत का होऊ नये, असा ती स्वत:ला प्रश्न विचारीत आहे. घरांतून बाजार करायला गेलेल्या मनुष्याला एकदम भावना उचंबळून टाकणारी मिरवणूक दिसावी आणि आपण कोठे चाललो आहो हे विसरून त्याने तिच्यात सामील व्हावे, असे या तरुणांचे झाले आहे. त्यांचे आपल्या कुटुंबावर प्रेम आहे. पण प्रेम म्हणजे मोह नव्हे, ही जाणीव झाल्यामुळे वडील माणसांच्या समाधानासाठी किंवा कुटुंबाचा डोलारा सांभाळण्यासाठी आपल्या नव्या ध्येयाचा चोळामोळा करायला ते तयार होत नाहीत.'[२०] तरुणांची मने अशी ध्येयप्रवण बनली होती. विजिगीषू ईर्ष्येने, जिद्दीने आणि तळमळीने ती कार्य करीत होती.

## चाळीस सालातील तरुणी

तरुणांच्या मनाप्रमाणेच तरुणींची मनेही शिक्षणामुळे बदलत होती. १८९० च्या सुमारास स्त्री–शिक्षणाची सुरुवात झाली. तोपर्यंत तिची हालचाल स्वयंपाकघर ते माजघर किंवा उलट, इतकीच मर्यादित होती. पायात खळखळणाऱ्या आणि तिला अगतिक करून सोडणाऱ्या परंपरागत रूढीच्या बेड्या थोड्यासुद्धा सैल झाल्या नव्हत्या. 'स्त्री–शिक्षण' हा सुरुवातीला उपहासाचा विषय बनला होता.

दोन तपांनी ही स्थिती पालटली. भरतीप्रमाणे स्त्री–शिक्षणाची लाट वेगाने पसरली. माजघराच्या दारात थबकणारी स्त्री ओसरीवर येऊन, प्रसंगी खुर्चीत

बसून, संवादात भाग घेऊ लागली. हे चित्र विरळ होते; पण शहरातील सुशिक्षित कुटुंबात हे चित्र दिसायला लागले होते.

१९१५ ते ३५ पर्यंतच्या काळात हा प्रसार आणखी झपाट्याने झाला. तिला आपल्या अस्तित्वाची जाणीव तीव्रतेने होऊ लागली. अंतर्बाह्य बदलण्याच्या इच्छेने ती अंकुरित झाली. चर्चेतून भाग घेताना आपली मते ती स्पष्टपणे मांडू लागली. पिढ्यान् पिढ्याच्या दास्याच्या बेड्या गळून पडताच ती थोडी भांडखोर किंवा स्वमताविषयी आग्रही बनली. या सुधारणेसाठी अनेक सामाजिक संस्थांचे कार्य उपयोगी पडले. त्यांच्या कार्याचे हे पडसाद होते. म्हणूनच कॉलेजमध्ये जाणाऱ्या कन्यका ही गोष्ट कुतूहलाची राहिली नव्हती. सायकलवरून जाणाऱ्या तरुणी आणि सभासमेलनात भाषण करणाऱ्या तरुणी ही आश्चर्याची गोष्ट वाटत नव्हती.

१९३५-४० च्या सुमाराच्या तरुणींचे मनही ध्येयाने भारले होते. 'मागच्या पिढीच्या पुरुषांसारखीच त्यांच्याही डोळ्यासमोर समाज सेवेची छोटी-मोठी ध्येये धूसर स्वरूपात तरळत होती. आपल्या शिक्षणाचा सदुपयोग करायला पाहिजे, आपल्या अनाथ, अशिक्षित भगिनींच्या उद्धारासाठी प्रयत्न केले पाहिजेत; डॉक्टरीण बनले पाहिजे पण ते एखाद्या मोठ्या डॉक्टरबरोबर विवाह करून मजा मारायला नव्हे, किंवा अन्य प्रकारांनी आपले आयुष्य चैनीत घालविण्यासाठी नव्हे तर दीन-दु:खितांची सेवा करण्यासाठी ! असे विचार जिच्या मनात निर्माण होत नव्हते अशी वीस वर्षांच्या आसपासची तरुणी त्याकाळी सापडणे कठीण होते. यौवनाच्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या या तरुणींचे ऐतिहासिक दृष्टीने उतावळी, स्वप्नाळू, व्यवहारकुशल, भावनाप्रधान असे प्रकार करता येतील. तारुण्य-सुलभ स्वप्नाळूपणा आणि ध्येयाच्या अदृश्य शक्तीने जागृत झालेल्या आत्म्याची ओढाताण या दोन्हीतलं अंतर फारच थोड्या तरुणींच्या लक्षात आले असेल पण त्यांच्या जीवनात प्रीती आणि क्रांतीच्या कल्पना एकमेकांच्या हातात हात गुंफून प्रवेश करीत होत्या यात शंकाच नाही.'[२१] तरुण स्त्री-मनही ध्येयवादी बनले होते. घराबाहेर पडण्यासाठी आणि समाजकार्यात, राष्ट्रकार्यात भाग घेण्यासाठी अधीर झाले होते. उत्सुक झाले होते.

## ध्येयवादी मनाचे पिंजरे

मध्यम वर्गातले तरुण-मन जागृत झाले होते; पण कौटुंबिक पाश ही आजच्या मध्यम वर्गातल्या जागृत तरुण मनाच्या पायातली पहिली आणि मोठी अवजड शृंखला आहे. ती नाजूक आहे. म्हणूनच तोडायला कठीण आहे. सर्व सामान्य मातेला आणि पत्नीला आपल्या राजकीय, सामाजिक कर्तव्याची जाणीव

आणि प्रणयपूजा यांनी भारली होती. ज्याला सर्व दृष्टींनी 'रोमँटिक' हे विशेषण लावता येईल. असा हा कालखंड होता.'[१९] अर्थात असे चित्र असले तरीही देश, समाज यांच्या प्रगतीविषयी विचारही त्यांच्या मनात निर्माण होत होते ! पण कृती बेताचीच होती.

## चाळीस सालातील तरुण-मने

पहिल्या महायुद्धाच्यावेळी जन्माला आलेली आणि दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी तारुण्यात पदार्पण करणारी तरुण–मने मात्र अगदी निराळी होती; निराळी बनली होती. 'या तरुणांची महत्त्वाकांक्षा परीक्षेतल्या यशाला तुच्छ लेखते, पदवीमुळे येणाऱ्या मोठेपणाचे तिला कवडीइतकेही महत्त्व वाटत नाही, आणि सुंदर बायको व टुमदार बंगला यांच्या गोड गोड स्वप्नात रंगून जाण्याइतकी तिची वृत्तीही क्षुद्र राहिली नाही. जगातल्या भयानक आणि स्फूर्तिदायक घडामोडींचे पडसाद तिला पदोपदी ऐकू येत आहेत. स्पेन आणि चीन यांच्यासारख्या देशात जनतेने प्राणपणाला लावून केलेले लढे तिला आकर्षित करीत आहेत, पंचवीस वर्षांपूर्वी रशियात जे झाले ते उद्या आपल्या प्रिय मातृभूमीत का होऊ नये, असा ती स्वत:ला प्रश्न विचारीत आहे. घरांतून बाजार करायला गेलेल्या मनुष्याला एकदम भावना उचंबळून टाकणारी मिरवणूक दिसावी आणि आपण कोठे चाललो आहो हे विसरून त्याने तिच्यात सामील व्हावे, असे या तरुणांचे झाले आहे. त्यांचे आपल्या कुटुंबावर प्रेम आहे. पण प्रेम म्हणजे मोह नव्हे, ही जाणीव झाल्यामुळे वडील माणसांच्या समाधानासाठी किंवा कुटुंबाचा डोलारा सांभाळण्यासाठी आपल्या नव्या ध्येयाचा चोळामोळा करायला ते तयार होत नाहीत.'[२०] तरुणांची मने अशी ध्येयप्रवण बनली होती. विजिगीषू ईर्ष्येने, जिद्दीने आणि तळमळीने ती कार्य करीत होती.

## चाळीस सालातील तरुणी

तरुणांच्या मनाप्रमाणेच तरुणींची मनेही शिक्षणामुळे बदलत होती. १८९० च्या सुमारास स्त्री–शिक्षणाची सुरुवात झाली. तोपर्यंत तिची हालचाल स्वयंपाकघर ते माजघर किंवा उलट, इतकीच मर्यादित होती. पायात खळखळणाऱ्या आणि तिला अगतिक करून सोडणाऱ्या परंपरागत रूढीच्या बेड्या थोड्यासुद्धा सैल झाल्या नव्हत्या. 'स्त्री–शिक्षण' हा सुरुवातीला उपहासाचा विषय बनला होता.

दोन तपांनी ही स्थिती पालटली. भरतीप्रमाणे स्त्री–शिक्षणाची लाट वेगाने पसरली. माजघराच्या दारात थबकणारी स्त्री ओसरीवर येऊन, प्रसंगी खुर्चीत

बसून, संवादात भाग घेऊ लागली. हे चित्र विरळ होते; पण शहरातील सुशिक्षित कुटुंबात हे चित्र दिसायला लागले होते.

१९१५ ते ३५ पर्यंतच्या काळात हा प्रसार आणखी झपाट्याने झाला. तिला आपल्या अस्तित्वाची जाणीव तीव्रतेने होऊ लागली. अंतर्बाह्य बदलण्याच्या इच्छेने ती अंकुरित झाली. चर्चेतून भाग घेताना आपली मते ती स्पष्टपणे मांडू लागली. पिढ्यान् पिढ्यांच्या दास्याच्या बेड्या गळून पडताच ती थोडी भांडखोर किंवा स्वमताविषयी आग्रही बनली. या सुधारणेसाठी अनेक सामाजिक संस्थांचे कार्य उपयोगी पडले. त्यांच्या कार्याचे हे पडसाद होते. म्हणूनच कॉलेजमध्ये जाणाऱ्या कन्यका ही गोष्ट कुतूहलाची राहिली नव्हती. सायकलवरून जाणाऱ्या तरुणी आणि सभासमेलनात भाषण करणाऱ्या तरुणी ही आश्चर्याची गोष्ट वाटत नव्हती.

१९३५–४० च्या सुमाराच्या तरुणींचे मनही ध्येयाने भारले होते. 'मागच्या पिढीच्या पुरुषांसारखीच त्यांच्याही डोळ्यासमोर समाज सेवेची छोटी-मोठी ध्येये धूसर स्वरूपात तरळत होती. आपल्या शिक्षणाचा सदुपयोग करायला पाहिजे, आपल्या अनाथ, अशिक्षित भगिनींच्या उद्धारासाठी प्रयत्न केले पाहिजेत; डॉक्टरीण बनले पाहिजे पण ते एखाद्या मोठ्या डॉक्टरबरोबर विवाह करून मजा मारायला नव्हे, किंवा अन्य प्रकारांनी आपले आयुष्य चैनीत घालविण्यासाठी नव्हे तर दीन–दु:खितांची सेवा करण्यासाठी ! असे विचार जिच्या मनात निर्माण होत नव्हते अशी वीस वर्षांच्या आसपासची तरुणी त्याकाळी सापडणे कठीण होते. यौवनाच्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या या तरुणींचे ऐतिहासिक दृष्टीने उतावळी, स्वप्नाळू, व्यवहारकुशल, भावनाप्रधान असे प्रकार करता येतील. तारुण्य-सुलभ स्वप्नाळूपणा आणि ध्येयाच्या अदृश्य शक्तीने जागृत झालेल्या आत्म्याची ओढाताण या दोन्हीतलं अंतर फारच थोड्या तरुणींच्या लक्षात आले असेल पण त्यांच्या जीवनात प्रीती आणि क्रांतीच्या कल्पना एकमेकांच्या हातात हात गुंफून प्रवेश करीत होत्या यात शंकाच नाही.'[२१] तरुण स्त्री-मनही ध्येयवादी बनले होते. घराबाहेर पडण्यासाठी आणि समाजकार्यात, राष्ट्रकार्यात भाग घेण्यासाठी अधीर झाले होते. उत्सुक झाले होते.

## ध्येयवादी मनाचे पिंजरे

मध्यम वर्गातले तरुण–मन जागृत झाले होते; पण कौटुंबिक पाश ही आजच्या मध्यम वर्गातल्या जागृत तरुण मनाच्या पायातली पहिली आणि मोठी अवजड शृंखला आहे. ती नाजूक आहे. म्हणूनच तोडायला कठीण आहे. सर्व सामान्य मातेला आणि पत्नीला आपल्या राजकीय, सामाजिक कर्तव्याची जाणीव

ज्यावेळी होईल, भोवतालच्या परिस्थितीचे आकलन ज्यावेळी होईल, आमची गृहरचना ज्यावेळी समयोचित बदलून नवे वळण घेईल, त्याचवेळी ही शृंखला नाहीशी होईल. फारच थोड्या तरुण–तरुणी या शृंखलांचे बंध सैल करून पुढे धावू शकतात. यात बदल करायचा असेल, ध्येयनिष्ठ तरुण–तरुणींना वाव द्यायचा असेल तर गृहरचना बदलणेही आवश्यक होते पण तसे प्रयत्न मात्र फारसे झाले नाहीत, म्हणून घराच्या जुन्या पिंजऱ्यात बऱ्याच तरुण मनांना आक्रोश करावा लागला. ज्याला ही बंधने झुगारून देता आली तो पुढे सरकला.

स्वातंत्र्यपूर्व काळात आणि उत्तर काळातही मध्यमवर्गीयांची गृहरचना बदलली नाही. परिणामत: स्वातंत्र्योत्तर काळात या वर्गाची स्थिती आणखी बदलली

## स्वातंत्र्योत्तर काळ

१९३५–४० च्या सुमारास निर्माण झालेली ही स्थिती फार काळ टिकू शकली नाही. दुसऱ्या महायुद्धाने जगाला अनेक बाबतीत हादरे दिले. महाराष्ट्रही त्यातून तसा सुटू शकला नाही. मध्यम वर्गाची जीवनमूल्ये अस्थिर होऊ लागली. त्यांना तडे जायला लागले आणि स्वातंत्र्योत्तर काळात तर ती बहुतेक उन्मळून पडली.

‘ इंग्रजी राज्याबाहेर जी क्रांती सुरू झाली तिचा हा अपरिहार्य परिणाम आहे. ती क्रांती केवळ वैचारिक नव्हती. जीवनाचे प्रत्येक स्वरूप पालटून टाकण्याची शक्ती तिच्या अंगी होती. साहजिकच भारतीय जीवनाला हजारो वर्षांची जुनी चाकोरी सोडून एका न रुळलेल्या नव्या मार्गाचा आश्रय करावा लागला. गेली शंभर वर्षे ही वाटचाल सुरू आहे. पण ती करताना आपण पुन्हा पुन्हा त्या दूर राहिलेल्या चाकोरीकडे आशाळभूतपणाने पहात आहो. मध्यमवर्गाची जी दुर्दशा झाली तिचे मूळ या मनोवृत्तीत आहे. ज्या दिवशी हा वर्ग इंग्रजी शिक्षण घेऊ लागला, खेडी सोडून मोठ्या प्रमाणात शहराकडे वळला, ज्ञान आणि संस्कृती यांची परंपरा चालविण्याच्या कर्तव्याचा निरोप घेतला, श्रद्धेची पणती फेकून देऊन बुद्धिवादासारख्या विद्युद्दीपाच्या प्रकाशात तो पुढला मार्ग शोधू लागला, मानवी जीवनातली सुख दु:खे परलोकातल्या परमेश्वरावर अवलंबून नसून ती इहलोकातल्या मनुष्याच्याच हातात आहेत याची जाणीव झाली, त्याच दिवशी या जुन्या चाकोरीचा मोह त्याने सोडायला हवा होता.’[२२]

## आणि धर्मविचाराचा नवा प्रवाहही

परंतु याच सुमारास धर्मविचाराचा एक नवा प्रवाह वाहू लागला. वैदिक धर्माची ध्वजा विवेकानंदांनी अमेरिकेत फडकावली, त्यामळे हिंदू धर्म, वेदान्त,

भारतीय संस्कृती याविषयी कुतुहल तरुण पिढीत पुनरुज्जीवित झाले. याचवेळी आपल्याकडे थिऑसफी या पंथाचा उदय आणि उत्कर्ष झाला. ईश्वर, कर्मवाद, मायावाद या जुन्या दृढमूल कल्पनांना थिऑसफीचे खतपाणी मिळाल्याने सुशिक्षित तरुणांच्या मनात अध्यात्माविषयी जिज्ञासा निर्माण झाली होती. तथापि, संपूर्ण समाज जीवनाला वेगळी दिशा देण्याचे वा जीवन तत्वज्ञान बदलवून टाकण्याचे काम या प्रेरणेने केले नाही.

## स्वातंत्र्योत्तर काळात तत्त्वनिष्ठेचे मरण

स्वातंत्र्योत्तर काळात तर सारे जीवन-तत्त्वज्ञानच बदलून गेले. पूर्वीची जिद्द, तळमळ, ध्येयनिष्ठा, त्याग या गोष्टी कापसासारख्या उडून जाऊ लागल्या. पैसा, सत्ता, पोशाखीपणा ही जीवनमूल्ये बनू लागली. परिणामत: ' स्वातंत्र्यानंतरच्या काळात आपल्याकडे जे दिसते ते तत्त्वनिष्ठेचे मरण ! स्वातंत्र्यपूर्व काळात या देशात जो धर्म होता तो आता धंदा होऊ पहात आहे, नव्हे झाला आहे ! साहित्य रंगभूमी, चित्रपट, शिक्षण, समाजकारण, राजकारण– कोणतेही क्षेत्र घ्या, त्यात ध्येयवादी माणसे विरळ दिसू लागली आहेत. प्रत्येक क्षेत्रातले पुढारी खुजे होत आहेत. पूर्वीच्या पंडितांच्या जागी आता पंडचे मिरवीत आहेत ! आजकाल आठव्या दर्जाच्या पुढाऱ्याच्या भाषणातसुद्धा हरघडी देशभक्तीच्या विठोबाचा जयजयकार असतो. पण प्रत्यक्षात मात्र जो तो पोटोबाची पूजा बांधण्यात दंग झालेला असतो. या पोटोबाचे अनेक मुखवटे आहेत– सत्तेचा, पैशाचा, प्रतिष्ठेचा ! त्यागाचे आणि सेवेचे मुखवटे आता जुनाट झाले आहेत. बहुधा लवकरच ते मोडीला घातले जातील !'[२३] अशी विदारक स्थिती निर्माण झाली.

ही सामाजिक स्थिती बदलण्याचे सामर्थ्य ज्या शिक्षणात आहे आणि ते शिक्षण देणाऱ्या ज्या शिक्षण संस्था आहेत त्याही याला अपवाद राहिल्या नाहीत. ' मोठमोठ्या संस्था ध्येयवादी महात्म्यांच्या स्फूर्तीतून आणि त्यागातूनच निर्माण होतात हे खरे, पण पै पै करून पैसा मिळविणाऱ्या बापाच्या कष्टाची कल्पना आयत्या बिळात नागोबा होणाऱ्या त्याच्या गर्भश्रीमंत मुलाला जशी येत नाही, त्याप्रमाणे कुठल्याही संस्थेच्या संस्थापकाचा ध्येयवाद ती चालविणाऱ्या पुढच्या पिढीच्या आचरणात उतरत नाही. संस्थेचा उज्ज्वल ध्येयवाद बहुधा एक पिढी-पुरताच टिकतो. ! दुसऱ्या पिढीला तो हिणकस झाल्याशिवाय रहात नाही ... महाराष्ट्रात सार्वजनिक जीवनाच्या अगदी अग्रभागी असलेल्या अनेक संस्थांचे गेल्या तीन पिढ्यांचे इतिहास पाहिले तर पहिल्या पिढीची ध्येयाची पताका तिसऱ्या पिढीला उपयुक्त लंगोटी म्हणून वापरण्यात येत आहे असे दिसून येईल ! राष्ट्राच्या उद्धाराकरिता तरुण पिढी विशिष्ट संस्कारांनी युक्त व्हायला हवी

म्हणून काढलेल्या शिक्षण संस्थांना आज कारकून निर्माण करणाऱ्या कारखाण्याचे स्वरूप आले आहे. वनराजाने जेथे स्वच्छंद विहार करायचा त्या स्वतंत्र अरण्याला मेंढरांच्या कोंडवाड्याचे स्वरूप यावे यापेक्षा अधिक दुर्दैवाची गोष्ट कोणती असू शकेल ? पुढे पुढे हा दुबळेपणा लपविण्याकरता ' संस्था जगली पाहिजे ' हे सूत्र फार उपयोगी पडते असा सर्व संस्थाचालकांचा अनुभव आहे ! पण निर्जीव संस्थेच्या चिरजीवनापेक्षा सजीव संस्थेचा अपमृत्यू शतपटींनी श्रेष्ठ असतो, तो स्फूर्तीची दिव्य ज्योत अमर ठेवून समाजाला प्रगतीचा मार्ग दाखवू शकतो, हे त्यांच्या ध्यानात कधीच येत नाही. आपल्या मूळच्या ध्येयापासून च्युत झालेल्या आणि ठराविक चाकोरीतून जाणाऱ्या असल्या संस्थामध्ये साहजिकच दोन प्रकारच्या साधूंचा लवकरच प्रवेश होतो. पहिले संधीसाधू आणि दुसरे स्वार्थसाधू. लोकशाहीचा जयजयकार करीत हे दांभिक लोक संस्थेतल्या मूठभर निष्ठावंत सेवकांची सहज गळचेपी करू शकतात. टोळ्या केल्याशिवाय चोरांचे व्यवहार चालू शकत नाहीत, असल्या संस्थात स्वार्थसाधूंचे कंपू झटकन तयार होतात व सज्जन माणसे एकेकटी राहिल्यामुळे हे कुटील कंपू त्यांचा लीलेने पराभव करू शकतात. कुठलीही संस्था घ्या– मग ती शिक्षणप्रसाराकरता काढलेली शाळा असो, अथवा राष्ट्राला जागृत करण्याकरता काढलेले वृत–पत्र असो उल्केप्रमाणे तिचा पहिला तेजस्वी अविष्कार संपला की तिचे पाषाणात रूपांतर होते.'[२४]

हे जर कळले तर या स्थितीत काही बदल घडण्याची शक्यता आहे. काळाच्या मागणीनुरूप नवीन संस्था जन्म घेतील. तात्पर्य शिक्षणसंस्था, राजकीय संस्था, सामाजिक संस्था या सगळ्याच संस्थांची स्थिती स्वातंत्र्योत्तर काळात ही अशी झाली आहे.

## ध्येयनिष्ठा घटत आहे

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास पाहिला तर एक गोष्ट प्रामुख्याने दिसते. ती म्हणजे दिवसेंदिवस ध्येयनिष्ठा आणि तत्त्वनिष्ठा घटत आहे. प्रत्येक पुढची पिढी पहिल्यापेक्षा कमी तत्त्वनिष्ठ आढळून येते आहे. ज्या मध्यम–वर्गातून अशी माणसे निर्माण होत होती त्यांच्याच जीवनाला तडा गेला आहे. त्यांची विलक्षण कुचंबणा होत आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, 'अनेकांचा ध्येयवाद मनातल्या मनात कोमेजून जात आहे. पुष्कळांच्या मनात ध्येयवाद रुजूच शकत नाही. ही सर्व तरुण माणसे एका वैचारिक पोकळीत भ्रमण करीत आहेत. ती सर्व दृष्टींनी अश्रद्ध होत आहेत. देव न मानणारा पण मनुष्याच्या कर्तृत्वावर विश्वास असणारा नास्तिक समाजाला उपकारकच ठरतो. पण गेल्या दहा बारा वर्षांच्या कुचंबणेने मध्यमवर्गात एक निराळ्याच प्रकारचा नास्तिक जन्माला आला

आहे. त्याचा देवावर विश्वास नाही, त्याची माणसावर श्रद्धा नाही, त्याला परलोक पटत नाही, इहलोकात काही राम आहे, असे वाटत नाही. जीवनाचे, प्रीतीचे किंवा त्यागाचे पावित्र्य तो जाणत नाही. एक प्रकारचा सर्वव्यापी नास्तिकवाद (nihilism) बहुसंख्य तरुणांना ग्रासू पाहात आहे. म्हणूनच जवाहरलालांच्या दर्शनाकरता गर्दी करणारे लोक राजकपूरला पाहायला तितकेच उत्सुक असलेले दिसतात. अभिजात साहित्याकडे पाठ फिरवून तरुण-तरुणी उथळ चित्रपटांच्या आणि रहस्यकथांचा चोथा चघळीत बसतात तो याच कारणामुळे! जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात हे भयंकर स्थित्यंतर जाणवू लागले आहे. उदात्तापेक्षा क्षुद्राची, चिरंतनापेक्षा क्षणिकाची आणि भावनेपेक्षा वासनेची पूर्वीपेक्षा अधिक उघडपणे पूजा केली जात आहे. तरुण पिढीला तर या पूजेचे विशेष आकर्षण वाटत आहे.' [२५]

## ध्येयवादाची श्रेष्ठता

मध्यमवर्ग आणि तरुण पिढी यांचे स्वातंत्र्योत्तर काळातले चित्र हे असे आहे. ही स्थिती अशीच राहिली तर कोणता स्तर गाठील हे सांगता येणे कठीण आहे. वेळीच काही उपाययोजना होणे आवश्यक आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर समाज–रचनेचा पायाच बदलत आहे याची जाणीव न झाल्याने या लोकांच्या आयुष्यक्रमात कालानुरूप बदल होऊ शकला नाही. आर्थिक पाया डळमळीत राहिल्याने जुनी स्वप्ने विरघळून गेली. त्यांच्या पुढच्या या समस्या कशा सोडवायच्या हे सांगता येणे कठीण आहे; तथापि या विसाव्या शतकात सामान्य माणसाला महत्त्व मिळाले आहे. सध्या संस्कृतीचा आणि माणुसकीचा आधार एकच आहे, तो म्हणजे सामान्य माणूस! त्याला विशेष काही चांगले करता येईल असे नाही; पण वाईट कृत्य करताना मात्र त्याचा हात कचरल्याशिवाय राहाणार नाही. 'असा माणूस भारतीय संस्कृतीने निर्माण केला. त्याची परंपरा मध्यंतरीच्या काळात मध्यमवर्गाने चालविली. बाह्यरूप कितीही बदलले तरी ती परंपरा अखंड ठेवणे आणि विकसित करणे यातच त्याच्या आयुष्याचे सार्थक, समाजाचे कल्याण आणि मानवतेचे अंतिम हित आहे.' [२६]

हे सारे करण्यासाठी मनात ध्येयवादाची पुन:स्थापना होणे आवश्यक आहे. ध्येयवादाविषयी आज तुच्छतेने बोलले जाते. सामाजिक आणि राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने हे अयोग्य आहे, ध्येयनिष्ठा, तत्त्वनिष्ठा हे मानवी जीवनाला पोषक आणि समाज जीवनाला अत्यंत आवश्यक असे जीवनमूल्य आहे. त्यावरची श्रद्धा दृढ करणे अंतिम हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

केवळ ध्येयाने या गोष्टी साध्य होणार नाहीत त्याला त्यागाचीही जोड पाहिजे. त्यागाशिवाय भावनांना तेज नाही. जगात जे जे उदात्त, मंगल, उच्च

आहे त्याचे स्वरूप उग्र असते. ते गाठण्यासाठी त्यागाचीच आवश्यकता असते. आज आपण ज्या वर्गात जन्माला आलोत, ज्या वातावरणात वाढलो त्या वर्गाच्या जीवन-विषयक, समाज-विषयक कल्पना 'पांढऱ्या ढगा'सारख्या झाल्या आहेत. नवीन जीवनाचा शोध घ्यायला निघाले पाहिजे. 'त्या जीवनाचे स्वरूप आक्राळ-विक्राळ कृष्ण मेघासारखे आहे. क्रांतीची विद्युल्लता त्याच्यातून परोपरी डोकावून पाहात आहे. ती कुठे कुठे पडेल आणि कुणाकुणाचा बळी घेईल याचा नेम नाही. पण तिच्याच प्रकाशात पुढचा मार्ग शोधण्यासाठी निघाले पाहिजे... यासाठीच तरुण सुशिक्षित पिढीने पुन्हा 'कुटुंबावर निखारे ठेवले पाहिजेत, आर्थिक स्वास्थ्याचा मोह झुगारून दिला पाहिजे आणि तारुण्यातल्या प्रीतीकडेही हसत मुखाने पाठ फिरविली पाहिजे' [२७] तरच काही करता येईल.

ध्येयाने प्रेरित होऊन त्यागाला सिद्ध झालेल्यांच्या पुढेही अनेक विघ्ने येतात. मोठी सुशिक्षित माणसे बुद्धिवादाच्या नावाखाली भोगवादी आयुष्य घालवतात आणि तरुणांची दिशाभूल करतात. यासाठी 'सामाजिक जीवनातली ही आत्मवंचनेची जागा तरुणपिढीने आरंभीच हेरून ती कटाक्षाने टाळली पाहिजे. बुद्धिवादाचा ध्वज तरुण पिढीने अवश्यमेव हातात घ्यायला हवा; पण त्याग हीच त्या निशाणाची काठी आहे आणि मनुष्याचे ऐहिक सुखसंवर्धन हेच तीन शब्द त्या निशाणावर कोरलेले आहेत, त्याचा तिने स्वतःला विसर पडू देता कामा नये अथवा या शब्दांना बाध येईल असा कुठलाही विचार आपल्या मनात येऊ नये अथवा त्या उदात्त शब्दांचे पावित्र्य दूषित होईल असा कुठलाही आचार आपल्या हातून घडू नये याबद्दल तिने डोळ्यांत तेल घालून जपले पाहिजे. प्रत्येक खरा सुधारक हा मूर्तिभंजक तसाच मूर्तिपूजकही असतो. तो आचारांच्या आणि आदर्शांच्या जुन्या फाटक्या तुटक्या मूर्ती फेकून देतो त्या काही त्यांच्या जागी बसून स्वतःची पूजा करून घेण्यासाठी नव्हे; तर त्या रिकाम्या जागी नव्या अधिक सुंदर आचारांची आणि अधिक उदात्त आदर्शांची प्रतिष्ठापना करण्याकरता.' [२८] हा विवेक ठेवून नव तरुणांनी मार्गक्रमणा केली तरच हरपलेले श्रेय पुन्हा मिळू शकण्याची काही तरी आशा!

## खांडेकरांच्या सामाजिक इतिहासाची मर्यादा

खांडेकरांनी आपल्या प्रस्तावनांमधून सामाजिक इतिहास किंवा स्थित्यंतरे मांडली आहेत. ब्रिटिशकालापासून स्वातंत्र्योत्तर कालापर्यन्तचा सामाजिक इतिहास या चिंतनातून मिळतो. दशका-दशकातील स्थित्यंतरे ध्यानी येतात. तरीही या चिंतनाला फार मर्यादा पडली आहे. 'मध्यम वर्ग' हेच या चिंतनाचे केंद्र आहे; किंबहुना 'सामाजिक' असा व्यापक शब्द न लावता 'सुशिक्षित मध्यमवर्गाचा' इतिहास हीच या चिंतनाची मर्यादा आहे.

सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास घडविण्याचे सामर्थ्य हे मध्यमवर्गीयातच असते, असे त्यांचे मत आहे. मध्यमवर्गीयांच्या इतिहासात आपोआपच सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक परिवर्तने सामावली जातात. म्हणून तसा तो पूर्ण इतिहास होय. परंतु श्रीमंत-वर्गाच्या व दरिद्रीवर्गाच्या सामाजिक वा सांस्कृतिक अवस्थांचे, त्यांच्या मनोभावांचे चित्रण व चिंतन यात आलेले नाही.

## संदर्भ-टीपा

१ रागिणी (सं. आ.) पृ. २४३, २४४.
२ अश्रू पृ. २९८.
३ उल्का पृ. १३
४ हरा चंपा (हिंदी) पृ. २६८ (अनुवादित)
५ पांढरे ढग पृ. २३
६ पांढरे ढग पृ. २३, २४
७ अग्निनृत्य (संपा.) पृ. १८,१९
८ किता – पृ. १९
९ स्वा. सावरकरांचे क्रांतिकार्य – डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे
१० अश्रू पृ. २९७
११ अश्रू पृ. २९७, २९८
१२अ अश्रू पृ. २९८, २९९
१२ अश्रू पृ. ३०१
१३ अश्रू पृ. ३०४
१४ पांढरे ढग पृ. १७
१५ अग्निनृत्य (संपा) पृ. ८
१६ पांढरे ढग पृ. १८
१७ अश्रू पृ. २९३
१८ अश्रू पृ. २९४
१९ रागिणी (संपा. ) पृ. २४७. २४८,
२० पांढरे ढग पृ. १९
२१ हरा चंपा (हिंदी आवृत्ती ) भावानुवाद पृ. २६५, २६६
२२ अश्रू पृ. ३०७, ३०८
२३ रंग आणि गंध, पृ. १९१, १९२
२४ रिकामा देव्हारा पृ. १८, १९
२५ अश्रू पृ. ३०६, ३०७
२६ अश्रू पृ. ३१५
२७ पांढरे ढग पृ. २४
२८ आगरकर व्यक्ती आणि विचार पृ. ५२, ५३

# ३

# विसावे शतक

## मोहकता आणि दाहकता यांनी नटलेले युग

खांडेकरांनी विसाव्या शतकाला 'यंत्रयुग' असे म्हटले आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाला हे नाव सार्थ आहे. खांडेकर विसाव्या शतकाचे अत्यंत मार्मिक शब्दांत वर्णन करतात.--

'यंत्रयुग हसत खेळत अनेक सुखसोयी घेऊन आले. असंख्य सुंदर स्वप्नांची माळ गळयात घालून त्याने मानवी जीवनात प्रवेश केला. पण ते केवळ एवढ्याच गोष्टी घेऊन आले नाही. सुंदर फुलपाखरांच्या रंगीबेरंगी पंखावरून भयंकर साथीचे जंतू जिकडे तिकडे पसरावेत तसे या युगाचे कर्तृत्व विचारवंतांना वाटू लागले आहे. यंत्रयुगाच्या एका हातात कॅन्सरसारख्या असाध्य गणल्या जाणाऱ्या रोगावरले औषध आहे. त्याच्या दुसऱ्या हातात लाखो लोकांची राखरांगोळी करणारा अॅटमबॉम्ब आहे. त्याच्या एका डोळयातून संरक्षणाची मोहकता ओसंडून वाहत आहे, दुसऱ्यातून संहाराची दाहकता उफाळून येत आहे. बहात्तर मजल्यांच्या इमारती उभारण्याचे अभूतपूर्व सामर्थ्य आजच्या मानवाला आहे; पण त्याच मानवाच्या जगात रात्री डोके ठेवायला निवाऱ्याची जागा नाही म्हणून त्याच इमारतीपुढल्या फूटपाथवर अनाथ अर्भकांसारखी पोटाशी पाय घेऊन पडलेली बहात्तरशे माणसे आहेत. अठरा कारखाने आणि अठरा विश्वे दारिद्र्य, शिक्षणाचा प्रसार आणि जीवनाचा संकोच, वेगाने वाढणारे शास्त्रज्ञान आणि त्या वेगाशी स्पर्धा करणारे पशुतुल्य आचरण, अशा विलक्षण विरोधी जोड्या आजच्या जीवनात एकमेकांच्या हातात हात घालून फिरत आहेत. या विचित्र आणि विलक्षण विरोधांनी सामान्य माणसाचे जीवन अधिक अस्थिर आणि असुरक्षित

केले आहे. त्यांच्या सुखदुःखाच्या कल्पनांना धार आली आहे. ही धार मध्यमवर्गातल्या संवेदनाशील मनाला तर अधिकच जाणवते, जीवन कसे होते, कसे आहे आणि कसे असावे ही तिन्ही चित्रे चांगल्या रीतीने रंगविण्याचे सामर्थ्य याच मनापाशी असते.'[१]

## भगवंताचे अधिष्ठान गमावले

ज्यावेळी हा संवेदनाशील मध्यमवर्ग जीवन कसे होते व आज कसे आहे, याचा विचार करू लागला त्यावेळी त्यांच्या ध्यानात सर्वांत प्रथम कोणती गोष्ट आली असेल, तर ती ही की, 'एका सर्वसाक्षी आणि सर्वशक्तिमान देवाभोवती वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनातल्या अगणित महत्त्वाच्या गोष्टी गुंफल्या गेल्यामुळे जगात असा देव नाही, ही खात्री होताच त्या सर्व गोष्टींची मांडणी पुन्हा नव्या रीतीने करणे आवश्यक आहे.'[२] परंतु अशी नवी रचना मानवाने केली नाही. फार तर 'करू शकला नाही,' असे म्हणता येईल. परिणामतः 'विसाव्या शतकातल्या मनुष्याचा हा आधार ( परमेश्वर ) तुटला आहे··· ऐहिक मूल्यांचे नियंत्रण करणारी जुनी धार्मिक मूल्ये बुद्धीला पटत नाहीत, म्हणून गेल्या शतकात त्याने सोडून दिली. नवी आत्मिक मूल्ये निर्माण करण्याला प्रथम नाना प्रकारच्या वैज्ञानिक शोधांच्या नादात, मग त्यातून निर्माण झालेल्या सुख-सोयींच्या विलासाच्या उन्मादात, नंतर दोन महायुद्धात आणि नंतर अॅटमबॉम्ब व हॅड्रोजनबॉम्ब यांच्या भयचकित करून सोडणाऱ्या गोंधळात त्याला सवडच झाली नाही. पण त्यामुळे माणसाच्या मनातही ही नवी पोकळी भयानक स्वरूप धारण करीत आहे. '[३]

## भारतीय लोकमानसातील पोकळी

नवी आत्मिक मूल्ये निर्माण करण्याची नितांत आवश्यकता होती. पण मानवाला तशी 'सवडच झाली नाही !' या गोष्टीचा भारतीयांवर काय परिणाम झाला ?

'विसाव्या शतकात वाढत्या वेगानं निसर्गावर विजय मिळवीत चाललेल्या विज्ञानानं पाप–पुण्यांच्या पुष्कळ जुन्या कल्पनांचे फुगे फोडून टाकले उदार–मतवाद, लोकशाही, साम्यवाद, गांधीवाद, समाजवाद, मानवतावाद इत्यादी नव्या प्रकारच्या नैतिक कल्पनांच्या चौकटीत सामाजिक मन बसविण्याचा या शतकांत खूप प्रयत्न केला; नाही असं नाही. या प्रयत्नाला कितपत यश आले आहे, याचं मूल्यमापन प्रत्येक देशातले विचारवंत करीत आहेत. भारतापुरतं एवढं निश्चितपणे म्हणता येईल. की, या नव्या नैतिक कल्पनांपैकी कुठलीही आमच्या सामाजिक

मनात अजूनही पूर्णपणे रुजलेली नाही. त्याचीच कटू फळं आजच्या बेबंद आणि भोगलोलुप पण दांभिक आणि बडबड्या समाजजीवनाच्या रूपानं आपण चाखीत आहोत.'[४]

तत्त्वज्ञानातील पाप–पुण्याच्या जुन्या कल्पना नष्ट झाल्या हे ठीक झाले; पण लोकमानसातून केवळ 'पाप–पुण्य' नाहीसे झाले नाही; सारे 'तत्त्वज्ञानचं नष्ट झाले!' सारा समाज जणू तत्त्वशून्य झाला. 'उथळ उपभोग हाच त्यांचा देव बनला. गजबजलेल्या शहराबाहेर ज्याला करमत नाही, क्षणोक्षणी शरीर–सुखाचा नवा चाळा जवळ केल्याशिवाय ज्याचा वेळ जात नाही, असा बहिर्मुख यांत्रिक मनुष्य विसावे शतक निर्माण करीत आहे. या मनुष्याची जात जगात सर्वत्र झपाट्याने वाढत आहे, हे मी नाकारू इच्छित नाही. या लोकांना ख्रिस्त, बुद्ध, श्रीकृष्ण यांचे जुने धर्म नकोत, मार्क्स, गांधी किंवा विवेकानंद यांची नवी तत्त्वज्ञानेही नकोत! संपत्ती आणि सत्ता यांची सदैव पूजा करणे हाच त्यांचा धर्म!'[५]

अशा रीतीने भारतीय समाज एका तत्त्वशून्य पोकळीत वावरत आहे. या तत्त्वशून्यतेचा परिणाम म्हणून एक 'नवा मानव' घडत आहे!

## आत्म्याचा बळी देणारा नवा यांत्रिक मानव

'भारतीय संस्कृतीत आत्म्याच्या गौरवाकरिता शरीराचा बळी देण्याची प्रथा पडली. आता जो नवा यांत्रिक मनुष्य निर्माण होत आहे तो शरीराच्या क्षुद्र अथवा क्षणभंगुर सुखाकरिता आत्म्याचा बळी देण्यात आनंद मानीत आहे. शारीरिक सुखाच्या अंध आसक्तीतून, उपभोगाच्या अमर्याद लालचीतून जास्तीत जास्त द्रव्याचा संग्रह करण्याचे वेड मनुष्याला जडते. या हृदयशून्य लोभातून इतरांवर राक्षसी प्रभुत्व गाजविण्याची इच्छा उत्पन्न होते. लोभ आणि मद यांनी मनाचा मृदुपणा मारून टाकल्यामुळे त्याची प्रीती एका व्यक्तीच्या ठिकाणी स्थिर होऊ शकत नाही. कामवासनेची स्वच्छंद आराधना आणि एक स्त्री मिळाली की दुसरीच्या मागे लागण्याने जो शिकारीतला कैफ चढतो त्याची उपासना हीच दुर्दैवाने त्याच्या प्रीतीची व्यक्त स्वरूपे ठरतात. अशा प्रकारचा चंचल, उथळ, आणि समाज–विन्मुख मनुष्य निर्माण होणं, हे मानवी संस्कृतीचे दुर्दैव आहे.'[६]

## यंत्रयुगातील मानव म्हणजे नवा ययाती

मानव संस्कृतीचे दुर्दैव म्हटले तरी ते आज उघड्या डोळ्याने पहावे लागत आहे. हे विसावे शतक 'सुंदर स्वप्नांची माळ गळ्यात घालून आले असले,' 'फुलपाखरासारखे रंगीबेरंगी' अन् 'मोहक' असले; तरी तत्त्वज्ञानशून्य, बहिर्मुख

आणि भोगलोलुप अशा बनलेल्या आजच्या मानवाचे भवितव्य खांडेकर अत्यंत कठोरतेने सांगतात. --

'यंत्रयुगाने जीवनाला आलेल्या वेगाने आणि भौतिक सौंदर्य व नैतिक कुरूपपणा यांच्या होऊ लागलेल्या विचित्र मिश्रणाने सामान्य मानवाची दुःखे वाढत जातील. त्याच्या सुखाच्या समस्या अधिक अवघड होऊन बसतील. जीवनातील संपूर्ण रस पिळून घेण्याच्या नादात मनुष्य अधिकाधिक विफल होत जाईल. त्या वैफल्यामुळे तो आत्महत्येला --आणि ते जमत नाही म्हणून आत्मलोपाला--प्रवृत्त होईल ······ययाती हा अष्टौप्रहर सुख भोगण्याच्या निराधार नादात आत्मलोपाला --अंतरीचा दिवा मालवायला प्रवृत्त झालेल्या मानवाचा--प्रतिनिधी आहे.' [७]

'पुराणातील ययातीची सुखविलासाची कल्पना स्त्री--सुखापुरतीच मर्यादित होती. आजचा ययाती तसा नाही. शास्त्राने, यंत्राने आणि संस्कृतीने निर्माण केलेले सारे आधुनिक सुंदर व संपन्न जग त्याच्यापुढे पसरले आहे, सुखोपभोगांची विविध साधने हाती घेऊन ते त्याला पळापळाला आणि पावलोपावली मोह घालीत आहे. प्रत्येक क्षणी त्याची वासना चाळवली जात आहे, भडकवली जात आहे. त्याच्या सुखस्वप्नात कुणालाही, कशालाही मज्जाव नाही ! पडद्यावर कामुक हावभाव करणाऱ्या सुंदर नटयांपासून रस्त्यावर अंगावरून जाणाऱ्या नटव्या तरुणींपर्यंत सर्व स्त्रिया त्यात येतात व जातात. मोटारी, बंगले, बँकबुके, नाना प्रकारची नवी नवी पक्वान्ने, घटकेघटकेला बदलायचे सुंदर वेष, गुदगुल्या करणारी गोड, नाचरी, हलकी--फुलकी गाणी, हरघडी गळ्यात पडणारे गेंदेबाज, प्रतिष्ठित पुष्पहार, आकाशाला भिडणारी सत्तेची उत्तुंग शिखरे--सारे सारे या सुखस्वप्नात येते आणि जाते ! ते त्याच्या अंतर्मनाला भूल घालते आणि त्याची तृप्ती न करता, स्वर्गात निघून जाणाऱ्या अप्सरेप्रमाणे, अदृश्य होते..' [८]

## विषवृक्ष फोफावत आहे

यतींचा भारत आता ययातींचा झाला आहे, याचे खांडेकरांना अतीव दुःख होते. 'सार्वजनिक व्यवहारातली लाचलुचपत, समाजातील वाढती गुन्हेगारी, कुटुंबसंस्थेतील अस्वस्थता व असंतुष्टता, विद्यार्थि--वर्गात पसरलेले बेशिस्तीचे वातावरण, नाच--गाण्यांचे उत्तान चित्रपट, कामवासना आणि प्रेमभावना यांची समाजात वाढत्या प्रमाणात होत असलेली गल्लत, कोणत्याही दुर्गुणांविषयी दिसून येणारी सामाजिक बेफिकिरी, किंबहुना कुठल्या तरी शास्त्राच्या अर्धवट आधाराने त्याचे मंडन करण्याची प्रवृत्ती, यांचा परस्परांशी किंवा सामान्य माणसाच्या मनाला आलेल्या या अवकळेशी काही संबंध नाही. असे ज्यांना वाटत असेल ते भाग्यवान आहेत; पण त्यांच्या पंक्तीत परमेश्वराने माझे पान मांडलेले नाही. मी अभागी

आहे, समाजात दिसून येणाऱ्या या सर्व अप्रिय गोष्टी एकाच विषवृक्षाच्या फांद्या आहेत असे मला वाटते. वेगाने बदलणारे व माणसाला यांत्रिक करून सोडणारे जीवन या विषवृक्षाचे संवर्धन करीत आहे. उद्या हा विषवृक्ष फळांनी लगडून जाईल. आणि ती फळे आपल्या समाजाला–ज्या समाजाचे सुखदुःख सहोदरपणामुळे मला अधिक तीव्रतेने जाणवते, अशा या माझ्या समाजाला–चाखावी लागतील, या कल्पनेने मी अतिशय अस्वस्थ होतो.' [९]

खांडेकर ज्या 'सहोदरपणाने' समाजाला अत्यंत जवळिकेने 'माझा समाज' म्हणून संबोधतात, आणि ज्या समाजाचे 'भीषण भवितव्य' ध्यानी येऊन अस्वस्थ होतात, त्या समाजात खांडेकरांसारखे आणखी काही कलावंत जन्माले आले असते तर एवढी निराशा वाटण्याचे कारण नव्हते. खांडेकरांच्या अस्वस्थतेला आणखी हे एक कारण आहे. कलेचा या अवकळेशी काही संबंध नाही; असे मानणारे पंडित बरेच आहेत. अवकळा तर वाढत आहे, पण 'तिचे नियंत्रण करणारी कोणत्याही स्वरूपाची आत्मिक शक्ती आज आपल्या समाजात अस्तित्वात नाही. उलट पूर्वीच्या चार पुरुषार्थांची जागा अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ कसे घेतील, याची काळजी गेली कैक वर्षे आमचे अनेक पंडित करीत आले आहेत !' [१०]

## आत्मविस्मरणासाठी धडपड

हे असे का व्हावे ? या मानवाला झाले आहे तरी काय ?–

याचे कारण असे आहे की, 'महायुद्धाच्या भीषण छायेखाली वावरणाऱ्या जगात तो राहात असल्याकारणाने सुरक्षितपणाच्या भावनेने त्याच्या मनातून पळ काढला आहे. त्यामुळे चोवीस तास कुठल्या तरी फुसक्या सुखात मन गुंतवून ठेवण्याखेरीज आनंदाचा दुसरा मार्ग त्याला आढळत नाही...' [११]

## पण महादेव कोठे आहे ?

समाजात वाढणाऱ्या अपप्रवृत्तींचा हा विषवृक्ष वेगाने फोफावत आहे, कारण या युगाचे समाजाला आकलनच झाले नाही. 'हे एक प्रकारचे विचारमंथन होते. त्या मंथनाचा ताण सोसण्याची शक्ती मूठभर सुबुद्ध, सुशिक्षित आणि सत्प्रवृत्त लोकातच काय ती होती.' [१२] परंतु सामान्य समाज कमालीचा गोंधळून गेला आहे. जीवन इतके बदलेल याची त्याला कल्पनाही आली नाही. यंत्रयुगाने निर्माण केलेल्या सुखसोयींनी तो भुलून गेला; पण या 'लक्ष्मी'च्या पाठोपाठ जीवन जाळणारे 'हलाहलही' बाहेर येईल अशी त्याला कल्पना आली नाही. 'या काळात जणू काही साऱ्या जगातच समुद्रमंथन सुरू झाले. हे मंथन अजून थांबलेले नाही. त्यातून बाहेर पडलेल्या नाना प्रकारच्या रत्नांची परीक्षाही आपल्याला पूर्णपणे झाली आहे असे म्हणवत नाही. अमृताच्या पाठोपाठ हलाहल बाहेर यावे आणि त्याचा स्वीकार करायला महादेव मात्र जागेवर असू नये अशी आजच्या जगाची स्थिती झाली आहे' [१२]

## भारतीय संस्कृती हाच तो महादेव !

विसाव्या शतकाचे हे 'हलाहल पचवायला' 'महादेव नाही' अशी खांडेकरांनी तक्रार केली असली तरी हे हलाहल पचवू शकणारा महादेव भारतीय संस्कृती हाच आहे, असाही विचार त्यांनी एका ठिकाणी मांडला आहे.—

'...त्या भग्न हृदयाला...जो थोडासा दिलासा मिळत आहे तो भारतीय संस्कृतीतल्या तत्त्वज्ञानाचा ! हे काय होत आहे याचा केवळ आमच्या साहित्यिकांनीच नव्हे तर समाज-धुरीणांनीही अवश्य विचार केला पाहिजे.'[१३]

परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, आमच्या साहित्यिकांना आणि समाज–धुरीणांना भारतीय संस्कृतीतील शाश्वत मूल्यांचे आकलन झालेले नाही किंवा जी शाश्वत मूल्ये आहेत, असे सर्व सामान्यत: तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांतून या पंडितांनी वाचलेले आहे, त्याचे सखोल चिंतन त्यांनी केलेले नाही. त्या शाश्वत–मूल्यांचा व या वैज्ञानिक युगाचा सांधा त्यांना जुळवताच आलेला नाही. साहित्यिकांनी तर सामाजिक सुखदु:ख, नीति–अनीती ही केव्हांच आपल्या अंगाबाहेर टाकून दिली आहेत. आता एखादा सामान्य लेखक वा अभिनेता स्वत:ला 'कलावंत' म्हणवतो ! आणि कलावंताने केवळ 'आनंद' द्यायचा असतो ! बाकी समाजाच्या सुखदु:खांशी, आशा–आकांक्षांशी त्याचे काही सोयरसूतक नसते ! बिचारे खांडेकर ! त्यांच्या मनाला वाटते की, 'सामाजिक अवकळेशी आपला संबंध आहे !' 'समाजात दिसून येणाऱ्या अपप्रवृत्ती या एकाच विषवृक्षाच्या फांद्या आहेत !' विशेष असे की, ते 'आपल्या समाजाला या विषवृक्षाची फळे 'उद्या' चाखावी लागतील, या कल्पनेने व्यथित होतात ! म्हणूनच जातिवंत टीकाकारांनी आणि साहित्यिकांनी त्यांना कलावंतच मानले नाही ! !

परंतु एक गोष्ट जाणवते की, विसाव्या शतकात 'भग्न' झालेल्या 'हृदयाला' 'भारतीय संस्कृतीतल्या तत्त्वज्ञानाचा दिलासा' मिळत आहे त्याचा साहित्यिकांनी आणि समाज-धुरीणांनीही विचार करायला हवा, असे खांडेकरांनी म्हटले असले तरी त्यांनी तसा दिलासा का मिळू शकतो याचे स्पष्टीकरण कोठेही केलेले नाही ! 'साहित्यिकांनी व समाज–धुरीणांनी याचा विचार केला पाहिजे !' हे त्यांचे आत्मचिंतन असावे. कारण 'सर्वसाक्षी व सर्वशक्तिमान देव नाही' हे विसाव्या शतकाने सिद्ध केले, 'पाप–पुण्याचे फुगे' या विसाव्या शतकात फुटून गेले, हे विचार त्यांनी जागोजाग प्रकट केले आहेत; मग भारतीय संस्कृतीतील कोणती मूल्ये या भग्न हृदयाला आजही दिलासा देणारी आहेत, त्यांचा विचार अपरिहार्य होता; पण तो सुस्पष्टपणे झालेला नाही.

## शास्त्रज्ञ हेच संत

प्रामुख्याने या विसाव्या शतकात शास्त्रज्ञ हेच संत वाटू लागले. शुद्ध ज्ञानाची उपासना व लोककल्याण ही दोन महत्त्वाची संतलक्षणे आहेत, असे मान्य केले तर शास्त्रज्ञांना संत म्हणायला कोणताही प्रत्यवाय नसावा ! शास्त्रज्ञांइतकी तटस्थ व निरपेक्ष ज्ञानोपासना कोणाला साधते ? शास्त्रज्ञ आपल्या संशोधनाबाबत अत्यंत तटस्थ असतो; इतका की, कित्येक वेळा तो स्वतःची मतेही बदलून घेतो ! प्रयोगांच्या निष्कर्षाबाबत तो ' स्वतःचे मत ' म्हणून मांडत नाही. म्हणूनच शास्त्रज्ञ निराग्रही असतो. ज्ञान स्वयंप्रकाशी असल्याने जाती–धर्म नि राष्ट्रीयता निरपेक्ष असते ! लोककल्याणाच्या दृष्टीने विचार केला तर येशू ख्रिस्ताने लोककल्याण अधिक साधले, की पाश्चरने हा जबरदस्त मतभेदाचा विषय होऊ शकेल !

म्हणून हे विसावे शतक शास्त्रज्ञांकडे ओढले जाणे स्वाभाविक होते. प्रयोग, बुद्धिनिष्ठा व प्रत्यक्ष अनुभव यांवर विज्ञानाचा भर असल्याने डोळे मिटून श्रद्धा ठेवण्याची अपेक्षा त्याने कधीच बाळगली नाही ! ' कशावरून ?' या प्रश्नाचे उत्तर जुन्या धर्मश्रद्धेप्रमाणे कोणा ऋषि–मुनीच्या वचनाचा आधार न देता ' हे तू स्वतःही अनुभवू शकतोस ' असा निर्वाळा विज्ञान देत असल्याने अधिक ज्ञाननिष्ठा व जीवननिष्ठा वाटू लागणे स्वाभाविक होते.

याचा परिणाम असा झाला की, संपूर्ण जीवनाची उभारणी ' धर्म–कल्पनेवर' न करता ' विज्ञान–कल्पनेवर ' करण्यात यावयास पाहिजे, याची स्पष्ट जाणीव विसाव्या शतकाला आली.

## नव्या क्रांतिकारी संशोधनाने जीवनाची रचनाही नव्याने केली आहे

आपणाला असे आढळून येईल की, विज्ञानाच्या प्रत्येक नव्या क्रांतिकारी संशोधनाने संपूर्ण मानवी जीवनात क्रांती घडविली आहे. यंत्र ' निर्माण होताच केवळ आर्थिक क्रांती झाली नाही, त्या क्रांतिकारी संशोधनाने संपूर्ण समाज-जीवनाची नवी रचना केली. समाजाच्या सर्व थरावर त्याचा परिणाम झाला. नवे संबंध, नवी संस्कृती, नवे विश्वच जन्माला आले ! समाजकारण, धर्मकारण, राजकारण, शिक्षण, कला इत्यादि जीवनाच्या सर्व क्षेत्रांत नव्या ज्ञानाचे किरण पसरले. घरांची रचना बदलली, पोशाखांच्या तऱ्हा बदलल्या, शहरातील वातावरण बदलले, काही ' समस्या ' सुटल्या, काही ' नव्याच समस्या ' जन्माला आल्या, सामाजिक व राष्ट्रीय वातावरण बदलले, आंतरराष्ट्रीय समस्या व राजकारण बदलले ! बदलले नाही काय ? शेकडो धर्मगुरूनी ' नवा मानव ' जन्माला यावा म्हणून तिळतिळ जीवन जाळले होते, पण संपूर्ण विश्वावर सहज रीतीने प्रभाव पाडून ते आमूलाग्र पालटवून टाकण्याचे सामर्थ्य कोणाही धर्मसंस्थापकाच्या

प्रवचनाला आले नाही: ते सामर्थ्य शास्त्रज्ञांच्या परीक्षानळीने दाखवले ! स्वाभाविक रीतीनेच 'परीक्षा-नळी, हा आजच्या युगाचा श्रद्धा-विषय झाला. परीक्षानळीचे प्रवचन लोक श्रद्धेने ऐकू लागले.

विसाव्या शतकात मानव गोंधळून जाण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. अनेक शोध लागले ! आपले जीवन या नव्या ज्ञानाशी सुसंगत करून रुळण्याच्या आतच नवे ज्ञान, नवे संशोधन, यांचा नुसता वर्षाव झाला ! विज्ञानावर जीवन आधारले जावे पण नव्या नव्या ज्ञानाने सतत नवी नवी रचना करीत असताना सारी समाजरचनाच आकारहीन बनून गेली !

म्हणून विज्ञानाने नव्या ज्ञानाच्या संशोधनासाठी थांबायला हवे होते, असे मुळीच नाही. वैज्ञानिक संशोधनाने मानव गोंधळला–सतत नवी नवी रचना करणे त्याला जमले नाही; हे थोडे फार खरे आहे. परंतु 'शास्त्रज्ञ मानवाच्या' संशोधनाशी मिळती–जुळती 'भावसृष्टी' निर्माण करण्याची कुवत 'कलावंत व विचारवंत' यांच्यांत निश्चितच आहे ! त्याने नवी समाजरचना विज्ञानाच्या पायावर करण्याचा प्रामाणिक प्रयत्नही केला ! तरीही त्यातून विसाव्या शतकाचा भस्मासुर जन्माला आला ! मानव गोंधळला तो त्यामुळे ! धर्मनिष्ठा आंधळी नि शब्दप्रामाण्यवादी म्हणून ती त्याने सोडली, परंतु ज्या परीक्षानळीवर व प्रयोगशाळेवर त्याने श्रद्धेने या शतकात डोके टेकले त्या प्रयोगशाळेतूनही 'अमृत' बाहेर न पडता 'हलाहलच' बाहेर पडले ! आता त्याला कळेना की काय चुकले ? समजल्या जाणाऱ्या आंधळ्या धर्मकल्पनांनी मानव जितका संयमी, समाजनिष्ठ नि सत्त्वशील वागत होता त्याच्या शतांशही या परीक्षानळीने मानवी जीवनात मानवता निर्माण केली नाही !

आता खरे म्हणजे 'परीक्षानळीच पारखावयास' हवी आहे !

## शास्त्र म्हणजे सर्वस्व नव्हे !

खरे म्हणजे गेल्या शतकातील आणि या शतकातील समाजधुरीणांच्या चिंतनात एक मोठीच उणीव राहून गेली ! 'संपूर्ण विज्ञाननिष्ठा' हीच ती उणीव होय ! समाज–जीवन विज्ञानावर आधारावयास हवे, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ असली तरी 'अपुऱ्या' ज्ञानावर 'पूर्ण श्रद्धा' हा फार मोठा वैचारिक दोष आहे ! मुळात विज्ञान हेच अजून विकास पावणारे शास्त्र आहे. अशा विकासाच्या कोणत्यातरी पायरीवर, अर्धवट स्थितीत असलेल्या शास्त्रावर ते 'शाश्वत व पूर्ण' आहे, या कल्पनेने संपूर्ण जीवनाची उभारणी घाईघाईने करणे यात फार मोठा धोका आहे, याची जाणीव कलावंतांना नि समाजधुरीणांना कधीच झाली नाही.

गेल्या शतकातील शास्त्रज्ञांनी संपूर्ण विश्वाच्या मागे जडतत्त्व आहे, असा शोध लावला. सृष्टीचे आदि व अंतिम तत्त्व 'जड' आहे, असा 'वैज्ञानिक शोध'

लागताच ' मार्क्सने ' आपले सामाजिक तत्त्वज्ञान त्यावर बसवले ! ' जडवाद ' या तथा–कथित ' संपूर्ण शास्त्रीय ज्ञानावर ' त्याने आपल्या सामाजिक तत्त्वज्ञानाची रचना केली ! या शतकाने ते शास्त्रीय ज्ञान अपुरे, एवढेच नाही. तर चुकीचे आहे, असा ' शोध ' लावला ! आता गेल्या शतकातील ' विज्ञानाधिष्ठित समजरचना ' मूलतःच ' अज्ञानाधिष्ठित ' ठरल्यामुळे तिची फळे भोगावी लागणे स्वाभाविकच आहे !

थोडक्यात म्हणजे पूर्णत्वाला न पोचलेल्या ज्ञानाला पूर्ण समजून जीवन उभारणे धोक्याचे आहे. विसाव्या शतकाने हा धोका केव्हाच ध्यानी घेतला नाही. संपूर्ण मानवी जीवन या हलत्या ज्ञानावर उभारण्याचा परिणाम विसावे शतक भोगत आहे ! ' अंध ' श्रद्धा गेली. पण ' पारद–चंचल अधिष्ठान ' स्वीकारले. जुन्या काळी भल्या मोठ्या कासवाच्या पाठीवर–खडक समजून उतरलेल्या वऱ्हाडाची गोष्ट सांगितली जात असे ! कासवाला स्थिर खडक समजण्याची चूक वऱ्हाडाने केली. त्याचा परिणाम ' इतरांना कळला,' पण ' सांगायला ' वऱ्हाड राहिले नव्हते ! विसाव्या शतकातील मानवाने विज्ञानाच्या पाठीवर असेच जीवनाचे वऱ्हाड उतरवले आहे ! हा जो शाश्वत आणि स्थिर खडक तो समजला, ते कासव निघाले ! परिणामतः सारा समाज पाण्यात फेकला गेला आहे. गटांगळ्या खाऊ लागला आहे !

## दुहेरी पेचात मानवी बुद्धी

जीवनाची उभारणी प्रयोगनिष्ठेवर, अनुभवावर व प्रत्यक्षावर भर देणाऱ्या विज्ञानावर करणे आवश्यक आहे, हे खरे आहे; पण त्याचबरोबर अर्धविकसित ज्ञानाचा पूर्ण आधार घेणे हेही धोक्याचे आहे ! विज्ञान म्हणजे विश्वज्ञान ! केव्हा पूर्ण होणार ? या विश्वाचा अंत केव्हा लागणार ? हाही प्रश्नच आहे !

तेव्हा एका बाजूने विज्ञानावर जीवनाची उभारणी करणे अत्यंत आवश्यक आहे, तर दुसऱ्या बाजूने विश्वज्ञानाची पूर्णता केव्हाही गाठणे शक्य नाही, व अपूर्ण ज्ञानावर जीवन उभारणे चुकीचेच ठरणार आहे ! असा हा दुहेरी पेच आहे !

## भारतीय संस्कृतीने हा पेच सोडविला आहे

हा पेच केवळ भारतीय संस्कृतीच सोडवू शकली आहे !

विज्ञानाची जी अंतिम झेप कधी काळी गाठली जाण्याची शक्यता आहे, ती गोष्ट भारतीय संस्कृतीने नुसती गृहीत कृत्य म्हणून स्वीकारली आहे असे नव्हे, तर साक्षात्कारली आहे ! भारतीय संस्कृतीने विज्ञानाची अंतिम झेप सुनिश्चित केली आहे ! सारे विज्ञान एका वाक्यात भारतीय संस्कृती उद्घोषित करते. ' हे सारे

विश्व एकाच तत्त्वातून निर्माण झाले असून चक्राकार गतीने ते पुन्हा एका तत्त्वातच विलीन होण्यासाठी गतिमान झाले आहे !' दुसरे विधान करायचेच झाले तर असे करता येईल की, ' जडातून सूक्ष्माचा विकास ही विश्वप्रक्रिया आहे !'

या वैज्ञानिक अंतिम सत्याचा साक्षात्कार करून घेऊन भारतीय संस्कृतीने संपूर्ण मानवी जीवन याच पायावर उभारण्याचा प्रयत्न केला. आपले कौटुंबिक जीवन, समाजरचना, शिक्षण, राजकीय तत्त्वज्ञान, कला, साहित्य इत्यादि सर्व जीवनाच्या अंगोपांगांचे अधिष्ठान व अंतिम लक्ष्य भारतीय संस्कृतीने हेच निश्चित केले !

यदाकदाचित विज्ञान भारतीय संस्कृतीने साक्षात्कारिलेल्या या तत्त्वाला धक्का लावू शकेल तर–तरच भारतीय समाज–चिंतनाला वा जीवनरचना पद्धतीला धोका पोहोचेल ! विसाव्या शतकातल्या भग्न हृदयाच्या मानवाला भारतीय संस्कृतीतच थोडासा दिलासा मिळत आहे, त्याचे कारण हे आहे !

समाजधुरीणांनी आणि साहित्यिकांनीही या गोष्टीचा अवश्य विचार करावा.

## संदर्भ-टीपा

१ अश्रू २९२
२ सुशीलेचा देव (संपादन ) पृ. १४
३ रंग आणि गंध पृ. ६६
४ ढगाआडचं चांदणं पृ. १४७
५ जळलेला मोहोर – साने यांचे पत्र – पृ. ४३
६ जळलेला मोहोर पृ. ४३
७ ययाती पृ. ४६०
८ ययाती पृ. ४६०–६१
९ ययाती पृ. ४६१
१० ययाती पृ. ४६८
११ ययाती पृ. ४६५–६६
१२ सुशीलेचा देव (संपादन) पृ. १४
१२ अश्रू पृ. २९२
१३ रंग आणि गंध पृ. ६६

# ४

# गांधीवाद : समाजवाद

## खांडेकरांचा ओढा समाजचिंतनाकडेच

खांडेकरांनी आपल्या कादंबऱ्यांसाठी राजकीय वा ऐतिहासिक विषय निवडले नाहीत. हरिभाऊ आपटे, नाथ माधव, वि. वा. हडप आदि लेखकांनी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या; परंतु खांडेकरांनी तो प्रयत्न कधी केला नाही. राजकीय संघर्ष चित्रित करणारे कथानक वा एखाद्या क्रांतिकारकाचे चरित्र त्यांनी लिहिले नाही. राजकारणाची पार्श्वभूमीही त्यांनी क्वचितच निवडली. त्यांच्या प्रस्तावना वा पार्श्वभूमी यातूनही त्यांनी भारतीय स्वातंत्र्य-संग्रामाचा आढावा घेतलेला नाही. खुदिराम बोस, लो. टिळक, सावरकर, करंदीकर, सुभाष यांसारख्या राजकीय क्रांतिकारकांचा ते केवळ धावता उल्लेख करतात. सावरकर, सुभाष, भगतसिंग आदि जहाल क्रांतिकारकांच्या विचारसरणीशी ते मुळीच तादात्म्य पावू शकले नाहीत. याला कारण एकच ! खांढेकरांचा ओढा राजकारणापेक्षा समाजकारणा-कडेच स्वाभाविकपणे होता.

म. गांधींबद्दल त्यांनी जागोजाग परमादर व्यक्त केला आहे. प्रारंभी गांधी-वादाकडे ते श्रद्धेने आकृष्ट झाले. सत्याग्रहाची पार्श्वभूमीही त्यांनी एका कादंबरी-करिता निवडली; परंतु गांधीवादातील समाजकारण हाच त्यांच्या प्रेमाचा विषय झाला होता. खांडेकरांचा स्वाभाविक कल समाजचिंतनाकडेच आहे. इतर विषयांचे त्यांना तादृश महत्त्व वाटत नाही.

## म. गांधींना म्हणता यावे –"मी सुखी आहे"

खांडेकरांची म. गांधीवरील श्रद्धा ' महात्म्यांचे अश्रू ' या निबंधात व्यक्त झाली आहे.

' रक्त हे शरीराचे अश्रू असले तरी अश्रू हे आत्म्याचे रक्त आहे. अलौकिक महात्म्यांचे हे अमोल रक्त जमिनीवर पडू नये म्हणून जोपर्यंत जगातल्या सर्व उदात्त शक्ती धाव घेत नाहीत, हे पवित्र रक्त काढणाऱ्याला शिक्षा केल्याशिवाय आम्ही राहणार नाही अशी प्रतिज्ञा करणारे जोपर्यंत प्रत्येक देशात विपुल प्रमाणात उत्पन्न होत नाहीत, तोपर्यंत मुत्सद्द्यांची एक ठेवणीतली थाप, किंवा कवींचे एक गोड स्वप्न या पलीकडे ' नवे जग ' या शब्दप्रयोगाला काही अर्थ नाही ! ज्या दिवशी गांधीसारख्या महात्म्यांच्या डोळ्यातून अश्रू येण्याऐवजी त्यांच्या मुखातून ' मी सुखी आहे ' असे शब्द निघतील त्याच दिवशी नव्या जगातला पहिला सूर्य आपल्या पवित्र किरणांनी या पृथ्वीला प्रकाशित करील ! ' [१]

## गांधीवाद हाच नव्या जगाचा निर्माता

ज्या नव्या जगाचे स्वप्न खांडेकर पाहतात त्या जगाची निर्मिती गांधीवादानेच होईल, अशी त्यांची श्रद्धा होती. ' मंजिऱ्या ' मधील ' एक मास ' मध्ये मानवी जीवनाचे स्थैर्य नष्ट झालेल्या या संहारक युगात माणसाला उदात्त करणारा गांधीवाद आणि विषमतेला चूड लावू पाहणारा समाजवाद ही दोनच तत्त्वज्ञाने आधार आहेत; असे खांडेकर सांगतात.[२] ही त्यांची श्रद्धा पुनःपुन्हा व्यक्त झाली आहे. ' जगातला सर्वसामान्य माणूस सुखी कसा होईल याची काळजी फक्त समाजवाद व गांधीवाद यांनाच आहे. मनुष्याचा मनुष्य म्हणून जगण्याचा हक्क दोघेही आनंदाने मान्य करतात. मनुष्य या नात्याने प्रत्येकाची अनेक कर्तव्येही आहेत याची काटेकोर जाणीव या दोन तत्त्वज्ञानातच स्पष्टपणे प्रतीत होते. बुद्धी आणि भावना यांच्यापैकी कुणाकडेही दुर्लक्ष न करता ही दोन्ही तत्त्वज्ञाने ' नवे जग ' निर्माण करण्याचा गेली पंचवीस वर्षे प्रयत्न करीत आली आहेत. ' [३] विषमतेने होरपळून गेलेल्या आणि महायुद्धांनी सळो की पळो करून सोडलेल्या मानवतेला या दोन तत्त्वज्ञानांशिवाय सुखाने डोके टेकायला दुसरी जागा नाही, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे ! ' [४]

त्यांच्या या श्रद्धेमुळे गांधीवादाचे विस्तृत विवेचन त्यांनी केले आहे.

## गांधीवादाचे अधिष्ठान भावना

' गांधीवादाला बुद्धीहूनही भावनेचे अधिष्ठान अधिक आहे हे खरे... ... दरिद्रनारायणाचे दुःख लेनिनला जाणवले नि गांधींना ते कळले नाही असे थोडेच आहे ? पण लेनिनला समाजरचनेत क्रांती हवी होती; गांधींना ती मानवी मनातच करायची आहे. समाज कायमचा बदलायला हवा तर मनुष्यच बदलायला हवा, अधिक सुखी असे ' नवे जग ' निर्माण करायचे असेल तर अधिक त्यागी असा नवा

मनुष्य निर्माण केला पाहिजे, अशा तऱ्हेची त्यांची विचारसरणी आहे. आर्थिक मूल्यांइतकीच नैतिक मूल्यांचीही जीवनविकासाला आवश्यकता आहे. या श्रद्धेने गांधीजी आतापर्यंत वागत आले आहेत.'[५]

## हृदयहीन जीवन–पद्धतीला विरोध

गांधींचा विरोध आहे तो हृदयहीन जीवनपद्धतीला ! बुद्धीचे कर्तृत्व ते अमान्य करीत नाहीत, शास्त्रज्ञानाविषयी त्यांना अनादर नाही. पण बुद्धीच्या गुलामगिरीमुळे मनुष्यांत भावनांची दिवाळखोरी उत्पन्न झाल्याचे जे करुणास्पद दृश्य दिसत आहे, ते काही झाले तरी बदललेच पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.'[६]

## गांधीजींचे आयुष्यविषयक नवे तत्त्वज्ञान

गांधीजींनी स्वत:चे असे नवे तत्त्वज्ञान बनवले होते. त्या तत्त्वज्ञानमंदिराचे चार स्तंभ होते. आश्रम, चरखा, प्रार्थना व ब्रह्मचर्य हे ते चार स्तंभ होत. या चारही स्तंभांमागील तत्त्वविचार खांडेकरांनी स्पष्ट केला आहे–

''… मुंबईसारख्या बकाली शहरांना चोवीस तास जी एक यांत्रिक अवकळा आलेली असते, ती पाहूनच गांधींचे मन गुदमरून जात असेल ! त्यांच्या आश्रम कल्पनेचा उगम येथेच आहे ! … मोठमोठ्या शहरांत जिकडे तिकडे पाहावे तिकडे गडबड, धावपळ, अशांती ! बारा महिने, चोवीस तास जणू काही माणसे ही यंत्रेच आहेत ! असल्या शहरांतली अगदी सुदैवी, सुखी माणसे घेतली तर त्यांचे जीवन स्वच्छंदानें पाण्यात पोहणाऱ्या माशाप्रमाणे भासत नाही. मधात पडलेल्या माशीसारखे बसते ते.'[७]

खांडेकरांनी गांधीजींच्या चरख्यामागील तत्त्वज्ञान स्पष्ट करताना म्हटले आहे–

''गांधीजींच्या चरख्याचा उगमसुद्धा काही केवळ तात्कालिक आर्थिक, राजकीय कारणांनी झालेला नाही. आधुनिक सुधारणेच्या आहारी गेलेला सुखवादी मनुष्य प्रत्येक पिढीला निर्मितीच्या नैसर्गिक आनंदापासून दूर जात आहे. … विहिरीतून पाणी काढण्याचा आनंद, नदीत किंवा समुद्रात पोहण्याचा आनंद, … पायवाटेने दूर भटकत जाण्याचा आनंद… या साऱ्या आनंदांना मनुष्य हळूहळू पारखा होत चालला आहे पण अशा प्रकारच्या क्षुल्लक आनंदाना आयुष्यात मोठे स्थान आहे अशी गांधींची श्रद्धा आहे. बालकाच्या विकासाच्या दृष्टीने त्याच्या निर्मितीच्या शक्तीला महत्त्व देण्यात आले पाहिजे असे आधुनिक शिक्षणशास्त्र मानते. प्रौढांच्या आयुष्यालाही तोच नियम लागू आहे. पण आधुनिक यांत्रिक सुधारणा

माणसांना या स्वाभाविक आनंदापासून दूर दूर नेत आहेत.''[८] गांधीजींचा चरखा हे माणसाने निर्मितीच्या नैसर्गिक आनंदाकडे वळावे या विचाराचे प्रतीक आहे !

'गांधीजींच्या प्रार्थनेकडेही याच दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे... ...आजच्या सुधारलेल्या काळात वर्षांवर्षांत आपल्या आयुष्याचा हिशेब पाहायला माणसाला फुरसतच होत नाही. प्रार्थनेसारखी वेळ हाच तो अत्यंत आवश्यक असा सक्तीचा एकांत आहे. आपल्या आशा आकांक्षा, आपली ध्येये व स्वप्ने, आपल्या वासना आणि विचार हे केवळ प्रवाह-पतिताप्रमाणे असू नयेत असे ज्याला वाटते, त्याला अंतर्मुख होण्याची आवश्यकता आयुष्यात केव्हा ना केव्हा तरी पटतेच पटते. स्वत:पासून आणि जगापासून घटकाभर दूर राहून विचार करण्यात माणसाच्या द्रष्टेपणाची बीजे असतात !'[९]

गांधीवादातील चौथा महत्त्वाचा विचार 'ब्रह्मचर्य' हा आहे. खांडेकरांनी तो विचारही स्पष्ट केला आहे–'कामवासनेच्या कोंडमाऱ्यामुळे माणसात अनेक विकृती उत्पन्न होतात, यात मुळीच शंका नाही. पण कामतृप्ती ही एक स्त्री व एक पुरुष यांच्या इच्छेची गोष्ट आहे. असे प्रतिपादन करणारे त्याहूनही फार मोठ्या अशा नव्या विकृती उत्पन्न करीत आहेत... ...गांधीजींच्या संयमाला हसणारे लोक.....! या बुद्धिवादी लोकांनाही डॉ. अनविन्च्या 'The group within the society which suffers the greatest continence displays the greatest energy and dominates the society.' ( समाजातल्या ज्या वर्गात कामविषयक संयम अधिक असतो तोच वर्ग अधिक कर्तृत्व प्रगट करू शकतो व समाजाचे पुढारीपण मिळवतो. ) या वाक्यासारखी अनेक विधाने आधुनिक पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या पुस्तकात वाचायला मिळतील.'[१०]

खांडेकरांनी आपल्या चिंतनाचे अवगुंठन देऊन गांधीवादाचा असा प्रदीर्घ परिचय दिला आहे. तो परिचय देताना गांधीजींचे राजकीय कर्तृत्व त्यांनी जमेस धरलेले नाही–– 'एका परतंत्र राष्ट्राचे नेतृत्व पत्करल्यामुळे आपल्या तत्त्वज्ञानाला त्यांना वेळी–अवेळी राजकारणाच्या चौकटीत बसवावे लागले आहे. पण वर्तमानकाळ गांधीजींच्याकडे राजकीय पुढारी म्हणून पाहात असला तरी भविष्यकाळ विसाव्या शतकातल्या गुंतागुंतीच्या मानवी जीवनाचे भाष्यकार याच दृष्टीने त्यांना मान देईल !'[११] असे त्यांनी म्हटले आहे. म्हणजे गांधी तत्त्वज्ञानातील समाजचिंतनानेच त्यांना आकृष्ट केले होते. गांधीवादाचे व समाजवादाचे त्यांना एवढे जबरदस्त आकर्षण वाटत होते की, 'आगरकर असते तर' त्यांनी काय केले असते, हे सांगतानाही खांडेकर म्हणतात– 'आज आगरकर असते तर त्यांनी गांधींच्या कर्तृत्वाचे आणि आशावादाचे कौतुक केले असते, पण क्रांतीच्या शिखराकडे जाणारा सरळ व बुद्धिग्राह्य मार्ग म्हणून रशियातल्या समाजवादाचे अभिनंदन करायला ते मुळीच चुकले नसते.'[१२]

अर्थात आगरकरांच्या काल्पनिक मुखातून खांडेकरांचेच गांधीवादावरील व समाजवादावरील प्रेम व्यक्त झाले आहे, हे उघड आहे.

## गांधीवाद समाजवादाला पूरक

समाजवाद आपल्या संस्कृतीला नवा नाही. पण 'समाजवाद आपल्या संस्कृतीशी व परंपरेशी विसंगत आहे, या कल्पनेने आपण त्याच्यापासून दूर राहिलो आहो; पण थोडे मागे वळून पाहिले तर समाजवादाचा संदेश उपनिषदांच्या उपदेशापेक्षा भिन्न नाही, असे आढळून येईल. 'सहनौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै' यापेक्षा समाजवाद तरी तुम्हां आम्हांला दुसरे काय शिकवीत आहे ?'[१३]

अशा रीतीने समाजवाद आपल्या भूमीत रुजायला हरकत नाही, असे सांगून खांडेकरांनी 'गांधीवाद समाजवादाला पूरक आहे' असा आपला अभिप्राय पुन्हा प्रकट केला आहे.

अन्नक्षुधा व कामक्षुधा यांच्या बाबतीत होणारी गरिबांची उपासमार थांबवायचा जगात एकच उपाय आहे. श्रीमंतांच्या त्या बाबतीतल्या उधळपट्टीवर आणि अमर्याद हक्कांवर नियंत्रण ! समाजवाद हे नियंत्रण नव्या समाजरचनेच्या रूपाने घालू इच्छितो ! रानटी काळापासून थोडे फार सुसंस्कृत झालेले मानवी मन अधिकाधिक सुधारून हा पालट घडून येईल अशी गांधीवाद अपेक्षा करतो. समाजवादाचा मार्ग जवळचा आहे. तो पूर्णपणे टिकाऊ आहे की नाही. हे काळच ठरवील. गांधीवादाचा मार्ग लांबचा आहे. त्याचे इच्छित साध्य झाले नाही. तरी समाजवादाच्या कार्याला अंती तो पूर्णपणे पोषकच होईल.'[१४]

तो कसा पोषक होईल त्याचेही विवेचन त्यांनी केले आहे.

'समाजवाद आजच्या जगाकडे पित्याच्या दृष्टीने पाहतो, गांधीवाद त्याच्याकडे आईच्या डोळ्यांनी बघतो. समाजवादाला नवे जग निर्माण करायचे आहे, पण नव्या माणसांशिवाय नवे जग निर्माण होणार नाही. आणि कदाचित् झालेच तरी नव्या माणसांशिवाय ते फार दिवस टिकणार नाही. गांधीवादाला नवा मनुष्य निर्माण करायचा आहे. पण जुन्या माणसाचा हृदयपालट यक्षिणीच्या कांडीने होत नाही तो विविध संस्कारांनीच करावा लागतो. सामान्य मनुष्याच्या संस्कारात सामाजिक संस्कार फार, आध्यात्मिक थोडे ! तेव्हा नवा मनुष्य निर्माण व्हायलासुद्धा त्याच्या भोवतालचे जुने जग बदलत राहायलाच हवे !'[१५]

'निसर्गातील अंदाधुंदी आणि माणसातले पशुत्व यांच्याविरुद्ध सतत युद्ध करणाऱ्या गांधीजींचा जीवन संदेश तात्त्विक दृष्टया मनुष्यजातीला मोलाचा वाटत राहील, हे सांगायला कशाला हवे ? पण तो पुस्तकात अथवा एखाद्या

आश्रमात पडून राहायचा नसेल, तर त्याची अंमलबजावणी होण्याकरिता विशिष्ट सामाजिक परिस्थिती आपण आधी निर्माण करायला हवी. जिथे हर एक प्रकारची कृत्रिम विषमता जास्तीत जास्त प्रमाणात नाहीशी झाली असेल अशा समाजरचनेतच गांधीजींचे तत्त्वज्ञान रुजू शकेल. त्याची गोड फळे कधी ना कधी मिळण्याची शक्यता निर्माण होईल. या दृष्टीने गांधीवाद समाजवादाला पूरक आहे...'[१६]

अशा रीतीने आपणास आढळून येते की, खांडेकर एक ' नवे जग ' निर्माण व्हावे, असे स्वप्न पाहात होते आणि ते तसे जग गांधीवाद व समाजवाद ही दोन तत्त्वज्ञानेच निर्माण करू शकतील, ही दोन्ही तत्त्वज्ञाने परस्पर पूरकही आहेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात खांडेकरांचे ते स्वप्न भंग पावले. स्वातंत्र्याने त्या ' नव्या जगाकडे ' वाटचाल केली नाही.

## स्वातंत्र्योत्तर काळात

## गांधीवादाचा सामाजिक जीवनात विसर

खांडेकरांच्या मनाला वेदना देणारे दृश्य दिसू लागले. ते म्हणू लागले.

' जगातली दुर्जनता, सत्ताहीन सज्जनांच्या निषेधाला तृणवत लेखते हा सनातन अनुभवच...आला. आज काल गांधीवादाचा आत्मा असलेली नैतिक मूल्ये मूठभर प्रामाणिक लोकांकडून व्यक्तिजीवनात पाळली जात असली तरी आपले सर्वसामान्य सामाजिक जीवन अगदी खालच्या पातळीवर घसरले आहे. मोठमोठ्या शहरांतून फिरून पहावे, विविध व्यवहार करणाऱ्यांशी बातचीत करावी, ज्या संस्कृतीचा आपण अभिमान बाळगतो ती हॉटेल-संस्कृती किंवा सिनेमा-संस्कृती बनू पाहात आहे, हे चटकन ध्यानात येईल. हिरवी नोट ही आजच्या हिंदी समाजातली सर्वश्रेष्ठ देवता आहे. आपल्या भक्ताला ती कोठलाही वर देऊ शकते. गांधीजी श्रम-पावित्र्याचा सतत पुरस्कार करीत राहिले. पण आजच्या जीवनात हरेक क्षेत्रात दलालांचा, बांडगुळांचा आणि उपटसुंभांचा एक भला मोठा नवा वर्ग निर्माण झाला आहे. जुन्या भारतीय संस्कृतीतील उच्च मूल्ये आम्ही कधीच गमावली. मात्र पाश्चात्य संस्कृतीतील श्रेष्ठ मूल्यांचा विचारपूर्वक स्वीकार करण्याची आम्हाला अजून तादृश आवश्यकता भासत नाही. आमचे विद्यार्थी अद्याप विज्ञानपराङ्मुख आहेत, आमचे शेतकरी अडाणी आणि धर्मभोळे आहेत, आमचे व्यापारी दलाल आहेत, आमचे सुशिक्षित लोक कोणाचे ना कोणाचे बंदे गुलाम आहेत. कोठल्याही प्रकारच्या ध्येयवादाने जनता उजळलेली नाही, भारावलेली नाही. त्यामुळे विकलता आणि विफलता यांच्या भेसूर छाया सामाजिक जीवनावर प्रत्यही अधिक मोठ्या प्रमाणावर पसरत आहेत.'[१७]

## सामाजिक मनात गांधीवाद उतरला नाही

खांडेकरांनी आपली वेदना पुनःपुन्हा बोलून दाखविली.–

' गांधीजींची सत्य, अहिंसा, अपरिग्रह वगैरे वगैरे तत्त्वे त्यांच्यापूर्वी अगदी बावनकशी होती. हिंदुस्थानातल्या सर्व सामान्यांनी त्यांच्या व्यक्तित्वाने दिपून जाऊन या तत्त्वांना माना डोलावल्या. पण एका विशाल देशातल्या पिढीच्या मनावर अपूर्व प्रभुत्व गाजवूनही गांधीजीं सामाजिक मनात ही तत्त्वे कितीसे उमटवू शकले ? त्यांच्या डोळयांदेखत नौखालीचे हत्याकांड झाले. ती आग विझते न विझते तोच पंजाबमध्ये वणवा पेटला. कोणत्याही कारणाकरता मानवी रक्ताचा थेंबही या देशात सांडला जाऊ नये, ही गांधीजींच्या अंतरीची उत्कट इच्छा होती. पण पराभूत हृदयाने आणि विषण्ण मनाने त्यांना आपल्या समोर निरपराधी रक्ताच्या नद्या वाहात असलेल्या पाहाव्या लागल्या. त्यांच्या अपरिग्रह तत्त्वाचा खून त्यांचे लहानमोठे अनुयायी आजकाल किती लीलेने करीत आहेत ? एका छोटया पांढऱ्या टोपीत केवढा मोठा काळाबाजार दडलेला असतो हे प्रसंगी सहस्राक्ष सरकारला सुद्धा उमगत नाही. याचा अर्थ गांधीजींची तत्त्वे चूक होती असा मुळीच नाही. ती त्यांच्यापुरती सर्वस्वी बरोबर होती ! ... [१८]

## धर्मनिष्ठेची जागा अर्थनिष्ठेने घेतली

' महात्माजींची ईश्वरावर जी श्रद्धा होती. तिचा ओझरता स्पर्श तरी हजारांपैकी एखाद्याला झाला असेल किंवा काय याची शंकाच आहे. तो व्हावा तरी कसा ? जीवनात धर्मनिष्ठेची जाग अर्थनिष्ठेने घेतली. जुन्या काळातल्या कृत्रिम आध्यात्मिक पातळीवरून प्रत्येकाचे मन आधिभौतिक पातळीवर आलेले. त्याला खऱ्या खुऱ्या आध्यत्मिक पातळीवर नेण्याचा गांधीजींनी प्रामाणिक प्रयत्न केला. तो निष्फळ आहे, असे त्यांना कधीच जाणवले नसेल असे म्हणवत नाही.......नौखालीच्या हत्याकांडापासून मृत्यूच्या दिवसापर्यंत गांधीजींचे सर्व उद्‌गार वाचले, दिल्ली डायरी बारकाईने चाळली म्हणजे महापुरुषांची दुःखे किती मोठी असतात या जाणिवेने सामान्य माणसांचे मन भयचकित झाल्याशिवाय राहात नाही.'[१९]

## हरिजनांची दु.खे कायम राहिली

गांधीवादातील ईश्वरनिष्ठा समाजात रुजली नाही. तीच गोष्ट त्यांच्या अस्पृश्यांच्या कळवळयाबाबत झाली.

अस्पृश्याला ' हरिजन ' आणि गरिबाला ' दरिद्रीनारायण ' म्हणून संबोधण्याचा तो काळ होता. या संबोधनाच्या मागचा गांधीजींचा हेतू कितीही

स्तुत्य असला तरी पिढ्यान् पिढ्या हरतऱ्हेची विषमता अंगवळणी पडलेले भारतीय सामाजिक मन पूर्णपणे बदलल्याशिवाय त्या शब्दांना खराखुरा अर्थ प्राप्त होणं शक्य नव्हतं. ते शब्द नुसते शब्दच राहिले. हरिजनांची काय किंवा दरिद्रीनारायणाची काय, अगणित पिढीजात दुःखे स्वातंत्र्यानंतरही कायम राहिली. नव्या दुःखांची त्यात भर पडत गेली.'[२०]

## सर्वत्र व्यवहार-वादाचं राज्य

'गांधीजींच्या एकादशव्रतात अपरिग्रहाला मानाचं स्थान होतं. अनिर्बंध धन संचयाच्या नादी माणसाने लागू नये, त्याच्या स्वार्थाला आणि लोभाला संयमाचे आणि सामाजिक संदर्भाचे लगाम असावेत हा या व्रताचा पुरस्कार करण्यातला गांधीजींचा उद्देश होता.'[२१] पण प्रत्यक्षात कोणते दृश्य दिसले ?

स्वातंत्र्योत्तर काळात वाढलेल्या बहुसंख्य तरुणांचा प्रतिनिधी त्यांनी कथा नायकाच्या रूपाने रंगवला आहे. खांडेकर म्हणतात,

'या पिढीच्या लेखी स्वातंत्र्यपूर्व काळातली त्याग आणि ध्येयवाद यांनी उजळलेली सारी स्वप्नं आणि ध्येयं कोमेजून गेलेली फुलं झालेली आहेत. फार तर निर्माल्य म्हणून तुळशीवृंदाबनात टाकावीत. भोवताली सर्वत्र चाललेलं नागड्या उघड्या स्वार्थाचं थैमान पहात १९४७ नंतरच्या पिढीनं तारुण्यात पदार्पण केलं आहे ! गांधीवाद आणि मार्क्सवाद यांच्या तात्त्विक बैठकीशी तिचा शाब्दिक परिचय असला तरी आपण ज्या समाजात वावरतो तिथं सर्वत्र व्यवहारवादाचं राज्य सुरू आहे हे पावलो–पावली अनुभवाला आल्यावर तरुणांनी त्याचाच आश्रय करावा यात विस्मयकारक असं काही नाही.......जशी स्वातंत्र्योत्तर काळात त्याच्या बुद्धीच्या विकासाला साधनं मिळाली तशी भावनेच्या विकासाला मिळालेली नाहीत. देव, धर्म, देश, समाज, कुटुंब यांच्यापैकी कुणाचंही जबरदस्त आकर्षण त्याच्या पिढीला नाही. जीवन म्हणजे ऐहिक जीवन ! यशस्वी जीवन म्हणजे जास्तीत जास्ती सुखोपभोग ! तो मिळवायला जो भरपूर पैसा हवा असतो तो भल्या बुऱ्या मार्गानं कसा संपादन करता येईल. या पलीकडे या पिढीची दृष्टी गेलेली नाही. एका कोरड्या पिढीत तो वाढला आहे.'[२२]

## जीवनाच्या सर्व क्षेत्रात गांधीवादाचा दारुण पराभव

ज्या खांडेकरांनी "नव्या जगाचे' रम्य स्वप्न सतत उराशी बाळगले होते. आणि हे नवे जग निर्माण करण्याचे सामर्थ्य फक्त समाजवाद व गांधीवाद यांच्यातच आहे, अशी श्रद्धा बाळगली होती. त्या तत्त्वज्ञानाचा असा दारुण पराभव झालेला त्यांना पहावा लागला. "या दोन तत्त्वज्ञानाखेरीज मानवतेला सुखाने डोके

टेकायला दुसरी जागा नाही, ही गोष्ट त्यांना ‘ सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट ’ वाटत होती, त्या सूर्यप्रकाशाला ग्रहण लागले ! मानवतेने गांधीवादावर आपले डोके टेकले नाही !

गांधीवादाचा पराभव जीवनाच्या सर्व क्षेत्रांत झालेला आहे, हे खांडेकरांनी वेगवेगळ्या प्रसंगांनी मान्य केले. ‘ जगातली दुर्जनता सत्ताहीन सज्जनांच्या निषेधाला तृणवत लेखते हा सनातन अनुभव ‘ गांधीवादातील ’ अहिंसा ‘ जगत नाही व जगवू शकत नाही’ हे सिद्ध करतो. म. गांधीजींना ‘ पराभूत हृदयाने आणि विषण्ण मनाने ’ ‘ निरपराधी रक्ताच्या नद्या वाहत असलेल्या ’ उघड्या डोळ्यांनी पाहाव्या लागल्या ! त्यांच्या अपरिग्रहाचे व्रत ‘ पांढऱ्या टोपीने ’ सुद्धा स्वीकारले नाही ! ‘ हरिजनांची आणि दरिद्रीनारायणांची दु:खे ’ तशीच कायम राहिली किंबहुना वाढली ! त्यांच्या ईश्वरनिष्ठेचा ’ ओझरता स्पर्शही कुणी आपल्या हृदयाला होऊ दिला नाही ! समाजाने गांधीजींना ‘ महात्मा ’ म्हटले पण त्यांच्या तत्त्वज्ञानाचा यत्किंचितही स्पर्श आपल्या जीवनाला होता कामा नये, याची जणू काळजी घेतली ! आपले राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञान पराभूत झाले आहे, याची दु:खद जाणीव महात्माजींना बोचत होती. खांडेकर म्हणतात, ‘ प्रत्येकाचे मन आधिभौतिक पातळीवरून आध्यात्मिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न’ निष्फळ आहे, असे त्यांना कधीच जाणवले नसेल, असे म्हणवत नाही !’ याचा अर्थ असा की, महात्माजींना आपले तत्त्वज्ञान रुजलेले नाही, याची अखेर जाणीव झाली होती ! त्यामुळेच ‘ दिल्ली डायरीत ’ त्या ‘ महापुरुषाची मोठी दु:खे ’ व्यक्त झाली आहेत.

याचा अर्थ असा की महात्माजींनीच आपले तत्त्वज्ञान पराभूत झाले आहे, याची कबुली दिली आहे. खांडेकरांनीही ती कबुली दिली. त्या पराभवाचे खापर त्यांनी प्रथमत: स्वार्थी आणि ढोंगी लोकांच्या डोक्यावर फोडले आहे.

## मानवतावादी तत्त्वज्ञानाचा पराभव

‘ गांधीजींना मुख्यत: भारतीय मनाची भावनिक क्रांती अभिप्रेत होती. आपल्या समाजाच्या, देशाच्या आणि मानवतेच्या संदर्भातच प्रत्येकानं आपल्या जीवनाचा विचार केला पाहिजे ही त्यांची मूलभूत भूमिका. तत्त्वत: ती अतिशय उदात्त असली तरी आपल्या दैनंदिन जीवनात ती आचरणात आणण्याचं सामर्थ्य कितीशा व्यक्तीत असते याचा विचार गांधीजींनी मंत्रमुग्ध केलेल्या त्या काळात कुणी फारसा केला नव्हता. धर्म, रूढी, वर्ण, वर्ग, जात, कुळ, श्रीमंती या किंवा अशा प्रकारच्या गोष्टींपासून आपल्याला जे विशेष फायदे पिढ्यान् पिढ्या मिळत आले आहेत त्यांच्यावर आपल्या वंचित देशबांधवांसाठी पाणी सोडायला बहुतेक माणसं सुखासुखी तयार होणार नाहीत. या फार मोठ्या धोक्याकडे स्वातंत्र्य

संपादनाच्या चळवळीत दुर्लक्ष झालं. प्रत्येकाला जगात सुखानं जगण्याचा हक्क आहे. या तत्त्वाला माना डोलविणारे आणि सभेत ते कुणी घोषवाक्य म्हणून उच्चारलं तर जोरजोरानं टाळ्या पिटणारे लोक आजकाल आढळतील. पण आपल्याशी इतर लाखो लोकांपेक्षा जे जे अधिक असेल त्याचा त्याचा मर्यादित प्रमाणात का होईना स्वच्छेने त्याग करण्याची मानसिक तयारी कितीशा लोकात आढळते ? स्वातंत्र्योत्तर काळातल्या भारतीय समाजानं गांधीजींनी पुरस्कारिलेल्या सामाजिक धर्मबुद्धीची व्यासपीठावरून सतत भलावण केली, पण वैयक्तिक जीवनात ज्यांनी ती धर्मबुद्धी जागती ठेवली अशा व्यक्ती फार थोड्या. केवळ खाजगीच नव्हे तर सार्वजनिक जीवनातही ती धुडकावून लावणारे आणि मिळालेल्या प्रत्येक संधीचा किंवा हक्काचा फायदा घेत सत्ता आणि संपत्ती यांची लूट आरंभणारेच जास्त ! गांधीजींच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाचा पराभव केला तो या स्वार्थी आणि ढोंगी लोकांनीच !–'[२३]

हळूहळू खांडेकरांचे चिंतनशील मन गांधीवादाचा अधिक सखोल विचार करू लागले. 'आपल्या देशात बुद्धिवादी म्हणवून घेणारा वर्ग– विशेषत: महाराष्ट्रातला पांढरपेशा मध्यमवर्ग– या पंचवीस वर्षांत भावनाप्रधान गांधीवादापासून शक्य तितका अलिप्त राहण्याचा प्रयत्न करीत आला[२४] अशी तक्रार करणारे खांडेकर ' महाराष्ट्रात गांधीवाद का रुजला नाही' याचा विचार करू लागले !– त्यांच्या ध्यानी आले,

## महाराष्ट्रात गांधीवाद का रुजला नाही

'व्यक्ती या दृष्टीने बुद्ध किंवा ख्रिस्त यांच्याप्रमाणे गांधी ही एक युगप्रवर्तक विभूती आहे हे महाराष्ट्राने आनंदाने मान्य केले. पण प्रभावी व्यक्तित्त्व म्हणजे मार्गदर्शक तत्त्वज्ञान नव्हे असे त्याला मन:पूर्वक वाटत होते. व्यक्ति जीवनाची सर्व उच्च मूल्ये समाज-जीवनाला लावून एका बलाढ्य साम्राज्यशाहीवर विजय मिळविणे किंवा चाळीस कोटींचे एक नवे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करणे शक्य नाही असे त्याची सदसद्विवेक बुद्धी म्हणत होती. व्यक्तीच्या जीवनात आत्मिक जाणिवेला थोडा अर्थ असला तरी सामाजिक जीवनात ती एक अर्थशून्य गोष्ट होते भौतिक मूल्ये हीच खरी सामाजिक मूल्ये होत. या गोष्टीकडे गांधीजींनीं पहिल्या पासून कानाडोळा केला आहे.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. महाराष्ट्राने गांधीजींना साथ दिली ती दुभंगलेल्या मनाने– त्यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार केला तोही अडखळणाऱ्या जिभेने ! महाराष्ट्राची बुद्धी गांधीजींच्या मागून नि:शंक मनाने कधीच गेली नाही

आणि महाराष्ट्राची वाणी पूर्ण आत्मीयतेने कधी चरखागीतही गाऊ शकली नाही! …सत्याग्रहाचे प्रतिध्वनी मराठी वाङमयात फारसे नाहीत!'[२५]

व्यक्तीजीवनाचे तत्त्वज्ञान व सामाजिक तत्त्वज्ञान भिन्न असायला हवीत, हा विचार येथे सुचित आहे. पण नंतर त्यांनी हा विचार ठसठशीतपणे मांडला!

## दोन ध्रुव

'…ते तत्त्वज्ञान सामाजिक मनाला जसेच्या तसे लागू करण्यात दंभाचा आणि आत्मवंचनेचा फार मोठा धोका निःसंशय होता. व्यक्ति-मन आणि सामाजिक-मन यांच्यांत नेहमीच दोन ध्रुवांचे अंतर असते. Man is kind but Men are cruel या टागोरांच्या उक्तीत ते अंतर अत्यंत स्पष्टपणाने सूचित केले गेले आहे. व्यक्ती प्रसंगी चटकन अंतरर्मुख होऊ शकते पण समाज नेहमी बहिर्मुख रहातो. त्याची भक्ती आणि भीती, प्रीती आणि द्वेष ही सर्व विचारापेक्षा विकारातून उगम पावतात व्यक्ती-मनाला उच्च जीवनमूल्याचे त्वरित आवाहन होऊ शकते. एवढेच नव्हे तर ती तिच्या आचरणातही प्रगट होतात. सामाजिक मन त्या दृष्टीने जड, बधिर, अगतिक असते.'[२६]

## गांधीवाद अपूर्ण आहे

खांडेकरांनी या नंतर गांधीवादातील अपूर्णतेवर अचूक बोट ठेवले आहे. ते म्हणतात–

'केवळ जीवनाबद्दल दया असावी, सर्वांनी प्रेमाने, बंधुभावाने वागावे एवढीच शिकवण गांधीवादात आहे. विश्वबंधुत्वावर अधिष्ठित असा समाज निर्माण करण्याचा ज्ञानावर अधिष्ठित असलेला मार्गही त्यात कोठेच आढळत नाही, बंधुत्व निर्माण करावयाचे म्हणजे शत्रूत्व का उत्पन्न होते याचा विचार करणे आवश्यक आहे. त्याचीही सुसंगत चिकित्सा व चर्चा त्यात कोठेच दिसत नाही…गांधीवादाच्या तीस वर्षाच्या शिकवणुकीने जीवनाकडे पाहण्याचा सामान्य माणसाच्या दृष्टिकोनात कोणताही मौलिक वा मूलभूत बदल घडून आला नाही, उलट भ्रामक समजुती, जुने विचार, जुनी दृष्टी यांना पोषक असे सांस्कृतिक वातावरण देशात कायम राहिले. त्यात अडाणीपणा, असहिष्णुता, स्वमताबद्दलचा हेकटपणा इत्यादि गोष्टी वाढतच गेल्या.'[२७]

याखेरीज " गांधींच्या विचारसरणीत ऐहिक व नैतिक जीवन यांची सांगड घालण्याऐवजी ऐहिक व नैतिकतेच्या कक्षेबाहेर टाकण्यात आले ही महत्त्वाची उणीव आहेच.'[२८]

## खांडेकरांचे विचार-विकसन

गेल्या तीस वर्षातील खांडेकरांचे गांधीवादावरील लेखन पाहिले तर त्यातच विचार-विकसन स्पष्ट दिसून येते. गांधीजींच्या विभूतिमत्त्वाने दिपून जाऊन खांडेकरांनी गांधीवादाचा प्रथम श्रद्धेने स्वीकार केला.' 'नव्या जगाची निर्मिती' केवळ याच तत्त्वज्ञानाने होईल, असे त्यांना वाटले. 'मानवी जीवनाचे भाष्यकार' म्हणून त्यांनी गांधीजींना गौरविले. पण गांधीजींनी स्वतःच आपल्या पराभवाची कबुली दिली, जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात समाजाने गांधीवाद स्वीकारला नाही, महाराष्ट्रात तो रुजला नाही; सामान्य माणसांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानात कोणतेही मौलिक परिवर्तन तो करू शकला नाही, हे पाहिल्यावर खांडेकरांनी आपल्यापरीने गांधीवादाचे विश्लेषण केले.

हे विश्लेषण करीत असताना खांडेकरांनी काही मौलिक चिंतन प्रकट केले आहे.

व्यक्ति-जीवन व समाज-जीवन हे 'दोन ध्रुव' होत. आध्यात्मिक मूल्ये व्यक्ति-जीवनाला आवाहन करू शकतात, ती व्यक्तीच्या जीवनात प्रकट होऊ शकतात, पण समाज नेहमी बहिर्मुखच राहातो. समाज विकारी असतो. भौतिक-मूल्ये हीच सामाजिक-मूल्ये होत. सामाजिक-चिंतनात ऐहिकता व नैतिकता यांची सांगड घालणे जरूर आहे. विश्वबंधुत्वाची नुसती शिकवण, ही निरुपयोगी ठरते. वर्षानुवर्षे संत-महात्मे ती देत आले आहेतच. त्या विश्वबंधुत्वाकडे जाणारा मार्ग सांगता येणे आवश्यक आहे !

गांधीवादाने व्यक्ति-मन व सामाजिक-मन यातील अंतर ध्यानी घेतले नाही. त्यामुळे गांधीवाद समाज-जीवनात रुजू शकला नाही.

## खांडेकरांच्या चिंतनातील दोष

खांडेकरांनी गांधीवादातील उणीव दाखविली आहे, ती अत्यंत शास्त्रशुद्ध भाषेत मात्र प्रकट झाली नाही ! व्यक्ति-मन व समाज-मन हे 'दोन ध्रुव' होत, असे ते म्हणतात. गुणधर्माच्या दृष्टीने ती मने परस्पर-विरोधी असतात हे खरे आहे. त्या दृष्टीने त्यांना दोन ध्रुव म्हणता येईल ! पण समाजचिंतकाने ते दोन ध्रुव नसून 'द्वंद्व' आहे, हे ध्यानी ठेवले पाहिजे. द्वंद्वाचे वैशिष्टय हेच असते की त्याची दोन टोके परस्पर विरुद्ध गुणधर्माची असतात, पण ती परस्पर पूरक असतात, कोणत्याही आधुनिक समाजचिंतकाने हे द्वंद्वाचे रहस्य समजावून घेतलेले दिसत नाही. त्यामुळेच आधुनिक 'वाद' कोणत्या ना कोणत्या एका अंगावर भर

देऊन दुसरे अंग पूर्णांशाने नष्ट करू इच्छितो. किंवा त्या दोन जीवनात ' संघर्ष ' कल्पितो दोन ध्रुवांची भाषा अशास्त्रीय आहे. व्यक्तिजीवन व सामाजिक-जीवन हे द्वंद्व आहे. ते दोन ध्रुव नव्हेत !

Man is kind but men are cruel !

हे विधानही द्वंद्व-रहस्य ध्यानी न घेतल्यानेच उच्चारले गेले आहे ! व्यक्तीच्या जीवनात आध्यात्मिक-मूल्ये आदर्श ठरतात तर सामाजिक जीवनात भौतिक-मूल्ये आदर्श असतात, हे खांडेकरांचे विधान ' द्वंद्व ' कल्पनेला जवळ आहे. ' मनुष्य प्रेमळ असतो, पण समाज क्रूर असतो ' या विधानापेक्षा खांडेकरांचे विधान अधिक शास्त्रीय पायावर उभे आहे आपल्या प्राचीन सांस्कृतिक परंपरेला धरून असेही म्हणता आले असते. व्यक्तीचा आदर्श ' ब्राह्मण ' आहे, तर समाज नेहमी ' क्षात्रवृत्तीत ' राहतो !

## खांडेकरांच्या चिंतनातील अपूर्णता

खांडेकरांनी गांधीवाद व समाजवाद या दोन तत्त्वज्ञानांचा पाठपुरावा केला होता. त्यापैकी गांधीवादाची स्वातंत्र्योत्तर काळातील स्थिती त्यांनी स्पष्टपणाने मांडली. त्याच्या गुणदोषाची मोकळेपणाने चर्चा केली. परंतु समाजवादाच्या बाबतीत ते त्यानंतर काही बोलले नाहीत. कदाचित समाजवादाला अभिप्रेत समाजरचना अद्याप झालेलीच नाही, तो प्रयोग अद्याप पूर्ण झालेला नसल्याने त्याचे मूल्यमापन आजच करणे, योग्य वाटले नसावे.

परंतु भारतात तो प्रयोग पूर्ण झाला नसला तरी इतरत्र झाला आहे. तिकडे त्याचे काय परिणाम झाले आहेत ते अभ्यासण्यासारखे आहेत.

' समृद्धीचा शाप ' या लेखात डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी समाजवादी समाजरचनेचा निरनिराळ्या राष्ट्रांत झालेल्या प्रयोगांचा आढावा घेतला आहे. ते म्हणतात.[२९] ' समाजवादी समाजरचना स्वीडनमध्ये पूर्ण झाली आहे. सर्व उद्योग सरकारी आहेत. आईला प्रत्येक मुलामागे ४०० रु. मिळतात. शिक्षण पूर्णांशाने नि:शुल्क; वैद्यकीय खर्च ७५ % सरकारचा ! तरी खून, दरोडेखोरी ८० % ने वाढली आहे. स्त्रियांवर २८ % अधिक बलात्कार होत आहेत. मादक द्रव्ये अधिक खपू लागली आहेत. आत्महत्या वाढते आहे. बालगुन्हेगारी तिप्पट झाली आहे··· ' या तऱ्हेने त्यांनी अमेरिका, ब्रिटन, बेल्जम, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इत्यादि देशांतील ' प्रगत राष्ट्रांतील प्रगती ' कोणती ते दाखवून दिले असून या भयंकर गोष्टीला कारण ' समाजवादी समाजरचना ' असे दिले आहे. या समाजरचनेने सारे नागरिक जबाबदारीतून मुक्त झाले आहेत ·· समाजवादी समाजरचनेत वासनांवरील नियंत्रण, त्याग, संयम इत्यादींची प्रेरणाच नष्ट होते. नीरस आयुष्य, भग्न संसार, इत्यादींचे भयंकर चित्र डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी रेखाटले आहे.

तेव्हा हे ' वाद ' वादातीत नाहीत, नवे जग निर्माण करण्याची या वादांची कुवत नाही, आणि मानवतेला सुखाने डोके टेकता येईल असे तत्त्वज्ञानही सापडलेले नाही हेच खरे !

## संदर्भ-टीपा

१ खांडेकर : व्यक्ति आणि साहित्य : पृ. ७३–७४ (मंजिऱ्या–पृ. ७५ )

२ कित्ता : पृ. ७३

३ क्रौंचवध – निवेदन पृ. १९

४ नवी कौले : कल्पलता पृ. १३५

५ क्रौंचवध : निवेदन पृ. २१

६ कित्ता पृ. २२

७ कित्ता पृ. २२

८ कित्ता पृ. २३

९ कित्ता पृ. २३

१० कित्ता पृ. २४

११. कित्ता पृ. २४

१२ आगरकर : व्यक्ति आणि विचार पृ. ५०

१३ पृथ्वी वाटोळी आहे; मंझधार पृ. १२४

१४ क्रौंचवध पृ. २७

१५ कित्ता पृ. २५४

१६ खांडेकर व्यक्ति आणि साहित्य : (' महात्मा गांधी ' ले. प्रा. गोवर्धन पारीख–यावरील समीक्षणात्मक लेख – खांडेकर – पृ. ४७)–पृ. १०३–१०४.

१७ रेषा आणि रंग : पृ. ४२–४३

१८. जळलेला मोहोर पृ. ३८–३९

१९ रेषा आणि रंग– पृ. ४६

२० ढगा आडचं चांदणं पृ. १४१–४२

२१ कित्ता पृ. १४१–४२

२२ कित्ता पृ. १४३–४४

२३ कित्ता पृ. १४५–४६

२४ क्रौंचवध पृ. २०

२५ अभिषेक : पृ. १७१–७२

२६ रेषा आणि रंग पृ. ४५

२७ महात्मा गांधी : रेषा आणि रंग पृ. ४०

२८ कित्ता : पृ. ४७

२९ समृद्धीचा शाप : केसरी दिवाळी अंक १९६८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२६१५
निबंध २८७३

# ५

# दुःखाची कारणमीमांसा

## दुःखाचे पहिले कारण : आर्थिक विषमता

खांडेकरांनी सामाजिक दुःखांची केवळ चित्रणे केलेली नाहीत, आपल्या परीने मीमांसाही केली आहे.

'आर्थिक विषमता' हा त्यांच्या अनेक कथांचा आणि काही कादंबऱ्यांचा विषय झाला आहे, गरिबांची दुःखे सांगताना त्यांच्या लेखणीला विलक्षण धार येते. 'हे जग गरिबांचे नाही, श्रीमंताचे आहे. जग माणुसकीचे नाही, मायेचे नाही, सत्याचे नाही, ते व्यवहाराचे आहे, कायद्याचे आहे' सत्तेचे आहे. इथे वशिल्याशिवाय नोकरी नाही, श्रीमंतीशिवाय मान नाही, मोटार उडविता आल्याशिवाय मोठेपण नाही... [१]' असे तर ते सांगतीलच पण त्यातही लक्ष्मीपुत्रांच्या वृत्तीवर प्रकाशझोत फेकतील ! –

'गरीब आणि श्रीमंत' असे समाजाचे दोन विभाग आहेत; एवढेच नव्हे तर 'त्यातल्या एका भागाची चैन दुसऱ्या भागाच्या कष्टावर उभारली आहे. एकाची रंगपंचमी दुसऱ्याच्या रक्ताने साजरी होत आहे. एकाचे अलंकार दुसऱ्याने आयुष्यभर गाळलेल्या घर्मबिंदूतून घडविले जात आहेत. एकाचे स्वातंत्र्य दुसऱ्याच्या गुलामगिरीवर उभारलेले आहे. ही एका जगातली माणसे नाहीत. त्यांची जगे दोन आहेत; सर्वस्वी भिन्न आहेत. बाह्यतः ती कितीही जवळजवळ वावरत असली तरी त्यांच्यामध्ये दोन ध्रुवांचे अंतर आहे.' २

गरीब–श्रीमंत यांच्यातील दोन ध्रुवांचे अंतर हे सामाजिक दुःखाचे पहिले कारण म्हणून सांगता येण्याजोगे असले तरी सर्व दुःखे अर्थमूलक आहेत असा काही त्याचा अर्थ नाही. ज्यांची आर्थिक स्थिती बरी आहे अशा मध्यमवर्गीयात दुःखे आहेतच. त्यांच्या दुःखाची कारणे भिन्न आहेत.

खांडेकरांनी मध्यमवर्गीयांच्या दुःखाचे स्वरूप अत्यंत मार्मिकपणे टिपले आहे.

**मध्यम वर्गात भावनात्मक अराजक**

'क्षुद्र व क्षुल्लक विषयावर वरचेवर होणारे वर्तमानपत्री आकांडतांडव, कोण कोणाची टोपी अधिक उंच उडवतो या बाबतीत बुद्धिवंतांमध्ये लागलेली स्पर्धा, शृंगाराच्या नावाखाली वाङमयात शिरलेली कलाशून्य कामुक चित्रणे, हास्यरसातला हास्यास्पद उथळपणा या सर्व दोषांचे मूळ मध्यमवर्गाच्या ... ... पराभूत मनोवृत्तीत आहे. या वर्गात अराजक माजले आहे; पण ते बौद्धिक नसून भावनात्मक आहे.'[3]

या भावनात्मक अराजकाला कारण बकाली शहरीजीवन आहे, असे खांडेकरांचे निदान आहे.

**बकाली शहरी जीवन : अनीतीची बीजभूमी**

शहरातील यांत्रिक जीवन, डोळयांना भुलवणारे विविध प्रकारचे मोह आणि व्यवसायाच्या निमित्ताने कौटुंबिक जीवनाला पारखे होणे, या वातावरणाचा परिपाक दुसरा काय होणार ? 'पत्नीपासून दीर्घकाल दूर राहावे लागणारी, मुलाबाळांच्या गोड सहवासात फुलणाऱ्या नाजूक भावनांना पारखी झालेली, कौटुंबिक जीवनामुळे सहजासहजी निर्माण होणाऱ्या संयमाचा संपर्कही नसलेली माणसे बकाली शहरात आपले दारिद्र्यामुळे कंटाळवाणे झालेले जीवन कंठीत आहेत.'[४]

खांडेकरांनी 'दारिद्र्याने जीवन कंटाळवाणे' झाले आहे, असे म्हटले असले तरी ते केवळ गरिबांच्या असंयमी वर्तनाचे कारण होऊ शकेल; मध्यमवर्गाच्या नव्हे ! मुंबईसारख्या शहरात कोकणातून आलेले शेकडो मजूर आपल्या कौटुंबिक जीवनाला पारखे झालेले असतात. तेव्हा दारिद्र्याने त्यांचे जीवन कंटाळवाणे व असंयमी होणे स्वाभाविक आहे. पण मध्यमवर्गातही 'संयमाचा' संपर्क नसलेली माणसे 'बकाली शहरी जीवनात' आहेत, त्यांच्या 'कंटाळवाणे-पणाचे' कारण काय आहे ? हा वर्ग तसा दरिद्री नाही, पत्नीपासून दीर्घकाल दूर राहात नाही, नाजूक भावनांना तसा पारखा झालेला नाही; तरीही त्यांच्यामध्ये भावनात्मक अराजक माजले आहे !

या भावनात्मक अराजकाचे विदारक चित्रण खांडेकर करतात.—

**मनोविकार अनिर्बंध होत आहेत**

आजचा मनुष्य केवळ अंध, स्वैर आणि क्रूर कामवासनेलाच बळी पडत आहे असे नाही ! त्यांचे सर्वच मनोविकार अनिर्बंध आणि अनियंत्रित होऊ पाहात

आहेत. त्याच्या विविध वासना उच्छृंखल होत आहेत. यांत्रिक जीवनाने त्यांचे समाधान नष्ट केले आहे‥‥ सुखात, विलासात, उपभोगात स्वतःला बुडवून टाकायचे, दररोज पक्वान्नापासून पोशाखापर्यंत नव्या नव्या टूमी काढायच्या आणि त्यांच्या आस्वादात वा प्रदर्शनात निमग्न राहायचे, हाच त्याचा जीवनधर्म होत आहे……'[५]

याला कारण काय ? हा काही दारिद्र्याचा परिणाम नाही ! कौटुंबिक ' गोड सहवासाला पारखे ' झालेले 'कंटाळवाणे आयुष्य' हेही कारण नाही. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलल्याचा तो परिणाम आहे. 'आजच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानातही सर्व भर उपभोगावरच दिलेला असतो. त्यामुळे तारुण्य नाही. तर जगण्यात मौज नाही. अशा प्रकारच्या ढोंगी कल्पना रूढ होऊन जो तो आपण तरुण आहो असा आभास उत्पन्न करण्याच्या अट्टाहासात दंग होऊन जातो !'[६] —— आणि तारुण्याचे लक्षण काय ? तर उपभोग ! ' बऱ्या-वाईट मार्गाने जे जे शरीरसुख मिळेल–– मग ते खानपानाचे असो, चुंबन–आलिंगनाचे असो अथवा लूट, खून अशा पद्धतीचे असो—— ते ते घेत राहावे, कारण या जीवनात वासनांच्या तृप्तीशिवाय दुसरे काहीही सत्य नाही, असे त्याला वाटू लागले आहे. साहजिकच कधी विकल, विमनस्क स्थितीत तर कधी धुंद, बेबंद स्थितीत तो आला दिवस कंठीत आहे. त्याच्या जीवनाचे जहाज भोवतालच्या वादळी समुद्रात डोंगरलाटांत सापडून हेलकावे खात आहे. स्थिर होण्यासाठी कुठे नांगर टाकावा, तर हे जहाज किनाऱ्यापासून फार दूर दूर खोल समुद्रात वाहत चालले आहे. शरीरसुख —— अधिक सुख– नवे, नवे सुख– मिळेल त्या मार्गाने सुख– ही त्या अंतर्मनाची एकच एक घोषणा होऊ पाहत आहे.'[७]

मनुष्याचे आजचे जीवन विषयक तत्त्वज्ञान हे असे केवळ शरीर–केंद्रित झाले आहे. हे नवे तत्त्वज्ञान उदयास येण्याचे कारण भाऊसाहेब स्पष्ट करतात.——

## मानव आत्मलोप करू इच्छितो

' महायुद्धाच्या भीषण छायेखाली वावरणाऱ्या जगात तो राहात असल्या-कारणाने सुरक्षितपणाच्या भावनेने त्यांच्या मनातून पळ काढला आहे. त्यामुळे चोवीस तास कुठल्या तरी फुसक्या सुखात मन गुंतवून ठेवण्याखेरीज आनंदाचा दुसरा मार्ग त्याला आढळत नाही. आत्मानंद ही भावनाच त्याला अपरिचित होऊन बसली आहे.'[८] …… म्हणून ……' आजचा मनुष्य अधिक सुखांच्या मागे धावण्यात मग्न आहे. ती जास्तीत जास्त प्रमाणात मिळावीत म्हणून तडफडत आहे [९]…….' हेच त्याचे जीवनसूत्र होऊन बसले आहे.

तो इंद्रियजन्य सुखाच्या धुंदीत स्वतःला विसरून जाऊ इच्छितो; आत्मलोप करू इच्छितो! कारण जीवनाच्या दारुण भवितव्याकडे तो नजर लावू शकत नाही. आज विज्ञानाने एवढी प्रगती केली असली, इतक्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या असल्या तरी जीवन विनाशाच्या काठावर उभे आहे, असे त्याला जाणवते; आणि तो भीतीने तोंड लपवू इच्छितो.

खांडेकरांनी सामान्य माणसाच्या मनातली व्यथा स्पष्ट केली आहे.––

## मानवजात अद्याप दुःखात पिचत आहे

'मानवाने आपल्या बुद्धीने एवढे मोठमोठे विजय मिळवले असूनही मानवजात अद्याप दुःखातच पिचत आहे. सामान्य मनुष्य संसारातल्या सर्व सामान्य सुखापासूनही अजून दूर आहे, इतकेच नव्हे तर, सध्याच्या धावपळीच्या नि धकाधकीच्या यांत्रिक आयुष्य–क्रमापेक्षा पूर्वीचे आपले शांत नि साधे भोळे जीवन अधिक सुखी होते की काय अशी शंकाही त्यांच्या मनात उत्पन्न झाली आहे.... [१०]'

याचे कारण उघड आहे– 'सुधारणा, सुधारणा म्हणून ज्या गोष्टी आपण आजपर्यंत भराभर कवटाळल्या. त्यांचा जीवनाच्या सुखशांतीशी कितीसा संबंध आहे? सोने मानून आपण मुलामा दिलेले पितळ तर विकत घेत नाही ना? कचकड्याचे बाळ खऱ्याखुऱ्या बाळापेक्षा अधिक रेखीव नि सुंदर दिसते; पण ते कितीही शोभिवंत असले तरी त्याला पोटाशी धरून आपली वात्सल्याची तहान कुठल्या आईला तृप्त करता येईल? सुधारणा, सुधारणा म्हणून आपण जिचा उदो उदो करीत आहो तीही अशीच केवळ शोभेची वस्तू आहे काय? मानवी हृदयाशी, स्त्री-पुरुषांच्या भावनांशी आणि जीवनाच्या अंतरंगाशी समरस होऊन ते अधिक सुंदर करण्याचे सामर्थ्य त्या सुधारणेत आहे काय? [११]... आतापर्यंतचा इतिहास म्हणजे मानवी बुद्धीच्या विविध विकासांचा इतिहास होय[१२] हे मान्य केले तरी मानवातील राक्षस जागा झाला आहे हे सिद्ध करायला फार दूरवर जायला नको.

## मनुष्यातला राक्षस जागा झाला आहे

'मनुष्यात ईश्वर निद्रिस्त असतो असं आम्ही ... युगं न् युगं ऐकत आलो. आम्हाला वाटलं– तो झोपी गेलेला ईश्वर आज ना उद्या जागा होईल. आमच्या आक्रोशानं का होईना, त्याची झोप मोडेल. पण आम्हाला अनुभव अगदी उलटा आला. मध्यंतरी झोपी गेलेला मनुष्यातला राक्षस या विसाव्या शतकात पुन्हा जागृत झाला आहे. विद्या, शास्त्र, संस्कृती, इत्यादिकांचे सुंदर मुखवटे घालून तो राक्षस देव म्हणून आजच्या जगात मिरवण्याचा प्रयत्न करीत आहे.... आज जगात देवाचं राज्य नाही, राक्षसांचं राज्य आहे![१३] "शरीरसुखाकरिता आपला आत्मा

आहेत. त्याच्या विविध वासना उच्छृंखल होत आहेत. यांत्रिक जीवनाने त्यांचे समाधान नष्ट केले आहे····· सुखात, विलासात, उपभोगात स्वतःला बुडवून टाकायचे, दररोज पक्वान्नापासून पोशाखापर्यंत नव्या नव्या टूमी काढायच्या आणि त्यांच्या आस्वादात वा प्रदर्शनात निमग्न राहायचे, हाच त्याचा जीवनधर्म होत आहे······'[५]

याला कारण काय ? हा काही दारिद्र्याचा परिणाम नाही ! कौटुंबिक 'गोड सहवासाला पारखे' झालेले 'कंटाळवाणे आयुष्य' हेही कारण नाही. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलल्याचा तो परिणाम आहे. 'आजच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानातही सर्व भर उपभोगावरच दिलेला असतो. त्यामुळे तारुण्य नाही. तर जगण्यात मौज नाही. अशा प्रकारच्या ढोंगी कल्पना रूढ होऊन जो तो आपण तरुण आहो असा आभास उत्पन्न करण्याच्या अट्टाहासात दंग होऊन जातो !'[६] –– आणि तारुण्याचे लक्षण काय ? तर उपभोग ! 'बऱ्या-वाईट मार्गाने जे जे शरीरसुख मिळेल–– मग ते खानपानाचे असो, चुंबन–आलिंगनाचे असो अथवा लूट, खून अशा पद्धतीचे असो–– ते ते घेत राहावे, कारण या जीवनात वासनांच्या तृप्तीशिवाय दुसरे काहीही सत्य नाही, असे त्याला वाटू लागले आहे. साहजिकच कधी विकल, विमनस्क स्थितीत तर कधी धुंद, बेबंद स्थितीत तो आला दिवस कंठीत आहे. त्याच्या जीवनाचे जहाज भोवतालच्या वादळी समुद्रात डोंगरलाटांत सापडून हेलकावे खात आहे. स्थिर होण्यासाठी कुठे नांगर टाकावा, तर हे जहाज किनाऱ्यापासून फार दूर दूर खोल समुद्रात वाहत चालले आहे. शरीरसुख –– अधिक सुख– नवे, नवे सुख– मिळेल त्या मार्गाने सुख– ही त्या अंतर्मनाची एकच एक घोषणा होऊ पाहत आहे.'[७]

मनुष्याचे आजचे जीवन विषयक तत्त्वज्ञान हे असे केवळ शरीर–केंद्रित झाले आहे. हे नवे तत्त्वज्ञान उदयास येण्याचे कारण भाऊसाहेब स्पष्ट करतात.––

## मानव आत्मलोप करू इच्छितो

'महायुद्धाच्या भीषण छायेखाली वावरणाऱ्या जगात तो राहात असल्या-कारणाने सुरक्षितपणाच्या भावनेने त्यांच्या मनातून पळ काढला आहे. त्यामुळे चोवीस तास कुठल्या तरी फुसक्या सुखात मन गुंतवून ठेवण्याखेरीज आनंदाचा दुसरा मार्ग त्याला आढळत नाही. आत्मानंद ही भावनाच त्याला अपरिचित होऊन बसली आहे.'[८] ······म्हणून ·····' आजचा मनुष्य अधिक सुखांच्या मागे धावण्यात मग्न आहे. ती जास्तीत जास्त प्रमाणात मिळावीत म्हणून तडफडत आहे [९]······' हेच त्याचे जीवनसूत्र होऊन बसले आहे.

तो इंद्रियजन्य सुखाच्या धुंदीत स्वतःला विसरून जाऊ इच्छितो; आत्मलोप करू इच्छितो ! कारण जीवनाच्या दारुण भवितव्याकडे तो नजर लावू शकत नाही. आज विज्ञानाने एवढी प्रगती केली असली, इतक्या सुखसोयी उपलब्ध करून दिल्या असल्या तरी जीवन विनाशाच्या काठावर उभे आहे, असे त्याला जाणवते; आणि तो भीतीने तोंड लपवू इच्छितो.

खांडेकरांनी सामान्य माणसाच्या मनातली व्यथा स्पष्ट केली आहे.––

## मानवजात अद्याप दुःखात पिचत आहे

'मानवाने आपल्या बुद्धीने एवढे मोठमोठे विजय मिळवले असूनही मानवजात अद्याप दुःखातच पिचत आहे. सामान्य मनुष्य संसारातल्या सर्व सामान्य सुखापासूनही अजून दूर आहे, इतकेच नव्हे तर, सध्याच्या धावपळीच्या नि धकाधकीच्या यांत्रिक आयुष्य–क्रमापेक्षा पूर्वीचे आपले शांत नि साधे भोळे जीवन अधिक सुखी होते की काय अशी शंकाही त्यांच्या मनात उत्पन्न झाली आहे.... [१०]'

याचे कारण उघड आहे– ' सुधारणा, सुधारणा म्हणून ज्या गोष्टी आपण आजपर्यंत भराभर कवटाळल्या. त्यांचा जीवनाच्या सुखशांतीशी कितीसा संबंध आहे ? सोने मानून आपण मुलामा दिलेले पितळ तर विकत घेत नाही ना ? कचकड्याचे बाळ खऱ्याखुऱ्या बाळापेक्षा अधिक रेखीव नि सुंदर दिसते; पण ते कितीही शोभिवंत असले तरी त्याला पोटाशी धरून आपली वात्सल्याची तहान कुठल्या आईला तृप्त करता येईल ? सुधारणा, सुधारणा म्हणून आपण जिचा उदो उदो करीत आहो तीही अशीच केवळ शोभेची वस्तू आहे काय ? मानवी हृदयाशी, स्त्री-पुरुषांच्या भावनांशी आणि जीवनाच्या अंतरंगाशी समरस होऊन ते अधिक सुंदर करण्याचे सामर्थ्य त्या सुधारणेत आहे काय ? [११]... आतापर्यंतचा इतिहास म्हणजे मानवी बुद्धीच्या विविध विकासांचा इतिहास होय[१२] हे मान्य केले तरी मानवातील राक्षस जागा झाला आहे हे सिद्ध करायला फार दूरवर जायला नको.

## मनुष्यातला राक्षस जागा झाला आहे

' मनुष्यात ईश्वर निद्रिस्त असतो असं आम्ही ... युगं न् युगं ऐकत आलो. आम्हाला वाटलं– तो झोपी गेलेला ईश्वर आज ना उद्या जागा होईल. आमच्या आक्रोशानं का होईना, त्याची झोप मोडेल. पण आम्हाला अनुभव अगदी उलटा आला. मध्यंतरी झोपी गेलेला मनुष्यातला राक्षस या विसाव्या शतकात पुन्हा जागृत झाला आहे. विद्या, शास्त्र, संस्कृती, इत्यादिकांचे सुंदर मुखवटे घालून तो राक्षस देव म्हणून आजच्या जगात मिरवण्याचा प्रयत्न करीत आहे.... आज जगात देवाचं राज्य नाही, राक्षसांचं राज्य आहे ![१३] "शरीरसुखाकरिता आपला आत्मा

विकणारा महापंडित गटेने त्यात चित्रित केला आहे. मला वाटले, विसावे शतक हे यंत्रयुग नाही हे आत्मे विकत घेणाऱ्या सैतानाचे युग आहे हे ! ज्यांच्यापायी मनुष्य आपली माणुसकी विसरतो, अशा मोहांनी भरलेले युग आहे हे ! या युगात सैतान विनाकष्ट मिळणाऱ्या पैशाच्या रूपाने अवतार घेतो. कष्टावाचून विकास करायला संवकलेला प्रत्येक मनुष्य आपण हजारो माणसांना जनावरांप्रमाणे आयुष्य कंठायला भाग पाडीत आहो ही जाणीव या सैतानाच्या उन्मादक सहवासात विसरून जातो.[१४]

## पापाच्या पैशाने दुःखे वाढली

'पूर्वकाळी समाजरचना सध्याइतकी गुंतागुंतीची नव्हती. तिची परंपरागत आर्थिक चौकट बदलण्याचा कोणीही सहसा प्रयत्न करीत नसे. लोभी माणसे त्या काळीही होती. पण यंत्रयुगाने, गुंतागुंतीच्या समाजरचनेने आणि शास्त्रीय शोधांनी पूर्वीचा मैल आज इंचाहून लहान केल्यामुळे मनुष्याच्या अंध स्वार्थाला सारे जग मोकळे झाले आहे. त्याचा लोभ हा सर्कशीतल्या पिंजऱ्यातून बाहेर पडलेल्या वाघासारखा मोकाट सुटला आहे. प्राचीन काळी अशी परिस्थिती नव्हती. त्यामुळे पापाचा पैसा हा आधुनिक मानव समाजाचा जेवढा मोठा शाप होऊन बसला आहे तेवढा जुन्या काळी नव्हता. 'आज ' या शब्दप्रयोगाला पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक कटू आणि भीषण अर्थ आला आहे आजच्या जगातली निम्मी कदाचित शेकडा ऐंशी सुद्धा असतील — दुःखे पापाच्या पैशाने निर्माण केली आहेत. निढळाच्या घामाऐवजी निष्पापांच्या रक्ताने तो पैसा माखलेला असतो.'[१५]

– ' सांजवात ' च्या प्रस्तावनेतील खांडेकरांचेच शब्द सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की, ' मधुमेहाने एखाद्याचे शरीर पोखरावे त्याप्रमाणे अंध आणि अनिर्बंध लोभाने, कष्ट न करता मिळणाऱ्या पाण्यासारख्या पैशाने माणसाची मनें पोकळ, ध्येयशून्य आणि पापप्रवृत्त करून सोडली. आपण जो पैसा मिळवतो तो कोठून येतो, तो कोणा असहाय्य माणसाच्या रक्ताने रंगला आहे की काय याचा विचार करण्याचे भानही अनेकांना राहिनासे झाले. प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्याची मनोवृत्ती सर्व धंद्यात, सर्व थरात बळावली ...'[१६]

याचा अर्थ असा की, गरिबांची दुःखे दारिद्र्याने वाढतात. तर मध्यमवर्गीय आणि श्रीमंत यांची अनीती पैशामुळे वाढते. थोडक्यात म्हणजे आर्थिक विवंचना असो वा विपुलता असो सामाजिक दुःखे वाढतच आहेत. खांडेकरांनी या सामाजिक स्थितीचे आपल्या परीने विश्लेषण केले आणि कारण शोधले, कारणे अनेक असू शकतील; पण त्यांना आढळलेले एक महत्त्वाचे कारण म्हणजे–

## श्रेष्ठ आदर्श राहिले नाहीत

'गांधीजींच्या पावलावर पाऊल टाकून जाणारी १९२०–३० ची पिढी आणि आजची विशीपंचविशीतली पिढी यांच्यामध्ये एक प्रचंड दरी निर्माण झाली

आहे. या तरुण पिढीच्या मनाची जडण–घडण अगदी निराळ्या परिस्थितीत झाली आहे. तिनं डोंगराएवढ्या कर्तृत्वाची आणि सागराइतक्या करुणेची माणसं जवळ जवळ पाहिलेलीच नाहीत. कोणतंही उदात्त ध्येय उराशी बाळगून व्रतस्थ वृत्तीचा जीवनक्रम आचरणाऱ्या स्त्री–पुरुषांचं दर्शन तिला दुर्लभ झालं आहे.'[१७] –– 'आपल्या भोवतालचे जीवन दांभिकतेने बुजबुजले आहे याचा कटू प्रत्यय तरुण पिढीला येतो. त्यामुळे तिच्या जीवनश्रद्धाच मुळापासून हादरून गेल्या आहेत. गांधींच्या नावाचा जयंती–पुण्यतिथीच्या निमित्ताने तार स्वरात जयजयकार केला जात असला तरी 'आज गांधी असते तर, आपल्या वर्तनाने त्यांना काय वाटलं असतं' हा विचार मोठमोठ्या पुढाऱ्यांना, अधिकाऱ्यांना, बुद्धिमंतांना, किंबहुना बऱ्यावाईट मार्गाने सत्ता आणि संपत्ती ज्यांच्यावर चवऱ्या ढाळू लागल्या आहेत अशा मंडळींपैकी कुणालाही स्पर्श करू शकत नाही. हे तरुण पिढीला उघड उघड दिसत आहे. समाजात त्याग, सेवा, ध्येयवाद वगैरे एकेकाळी सजीव असलेल्या जीवनमूल्यांची प्रेते आजच्या तरुणाभोवती पडली आहेत, पडत आहेत, कुजत आहेत. त्या कुबट घाणीने त्याचे डोके उठले आहे. ते शांत राहू शकत नाही; सुस्पष्ट विचार करू शकत नाही, नव्या श्रद्धास्थानांची धडपड करू शकत नाही.'[१८]

खांडेकरांनी 'ढगाआडचं चांदणं' यांत मुख्यतः तरुणांच्या मनोव्यथांचे विश्लेषण केले असले तरी ही सामाजिक व्यथाच आहे, केवळ तरुणांपुरती मर्यादित नाही. १९२०–३० च्या तरुणांपुढे टिळक, गांधी यांचे आदर्श होते; आज तेथे 'दरी' निर्माण झाली आहे ! पण का ? 'डोंगराएवढ्या कर्तृत्वाची' नि 'सागरा इतक्या करुणेची' माणसे एकाएकी अस्तंगत का झाली ?––

याचे कारण असे आहे की, टिळक–गांधी यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान एका वेगळ्या संस्कारातून तयार झाले होते. पण त्याच काळातील तथाकथित विद्वानांनी फक्त मूर्तिभंजन केले ! 'जुने जाऊ द्या मरणालागुनि ! जाळूनि किंवा पुरून टाका' एवढी एकच घोषणा त्यांना पाठ होती. त्याचा परिणाम एवढाच झाला की,

## जुन्या श्रद्धास्थानांचा विध्वंस झाला

'मध्यमवर्गाची आजची केवळ आर्थिकच नव्हे तर मानसिक दुरवस्था, कुटुंबव्यवस्थेतील वाढती मोडतोड, विद्यार्थि–जीवनाची दिशाहीनता, जुन्या श्रद्धा स्थानाचा विध्वंस, नव्या पूजास्थानांचा अभाव इत्यादि समाजाची दुरवस्था गेल्या पंचवीस वर्षांत जी वेगाने वाढली ती मुख्यतः आपल्या निराधार स्वप्नरंजनाच्या आणि पाश्चात्यांच्या अंध अनुकरणाच्या प्रवृत्तीमुळे !'[१९]

तरुण पिढी तयार झाली ती अशा अंधळ्या विद्वानांच्या तत्त्वज्ञानांतून ! या विद्वानांनी कधी विधायक चिंतन केले नाही; केले ते केवळ नकारात्मक चिंतन !

## केवळ मूर्तीभंजन नको : मूर्तीपूजनही हवे !

असे त्यांच्या मनाला कधीही शिवले नाही. 'मानवी प्रगती केवळ मूर्तिभंजनाने होत नाही, तिला मूर्तिपूजनाचीही तितकीच जरुरी असते. भंजनाला पूजनाची जोड मिळाली नाही तर बुद्धिवाद हा निव्वळ सुखवाद ठरतो. या सुखाची मर्यादाही खा पी आणि मजा कर या सूत्रापलीकडे जात नाही. संस्कृती मनुष्याला सामाजिक करण्याचा प्रयत्न करीत असते. ती शरीरसुखाचे स्तोम माजव रे तत्त्वज्ञान मान्य करीत नाही. दुसऱ्याच्या दुःखावर उभारलेले सुख भोगताना माणसाला खंत वाटली तरच त्याची माणुसकी जागृत आहे, असे तिला वाटते.'[२०]

हाच विचार त्यांनी पुन्हा मांडला आहे ! कितीतरी वर्षानंतर पुन्हा मांडला आहे ! यांचा अर्थ असा की, खांडेकरांच्या दृष्टीने लोकमानसात तसे काही स्थित्यंतर झाले नाही ! त्यामुळे तोच विचार पुन्हा देण्याची गरज भासली.–

'आजचा मनुष्य मूर्तिभंजक झाला आहे. याचे मला वाईट वाटत नाही; पण समोर दिसेल ती मूर्ती फोडणे हाच आपला धंदा आहे, अशी जी त्याची समजूत होऊ पाहात आहे.– आणि भल्याभल्यांकडून जिची भलावण केली जात आहे.–– ती मानवतेच्या दृष्टीने मोठी धोक्याची गोष्ट आहे.·····शतकाशतकांनी क्वचित् पिढीपिढीला सुद्धा, जीवनातल्या पूजामूर्ती बदलणे स्वाभाविक आहे. अनादिकालापासून मानव हे करीत आला आहे······टिळक आगरकर हे जसे कडवे मूर्तिभंजक होते, तसेच ते डोळस मूर्तिपूजकही होते. एकीकडे जुन्या जीर्णशीर्ण किंवा प्रगती कुंठित करणाऱ्या राजकीय व सामाजिक मूर्तींवर ज्या हातांनी त्यांनी घाव घातले, त्याच हातांनी त्यांनी राजकीय व सामाजिक पूजामूर्तींची प्राणप्रतिष्ठा केली. त्यांनी द्रष्टेपणाने नवी स्वप्ने पाहिली, नवे राष्ट्र पाहिले, नवा समाज पाहिला. प्राणपणाने त्यानी नव्या निष्ठा कवटाळल्या, त्यांच्यासारखे झुंजार आणि अंतर्बाह्य पवित्र नेते लाभल्यामुळे त्या काळातल्या सामान्य मनुष्याची गुणांची सरासरीसुद्धा थोडीशी वाढली.'[२१]

या आपल्या विचारांशी स्वतः भाऊसाहेब अत्यंत प्रामाणिक राहिले, सामाजिक दुःखांची कारणमीमांसा करताना त्यांनी केवळ मूर्तिभंजन केले नाही. पूजनही केले. विध्वंसक वा नकारात्मक चिंतनाची आवश्यकता असतेच, त्यामुळे दोषाचे स्वरूप ध्यानी येते. पण केवळ दोष ध्यानी आले म्हणजे गुणसंवर्धन झाले असे म्हणता येत नाही. गुणसंवर्धन ही स्वतंत्र गोष्ट आहे. याचसाठी भाऊसाहेबांनी

दुःखाचे विश्लेषण करताना दोषदिग्दर्शन प्रथम केले, नंतर या दुःखांवर इलाजही सांगितला आहे.

सामाजिक समस्यांचे मूळस्वरूप मानसिक असते. ‘परिस्थिती’ म्हणजे ‘भोवतालचे जीवन’ नव्हे ! तर ‘भोवतालच्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन’ होय ! परिस्थिती घडते अगर बिघडते ती या जीवनाच्या तत्त्वज्ञानातून ! आज समाज ज्या ठिकाणी येऊन पोचला आहे, त्याचे मूळही या जीवनविषयक तत्त्वज्ञानातच शोधायला पाहिजे. भाऊसाहेबांनी ते शोधले ! त्यांना आढळले तत्त्वज्ञानात दोष नाही. जीवन आणि तत्त्वज्ञान यात प्रचंड विसंगती आहे ! हाच मोठा दोष आहे.

## भारतीय संस्कृतीच्या पराभवाचे मूळ

‘समतेचे तत्त्वज्ञान भारतीय संस्कृतीचे संवर्धन करणाऱ्या आपल्या प्राचीन साहित्यात अनेक स्थळी प्रतिबिंबित झाले आहे. पण एकीकडे सारे पूज्य ऋषी आणि सारे थोर धर्मग्रंथ समतेचा पुरस्कार करताना दुसरीकडे भारतीयांच्या प्रत्यक्ष जीवनात मात्र विषमतेचेच वर्चस्व वाढत गेले. आधुनिक काळात जगाच्या चढाओढीत भारतीय संस्कृतीचा जो पराभव झाला, त्याचे मूळ या विसंवादात आहे. मनुष्यमात्रात देव पाहण्याची शिकवण आम्ही देवभाषेतून देवालयात घेत होतो आणि देवळाबाहेर पडताच महार दिसला की त्याची सावलीसुद्धा आपल्या अंगावर पडणार नाही, अशा बेताने घराकडे पोबारा करीत होतो. ‘सर्वेऽत्र सुखिनः सन्तु’ या सुंदर श्लोकाची पोपटपंची आम्ही पिढ्यान् पिढ्या केली पण या जगातली दुःखें नुसत्या पवित्र इच्छेनें नाहीशी होत नाहीत; ती त्यागानें, सेवेने संघटनेनें आणि कर्तृत्वानेंच दूर करावी लागतात, हें मात्र कधी आमच्या लक्षात आले नाही. आमच्या काव्य, कथांतून आणि इतिहासपुराणांतून जीवनाचे उच्च आदर्श आम्ही रंगवले. पण पुढे ठेवलेल्या आदर्शाप्रमाणें समाज जेव्हा वागतो, तेव्हाच नवा उज्ज्वल इतिहास घडविला जातो ही जाणीव मात्र आम्ही विसरलो.’[२२]

तत्त्वज्ञान श्रेष्ठ होते, आहेही ! पण आपलें प्रत्यक्ष वर्तन ?–

‘बंगालच्या काळचा दुष्काळात लाखो लोकांच्या राक्षसी हत्येला कारणीभूत झालेलें लोभी नराधम दररोज देवपूजा करीत होते, घरातल्या प्रत्येक मंगलकार्याला धर्मशास्त्राप्रमाणें मुहूर्त पहात होते, भटाभिक्षुकांना दानधर्म करीत होते, नियमानें गीतापाठ करीत होते ··· निष्पाप अर्भकांच्या केविलवाण्या किंकाळ्यांनी त्यांची झोप कधी उडाली नाही. पोटातली आग विझविण्याकरिता रुपया–दोन रुपयासाठी आपलें प्राणाहून प्रिय असलेले शील विकावे लागणाऱ्या अल्लड खेडवळ तरुणींच्या हृदय–विदारक वेदना पाहून त्यांची निर्घृण मने कधी अस्वस्थ झाली नाहीत···’

'असे होण्याचे एक प्रमुख कारण म्हणज आपला परंपरागत जीवनविषयक दृष्टिकोण हे आहे...'[२३] हा परंपरागत दृष्टिकोन कोणता त्याचे स्पष्टीकरण भाऊसाहेबांनी ठिकठिकाणी केले आहे.

## दृष्टी इहलोकापेक्षा परलोकाकडे

'आम्ही इहलोकापेक्षा परलोकाकडे दृष्टी देऊन शतकानुशतके काढली... जीवनाविषयीच्या या एकांगी तत्त्वज्ञानाची कटू फळे आज आम्ही प्रत्येक क्षेत्रात चाखीत आहो !...'[२४]

'अस्तित्वात नसलेल्या स्वर्गसुखाच्या मागे धावत सुटलेल्या आणि ज्या पृथ्वीवर आपणाला प्रत्येक क्षण घालवावा लागतो. तिच्याकडे पाठ फिरवून कल्पनेतल्या परलोकाकडे डोळे लावून बसलेल्या माणसांना तर्कशुद्ध विचार करता येणार तरी कसा ?'[२५]

जुन्या पुराण ग्रंथांत 'पृथ्वी शेषनागाच्या डोक्यावर टेकली आहे,' किंवा 'एखाद्या दिशेला चालत चालत जाऊनही दिशेच्या कडेवर जाऊन आपण पलीकडे पडत नाही, कारण दिशांचे संरक्षण मोठमोठे हत्ती– 'दिग्गज–' करीत असतात' अशी काही वर्णने असतात. आपल्या शंकेचे समाधान झाले; आपल्याला उत्तर ठाऊक आहे, किंवा याची कारणमीमांसा अशी आहे, असे एकदा मानवी मनाने घेतले की, त्याचे समाधान होते. त्याकाळात खांडेकरांप्रमाणेच अनेकांनी आपल्या सामाजिक दुरावस्थेची कारणे 'परमात्मकल्पना,' 'स्वर्ग–नरक कल्पना,' 'मोक्ष-कल्पना,' 'पाप–पुण्य' इत्यादि आहेत असे म्हटले. खांडेकरांनी स्वतः अनेकदा या 'कल्पना' आहेत, त्या 'झुगारल्या' पाहिजेत असे प्रतिपादन केले. कडाडून हल्ला केला·

पण त्यांच्यासारख्या प्रामाणिक तत्त्वचिंतकांच्या मनात हाहीं विचार आला.

## सूर्योदय व कोंबडा यांचा संबंध नाही

...'या विषमतेचे खापर धर्ममोक्षाच्या जुन्या कल्पनांवर फोडून आजच्या जगाने नामानिराळे होण्यात अर्थ नाही. युरोप–अमेरिकेत धर्ममोक्षांचा बाजारभाव साफ बसून गेल्याला किती तरी तपे झाली. आपल्या देशातल्या सुशिक्षित वर्गाने या कल्पनांचे जू झुगारून दिल्यालाही दोन पिढचा होत आल्या; पण जो कोंबडा झाकल्यामुळे सूर्य उगवत नाही म्हणून आम्ही आरडाओरड करीत होतो; तो पंख फडफडावून मोठमोठ्याने आरवत असला तरी आम्हाला हव्या असलेल्या सूर्याचा मात्र अजून उदय होत नाही. तेव्हा सूर्योदय आणि कोंबडा यांचा काही संबंध असणे शक्य नाही, हे समाजाने समजावून घेण्याची वेळ येऊन चुकली आहे.'[२६]

याचाच अर्थ असा की, 'परलोकाकडे डोळे लावून बसलेल्या माणसांना तर्कशुद्ध विचार करता येत नाही' असे म्हटले तरी 'इहलोकावरच दृष्टि केंद्रित झालेल्या माणसालाही' तर्कशुद्ध विचार करता येत नाही, हेच खरे! त्यांच्या विचारांनी तरी सूर्य कोठे उगवत आहे?' किंबहुना भाऊसाहेबांच्या मनात असेही आले की, 'पूर्वीचा सामान्य मनुष्य परलोकाच्या कल्पनेने, स्वर्गाच्या आशेने, नरकाच्या भीतीने, ईश्वराच्या श्रद्धेने आणि अनेक धार्मिक, सामाजिक व कौटुंबिक बंधनांनी एका पोलादी चौकटीत ठाकून ठोकून बसविला गेला होता. बिचाऱ्याला इकडे तिकडे तसूभर हलतासुद्धा येत नव्हते. अशा रीतीने त्याच्या ठिकाणी निर्माण केलेले पावित्र्य पुष्कळ अंशी कृत्रिम होते; पण ते त्याला सन्मार्गापासून ढळू देत नव्हते; त्याच्या अनेक निष्ठा अंध होत्या; पण त्या प्रामाणिक होत्या...' [२७]

अशा रीतीने सध्याच्या सामाजिक अधःपतनाचे कारण 'परलोकाकडे दृष्टी,' 'ईश्वरनिष्ठा,' 'धर्मनिष्ठा,' 'पूजापाठ,' इत्यादि वाटत होते; त्याबद्दलचे त्यांचे मत बदललेले दिसते. सामाजिक अधःपतनाचे खापर या 'अंध' 'प्रामाणिक' निष्ठेवर फोडता येणार नाही, किंबहुना या 'कृत्रिम पावित्र्याने' समाज 'सन्मार्गापासून ढळत तरी नव्हता' असे त्यांचे मत झाले.

आता प्रश्न आला की, मग या अधःपाताचे कारण काय ?

तत्त्वचिंतक भाऊसाहेबांना निरनिराळ्या प्रसंगी काही कारणे सापडली! ती त्यांनी प्रतिपादिली आहेत.

## इहवादाने संकुचितपणा येतो

'पतंग' आकाशात उडताना पाहून त्यांच्या मनात आले. 'माणसाचे पाय पृथ्वीवर असले तरी त्याची नजर नेहमी आकाशाकडे असली पाहिजे, असे मला त्या क्षणी वाटले. खाली मान घालून जमिनीकडे पाहात जाणाऱ्याला खडे आणि काटेच अधिक दिसतात. दुनिया हा दीडवितीचा कैदखाना आहे, अशी त्यांची कल्पना होऊ लागते. इतरांची अडखळणारी, धडपडणारी, मंद चालणारी आणि वाकडी पडणारी पावलेच पुन्हापुन्हा त्याच्या डोळ्यापुढे येऊ लागतात. त्याची जीवनाची कल्पना नकळत संकुचित, पुष्कळदा विकृतसुद्धा होते. तो स्वार्थात, लोभात, उपभोगात, स्वतःच्या टीचभर कर्तृत्वाची उंची पुनः पुन्हा मोजण्यात दंग होऊन जातो. आज निसर्गापेक्षा, हिंस्त्रपशूपेक्षा किंबहुना पुराणातल्या भयंकर राक्षसापेक्षा माणूसच माणसाचा अधिक मोठा शत्रू बनला आहे याचे कारण त्याची जीवनाविषयीची ही संकुचित कल्पनाच आहे...' [२८]

कमाल आहे! म्हणजे या भाऊसाहेबांनी 'परलोकनिष्ठेबद्दल' शेकडो वेळा कडवट उद्गार काढले. त्यांनाच वाटते की, 'पाय पृथ्वीवर' पण 'नजर आकाशात असावी! आता नेमके 'आकाश' म्हणजे काय ते कळत नाही; पण 'नजर'

आकाशात लावण्याने ' जीवनाची संकुचित कल्पना नाहीशी होईल, माणूस स्वार्थातून, लोभातून मुक्त होईल असे त्यांना वाटते !' ' आकाशात नजर ' नि ' पृथ्वीवर पाय ' असे असल्यावाचून जीवनाबद्दल विशाल निष्ठा निर्माण होणार नाही, असे त्यांना वाटते. जीवन म्हणजे ' वीड वितीची दुनिया ' नव्हे, हे कळणे आवश्यक आहे ! तेव्हा ' पृथ्वीपेक्षा वरची ' ' आकाशात लागलेल्या नजरेची ' आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली आहे ! थोडक्यात म्हणजे केवळ इहवादाने संकुचितपणा येतो, असेच त्यांना म्हणावयाचे आहे.

## नवी नवी तत्त्वज्ञानेही दु:ख वाढवतातच !

जुनी श्रद्धा, जुन्या निष्ठा या ' अंध ' होत्या, पण नव्या ' डोळस ' निष्ठांनी काय केले आहे ? ' माणसाच्या ..अंध आत्मनिष्ठेतच जगातल्या सर्व दु:खांचे मूळ आहे...मनुष्याला सुखी करण्याचा चंग बांधलेली नवी नवी तत्त्वज्ञाने त्याचे दु:ख वाढवीत जातात...'[२९] या ' आत्मनिष्ठेला ' त्यांनी ' अहंकार ' असेही म्हटले आहे. अहंकार हा मनुष्याचा अधिक मोठा शत्रू आहे...अहंकाराने अंध झालेल्या मानवी मनाला आपल्या मर्यादांचे आणि वैगुण्यांचे ज्ञान कधीच होत नाही. कौटुंबिक कलहापासून जागतिक युद्धापर्यंत जगात जे लहान मोठे अनर्थ नित्य घडून आलेले दिसतात, त्यांच्या मुळाशी अनेकदा दोन अहंकारी मनांचा संघर्षच असतो. दया, प्रेम, भक्ती, कृतज्ञता इत्यादी हृदयात उमलणारी फुले अहंकारी मनाच्या धगधगत्या ज्वालांमुळे हळूहळू करपून जातात आणि मग साहजिकच अशा मनुष्याच्या आत्म्याचा विकास खुरटतो...'[३०]

खांडेकरांनी या ठिकाणी ' अंध आत्मनिष्ठा ' किंवा ' अंध अहंकार ' हे ' जगातल्या सर्व दु:खांचे मूळ ' म्हणून सांगितले आहे. ' आत्मा ' नि ' अहंकार ' या दोन गोष्टी भिन्न आहेत, असा त्यांचा विचार दिसतो, हेही या ठिकाणी ध्यानात ठेवण्याजोगे आहे.

## मानवी आत्मा : सात्त्विक शक्तींचे भांडार !

' मानवी आत्मा हे अनेक सुप्त, सात्त्विक शक्तींचे भांडार आहे... उठल्या–सुटल्या शरीराची पूजा करीत सुटणाऱ्या आणि इंद्रियसुखें हीच जीवनातील सर्व श्रेष्ठ सुखे मानणाऱ्या मनुष्याला–मग तो जुन्या काळातील ययाती असो किंवा नव्या काळातील कुणी अतिरथी–महारथी असो,–स्वत:च्या या सुप्त शक्तींची जाणीव असत नाही; पण मानवाची आत्मिक शक्ती–पशुपक्ष्यांहून भिन्न आणि उच्च अशी अनेक सामर्थ्ये सृष्टीने त्याला दिली असल्यामुळे, पिढ्यान् पिढ्या त्या

सामर्थ्यांची बीजें पेरून नवी नवी पिके काढण्याचे स्वातंत्र्य त्याला लाभलें असल्यामुळे या प्रगतीच्या प्रयत्नात धर्म, नीती, कला, शास्त्र, संस्कृती इत्यादि नव्या सामर्थ्यांचा साक्षात्कार त्याला होत असल्यामूळे, वृद्धिंगत होऊ शकणारी आत्मिक शक्ती—ही त्याच्या जीवनातील एक अपूर्व शक्ती होऊन बसली आहे, तो सर्व चराचर सृष्टीपेक्षा भिन्न आहे तो इथच !'[३१]

तेव्हा ही 'आत्मिक शक्ती' जागृत होणे आवश्यक आहे, पण ती आज होत नाही, त्यामुळेच 'धर्म, नीती, कला, शास्त्र आणि संस्कृती' या सामर्थ्यांचा साक्षात्कार त्याला होत नाही. आजचे तत्त्वज्ञान कमालीचे इहवादी, स्थूल दृष्टीचे पार्थिव बनून गेले आहे !

## पार्थिवाचे अपार्थिवावर आक्रमण होत आहे

'एके काळी परलोकाने इहलोकावर आक्रमण करून आमच्या जीवनातला रस शोषून टाकला होता. आज त्याच्या बरोबर उलट घडत आहे. माणसाचे शरीर पावलो–पावली आत्म्यावर आक्रमण करीत आहे. एखाद्या माकडाने बागेत शिरून तिथल्या फुलांचा चोळामोळा करून टाकावा तसे ते जीवनातल्या उच्च मूल्यांचा, त्यातल्या सुमधुर संगीताचा चुथडा करून टाकीत आहे. दिव्य, भव्य, उदात्त, अपार्थिव अशी जी जी अनुभूती असेल ती ती माणसाला या जगात शक्य तितके मिळणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्याच्या आत्म्याचा विकास होणार नाही. पण आजच्या जगात ही अनुभूती पदोपदी खंडित होत आहे, शतशः छिन्नविच्छिन्न केली जात आहे...[३१] 'पार्थिवाच्या अपार्थिवावर होणाऱ्या या आक्रमणाने आपले सारे जीवन संगीत बेसूर करून टाकले आहे. आजच्या जगातल्या दुःखांचे हे एक प्रमुख कारण आहे, असे मला वाटते.'[३२]

## खांडेकरांचे चिंतन विकसित होत गेले आहे

आपणास असे आढळून येते की, सामाजिक दुःखाची कारणमीमांसा करताना खांडेकरांचे चिंतन उत्तरोउत्तर विकसित होत गेले आहे. त्यांच्या चिंतनाने उत्तरोउत्तर सूक्ष्म, तात्त्विक पातळी गाठली आहे. दारिद्र्य, विषमता, जातिभेद ही दुःखाची कारणे आहेत, असे कोणाही स्थूल दृष्टीच्या माणसाला वाटते. तेच त्यांनाही प्रथम वाटले; पण 'मध्यमवर्गीयात भावनात्मक अराजक' माजले आहे, 'भ्रष्टाचार, ढोंग, अनीती' पसरत चालली आहे, 'सामाजिक जीवनमूल्यांची प्रेते' झाली आहेत, ती काही दारिद्र्याने नाहीत ! उच्चभ्रु लोकांतच हा रोग अधिक बळावला आहे ! याचे कारण काय असावे ? असा प्रश्न त्यांना पडला. स्वाभाविक रीतीने ते आपला 'जीवनविषयक दृष्टिकोण' त्याला जबाबदार आहे,

असे समजले. आपण केवळ काल्पनिक तत्त्वज्ञान निर्माण केले असून ते या विज्ञान युगात ढासळले आहे, नवे तत्त्वज्ञान मात्र निर्माण झालेले नाही, या पोकळीत निराधार अवस्थेने भावनात्मक अराजक माजले आहे, असे त्यांनी प्रथम निदान केले. त्यानंतर मात्र आपण या युगात अत्यंत तरल, पार्थिव, संकुचित, शरीरकेंद्रित तत्त्वज्ञान निर्माण केले असून त्याचाच परिणाम केवळ भोगवादात झाला आहे, असे त्यांना वाटले. जीवनाची पातळी बदलायची असेल तर जीवनमूल्ये श्रेष्ठ, सूक्ष्म, व्यापक, अपार्थिव असलीच पाहिजेत. यासाठी सामाजिक दृष्टी ' आकाशाकडे आणि व्यक्तीची दृष्टी ' आत्म्याकडे ' हवी !

थोडक्यात म्हणजे खांडेकर दुःखाची मीमांसा करताना समाजचिंतनाकडून तत्त्वचिंतनाकडे वळले आहेत. सामाजिक तत्त्वज्ञान हे अंतिम आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतच उतरते असाच त्याचा अर्थ आहे. हीच गोष्ट वेगळ्या भाषेत अशीही सांगता येईल की, आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या पायावरच सामाजिक तत्त्वज्ञान उभारले जाऊ शकते ! खांडेकरांना ' परलोककल्पना ' टाकाऊ वाटते, पण ' आकाशकल्पना ' आवश्यक वाटते, ' आत्मा ' हवाच आहे, त्यावाचून जीवन ' पार्थिव ' बनत आहे, पण ' परम-आत्मा ' ही मात्र ' कल्पना ' वाटते ! तेव्हा एका पायरीवर येऊन त्यांचे धर्मचिंतन थांबले आहे, असाच त्याचा अर्थ.

परंतु त्यांची ' सामाजिक दुःखमीमांसा ' धर्मचिंतनाकडे कळली आहे, हेही नसे थोडके ! !

## संदर्भ-टीपा


१ खांडेकर व्यक्ति आणि साहित्य ( फुले आणि दगड )पृ. २६७
२ दोन ध्रुव
३ अभिषेक पृ. १६५
४ जळलेला मोहोर पृ. ४१
५ ययाती पृ. ४६५-६६
६ कल्पलता पृ. ५४
७ ययाती पृ. ४६५
८ कित्ता पृ. ४६५-६६
९ कित्ता पृ. ४६६
१० क्रौंचवध पृ. १२
११ कित्ता पृ. १२
१२ ,, पृ. १४

१३ कल्पलता पृ. ९०
१४ कित्ता पृ. ११०-११
१५ स्त्री आणि पुरुष पृ. १२५-२६
१६ खांडेकर व्यक्ती आणि साहित्य पृ. २७४
१७ ढगाआडचं चांदणं पृ. १४०
१८ कित्ता पृ. १४०-४१
१९ कित्ता पृ. १४८-४९
२० सुशीलेचा देव (संपादन) प्रस्तावना पृ. १९
२१ ययाती पृ. ४६२-६३
२२ उल्का पृ. १४
२३ जळलेला मोहोर ( डॉ. साने यांचे पत्र ) पृ. २९-३०
२४ कित्ता पृ. २९
२५ कित्ता पृ. १९
२६ क्रौंचवध पृ. २६-२७
२७ ययाती पृ. ४६२
२८ मंझधार - पतंग - पृ. १२९
२९ कित्ता पृ. २०५
३० वेचलेली फुले पृ. ७१
३१ ययाती पृ. ४५९
३१ मंझधार पृ. ३३०
३२ कित्ता पृ. ३३१

# ६

# धर्मचिंतन

## धर्मबुद्धी आणि व्यवहार ही पतिपत्नी

'व्यवहाराचा धर्माशी, नीतीशी आणि मानवी जीवनमूल्यांशी काहीच संबंध नाही या कल्पनेने ज्या दिवशी आम्हां भारतीयांच्या आयुष्यात प्रवेश केला, त्याच दिवशी आमच्या अध:पाताला प्रारंभ झाला.... ... 'हा व्यवहार आहे' या तीन शब्दात जगातील आजकालचे सर्व पाप साठले आहे. आजच्या मानवतेच्या साऱ्या दु:खांचा आणि विकृतींचा उगम या तीन शब्दांत आहे. व्यवहार आणि धर्मबुद्धी यांचे पतिपत्नीचे नाते आहे. जीवनात त्यांचे हक्क समान आहेत. जीवनाची सफलता त्यांच्या सहकार्यावर अवलंबून आहे; पण हे लक्षात कोण घेतो ? ज्या समाजात धर्मबुद्धी ही व्यवहाराची दासी मानली जाते, त्यांचा उत्कर्ष होणे, ही अशक्यप्राय गोष्ट आहे, 'हा व्यवहार आहे' या शब्दांच्या पायावर मानवतेच्या सुखाचे मंदिर कधीही बांधले जाणार नाही ! 'हा धर्म आहे' या भावनेवरच त्याची उभारणी करता येईल.... ...'[१]

खांडेकरांनी अशा प्रभावी शब्दात धर्मबुद्धीचे जीवनातील स्थान सांगितले आहे; परंतु खांडेकरांची धर्मकल्पना एकांगी त्यागावर आधारलेली नाही. 'धर्म म्हणजे सर्वस्वाचा त्याग--संन्यास--निरिच्छ, उपभोगशून्य वृत्ती !' अशी व्याख्या त्यांना मान्य होणारी नाही.

## जीवनात शारीरिक सुखाला मोठे स्थान आहे.

'उपभोग--अधिक उपभोग' या ययातीच्या मार्गाने जाऊन मानव सुखी होणार नाही, ही गोष्ट उघड आहे. पण यांचा अर्थ प्रत्येक मनुष्याने वैराग्य

स्वीकारले पाहिजे, ब्रह्मचारी राहिले पाहिजे, संन्यासी बनले पाहिजे, अमुक खाता नये, तमुक पिता नये, असा मुळीच नाही. सामान्य मनुष्याच्या जीवनात शारीरिक सुखाला फार मोठे स्थान आहे......भाकरी,......कपडे, .....जागा......हवी. आवश्यक गरजा निराळ्या, अनावश्यक विलास निराळे. प्रत्येक शारीरिक गरज ही जीवनाचा आधार आहे. ती प्रत्येकाची भागलीच पाहिजे. .....'[२]

## धर्म, अर्थ, काम मिळून पूर्णता.

शारीरिक गरजांचे जीवनातील स्थान खांडेकरांनी अशा तऱ्हेने मान्य केले आहे. अर्थ–मूल्यही त्यांना मान्य आहे. परंतु 'फ्राइड' अगर 'मार्क्स' यांचे तत्त्वज्ञान ते स्वीकारतात असा त्याचा अर्थ नाही. नवे जग निर्माण करण्याचे सामर्थ्य कोणत्या तत्त्वविचारात आहे, हे त्यांनी एका ठिकाणी स्पष्ट केले आहे.—

'बुद्धीला पटणारे उन्नत ऐहिक जीवन हेच माणसाचे ध्येय होत आहे. या ध्येयाशी सुसंगत असणारी आणि शरीर आणि आत्मा या दोन्हींचा सुंदर समन्वय साधणारी नवीन सामाजिक बंधने निर्माण झाली तरच नवा मानव, नवे जग, इत्यादिकांविषयींची कवींची, शास्त्रज्ञांची, सज्जनांची आणि तत्त्वज्ञांची स्वप्ने अंशतः सत्य सृष्टीत उतरतील; पण त्या करिता एक गोष्ट कटाक्षाने लक्षात ठेवली पाहिजे. मनुष्य हा नुसता आर्थिक, केवळ कामुक किंवा निव्वळ आध्यात्मिक प्राणी नाही. मार्क्स, फ्राईड व गांधी हे सर्व आधुनिक मानव समाजाची चिकित्सा करणारे प्रतिभावान धन्वन्तरी आहेत. त्या प्रत्येकाच्या चिकित्सेत सत्यांश आहे. पण पूर्ण सत्य मात्र एकातही नाही. हे सर्व सत्यांश एकत्र करून नवे जग निर्माण करण्याचे सामर्थ्य मानवाने दाखवावे.'[३]

खांडेकरांनी मानवी जीवनात 'अर्थ व काम' यांना स्थान आहे, असे मान्य केले असले, तरी ते म्हणतात–– 'काम आणि अर्थ हे महान पुरुषार्थ आहेत. मोठे प्रेरक पुरुषार्थ आहेत. जीवनाला पोषक असे पुरुषार्थ आहेत. पण स्वैर धावणारे पुरुषार्थ आहेत. हे पुरुषार्थ केव्हा अंध होतील याचा नेम नसतो! त्यांचे लगाम अष्टौप्रहर धर्माच्या हातात ठेवणे आवश्यक आहे.'[४]

अशा रीतीने 'मानवतेचे मंदिर धर्मबुद्धीच्या पायावर' उभारले जावे, 'अर्थ–कामांचे लगाम धर्माच्या हाती हवेत' असे विचार त्यांनी प्रकट केले आहेत. परंतु धर्म–कल्पना म्हणताच 'ईश्वरनिष्ठा' 'देवपूजा,' इत्यादि गोष्टी डोळ्यासमोर येतात. खांडेकरांच्या धर्मकल्पनेत मात्र 'देव,' 'ईश्वर,' 'परलोक' यांना स्थान नाही. त्यांना वाटते —

## देवकल्पनेत काव्यच अधिक आहे.

विसाव्या शतकातील पूर्वार्धात वाढलेल्या पिढीचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे.——

' देवधर्माविषयींच्या परंपरागत कल्पनांवर पूर्ण श्रद्धा असलेल्या वातावरणात ही पिढी जन्माला आली. साहजिकच प्रत्येक देवळात आणि प्रत्येक मूर्तीत देव आहे या भावनेने तिने जीवनातली पहिली पावले टाकली. तिने प्रत्येक देवळापुढे हात जोडले आणि प्रत्येक मूर्तीपुढे मस्तक नम्र केले. पण धरणीकंपात घरे भराभर कोसळून पडावीत त्याप्रमाणे नव्या शिक्षणाचे, नव्या जीवनाचे, नव्या विचारांचे आणि नव्या भावनांचे धक्के बसताच या अंधश्रद्धेला आधारभूत असलेल्या अनेक गोष्टी भराभर ढासळू लागल्या. तर्काच्या, अनुभवाच्या आणि व्यवहाराच्या कसोटीवर प्रचलित देवकल्पना घासून पाहताच तिच्यात सोने थोडे आणि हीण फार असे स्पष्ट दिसू लागले. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी देव आहे या कल्पनेत काव्यच अधिक आहे––हे त्या पिढीला चटकन उमगले. सज्जनांचा वाली असलेला सर्वशक्तिमान परमेश्वर समाजातल्या सत्पक्षाच्या किंवा सत्प्रवृत्त माणसांच्या साहाय्याला धावून येत नाही. या दाहक अनुभवाने तिचे डोळे उघडले. पिढ्यान् पिढ्या एका चाकोरीतून जीवनविषयक विचार करणारे भारतीय मन या व अशा प्रकारच्या चटक्यांनी जागे झाले.–'[५]

या विचारातून असे स्पष्ट दिसते की, खांडेकर ' धर्मबुद्धी ' हवी असे म्हणत असले तरी त्यांच्या मनातील धर्मबुद्धीची कल्पना ईश्वराधिष्ठित नाही. त्यांच्या डोळ्यांसमोर ' उन्नत ऐहिक जीवन हेच मानवी जीवनाचे ध्येय ' आहे. ' ऐहिक सुख हे सर्व सामान्य मनुष्य जीवनाचे मुख्य ध्येय आहे, हे गृहीत धरून आम्ही अजूनही विचार करू शकत नाही. ईश्वर आणि परलोक यांच्या अस्तित्वावर अवलंबून असलेल्या जुन्या नीति–कल्पनांच्या मृगजळामागे धावण्यात आमच्या सामाजिक मनाला अजून आनंद वाटतो,–'[६] ' याची त्यांना खंत वाटते. ईश्वरकल्पनेवाचून संस्कृती कशी टिकेल, अशी आपणाला शंका येऊ शकेल पण खांडेकरांना संस्कृतीसाठी ईश्वर अपरिहार्य आहे असे वाटत नाही.

## बुद्धी व हृदय यातून संस्कृती – संवर्धन

' जगात देव नसेल पण माणूस आहे. त्याचे शरीर मर्त्य असले तरी बुद्धी अमर आहे. हृदय अमर आहे. मानवी संस्कृतीच्या वृक्षाचे संवर्धन करण्याची शक्ती त्याच्या बुद्धीत आणि हृदयात निःसंशय आहे.–'[७] अर्थात बुद्धी आणि भावनांचा समन्वय त्यांच्यात झालेला असतो असे ' महापुरुष नवी जीवनमूल्ये सूचित करतात '……[८]

'खांडेकरांनी 'बुद्धी आणि हृदय' यातून नव्या संस्कृतीची निर्मिती आणि संवर्धन होईल असे म्हटले आहे. महापुरुष नवी जीवनमूल्ये निर्माण करतात– परंतु असामान्यांच्या जीवनातून आणि तत्त्वचिंतनातून प्रकट झालेली जीवनमूल्ये सामान्यांच्या जीवनातही प्रकट होणे कसे शक्य आहे ? तो आदर्श असू शकेल, ते ध्येय असू शकेल, ते मानवतेचे शिखर मानता येईल, पण सामान्यांना ते नेहमी दूर वाटत राहील. तिकडे वाटचाल करीत राहाणे, एवढेच ते करू शकतात ! गौतमबुद्ध, महावीर, शंकराचार्य यांनी स्वतःच्या जीवनातून प्रकट केलेला सर्वसंग-परित्यागाचा नि अपरिग्रहाचा आदर्श सामान्यांनी पूजनीय मानला पण त्यांच्या जीवनात तो उतरू शकला नाही. म्हणून खांडेकरांना वाटते–

**सामान्यांसाठी तत्त्वज्ञान भिन्न पाहिजे.**

'असामान्य माणसे आणि सामान्य माणसे यांची जीवनविषयक तत्त्वज्ञाने निश्चितपणे भिन्न असली पाहिजेत, असे मला वाटते. चिमणीचे खरे सामर्थ्य काड्या आणि कापूस जमवून घरातल्या एखाद्या कोपऱ्यात सुंदरसे घरटे बांधण्यात असते··· गरुडाप्रमाणे उंच अंतराळात जाऊन तिने सूर्याकडें टक लावून पाहावे किंवा गगन मंडलातून वेगाने खाली येऊन पृथ्वीवर सरपटणाऱ्या सर्पावर झडप घालावी अशी अपेक्षा करणे चुकीचे नाही काय ? सामान्य माणसांचे जीवन या चिमणीसारखे असते. त्यांची सुख-दुःखे, त्यांचे विचार-विकार, किंवा त्यांच्या वासना-भावना असामान्यांच्या मोजमापाने मोजून चालणार नाहीत.–' [९]

**सामान्यांच्या दृष्टीने काम शत्रू नाही.**

त्यांच्या जीवनात शरीरसुखाला फार मोठे स्थान आहे, असे मी म्हणतो याचे कारण हेच आहे. ते सुख त्याला विवेकपूर्ण दृष्टीने भोगून देण्यानेच त्याची उन्नती होण्याचा संभव आहे ·· सामान्यांच्या आत्म्याचा विकास ... हळूहळू होतो. एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच तो होण्याची शक्यता असते हे आदर्शवाद्यांनी विसरता कामा नये. मानवाला बुद्धीच्या रूपाने देवत्वाची देणगी निसर्गाने दिली आहे हे काही खोटे नाही. पण त्याच्याकडे पशुत्वाचाही वारसा याच निसर्गाच्या कृपेने आला आहे हेही तितकेच खरे आहे [१०]

असामान्यांचे तत्त्वज्ञान कामभावनेचे शत्रुत्व पत्करून दमनाची भाषा वापरीत असले तरी सामान्यांना दमनापेक्षा शमन शक्य आहे !

**––परंतु संयमावाचून अधःपातच !**

कामभावनेचे शमन करणे हे कोणत्याही तऱ्हेचे पाप नाही, असे समाजाने मान्य केले आहे, 'पण गेल्या अनेक वर्षांत संयम हा शब्द आबालवृद्धांना जुनाट

वाटू लागला आहे, तो जवळ जवळ हास्यास्पद झाला आहे. व्यक्तिजीवनात आणि समाजजीवनात संयम हा फार मोठा गुण आहे, हे आपण जवळ जवळ विसरून गेलो आहोत. जीवनेच्छा व तिच्यातून निर्माण होणारी भोगेच्छा ही मानवाची प्रमुख प्रेरक शक्ती आहे, ही कोण नाकारील ? पण ती सर्वस्वी आंधळी व स्वच्छंद शक्ती आहे तिचे नियंत्रण करणारी कोणत्याही प्रकारची आत्मिक शक्ती आज आपल्या समाजात अस्तिवात नाही. उलट पूर्वीच्या चार पुरुषार्थांची जागा अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ कसे घेतील याची काळजी गेली कैक वर्षे आमचे अनेक पंडित करीत आले आहेत ! ... या पंडितांचे मत काही असो अर्थ व काम यांच्या स्वैर संचारावर आणि नग्न वर्तनावर ज्या समाजात धर्माचे नियंत्रण नसेल– मग तो धर्म जुन्या काळच्या ईश्वर-श्रद्धसारखा अथवा कर्तव्यनिष्ठेसारखा असो, किंवा नव्या काळातल्या समाजसेवेसारखा अथवा मानवप्रेमासारखा असो– त्या समाजाचे अध:पतन आज ना उद्या झाल्याशिवाय रहात नाही '...११

संयमाचे महत्त्व खांडेकरांनी क्रौंचवध कादंबरीच्या प्रस्तावनेतही सांगितले आहे–

'समाजातल्या ज्या वर्गात कामविषयक संयम अधिक असतो. तोच वर्ग अधिक कर्तृत्व प्रगट करू शकतो व समाजाचे पुढारीपण मिळवतो... ...'१२

यायाच अर्थ असा की, सामान्यांच्या जीवनात कामभावना तृप्त झाली पाहिजे, तिचे जीवनात मोठे स्थान आहे, हे खरे असले तरी तो सामान्य सदैव सामान्यच राहावा, तो हळूहळू उदात्त वा उन्नत बनू नये, असे थोडेच आहे ? 'चिमणीने गरुड बनू नये' हे म्हणणे ठीक आहे. चिमणीला ते शक्यही नाही ! कारण चिमणी नि गरुड दोन जातीच भिन्न आहेत ! परंतु गरुडाच्याच पंख न फुटलेल्या पिलाला आज झेप मारता येत नसली तरी तो त्याच कुळात जन्माला आला आहे, हे त्याने कधीही विसरू नये ! 'सामान्य' हा पंख न फुटलेल्या गरुडाच्या पिलासारखा असतो ! चिमणी सारखा नव्हे ! कारण सामान्य व असामान्य यांच्यात गरुड व चिमणीसारखा जातीचाच भेद नाही ! तेव्हा त्यालाही तृप्ती बरोबर संयमाचे पाठ देऊन समर्थ बनवणे, हेच धर्मकल्पनेचे कार्य होय ! जर कामतृप्तीच त्याला शक्य आहे, असे मानले तर तो कधीही समाजाचे पुढारीपण मिळविण्याइतका प्रगत वा उन्नत होणे शक्य नाही !

म्हणून शारीरिक वासनांचे स्थान मान्य केले तरी त्यांची मर्यादाही ओळखणे आजच्या काळात आवश्यक आहे. हेच आमचे आजचे लेखक विसरलेले दिसतात.

'ललित वाङ्मयातील कामुक चित्रणे कष्टाने जिणे जगणाऱ्या आजच्या सर्वसामान्य दु:खांचा घटकाभर विसर पाडीत असतील. मद्यपीही अशा क्षणिक विस्मृती करिताच दारू पीत असतो. पण जीवनातल्यां विविध संकटांना तोंड द्यायला जे अखंड धैर्य लागते ते कांही असल्या आसुरी व अंती निष्फळ ठरणाऱ्या उपायांनी निर्माण होणार नाही.'[१३] 'कामचित्रण हा कितीही गुदगुल्या करणारा विषय असला, मानवी मनाला तो धुंदफुंद करून सोडीत असला तरी मानवी आत्म्याला असह्य झालेले निराशा, विफलता आणि असंतुष्टता यांचे ओझे पेलण्याची त्याला ताकद आहे. का?--हा अवाजड भार केवळ धर्मच पेलू शकेल.'[१४]याचाच अर्थ असा की.--

## कामवासनेचे उदात्तीकरण आवश्यक आहे.

'कामवासना ही अन्नाच्या वासनेइतकीच स्वाभाविक वासना आहे. अन्नाच्या गरजेइतकीच आवश्यक गरज आहे. तिचे मानवी जीवनातील अस्तित्व, तिचे सौंदर्य, तिचे सामर्थ्य ही सर्व मला मान्य आहेत; पण मनुष्याची कुठलीही वासना, सदैव वासना स्वरूपातच राहिली, तर तिचे उन्मादात रूपान्तर होण्याचा संभव असतो. तिला कोणत्या तरी बाजूने उदात्ताचा स्पर्श झाला पाहिजे. काम क्रोधादि विकारांकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन पूर्वग्रह दूषित नाही. हे मनोविकार आपले शत्रू आहेत. असे प्राचीन काळी मानले जात असे; पण ते मानवाचे मित्र आहेत. त्यांच्यावाचून त्याचे जीवन नीरस होईल, याची परिपूर्ण जाणीव मला आहे. तथापि कुत्रा हा माणसाचा इमानी मित्र असला, तरी तो पिसाळला म्हणजे त्यांचा शत्रू बनतो! तशी या मनोविकारांची स्थिती आहे. म्हणूनच वैयक्तिक आणि सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या जीवनात मनुष्याच्या सर्व वासना एका मर्यादेपर्यंत सुजाण पद्धतीने तृप्त होण्याची सोय असली पाहिजे, आणि त्या मर्यादेनंतर त्या नियंत्रित कशा करता येतील, याचीही काळजी व्यक्तीने आणि समाजाने घेतली पाहिजे. या बाबतीत फ्राईडपासून किन्सेपर्यंतचे पाश्चात्य कामशास्त्रज्ञ काय म्हणतात ते मला ठाऊक आहे, पण कामवासनेने काय किंवा दुसऱ्या कुठल्याही वासनेने काय, मानवी जीवनात सतत वासनेच्या स्वरूपातच कायम राहणे भयप्रद आहे. मानवी मनाची व जीवनाची रचना या गोष्टीला अनुकूल नाही. मनुष्याने मोठ्या कष्टाने निर्माण केलेली. संस्कृती तर कंठरवाने या गोष्टीचा निषेध करीत आलेली आहे. कामवासना, कामभावना, प्रीतिभावना आणि भक्तिभावना ही या एकाच वासनेचीं क्रमाक्रमाने अधिक सूक्ष्म, सुंदर, उन्नत, आणि उदात्त होत जाणारी चार रूपे आहेत. या चारही रूपांचे जीवनातील असामान्य स्थान सामान्य माणसाला सतत जाणवले पाहिजे.'......[१४]

वेगळ्या शब्दात सांगायचे तर, सामान्याला असामान्याची सतत जाणीव होईल, तो हळूहळू उन्नत, उदात्त होईल, अशी योजना सामाजिक तत्त्वज्ञानात असणे आवश्यक आहे. ती योजना कोणती ? अर्थ आणि काम यांच्यावर धर्माचे नियंत्रण, हवे असे खांडेकर म्हणत असले तरी त्यांच्या अंतःकरणात धर्मबुद्धीचा अर्थ स्वतंत्र आहे. –

## नवा धर्म–समाज धर्म !

आपणास माहीतच आहे की, खांडेकर मानवता हाच धर्म मानतात. समाजसेवा अथवा मानवताप्रेम म्हणजे धर्मबुद्धी अशी त्यांची कल्पना आहे. ' प्रीस्ट्लेने ज्या धर्मबुद्धीचा उल्लेख केला तिलाच मी सामाजिक जाणीव, जागृत सामाजिक मन, कलेची जीवनसन्मुखता अशा निरनिराळ्या नावांनी संबोधित आलो आहे. परलोक आणि परमेश्वर यांच्याविषयी श्रद्धा नसलेल्या समाजाला परंपरागत धर्म नियंत्रित करू शकत नाही. नवीन काळाला अनुरूप आणि नव्या समस्या सोडविण्याला समर्थ अशा धर्मबुद्धीचीच आता आपणांला आवश्यकता आहे. मानवी मनाची पातळी उंचावली नाही. आणि मानवाने नवा धर्म म्हणून समाज धर्म आत्मसात केला नाही. तर त्याने गेल्या अनेक शतकांच्या कष्टपूर्ण प्रवासात जी संस्कृती संपादन केली आहे, तिचा विनाश अटळ आहे.... ... '[१५]

' मानवता हाच धर्म ' हा विचार खांडेकर पुनः पुनः सांगतात. ––

## मानवधर्माचा दिव्य ध्वज फडकत राहावा.

' जगात खरा धर्म एकच––समता ! जगात जागृत देवता एकच–– मानवता ! मानवधर्माचा हा झेंडा उंच राहावा म्हणून सिंहासन सोडून बुद्ध संन्यासी झाला. रिव्रस्त हसत सुळी गेला. रक्ताच्या नद्या वाहणाऱ्या अशोकाला याच ध्वजाने अहिंसेचा निःसीम उपासक बनविले. मानवातील सुप्त देवत्व या ध्वजानेच आजपर्यंत जागृत केले आहे. विकसित केले आहे. ज्या मानवी संस्कृतीचा आपण अभिमान बाळगतो, तिची प्रगती या ध्वजाच्या आशीर्वादानेच होत असते.'[१६]

या मानवताधर्माचे उपनिषद खांडेकर सांगतात –––

' नव्या युगाच्या नव्या तत्त्वज्ञानात स्वप्नाळूपणाला, विषमतेला थारा नाही. या जगात एकच जात राहील, ती म्हणजे माणूस ! ... ... नवीन धर्म माणुसकी ! या जगातल्या मंदिरात समानता––जीवनात विकास करण्याची समानसंधी––या देवाची पूजा होईल. प्रीतीला कोणतीही कृत्रिम बंधने आवडणार नाहीत. काम तृप्ती हे जीवन सर्वस्व मानून माणसे वेड्यासारखी धावणार नाहीत.

लढाया होतील. त्या मनुष्य आणि निसर्ग, मनुष्य आणि अज्ञान, मनुष्य आणि दारिद्र्य यांत ! माणसामाणसात नाहीत ! ... ...[१७]

अशा तऱ्हेचा मानवताधर्म हाच मानवीविकारांचे नियंत्रण करू शकेल, असे खांडेकरांना वाटते.——

' पूर्वी धर्माचे, नीतीचे आणि ईश्वरी श्रद्धेचे नियंत्रण त्यांच्या मनावर होते. आता मानवतेचे, सामाजिकतेचे, सहजीवनाचे, नियंत्रण तेथे आले पाहिजे.'[१८] अर्थातच खांडेकरांना वाटते की, असे सामाजिकतेचे नियंत्रण आले की ' मानवाला स्वतःच्या भोगाच्या मर्यादा सदैव कळत राहातील.'[१९]

अशा रीतीने मानवता हा धर्म असून त्या धर्माच्या हाती अर्थ आणि काम यांचे लगाम राहावे, म्हणजे नवे जग निर्माण होईल. हे लगाम धर्मबुद्धीच्या हाती श्रद्धेने किंवा भावनेच्या पूजनानेच राहातील, तर्कबुद्धीने राहाणेच शक्य नाही, हे ओळखून खांडेकरांनी श्रद्धेचे वा भावनेचे माहात्म्यही वर्णिले आहे.——

**श्रद्धा जीवनातील मोठी शक्ती.**

' श्रद्धा ही जीवनातली फार मोठी शक्ती आहे. कारण श्रद्धा ही प्रीतीचेच विशाल रूप आहे ···श्रद्धेची ही विशालता जेव्हा पराकोटीला पोचते तेव्हा चंडोलाचे गरुडात रूपांतर होते···आजच्या मानवतेपुढला खरा प्रश्न श्रद्धेचे निर्मूलन हा नसून तिचे विकसन आणि संस्करण हा आहे, हे कुणीही कबूल करील.'[२०]

' बुद्धीच्या मागे धावता धावता मनुष्य भावनेला विसरत चालला, हेच वैगुण्य आहे. नुसत्या उन्हात झाडे वाढत नाहीत, ती सुकून जातात, हे आम्हांला कळते. नुसत्या बुद्धीवर मनुष्याला जगता येईल या अहंकाराचा मात्र अजूनही सुधारलेल्या मनुष्याच्या मनावर पगडा आहे. विसाव्या शतकातला मानव आपल्या उद्धाराचा एकच महामंत्र घोकीत आला– ' बुद्धी–बुद्धी–बुद्धी !' पण ज्या बुद्धीला भावनेची जोड नाही, ती जीवन सुखमय करायला शेवटी असमर्थ ठरते, याचा त्याला विसर पडला ··भावनेचे सामर्थ्य... जितके सूक्ष्म तितकेच सर्वस्पर्शी असते... जीवनाच्या विकासाला दोन्ही शक्ती आवश्यक आहेत ··बुद्धी चिकित्सा करते. भावना कार्य करते···भावनेच्या दुर्भिक्षामुळे आपल्या सार्वजनिक जीवनाची स्थिती सुकल्या हिरवळीसारखी झाली आहे. आम्ही बोलतो पुष्कळ पण करतो मात्र फार

थोडे ! कुठल्याही कार्यासाठी अखंड कष्ट करायला जो श्रद्धेचा आणि त्यागाचा आधार लागतो· तोच खुरटलेल्या भावनेमुळे मिळेनासा झाला आहे···'[२१]

## अपार्थिवाचा पार्थिवाला स्पर्श होत राहिला पाहिजे.

खांडेकर ईश्वरनिष्ठा ही 'जुन्या काळातली' आहे, असे मानतात. खांडेकरांची धर्मकल्पना 'मानवताधर्म' मानणारी आहे, तिला 'भगवंताचे अधिष्ठान' आवश्यक वाटत नाही; परंतु अपार्थिवाचा स्पर्श' जीवनाला होत राहावा असे मात्र त्यांना वाटते.

'प्रत्येक सामान्य मनुष्याला थोडी ना थोडी आत्मशक्ती असतेच असते. पण ती इतकी गाढ झोपी गेलेली असते की, तिचे अस्तित्व त्याचे त्याला सुद्धा सहसा जाणवत नाही···धर्म, कला, कायदे, साहित्य, राजकारण यांची कार्यक्षेत्रे एकमेकांपासून कितीही भिन्न असली तरी त्यांचे ध्येय एकच असले पाहिजे. मृत्यूच्या सान्निध्यात किंवा अशाच उत्कट अनुभूतीच्या वेळी मानवी मन काही क्षण ज्या उच्च पातळीवर जाते, तिचा स्पर्श दैनंदिन पार्थिव जीवनाला होत राहील, अशी त्यांनी सतत धडपड केली पाहिजे.'[२२]

अपार्थिवाच्या स्पर्शानेच उदात्तता येते, असे ते म्हणतात–

'सौंदर्याच्या अमर्याद उपभोगानेसुद्धा आत्मा कधीच संतुष्ट होत नाही. तो त्या सौंदर्यापलीकडच्या उदात्ततेकरता तळमळू लागतो.. ···उंचावलेले हात अज्ञात अशा अनंतातून येणाऱ्या अग्निज्वालांना कवटाळीत असतात··· ···' [२३]

अशा रीतीने 'अपार्थिवाचे' अस्तित्व व महत्त्व ते वर्णन करतात. या अपार्थिवामुळेच केव्हा केव्हा त्यांची स्थिती हॅम्लेटसारखीही होते–

## ईश्वर अज्ञेय ! –– बुद्धिवाद लंगडा !

'देव आहे की नाही हा प्रश्न मनुष्याला युगानुयुगे अस्वस्थ करीत आला आहे. तो आहे म्हणावे तर या जगात गोजिरवाणी बालके मृत्युमुखी पडतात, अश्राप जीव दुःखे भोगतात, प्रामाणिक माणसे उपाशी मरतात, सोन्यासारखी अंतःकरणे असलेली माणसे मातीमोल ठरतात. तो नाही म्हणावे तर जन्म–मृत्यूचे

कोडे काही केल्या उलगडत नाही, बुद्धीचे सर्व जीवन प्रकाशित करण्याचा कितीही कसोशीने प्रयत्न केला तरी त्याचे काही भाग काळोखात रहातात आणि त्या काळोखातून ऐकू येणारे विचित्र आवाज मन बचैन करून सोडतात. अशा स्थितीत ' जगावे की मरावे ' या प्रश्नाने गोंधळून गेलेल्या हॅम्लेटसारखी मनुष्याची मनस्थिती होत असली तर त्यात नवल नाही.' [२४]

## खांडेकरांच्या धर्मचिंतनाची वैशिष्टये.

खांडेकरांनी लेखणी उचलली ती काही ध्येयवाद डोळ्यासमोर ठेवून ! आपल्या विचारांनी आपणाला समाज घडवावयाचा आहे याची जाणीव त्यांनी सतत बाळगली. त्या दृष्टीने त्यांनी प्रत्येक दशकादशकातल्या बदलत्या सामाजिक वृत्ति–प्रवृत्तींचे विश्लेषण केले, गण–दोष पाहिले, मार्गदर्शन केले. एका अर्थाने हे सारेच धर्मचितन आहे; कारण ' समाजाची धारणा करतो तो धर्म ' अशी धर्माची मान्यवर व्याख्याच आहे.

समाजधारणेच्या प्रयत्नांत खांडेकर भारतीयांच्या गुणदोषांची प्रखर चर्चा करतात, दोषांवर तुटून पडतात ! भारतीय तत्त्वज्ञान हे समाजोन्मुखच आहे, त्याबद्दल शेकडो वचने उद्धृत करता येतील. स्वतः खांडेकरांनी ती उद्धृत केली आहेत. पण प्रत्यक्ष जीवन समाजविन्मुख आहे. ' सर्वे ऽत्र सुखिनः सन्तु ' म्हणणारे ब्राह्मण बंगालच्या दुष्काळात आर्त किंकाळ्या शांतपणे ऐकू शकतात, हे कशाचे लक्षण ? जीवन आणि तत्त्वज्ञान यात सुसंगती हवी, याची जाणीवच नाही ! हेच. सामाजिक दुःखाचे कारण आहे.

खांडेकरांच्या धर्मचिंतनातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आपली परंपरागत जीवनदृष्टी इहवादापेक्षा परलोकवादाला अत्याधिक केंद्रित झाली आहे. या परलोकवादाला या विसाव्या शतकात स्थान राहिलेले नाही. या शतकात ' ईश्वरनिष्ठा, ' ' परलोकनिष्ठा ' नाहीशी झाली हे एका अर्थी बरेच झाले, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, खांडेकर जडवादी आहेत ते सतत ' आत्मा व शरीर ' यांच्या समन्वयाची भाषा वापरतात. म्हणजे त्यांना ' ईश्वर' मान्य नाही, पण ' आत्मा ' मान्य आहे. खरे सांगायचे झाले तर ' ईश्वर वा परलोक ' यांच्या सत्यासत्यतेपेक्षा त्या कल्पनांवर जीवनाची केलेली उभारणी खांडेकरांना मान्य नाही. समाज–धारणेसाठी सामाजिक धर्मबुद्धी, समाजप्रेम, नीतिमत्ता, माणुसकी, समानतेची भावना हीच उपयोगी पडतात. शिवाय विसाव्या

शतकातल्या विज्ञानाने ‘ईश्वर’ व ‘परलोक’ यावरील निष्ठा अशास्त्रीय ठरविल्या. तेव्हा असिद्ध वस्तूवर वा कल्पनेवर केवळ सोयीस्कर म्हणून कोण विश्वास ठेवणार? ‘ईश्वर’ कल्पना ठेवून भीतीपोटी नीतिमत्तेचे पालन होई व समाजधारणेचा प्रश्न सुटत असे. पण म्हणून अज्ञानावर जीवनाची उभारणी करणे योग्यही नाही व मानवाची अज्ञानावर समजून उमजून दृढ निष्ठाही राहाणे शक्य नाही !

खांडेकरांच्या धर्मचिंतनाचे तिसरे वैशिष्टय म्हणजे त्यांनी केलेले पुरुषार्थ चिंतन ! जुन्या काळात विकार हे शत्रू मानले जात. नव्या काळात ते शत्रू मानले जाणार नाहीत. ते जीवनाची प्रेरणाच आहेत; पण या विकारांना नियंत्रित ठेवण्याची सामाजिक गरज आहे. या दृष्टीने खांडेकरांनी प्राचीन काळातली ‘ पुरुषार्थ, कल्पना उचलून धरली आहे. गांधी, मार्क्स, फ्राईड हे मोठे द्रष्टे तत्त्ववेत्ते होऊन गेले, या प्रत्येक तत्त्ववेत्याच्या चिंतनात सत्यांश आहे, पण तो एकांगी आहे. कोणीही एक पूर्ण नाही. तिन्ही तत्त्वज्ञानाच्या समन्वयात पूर्णता आहे. हे तीन द्रष्टे तत्त्ववेत्ते धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांचे प्रणेते आहेत तेव्हा जीवनाचे तत्त्वज्ञान ‘त्रिविध पुरुषार्थावर’ आधारलेले असावे असे खांडेकरांचे मत दिसते. खांडेकरांना चौथा पुरुषार्थ मान्य नसावा ‘ययातीच्या पार्श्वभूमीत’ त्याचा उल्लेख मात्र येतो. पण धर्म, अर्थ, काम यांचे चिंतन हा जसा ‘पार्श्वभूमीचा’ विषय झाला आहे, तसा चौथा पुरुषार्थ कोठेही चर्चा-विषय झालेला नाही.

–आणि हे स्वाभाविकही आहे. ‘मोक्ष’ हा चौथा पुरुषार्थ ‘ईश्वर’ व परलोक या कल्पनांना धरून आहे, असे त्यांचे मत असावे. तेव्हा ईश्वर अमान्य करताच चौथा पुरुषार्थही आपोआप अमान्य होतच आहे; त्याबद्दल स्पष्ट विधानाची आवश्यकता त्यांना वाटली नसावी. शिवाय खांडेकरांच्या मताने सामाजिक दृष्टीने तथाकथित मोक्षाचा काय उपयोग आहे ? तेव्हा खांडेकर तीनच पुरुषार्थ मानतात गांधी, मार्क्स व फ्राईड या तिघांनाच द्रष्टे म्हणण्याने हे सिद्ध होतेच.

खांडेकरांच्या मताने अर्थ व काम हे दोन अत्यंत प्रभावी पुरुषार्थ आहेत. ते अनियंत्रित व बेलगाम होऊ नयेत म्हणून ‘धर्म’ या पुरुषार्थाची गरज आहे. पण ‘धर्म’ या शब्दाने जुना ‘ईश्वरनिष्ठा’ ‘उपासना’ असा अर्थ घ्यावयाचा नाही. खांडेकरांना तो ‘जुना धर्म’ अभिप्रेत नाही. ‘समाजधर्म’ व ‘मानवता’ असा अर्थ ते सांगतात. तेव्हा अर्थ कामावर धर्माचे नियंत्रण हवे म्हणजे ‘समाजहित दृष्टी’ हवी, ‘मानवतावादी दृष्टी’ हवी, असा घ्यावयाचा आहे. समाज प्रेमाने अर्थ-काम या पुरुषार्थांचे नियंत्रण होऊ शकेल असे खांडेकरांचे म्हणणे आहे.

समाजाला उच्च संस्कृतीची व कालमानानुरूप नव्या जीवननिष्ठांची आवश्यकता वाटते. या नव्या जीवननिष्ठा महापुरुष आपली 'बुद्धी व भावना' यांच्या जोरावर निर्माण करू शकतात. महापुरुषांनी निर्माण केलेले आदर्श श्रेष्ठ दर्जाचे असले तरी सामान्य व्यक्तीसाठी मात्र स्वतंत्र आटोक्यात येतील असेच आदर्श हवे. असामान्यांचे तत्त्वज्ञान सामान्यांना पेलवणार नाही परतु सामान्य हा नेहमी सामान्यच रहावा व तो क्षुद्र जीवनातच वळवळत रहावा, असा त्याचा अर्थ नाही. समाजाने संस्कार व शिक्षण यांनी सामान्यांनाही संयमाचे पाठ दिले पाहिजेत व त्यांचे जीवनही उत्तरोत्तर उन्नत, उदात्त व सामर्थ्यसंपन्न होईल, अशी दक्षता घेतली पाहिजे.

## खांडेकरांच्या धर्मचिंतनाला पडलेल्या मर्यादा

खांडेकरांनी 'धर्म' या शब्दाने मानवता, समानता असा अर्थ घेतला आहे. 'समाजाची धारणा करतो तो धर्म' ही जुनी व्याख्याच त्यांना मान्य आहे; परंतु त्यासाठी 'ईश्वरनिष्ठेची' आवश्यकता नाही, असे त्यांचे म्हणणे. त्याला त्यांची कारणे विसाव्या शतकात ईश्वर-कल्पनेवर कोणाची श्रद्धा बसणे शक्य नाही 'ती कल्पना अज्ञानमूलक आहे, ईश्वर दयाळू आहे हे सिद्ध होत नाही जगातील अन्याय व दुःख ही तो असता तर पाहू शकला नसता' अशी आहेत.

परंतु खांडेकरांचे हे मत स्थिर नाही ते ठामपणे 'ईश्वर नाहीच' व त्याची जीवनाला आवश्यकताही नाही' असे चार्वाक मतही स्वीकारीत नाहीत. 'प्रत्यक्षं प्रमाणम्' या मतावर त्यांना दृढ श्रद्धा ठेवता आलेली नाही. 'देव अज्ञेय वाटत रहातोच-' 'जीवनाचे कोडे सुटत नाही' 'जीवनाच्या काळोख्या भागातून संदेश येतात' जीवनाला अपार्थिवाचा स्पर्श होणे आवश्यक आहे' व्यक्तीच्या जीवनात आत्मा सात्त्विक शक्तींचे भांडार आहे' असे ते जागोजाग म्हणतात.

म्हणजे 'व्यक्तीला' 'अपार्थिव आत्मा' असतो व त्याची नुसती गरजच नसते तर त्या अपार्थिवाच्या चिंतनावाचून व्यक्ती अत्यंत क्षुद्र, संकुचित, स्वार्थी व पशुवत बनते, हे भाऊसाहेब मान्य करतात; परंतु व्यापक, अनंत असे एकतत्त्व त्यांच्या कल्पनेत बसू शकत नाही! 'आत्मा' मान्य आहे पण 'परम-आत्मा' मान्य नाही!

## विसाव्या शतकातही परमात्मा तर्कसंगत व अनुभवसिद्ध आहे.

विसावे शतक असले, ते विज्ञानयुग असले नि प्रयोग व प्रत्यक्ष यांच्यावरच निष्ठा ठेवणारे असले तरीही 'परमात्मा' सर्व प्रकारे सिद्ध होतो. खांडेकर 'व्यक्तीतील अपार्थिवता' मान्य करतात पण 'विश्वाच्या अभिव्यक्तीमागील अपार्थिवता' त्यांना पटत नाही, याचे आश्चर्य वाटते.

स्वामी विवेकानंद म्हणतात–

'ज्ञेय व ज्ञात ही दोन्ही बाजूंनी अज्ञेयाने व अनंत अशा अज्ञाताने वेढलेली आहेत हे जरी आपण मान्य केले तरी त्या अज्ञाताच्या प्राप्तीसाठी आपण प्रयत्न का करावा ? आपण ज्ञातानेच संतुष्ट का राहू नये ? खाणे, पिणे व लोकांचे थोडे फार भले करणे येवढयातच आपण समाधान का मानू नये ? आज हा विचार सर्वत्र प्रचलित असलेला दिसून येतो. अति विद्वान प्राध्यापकापासून तो बोबडे बोल बोलणाऱ्या लहान मुलापर्यंत सगळेजण आपल्याला सांगतात की, 'लोकांचे भले करा, त्यातच सगळा धर्म आहे; विश्वाच्या पलीकडे काय आहे या प्रश्नाने आपले डोके शिणवू नका.' हा विचार इतका पसरला आहे की, ही अगदी सामान्य गोष्ट होऊन बसली आहे.'––

'पण सुदैवाने आपल्याला विश्वाच्या पलीकडील त्या सत्तेचा शोध करावाच लागतो. हे दृश्य व अभिव्यक्त विश्व हे त्या अव्यक्ताचा केवळ एक अंश आहे. हे इंद्रियगम्य विश्व म्हणजे जणू काही त्या अनंत आध्यात्मिक इंद्रियज्ञानाच्या पातळीवर अभिव्यक्त झालेला एक लहानसा अंश आहे. हा लहानसा अंश त्याच्या पलीकडे असलेल्या आध्यात्मिक विश्वाच्या ज्ञानाशिवाय कसा काय जाणला किंवा समजला जाऊ शकतो ? सॉक्रेटिसबद्दल असे सांगतात की अथेन्समध्ये एकदा तो भाषण देत असताना त्याला भारतातून ग्रीस देशात गेलेला एक ब्राह्मण भेटला. सॉक्रेटिसने ब्राह्मणाला म्हटले की मानवाच्या अभ्यासाचा सर्व श्रेष्ठ विषय मानव हाच आहे. त्यावर ब्राह्मणाने तात्काळ उत्तर दिले की, 'जोपर्यंत तुम्हाला ईश्वराचे ज्ञान होत नाही तोपर्यंत तुम्हाला मानवाचे तरी ज्ञान कसे होणार ?' हा ईश्वर किंवा ही अनंत, अज्ञात व निरपेक्ष सत्ता किंवा ही अनंत व नामातीत वस्तू–मग तिला तुम्ही कोणतेही नाव द्या–तीच ज्ञात व ज्ञेय अशा या वर्तमान जीवनाचे एकमेव तर्कसंगत स्पष्टीकरण आहे. तुमच्यापुढील कोणतीही वस्तू घ्या, अगदी जड अशी वस्तू घ्या, अत्यंत भौतिक असे कोणतेही शास्त्र घ्या, उदाहरणार्थ रसायन शास्त्र, पदार्थ विज्ञान शास्त्र, ज्योतिषशास्त्र किंवा जीवशास्त्र घ्या, त्याचा अभ्यास

करा, हा अभ्यास जितका खोलवर नेता येईस तितका न्या. मग तुम्हाला दिसून येईल की, स्थूल रूपे ही क्रमशः अधिकाधिक सूक्ष्म रूपात लय पावत आहेत. असे होता होता अशी एक अवस्था येते की जिथे पोहोचल्यावर तुम्हाला जडातून उडी घेऊन एकदम अ–जड वस्तूकडे जावे लागते. ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात स्थूल हे सूक्ष्मात व भौतिकशास्त्र हे अध्यात्मशास्त्रात लय पावते.'

'असेच प्रत्येक गोष्टीचे आहे. आपला समाज, आपले परस्पर संबंध, आपला धर्म आणि आपले नीतिशास्त्र या सर्वांना हीच गोष्ट लागू आहे. केवळ उप–योगितेच्या तत्त्वाच्या आधारे नीतिशास्त्राची उभारणी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अशा आधारावर तर्कसंगत नीतिशास्त्र कोणीही निर्माण करून दाखवावे, असे माझे आव्हान आहे. लोकाचे भले करा. का ? तर ही गोष्ट सर्वांत उपयोगाची आहे म्हणून ?' [२५]

तेव्हा समाजधर्म, समानता, समाजप्रेम, मानवता या सर्व तथाकथित बुद्धिवादाने निर्माण केलेल्या 'विसाव्या शतकातील' समाजवादाचेही स्पष्टीकरण 'विश्वाच्या पाठीमागे एक तत्त्व म्हणून बंधुभाव शास्त्रीय आहे' यावाचून कोण व कसे देऊ शकणार ? तेव्हा विसाव्या शतकातही ईश्वरचिंतन कोणत्याही दृष्टीने अंधश्रद्धेचे वाटण्याचे कारण नाही. किंबहुना 'बुद्धिवाद लंगडा का पडतो ?' याचेच कारण बुद्धिवाद्यांनी शोधणे आवश्यक आहे !

## मानवताधर्म म्हटल्याने वृत्ती नियंत्रित होतात काय ?

खांडेकरांनी म्हटले आहे, अर्थ व काम यांच्या स्वैर संचारावर आणि नग्न वर्तनावर ज्या समाजात धर्माचे नियंत्रण नसेल–मग तो धर्म जुन्या काळच्या ईश्वर श्रद्धेसारखा अथवा कर्तव्यनिष्ठेसारखा असो, किंवा नव्या काळातल्या समाजसेवे–सारखा अथवा मानवप्रेमासारखा असो– त्या समाजाचे अधःपतन आज ना उद्या झाल्याशिवाय रहात नाही.'– परंतु 'नव्या काळातल्या समाजसेवेला वा मानव प्रेमाला खांडेकर कोणते तर्कसंगत कारण सांगू शकतील ? या शतकातल्या विद्वानांनी ईश्वरनिष्ठेचा अर्थच समजावून घेतला नाही. प्राचीन शास्त्रांचे बुद्धिनिष्ठ चिंतन केले नाही. व्रत, उपवास, मूर्तिपूजा यातच धर्म आहे, असेच जुन्या धर्मनिष्ठ मंडळींप्रमाणे ही नवी मंडळीही विश्वास धरून बसली. त्यांनीही खऱ्या ईश्वर–

## विसाव्या शतकातही परमात्मा तर्कसंगत व अनुभवसिद्ध आहे.

विसावे शतक असले, ते विज्ञानयुग असले नि प्रयोग व प्रत्यक्ष यांच्यावरच निष्ठा ठेवणारे असले तरीही 'परमात्मा' सर्व प्रकारे सिद्ध होतो. खांडेकर 'व्यक्तीतील अपार्थिवता' मान्य करतात पण 'विश्वाच्या अभिव्यक्तीमागील अपार्थिवता' त्यांना पटत नाही, याचे आश्चर्य वाटते.

स्वामी विवेकानंद म्हणतात–

'ज्ञेय व ज्ञात ही दोन्ही बाजूंनी अज्ञेयाने व अनंत अशा अज्ञाताने वेढलेली आहेत हे जरी आपण मान्य केले तरी त्या अज्ञाताच्या प्राप्तीसाठी आपण प्रयत्न का करावा ? आपण ज्ञातानेच संतुष्ट का राहू नये ? खाणे, पिणे व लोकांचे थोडे फार भले करणे येवढ्यातच आपण समाधान का मानू नये ? आज हा विचार सर्वत्र प्रचलित असलेला दिसून येतो. अति विद्वान प्राध्यापकापासून तो बोबडे बोल बोलणाऱ्या लहान मुलापर्यंत सगळेजण आपल्याला सांगतात की, 'लोकांचे भले करा, त्यातच सगळा धर्म आहे; विश्वाच्या पलीकडे काय आहे या प्रश्नाने आपले डोके शिणवू नका.' हा विचार इतका पसरला आहे की, ही अगदी सामान्य गोष्ट होऊन बसली आहे.'––

'पण सुदैवाने आपल्याला विश्वाच्या पलीकडील त्या सत्तेचा शोध करावाच लागतो. हे दृश्य व अभिव्यक्त विश्व हे त्या अव्यक्ताचा केवळ एक अंश आहे. हे इंद्रियगम्य विश्व म्हणजे जणू काही त्या अनंत आध्यात्मिक इंद्रियज्ञानाच्या पातळीवर अभिव्यक्त झालेला एक लहानसा अंश आहे. हा लहानसा अंश त्याच्या पलीकडे असलेल्या आध्यात्मिक विश्वाच्या ज्ञानाशिवाय कसा काय जाणला किंवा समजला जाऊ शकतो ? सॉक्रेटिसबद्दल असे सांगतात की अथेन्समध्ये एकदा तो भाषण देत असताना त्याला भारतातून ग्रीस देशात गेलेला एक ब्राह्मण भेटला. सॉक्रेटिसने ब्राह्मणाला म्हटले की मानवाच्या अभ्यासाचा सर्व श्रेष्ठ विषय मानव हाच आहे. त्यावर ब्राह्मणाने तात्काळ उत्तर दिले की, 'जोपर्यंत तुम्हाला ईश्वराचे ज्ञान होत नाही तोपर्यंत तुम्हाला मानवाचे तरी ज्ञान कसे होणार ?' हा ईश्वर किंवा ही अनंत, अज्ञात व निरपेक्ष सत्ता किंवा ही अनंत व नामातीत वस्तू–मग तिला तुम्ही कोणतेही नाव द्या–तीच ज्ञात व ज्ञेय अशा या वर्तमान जीवनाचे एकमेव तर्कसंगत स्पष्टीकरण आहे. तुमच्यापुढील कोणतीही वस्तू घ्या, अगदी जड अशी वस्तू घ्या, अत्यंत भौतिक असे कोणतेही शास्त्र घ्या, उदाहरणार्थ रसायन शास्त्र, पदार्थ विज्ञान शास्त्र, ज्योतिषशास्त्र किंवा जीवशास्त्र घ्या, त्याचा अभ्यास

करा, हा अभ्यास जितका खोलवर नेता येईल तितका न्या. मग तुम्हाला दिसून येईल की, स्थूल रूपे ही क्रमशः अधिकाधिक सूक्ष्म रूपात लय पावत आहेत. असे होता होता अशी एक अवस्था येते की जिथे पोहोचल्यावर तुम्हाला जडातून उडी घेऊन एकदम अ–जड वस्तूकडे जावे लागते. ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात स्थूल हे सूक्ष्मात व भौतिकशास्त्र हे अध्यात्मशास्त्रात लय पावते.'

'असेच प्रत्येक गोष्टीचे आहे. आपला समाज, आपले परस्पर संबंध, आपला धर्म आणि आपले नीतिशास्त्र या सर्वांना हीच गोष्ट लागू आहे. केवळ उप–योगितेच्या तत्त्वाच्या आधारे नीतिशास्त्राची उभारणी करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अशा आधारावर तर्कसंगत नीतिशास्त्र कोणीही निर्माण करून दाखवावे, असे माझे आव्हान आहे. लोकाचे भले करा. का ? तर ही गोष्ट सर्वात उपयोगाची आहे म्हणून ?' [२५]

तेव्हा समाजधर्म, समानता, समाजप्रेम, मानवता या सर्व तथाकथित बुद्धिवादाने निर्माण केलेल्या 'विसाव्या शतकातील' समाजवादाचेही स्पष्टीकरण 'विश्वाच्या पाठीमागे एक तत्त्व म्हणून बंधुभाव शास्त्रीय आहे' यावाचून कोण व कसे देऊ शकणार ? तेव्हा विसाव्या शतकातही ईश्वरचिंतन कोणत्याही दृष्टीने अंधश्रद्धेचे वाटण्याचे कारण नाही. किंबहुना 'बुद्धिवाद लंगडा का पडतो ?' याचेच कारण बुद्धिवाद्यांनी शोधणे आवश्यक आहे !

## मानवताधर्म म्हटल्याने वृत्ती नियंत्रित होतात काय ?

खांडेकरांनी म्हटले आहे, अर्थ व काम यांच्या स्वैर संचारावर आणि नग्न वर्तनावर ज्या समाजात धर्माचे नियंत्रण नसेल–मग तो धर्म जुन्या काळच्या ईश्वर श्रद्धेसारखा अथवा कर्तव्यनिष्ठेसारखा असो, किंवा नव्या काळातल्या समाजसेवे–सारखा अथवा मानवप्रेमासारखा असो– त्या समाजाचे अध:पतन आज ना उद्या झाल्याशिवाय रहात नाही.'– परंतु 'नव्या काळातल्या समाजसेवेला वा मानव प्रेमाला खांडेकर कोणते तर्कसंगत कारण सांगू शकतील ? या शतकातल्या विद्वानांनी ईश्वरनिष्ठेचा अर्थच समजावून घेतला नाही. प्राचीन शास्त्रांचे बुद्धिनिष्ठ चिंतन केले नाही. व्रत, उपवास, मूर्तिपूजा यातच धर्म आहे, असेच जुन्या धर्मनिष्ठ मंडळींप्रमाणे ही नवी मंडळीही विश्वास धरून बसली. त्यांनीही खऱ्या ईश्वर–

कल्पनेचा बुद्धिनिष्ठ शोध घेतला नाही. परिणामतः त्यांची आधुनिक शास्त्रेही निराधार होऊन बसली आहेत.

'मानवप्रेम' या शब्दप्रयोगाने कोणी मानवतावादी होतो काय ? या समाजवादी संस्कारांनी मानवाच्या वृत्ती नियंत्रित झालेल्या दिसतात काय ? तसे काहीही आढळत नाही. 'विसाव्या शतकातली' 'स्त्री–जीवन व्यथा' अभ्यास–ण्यासारखी आहे.

## जगात संस्कृतीचे युग अवतरले आहे काय ?

'जगात संस्कृतीचे युग अजून आलेलेच नाही.. ... स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिच्या शरीराला कोणी हात लावणार नाही, असे जेव्हा होईल तेव्हाच जगात संस्कृती आली असे मी म्हणेन... ...'[२६]

'...स्त्रीला कोणताही समाज व्यक्ती तर नव्हेच, पण मनुष्यसुद्धा मानायला तयार नाही. ती भोग्य वस्तू आहे, मालमत्ता आहे, विलासाचे एक साधन आहे' अशीच दृष्टी मानवसमाजाच्या प्रारंभापासून आजपर्यंत सर्व देशातं, सर्व समाजात आढळून येते...'[२७]

'...रशियन सैनिकांनी जर्मन स्त्रियांवर जे अत्याचार केले ते, एका दृष्टीने मानवी संस्कृतीला जास्त लांछनास्पद आहेत, असे वाटते. का ? असे का ? तसे वाटण्याचे कारण हे की, सोव्हिएट रशिया नव्या संस्कृतीचीं उभारणी करण्याची प्रतिज्ञा करीत होता. भांडवलशाही संस्कृतीने स्त्रीला भोगदासी करून ठेवली आहे' असा मार्क्सचा आरोप होता. नव्या साम्यवादी संस्कृतीत स्त्री मुक्त होईल आणि तिच्या व्यक्तिवाला प्रतिष्ठा प्राप्त होईल, असे मार्क्स व लेनिनवादी अनुयायी सांगत होते...विश्वसंस्कृती उन्नत करण्यास निघालेले सैनिक बहिणी म्हणून आदराने वागतील, असेच कोणालाही वाटले असते. पण रशियन शिपायांच्या लेखी स्त्रिया म्हणजे देहच होते...'[२८]

खांडेकर 'नवे जग' निर्माण करण्यासाठी 'जुन्या निष्ठा' मोडीत काढण्याची भाषा वापरतात; पण 'नव्या निष्ठांनी' कोणती 'अद्ययावत संस्कृती निर्माण केली आहे ? संस्कृतीची वाटचाल मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे होण्याऐवजी मनुष्यातल्या पशुत्वाला जागे करण्याकडे होत आहे ! तेव्हा 'समाजधर्म' वा 'मानवधर्म' याला जुन्या 'ईश्वरनिष्ठेची' जागा घेता आलेली नाही, हे मान्य करणे भाग आहे.

## मानवतावाद प्रगतीची दिशा सुचवीत नाही

समाजवाद किंवा मानवतावाद हे शब्द ‘ धर्म ’ वा ‘ ईश्वरनिष्ठा ’ यांचे स्थान घेऊ शकतील काय ? समाजवादाला ‘ अर्थ व काम ’ यांचीच केवळ काही विशिष्ट सामाजिक रचना अभिप्रेत आहे. सध्याचे सारे ‘ वाद ’ ‘ अर्थ व काम ’ या दोनच पुरुषार्थांची चर्चा करतात. खांडेकरांनी ‘ ययातीच्या पार्श्वभूमीत ’ याबाबत तक्रार केली आहेच. कोणता ‘ वाद ’ धर्माचर्चा करतो ? वा ‘ धर्मसंस्थापना ’ करण्यासाठी योजना आखतो ? समाजवाद मानवी जीवनाच्या प्रगतीची आकडेवारी केवळ आर्थिक परिभाषेतच मांडतो ना ? ‘ शरीर आणि आत्मा ’ या दोहोंच्या समन्वयाची आवश्यकता आहे, असे भाऊसाहेब म्हणतात; परंतु समाजाच्या आत्मिक विकसनाच्या आलेखावरून संस्कृतीची प्रगती मोजली पाहिजे; पंचवार्षिक योजना आखल्या पाहिजेत, असे कोणाला वाटते काय ?

समाजवाद वा मानवतावाद म्हणजे काय ? हे शब्द कोणतेही ध्येय सुचवीत नाहीत. निष्ठा सुचवतात. या निष्ठा कोणत्या श्रेष्ठ जीवनमूल्यांचा पाठपुरावा करतात ? या निष्ठा समाजाला कोठे घेऊन जाणार ? ‘ नीती ’ म्हणजे ‘ नेणारी ’ ! समाजनीती म्हणजे समाजाला घेऊन जाणारी ! पण कोठे ? ‘ ईश्वरनिष्ठेत ’ समाजाच्या प्रगतीची ‘ अपार्थिवाकडे ’ गती निश्चित होते ! ती मानवतावाद या शब्दाने मुळीच सूचित होत नाही. तेव्हा विद्वानांनी असले अर्थशून्य शब्द वापरणे सोडून द्यावेत, हेच उत्तम !

मानवतावाद हा शब्द प्रगतीची दिशा व व्याख्या करीत नाही !

## नीती समाज-मान्यतेवर अवलंबून ठेवावी काय ?

समाजनिष्ठा, मानवतावाद हे शब्द अत्यंत फसवे आहेत. सामाजिक नीती वा हित ही समाजमान्यतेवर ठरवता येतील काय ? लोकनेता हा केवळ लोकमताचा वाहक असून चालत नाही, प्रसंगी लोकमताला डावलून त्याने लोकहित साधले पाहिजे. लोकोत्तर महापुरुष यांनी आपली मते समाजमान्यतेवर पारखून घेतली होती काय ? लोकोत्तर महापुरुषांनी आपल्या जीवनात निश्चित केलेली नीती कोणत्या तत्त्वांवर पारखून घेतली ? ‘ बुद्धी व भावना ’ यातून ‘ महापुरुष संस्कृतीची निर्मिती ’ करू शकतात, असे भाऊसाहेब म्हणतील ! पण बुद्धी व भावना हे साधन होऊ शकते, समाजहिताचा निकष नव्हे !

संपूर्ण समाज एखादे अज्ञान स्वीकारू शकतो की नाही ? ‘ नीती म्हणजे समाजाने मान्य केलेले जीवनमूल्य ’ अशी पाश्चात्य पंडितांची नीतीची व्याख्या आहे. मद्यपान समाजाला बोचेनासे झाले की, अनैतिक राहात नाही. कलेच्या क्षेत्रातही नग्नता आली; पण त्याला कोणीही ‘ आता ’ ‘ अश्लील ’ म्हणत नाहीत.

समाजाने या गोष्टींना मान्यता दिली आहे. अमेरिकेत निग्रोंना हीन लेखणे ही समाजमान्य वस्तुस्थितीं आहे. या सर्व अज्ञानजनित कल्पनांना 'नीतीचं' म्हटले जाते ! तेव्हा नीतीची नीतिमत्ता ठरविण्याची कसोटी मानवता वा समाजनिष्ठा ही ठरविली तर किती फसवी होईल, हे स्पष्ट आहे.

## अपार्थिवाकडे गती – एक सामाजिक गरज

खांडेकरांना 'अपार्थिवाची' आवश्यकता वाटली ती याचसाठी ! तेव्हा समाजमान्यता वा मानवता या गतिशून्य कल्पनांपेक्षा 'अपार्थिवाकडे नेणारी' ही नीतीची व्याख्या अधिक अर्थपूर्ण आहे, असे वाटते. या संदर्भाद श्री. खांडेकर यांनी उत्कृष्ट विचार मांडला आहे. काम पुरुषार्थाचे उदात्तीकरण भक्तीत व्हावे, हाच तो विचार होय ! पण या विचाराचा पाठपुरावा कसा करणार ? योजना कोठे आहे ? भक्तीचे स्वरूप कोणते ?

व्यक्तीच्या दृष्टीने शरीर, मन, बुद्धी आणि अहंकार ही सारी पार्थिव ठरतात; त्या पलीकडील सूक्ष्म 'आत्मा' हाच 'सात्त्विक शक्तीचे भांडार' असतो, हे जर खांडेकर मान्य करतात तर या जड, दृश्य विश्वाच्या मागेही असणाऱ्या 'एक तत्त्व परमात्मा' त्यांनी का मान्य करू नये ? किंबहुना व्यक्तीच्या जीवनात आत्मा हे सात्त्विक शक्तींचे भांडार तर समाजाच्या दृष्टीने 'परमात्मा' सात्त्विक शक्तींचे 'भांडार' ठरतो. त्याची भक्ती करणे हे 'काम पुरुषार्थाचे उदात्तीकरण' होऊ शकेल. स्थूलाची वा जडाची भक्ती माणसाला संकुचित व स्वार्थी बनवते. तेव्हा समाजालाही 'अपार्थिव ईश्वरनिष्ठा' दिल्यावाचून कामाचे उदात्तीकरण भक्तीत होणे शक्य नाही. नाहीतर 'समाज-सेवा' व 'मानवता' या स्थूल कल्पनांनी 'भक्तीचेच कामात रूपान्तर' होण्याचा धोका आहे. उदात्तता म्हणजे केवळ व्यापक सामाजिकता नव्हे ! कारण संपूर्ण समाजजीवन पार्थिवाची उपासना करू शकते. त्याला व्यक्तीने साह्य करणे ही कांही उदात्तता नव्हे. उदात्ततेला अपार्थिवाचा स्पर्श आवश्यकच आहे. हे ध्यानी ठेवणे अगत्याचे आहे.

'काम' वा इतर विकारांचे नियंत्रण वा संयम मानवतेच्या प्रेमाने होईल; पण हे मानवतेचे प्रेम कशातून निर्माण होईल ? भगवद्‌गीता सांगते 'परं दृष्ट्‌वा निवर्तते' विषयांना भोगण्याचा रस आत्मसाक्षात्कार होण्यानेच नष्ट होऊ शकतो ! ( अ. २–५९ ) याचा अर्थ असा की, उदात्ततेचा, अपार्थिवाचा साक्षात्कार झाल्यावाचून निःस्वार्थी वृत्ती निर्माण होणार नाही. मानवतेचे प्रेम 'सर्व मानवात एक-तत्त्वाच्या दर्शनावाचून' निर्माण होणे शक्य नाही ! समानतेचा उद्‌घोष अपूर्णच ! एकात्मतेचा उद्‌घोष हवा !

याचाच अर्थ असा की, समाजवाद वा मानवतावाद यांना अभिप्रेत असलेले मानवताप्रेम, निःस्वार्थी वृत्ती व संयम ही स्वाभाविक व सहजस्फूर्त होण्यासाठी जीवनाला ईश्वरनिष्ठेचे अधिष्ठान अपरिहार्य आहे ! एकात्मतेचा परिणाम समानता आहे !

म्हणून विसावे शतक झाले तरी ईश्वरनिष्ठेला एवढे भिण्यासारखे काय आहे ? कामाचे उदात्तीकरण भक्तीने--म्हणजे ईश्वरभक्तीनेच शक्य आहे कारण अपार्थिवाच्या चिंतनावाचून उदात्तता व व्यापकता येणेच शक्य नाही ; 'समाजसेवा' हे शब्दही भोंगळ आहेत; कारण ते सेवेची श्रेणी व विकास दाखवीत नाहीत. समाजसेवेची श्रेणीही उत्तरोत्तर अपार्थिवाकडे नेणारी आवश्यक आहे.

तेव्हा विकारांच्या उदात्तीकरणासाठी ईश्वरनिष्ठा अपरिहार्य ठरते.

## चौथा पुरुषार्थ म्हणजे जीवनाचे अपार्थिव ध्येय

खांडेकरांनी 'ते दिवस ती माणसे' यात एक अत्यंत उत्कृष्ट विचार मांडला आहे. 'धर्म, कला, कायदे, राजकारण यांची कार्यक्षेत्रे एकमेकांपासून कितीही भिन्न असली तरी त्यांचे ध्येय एकच असले पाहिजे.……उत्कट अनुभूतीच्या वेळी मानवी मन काही क्षण ज्या उच्च पातळीवर जाते, तिचा स्पर्श दैनंदिन पार्थिव जीवनाला होत राहील, अशी त्यांने सतत धडपड केली पाहिजे,' असे त्यांनी म्हटले आहे.

पुन्हा तोच प्रश्न ! सर्व कार्यक्षेत्रांचे जर 'एकच ध्येय' ठरवायचे म्हटले, ते ध्येय 'अपार्थिव' असले पाहिजे, हे जर निश्चित असले आणि 'उत्कट अनुभूतीच्या वेळी मनाला त्याचा अनुभव येत असला' तर ते अपार्थिव ध्येय कोणते ? सर्व जीवनव्यापारांचे एकच एक ध्येय कसे व कोणते ठरवता येईल ?

खांडेकरांनी ते एकच एक ध्येय सांगितलेले नाही; परंतु जो चौथा पुरुषार्थ त्यांनी टाळला तेच ते सर्व जीवनाचे एकमेव ध्येय होय ! जीवनाचे अंतिम ध्येय आणि राजकीय व सामाजिक ध्येय स्वतंत्र असू शकत नाहीत.

जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सुटणे म्हणजे मोक्ष अशी सर्व साधारण समजूत आहे; पण ती चुकीची आहे. 'जीवनाचे सर्वोत्तम ध्येय म्हणून भारतीयांनी मोक्ष असे सांगितले आहे. हा मोक्ष उदात्त असला तरी केवळ व्यक्तिगत स्वरूपाचा असल्याने त्यात समाज-निरपेक्ष व्यक्तिस्वार्थाची भावना आहे, असा पुष्कळांनी आपला समाज करून घेतला आहे. वैदिक व उपनिषद् तत्त्वज्ञानाची परिभाषा माहीत नसल्यामुळे हा अपसमाज उत्पन्न झाला आहे.' मोक्ष म्हणजे अत्यंत व्यापक अथवा विश्वात्म होऊन राहाणे'; हे लक्षात घेतले तर त्यात व्यक्तिस्वार्थालावाव

मुळीच नाही, हे ध्यानात येईल. उलट विश्वात्म होऊन राहाण्यात 'आत्मौपम्येन भूतानि' या न्यायाने संपूर्ण आपपर भेदभाव नष्ट होऊन सर्वांच्या हितासाठी सतत उत्कटतेने खपणे हा नैसर्गिक स्वभाव होऊन राहतो. परोपकाराची उसनी आगंतुकी करावी लागत नाही… जेथे व्यक्तित्व उरले नाही व देहाच्या देहलीतील 'स्व' संपला तेथे व्यक्तिस्वार्थ उरलाच कोठे ?'

याचा अर्थ असा की, मोक्ष म्हणजे निरहंकारिता ! मोक्ष म्हणजे विश्वात्म होऊन रहाणे ! महापुरुष नवी नवी जीवनमूल्ये देऊ शकतात, नवी संस्कृती निर्माण करतात ते या 'विश्वात्म' भूमिकेवर आरूढ होऊनच ! किंबहुना महापुरुषांचे माहात्म्य– 'महा–आत्मा–पण'– विश्वात्म होण्यानेच सिद्ध होते. विश्वात्म झालेला म्हणजेच पुरुषार्थाच्या भाषेत मोक्षप्राप्ती झालेला तोच महापुरुष ठरू शकतो. तेव्हा मोक्षप्राप्तीनंतरचे जीवन हेच खरे उदात्त व सुसंस्कृत जीवन होय. महापुरुषांनी ही मोक्ष प्राप्ती करून घेतलेली असते आणि इतर साऱ्या सामान्यांचे सर्व जीवनाचे ध्येय ठरते. मोक्षप्राप्ती म्हणजे अपार्थिवाचा साक्षात्कारच होय. खांडेकर 'अपार्थिवाचा स्पर्श जीवनाला होणे' आवश्यक आहे, असे म्हणतात. अर्थात चौथा पुरुषार्थ मोक्ष हाही त्यांनी मान्य करायला हवा. किंबहुना साऱ्या जीवन व्यापाराचे जे एकमेव ध्येय असावयास हवे, असे त्यांना वाटते, ते ध्येय कोणते तर मोक्षप्राप्ती हेच !

धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांच्या परिभाषेत समाजशास्त्राचे ध्येय व रचना केली आहे, ती अन्य कोणत्याही परिभाषेत इतक्या परिपूर्णतेने व्यक्त होऊ शकत नाही.

तेव्हा खांडेकरांच्या धर्मचिंतनात ईश्वरनिष्ठेची व मोक्ष या चौथ्या पुरुषार्थाची आवश्यकता आहे; त्यावाचून धर्मचिंतन पूर्ण होऊ शकत नाही. त्यांना अपेक्षित मानवतावाद त्यावाचून उभाच राहू शकणार नाही !

## संदर्भ-टीपा


१ कल्पलता पृ. १४०–४१

२ ययाती पृ. ४६७

३ जळलेला मोहोर पृ. ४४

४ ययाती पृ. ४४६

५ सुशीलेचा देव पृ. १३

६ रिकामा देव्हारा पृ. २२–२३

७ सुशीलेचा देव पृ. २३

८ कल्पलता पृ. १३६

९ जळलेला मोहोर पृ. ३९-४०
१० किता पृ. ४०
११ ययाती पृ. ४६८
१२ क्रौंचवध पृ. २४
१३ अभिषेक पृ. ३५१
१४ किता पृ. ३५०
१४ ययाती पृ. ४६९
१५ अभिषेक पृ. ३५१
१६ उल्का पृ. २३-२४
१७ अभिभेक पृ. १७५
१८ ययाती पृ. ४६७-६८
१९ किता पृ. ४६७
२० वेचलेली फुले पृ. २०-२१
२१ क्रौंचवध पृ. १४-१६
२२ ते दिवस ती माणसे पृ. ७३
२३ कल्पलता पृ. १५०
२४ सुशीलेचा देव (संपा.) पृ. २३
२५ धर्माचे विज्ञान आणि तत्त्वज्ञान : स्वामी विवेकानंद
प्रकाशक श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर १९६४
पृ. ३-४
२६ स्त्री जीवन व्यथा : हंस : दिवाळी अंक १९७५ : डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्ध
पृ. ४०
२७-२८ किता पृ. ४६

# ७

# स्त्री-जीवन

## स्त्री जीवनाच्या विविध पैलूंचे चित्रण

खांडेकरांनी स्त्री जीवनाच्या विविध पैलूंचे चित्रण अत्यंत जिव्हाळ्याने केले आहे; आणि त्याच बरोबर स्त्री जीवनातील विविध समस्यांवर आणि संघर्षांवर प्रकाश टाकला आहे.

वात्सल्य हा स्त्री जीवनाचा एक महत्त्वाचा पैलू आहे; किंबहुना ते 'स्त्री जीवनाचे खरे प्रतीक आहे.' आपल्या मुलासाठी, आपल्या भावासाठी प्रसंगी ती कोणताही स्वार्थत्याग करू शकते. खांडेकरांनी हे बऱ्याच ठिकाणी मार्मिकतेने स्पष्ट केले आहे. या भावनांना विवाहोत्तर जीवनात अधिक वाव मिळतो.

## स्त्री जीवनात विवाह महत्त्वाचा

स्त्री जीवनात विवाहाला अनन्य साधारण महत्त्व आहे; पण हा पवित्र संस्कारही अनेक समस्यांचा निर्माता आहे. विवाहविषयक काही समस्यांचाही खांडेकरांनी विचार केला आहे. वैवाहिक जीवनाची बैठक प्रेमाधिष्ठित हवी; पण बालपणातील आकर्षण किंवा कॉलेजातील तरुण–तरुणींना एकमेकाविषयी वाटणाऱ्या आकर्षणाला प्रेम म्हणता येईल का ? प्रेमभंग आणि त्यातून निर्माण होणारी जखम ही खरोखरच न भरून येणारी आहे काय ? या विषयीची चर्चा त्यांनी 'पहिले प्रेम' या कादंबरीत केली आहे.

सामाजिक स्वास्थ्य आणि व्यक्तिगत स्वास्थ्य या दृष्टीनें विवाह एका ठराविक वयात होणेच इष्ट असते; तथापि अनेक कारणांनी विवाह लांबतो. त्यातून

मानसिक कोंडमारा होतो. काही वेळा विवाहच अशक्य होतो. खांडेकरांनी याचे चित्रण ' वादळ ' या कथेद्वारा केले; तर वडिलांच्या सांगण्यावरून, समाजसेवेसाठी आपल्या आवडत्या व्यक्तीशी विवाह नाकारून अविवाहित राहिल्यामुळे मालतीच्या मनाचा कोंडमारा ' पिंजऱ्याबाहेर ' या कथेत दाखविला आहे. ' केवळ भक्तीवर स्त्री जगू शकत नाही, भक्तीच्या जोडीला प्रीतीचे पाणी पाहिजे.' असेही खांडेकर सुचवतात.

विवाहातून निर्माण होणारे मातृत्व हेही स्त्री–जीवनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे अंग आहे. मातृत्वाशिवाय स्त्री जीवनाला पूर्णता येत नाही; हे जरी खरे असले तरी ' मातृत्व ' कोणापासून हेही महत्त्वाचे आहे. क्षयासारख्या रोगी पतीपासून मिळालेले मातृत्व स्त्री जीवनाल शाप की वरदान ? मातृत्व हा निसर्ग ! पण अशा ठिकाणी निसर्ग हाच माणसाचा शत्रू होत नाही का ? आपल्या ' निसर्ग ' या कथेत खांडेकरांनी ही समस्या मांडली आहे. स्त्री ही माता असली पाहिजे, तथापि याबाबतीत गांधारीचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवणे योग्य होणार नाही. ते स्त्रीच्या विकासाच्या दृष्टीने अनिष्ट होईल. मुलामागून मुले झाली की स्त्रीचे शरीर दुबळे होते तिच्या बुद्धीचा विकास खुंटतो. त्यामुळे जीवन दुःखी होऊन खऱ्या सुखाला ती वंचित होते. त्यामुळेही तिच्या प्रपच सागरात वादळे निर्माण होऊ शकतात. विवाहविषयक या काही प्रश्नांबरोबरच स्त्री जीवनात विवाहोत्तर जी वादळे निर्माण होतात त्यासंबंधीही खांडेकर काही ठिकाणी चर्चा करतात.

संसारात दोन मनांचे सुसंवादी सूर जुळणे आवश्यक असते. पण अनेक गोष्टी अशा घडतात की त्यातून हे संगीत बिघडते. त्यापैकी एक गोष्ट म्हणजे स्त्रीचा संशयी स्वभाव ! अशा स्वभावाने संसारात वादळे निर्माण होऊ शकतात याची साक्ष ' धुके ' या कथेबरोबरच ' अमृतवेल ' ही कादंबरीही देऊ शकेल.

## धर्म–मोक्षा इतकाच ' काम ' महत्त्वाचा

पतिपत्नी संबंधात शरीरसुख हाही एक महत्त्वाचा भाग आहे. यशस्वी जीवनाला धर्म–मोक्षाइतकीच ' कामा 'चीही आवश्यकता आहे. ' लग्नपूर्व प्रणयातच नव्हे तर लग्नोत्तर जीवनातही स्त्री–पुरुषामधले शारीरिक आकर्षण ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. या आकर्षणाचे स्वरूप प्रामाणिकपणे समजावून घेण्याचा प्रयत्न न केल्यामुळे लाखो जोडपी नेहमी दुःखी होतात.' [१] ' काम ' या पुरुषार्थाकडे शास्त्रीय दृष्टीने पाहाणे आवश्यक आहे. आजच्या तरुण–तरुणींच्या वैवाहिक जीवनात ज्या स्पष्ट व अस्पष्ट विकृती दिसत आहेत त्याचे कारण काय ? या व अशा प्रकारच्या समस्यांची चर्चा आणि चिंतन खांडेकरांनी 'जळलेला मोहर' यात केले आहे.

सुखी जीवनासाठी स्त्री-जीवनाच्या विकासाचीही पूर्ण काळजी घेतली गेली पाहिजे. तसे घडले नाही तर ती आपल्या पतीच्या जीवनाशी, ध्येयाशी समरस होऊ शकत नाही. यामुळे निर्माण होणारी विषमताही जीवन संगीत बेसूर करीत असते. शरीर शृंगारण्यासाठी ती (माणसे) इतकी धडपडतात पण ज्या मनावर त्यांचे सुख अवलंबून असते त्याची ती कधीच काळजी करीत नाहीत; आणि त्यामुळेच ही वादळे निर्माण होतात.

या वादळातून स्त्री-जीवन नौका बाहेर पडण्यासाठी वरील समस्यांचा विचार तर व्हायला हवाच, पण या बरोबरच तिच्या समाधानाला आणखीही काही गोष्टींची आवश्यकता आहे असे खांडेकरांना वाटते. 'आजच्या स्त्रीला केवळ आर्थिक स्वातंत्र्य, केवळ पतिसुख, किंवा केवळ अपत्यसुख असल्याने समाधान होणार नाही. व्यक्तिविकास, पतिसुख व अपत्यसुख यांचा जेव्हा संगम होईल तेव्हाच स्त्रीचे जीवन खरोखर पूर्ण होऊ शकेल, ही विचारसरणी त्यांनी 'आठ जून' या कथेत मोठ्या कौशल्याने मांडली आहे.'[२]

स्त्री-जीवन पूर्णत्वाला कसे नेता येईल. यांचे चिंतन करीत असताना, अजूनही तिच्या व्यथा संपत नाहीत यांचे आणखीही एक कारण भाऊसाहेब सांगतात; आणि ते म्हणजे स्त्रीकडे पाहण्याचा पुरुषाचा दृष्टिकोन !

## 'स्त्री'कडे पाहण्याचा दृष्टिकोन

पुरुषांनी आजपर्यंत स्त्रीला समानतेने वागवले नाही. तिच्याकडे केवळ एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहिले. यामुळेच तिच्या मुक्या मनाच्या मुक्या वेदना पुरुषाला कळू शकल्या नाहीत. कळल्या असल्या तरी, आपल्या सुखाच्या आड त्या येऊ नयेत यासाठी, त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. 'डावा हात' या लघुनिबंधात त्यांनी ही वेदना मार्मिकतेने मांडली आहे. 'माझं नाव ? माझं नाव तुला ठाऊक नाही ? जगाच्या आरंभापासून प्रत्येकाला ते माहीत आहे. माता म्हणून तुम्ही पुरुषांनी माझी पूजा केली आहे. पत्नी म्हणून तुम्ही माझ्यावर प्रेम केलं आहे. पण ती पूजा आणि ते प्रेम हे मला कोंडून ठेवणारे सोनेरी पिंजरे आहेत. अशी माझी आता पुरेपूर खात्री होऊन चुकली आहे. पुरुषाला स्त्री ही दासी म्हणून हवी, भोग दासी म्हणून हवी ! पण समान हक्क उपभोगणारी मैत्रीण म्हणून मात्र ?... कुळाची प्रतिष्ठा, स्वतःची महत्त्वाकांक्षा, लोक काय म्हणतील ही भीती, एक ना दोन, असल्या हजारों गोष्टींची पुरुष कदर करतात. त्यांना पर्वा वाटत नाही ती एका गोष्टींची त्यांच्यासाठी सर्वस्वाचा होम करणाऱ्या स्त्रीच्या मनाची. तिचं सुख दुःख, तिचा विकास, तिचं ध्येय-पुरुषांना तिच्या मनाच्या मुक्या माराची कधीच कल्पना यायची नाही.!'[३] स्त्रीकडे पाहण्याचा हा पूर्वापार चालत आलेला दृष्टिकोन अजूनही फारसा बदलला नाही.

## हा दृष्टिकोन बदलला पाहिजे

आजची स्त्री आपल्या गुलामगिरीच्या अवजड शृंखला तोडून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहे. आपली समानता प्रस्थापित करण्याचा, आपले हक्क मिळविण्याचा प्रयत्न करून सुखी होण्याचा मार्ग शोधत आहे. हे सारे करीत असताना मूळ प्रश्न असा आहे. की, पुरुषवर्गाचा स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन आजतरी बदलला आहे काय ? काही दिवसांपूर्वी झालेली केरळ मधील कन्यकांची विक्री, बांगला देशात स्त्रियांच्यावर झालेले अत्याचार, कलकत्त्यातील रवीन्द्र सरोवर प्रकरण, खेडेगावातून राजरोस प्रतिष्ठित गुंडांच्याकडून स्त्रियांच्यावर होणारे बलात्कार, कामानिमित्त खेडेगावात राहाणाऱ्या स्त्रियांचे असुरक्षित जीवन ही कशाची उदाहरणे आहेत ? ' आज ' या विसाव्या शतकातही ' स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे. ' ती पुरुषाची भोगदासी आहे ' हा दृष्टिकोन बदललेला दिसत नाही डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी ' स्त्री जीवन व्यथा '[४] या आपल्या लेखात याच विचाराला पुष्टी दिलेली आहे. ' समाजात स्त्रीला काही स्थान आहे का, यापेक्षा स्त्रीचा समान समाज घटक म्हणून समाजात किंवा आपल्या कौटुंबिक जीवनात स्वीकार झाला आहे का ? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यांच्या नव्या स्थानाशी अनुकूल अशी समाजाची व व्यक्तीची मानसिक घडण जडण झाली पाहिजे. अशी घडण जडण जोपर्यंत होत नाही तो पर्यंत स्त्री जीवनाच्या व्यथा संपणार नाहीत.

## संतांचा एक सामाजिक प्रयोग ?

स्त्री–जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टीत बदल झाला पाहिजे. पुरुष मनातही वैचारिक, भावनिक क्रांतीच होणे आवश्यक आहे. या भूमिकेतून संस्कार करणे, केलेले संस्कार सतत टिकविणे त्याप्रमाणे आचरण घडणे हे अत्यंत कठीण काम आहे; पण ते करणे आवश्यक आहे. समाजाने एखादी गोष्ट सतत करण्यासाठी दोन गोष्टींच्या संस्कारांची आवश्यकता असते, एक तर भावनांचे उदात्तीकरण करणे किंवा त्या वस्तू विषयी मनात विचारही न येईल अशी व्यवस्था करणे. त्यासंबंधी घृणा उत्पन्न होईल, किळस निर्माण होईल असे करणे. यातला पहिला मार्ग चांगला आहे यात शंकाच नाही पण या संदर्भात चिंतन करीत असताना, संतांनी पहिल्या बरोबरच दुसरा मार्गही आपल्या साहित्यात हाताळला होता काय अशी शंका येते.

संत साहित्यात ' स्त्री ही मातेसमान ' मानली आहे. त्यातून समाजमनाच्या उदात्तीकरणाचा प्रयत्न केला आहे. तथापि, या बरोबरच अनेक ठिकाणी स्त्रीचे, अत्यंत ओंगळ, किळसवाणे वर्णनही केले आहे. एकाच वेळी या दोन भिन्न भूमिका का ? मानवापुढे स्त्रीचे किळसवाणे, असे वर्णन सातत्याने पुढे ठेवले तर त्यांच्या

मनात ' स्त्री शरीराची ' घृणा निर्माण होऊन तो ' वाममार्गा ' पासून परावृत्त होईल व त्यांच्या मनातील ' स्त्री भोगासक्ती ' कमी होईल. असे तर संतांना वाटले नसेल ना ? त्यांनी केलेला हा प्रयोग योग्य की अयोग्य ? समतोल विचार सरणीचा का असमतोल विचाराचा, किंवा यशस्वी झाला की अयशस्वी, यांचा विचार, हा अगदी वेगळा भाग आहे. पण, पुरुषाच्या मनातील स्त्रीविषयक दृष्टिकोन बदलावा यासाठी तर त्यांनी हा प्रयोग करून पाहिला नसेल ना ?

## नवी स्त्री चुकत आहे

स्त्रीकडे दासी म्हणून पाहण्यात समाजाने आजपर्यंत चूक केली. याची स्त्री मनाला जाणीव होऊन आज ती आपल्या समान हक्कांसाठी भांडत आहे. आपल्या हाती ' सत्ता ' यावी, ' हक्क ' मिळावेत आणि आपण ' राणी ' बनावे असेही तिला वाटते आहे.

बरीच वर्षे गुलामगिरीत काढल्याने आता आपल्याला श्रेष्ठत्व मिळावं, ' राणी 'चा मान मिळवा असे स्त्रीला वाटत असले तरी ते उचित मात्र निश्चित नाही. ' आजची स्त्री गुलामगिरीच्या या अवजड शृंखला तोडून बाहेर पडत आहे. राणी म्हणून समाजात मिरविण्याचा ती आटोकाट प्रयत्न करीत आहे. पण या पुढे स्त्री जीवनाची सफलता दासी होण्यात नाही आणि राणी होण्यातही नाही; ती जगन्माता होण्यात आहे. केवळ पुरुषाशी स्पर्धा करण्याकरिता आणि त्याच्या तोडीने आयुष्यातील विविध सुखांचा उपभोग घेण्याकरता आजची स्त्री घराबाहेर पडत असेल, तर तिची ती मोठी चूक आहे.'[५] असे असले तरी आजच्या गुंतागुंतीच्या समाजरचनेत वेगवेगळ्या कारणासाठी स्त्री ही घराबाहेर पडली आहे. या संदर्भात तिचे कार्यक्षेत्र काय ? तिने घराबाहेर पडावे किंवा नाही ? स्त्री ही घरात स्वतंत्र असते की घराबाहेर ? या संबंधी खांडेकरांनी चिंतन केले आहे. परस्पर विरोधी विचारांच्यामुळे खांडेकरांच्या मतांची आंदोलने पाहाणेही मोठे उद्बोधक ठरणार आहे.

नवी स्त्री, तिचे कार्यक्षेत्र, गुंतागुंतीच्या समाज रचनेतील नीतीच्या कल्पना या संबंधी खांडेकर ज्यावेळी आपले विचार मांडतात त्यावेळी वेगवेगळ्या ठिकाणी ते परस्पर विरोधी आहेत असे जाणवते. स्वतःच्या हक्कासाठी असो, स्वातंत्र्यासाठी असो वा कौटुंबिक कारणासाठी असो, आजची स्त्री घराबाहेर पडली आहे साहजिकच स्त्री–पुरुषांचे घनिष्ठ संबंध येऊ लागले आहेत, अशा स्थितीत नव्या नीतिकल्पना रूढ झाल्या पाहिजेत असे खांडेकरांना वाटते.

**नव्या समस्या**

'सामाजिक जीवन दिवसेंदिवस अधिक संमिश्र होत आहे. जुन्या नीतीचा पुरस्कार करणारांची इच्छा असो वा नसो, स्त्रिया व पुरुष यांचे सर्व क्षेत्रात यापुढे निकट संबंध येत जाणार ही गोष्ट उघड आहे. अशा स्थितीत, स्त्री ही ज्यावेळी नवऱ्याची मालमत्ता मानली जात होती अशा काळातल्या प्रेमाच्या, लग्नाच्या आणि पावित्र्याच्या कल्पनांना कवटाळून बसण्यापासून कोणाला सुख होणार आहे ?' [६]

सध्याच्या स्थितीत जुन्या, लग्नाच्या, प्रेमाच्या आणि पावित्र्याच्या कल्पनांना कवटाळून कोणाला सुख होणार नाही असे खांडेकर म्हणतात. असे गृहीत धरले तर, स्त्री पुरुषांना दिलेले किंवा मिळालेले हे 'स्वातंत्र्य' समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने योग्य ठरेल का ? 'स्त्रिया व पुरुष यांचे सर्व क्षेत्रात यापुढे निकट येणारे संबंध' अधिक निकट' आले तर आणखी वेगळ्या समस्या निर्माण होणार नाहीत का ? हे प्रश्नही विचारात घेतले पाहिजेत. आज 'जीवविज्ञानाच्या या विलक्षण प्रगतीमुळे जुनी नीतिमत्ता ढासळत आहे. नव्या पिढीची वाटचाल या नव्या जीवशास्त्रासच धरून आहे. अतिरिक्त स्वातंत्र्याची मागणी स्वैराचाराकडे, भोग प्रवृत्तीकडे वळत आहे. काल निषिद्ध असलेली बाब आज नीतीला अनुसरून ठरत आहे. सारा समाजच ढवळून निघत आहे. आर्थिक सुबत्तेस हातभार लावण्यासाठी उद्योगासाठी, व्यवसायासाठी स्त्री घराबाहेर पडली आहे. आधुनिक शिक्षणाने ती जागी झाली आहे. स्वतःच्या अस्तित्वाची व व्यक्तित्वाची तिला जाणीव झाली आहे. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याला ती उत्सुक आहे. घरच्या पुरुषाला खूष करण्यापेक्षा बाहेरच्या 'बॉस'ला खूष करणे तिला कधी अगत्याचे, कधी हवेसे वाटते.' [७] अशा स्थितीत जुन्या 'पावित्र्याच्या' कल्पनांना मूठमाती देणें योग्य ठरेल असे वाटत नाही. मला वाटते, खांडेकरांनाही ते चालणार नाही. 'अर्थ' आणि 'काम' या मोठे प्रेरक पण अंध असणाऱ्या पुरुषार्थाचा लगाम 'धर्मा'च्या हाती ठेवणे आवश्यक आहे असेच खांडेकरांनाही वाटते. 'क्रौंचवधा'च्या प्रस्तावनेत 'समाजातल्या ज्या वर्गात कामविषयक संयम अधिक असतो तोच वर्ग अधिक कर्तृत्व प्रकट करू शकतो व समाजाचे पुढारीपण मिळवतो.' [८] हे डॉ. अनविन्‌चे वाक्य सांगून त्यांनी संयमाचे महत्त्वच प्रतिपादन केले आहे.

आज कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या साऱ्याच स्त्रिया या 'वाममार्गी' बनतील किंवा त्या तशा आहेत असे प्रतिपादण्याचा येथे हेतू नाहीं; पण लग्न, प्रेम, पावित्र्य' यांच्या कल्पना झुगारून दिल्या गेल्या तर आजच्या काळात, व्यक्ति स्वातंत्र्य, अनिर्बंध भोगलालसा. जीवशास्त्राची प्रगती यातून नैतिक अराजक निर्माण झाल्याशिवाय रहाणार नाही. 'काम तृप्ती ही एक स्त्री व एक पुरुष यांच्या इच्छेची गोष्ट आहे असे प्रतिपादन करणारे याहूनही फार मोठ्या अशा

नव्या विकृती उत्पन्न करीत आहेत.'[९] असे खांडेकरांचे मत असल्याने 'नवी नीती' दृढमूल होत असताना या समस्यांचाही विचार डोळ्यासमोर असावयास हवा. स्त्री–पुरुष यांच्या समान हक्काच्या मागणीतून स्वैरता येणारच नाही असे नाही. खांडेकर या संबंधी लिहितात, 'स्त्री पुरुषाच्या सर्व व्यावहारिक हक्कात समता अवश्य हवी. पण समता म्हणजे स्वैरता नव्हे. समतेचा जन्म विरोधातून होत असला तरी सहकार्य हेच तिचे जीवन आहे. ही भूमिका सोडून कुठल्यातरी वैयक्तिक पुरुषाच्या भ्रामक कल्पनेच्या मागे स्त्रिया धावत सुटतील तर त्या निव्वळ पुरुषी होतील. आपले स्त्री मन गमावून त्या स्वतःलाच नव्हे तर समाजाला दुःखाच्या गर्तेत लोटतील.'[१०]

## नव्या नीतीची सामाजिक पाहाणी

'नवी नीती' अवलंबिली आणि त्यातून स्वैरता आली तर नैतिक अराजक निर्माण होईल. ते चांगले का वाईट हा भाग अगदी वेगळा आहे 'या मुक्ताचाराचा परिणाम काय आहे ? धर्म परंपरा संपली, नीति व्यवहार बुडाला, कुटुंबसंस्था नष्ट झाली, दांपत्यप्रेम, अपत्यवात्सल्य, घरची रीत इत्यादींचा ऱ्हास होईल की काय ? या प्रश्नांची चर्चा जाणते करतील. परंतु या नैतिक स्वैराचाराचा निष्कर्ष डॉक्टरांनी पहाणी करून काय काढला आहे ? १८ जून १९६८ च्या वॉलस्ट्रीट जर्नलने म्हटले आहे, ' गनोरियाची लागण अमेरिकेत फार झपाट्याने होत आहे. सर्व वयांच्या, व्यवसायांच्या, उत्पन्नांच्या लोकांत हा रोग बळावत आहे. कोवळ्या वयातील स्वैराचार हे याचे एक प्रमुख कारण होय. आता तर पेनिसिलीनचाही उपयोग यावर होत नाही.' डॉ. इमॅन्युएल स्नेलसारख्या तज्ज्ञाने म्हटले आहे, ' अमेरिकेत व सबंध पश्चिमेकडील जगात गुप्त रोग अटोक्यात आणणे अशक्यप्राय झाले आहे.' लहान वयातील कौमार्यभंग व स्वैराचार यांनी इंद्रियांचा कॅन्सर मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. २१ ऑक्टोबर १९६८ च्या 'न्यूजवीक' प्रमाणे दरवर्षी ४०,००० स्त्रियांना हा रोग होतो. गेल्या दहा वर्षात एकट्या न्यूयॉर्कमध्ये लैंगिक रोगी ५०० टक्क्यांनी वाढले.–'

विवाहबाह्य संततीची संख्याही वाढत आहे. अमेरिकेत ही संख्या दर वर्षी सर्वसाधारणपणे तीन लाखांची आहे ! एकूण १४ बालकांतील १ बालक या प्रकारचे असते. विवाहापूर्वी मातृत्व आलेल्या ४४ टक्के मुलींचे वय वीसपेक्षा कमी असलेले दिसून आले आहे. विवाहपूर्व संबंधातून जन्मास आलेली बालकांची संख्या न्यूयॉर्कमध्ये सहात एक, ब्रिटनमध्ये तेरात एक, ऑस्ट्रेलियात बारात एक, न्यूझीलंडमध्ये आठात एक, आणि रशियात ? स्वैराचारापासून अलिप्त असल्याचा समज असणाऱ्या या देशात हे प्रमाण चौदात एक असे आहे ! स्वीडनमध्ये लग्नापूर्वीच यौवनाचा अनुभव घेणाऱ्या युवतींची संख्या ९५ टक्के आहे ! आपल्या देशात अशी आकडेवारी सुलभपणे मिळण्यासारखी नाही.

या मुक्त स्वैराचारामुळे मनावर अतिशय ताण पडतो, कामात लक्ष लागत नाही, नाना प्रकारच्या मानसिक व्याधी जडतात. पॅरिसमधील डॉ. पॉल म्हणतात, 'विवाहबाह्य संबंधातून निपजलेली प्रजा अधिक अपघात करते. आजारी पडते. मानसिक असमतोल त्यांच्यात अधिक असतो.' या मुक्त स्वैराचाराने अमेरिकेची अवनती होत चालली आहे असे ८० टक्के लोकांचे मत बनले आहे. धार्मिक भावनांचा प्रभाव कमी होत गेला, नीतीचे आदर्श उरले नाहीत, भौतिक सुखांच्या मागे आपली धाव वाढली, जुनी परंपरा संपली आणि आपण आपले स्वास्थ्य गमावून बसलो आहोत, असाच समज जगातील विचारवंतांचा आज आहे. वैफल्य, एकाकीपणा, गुप्तरोग, मानसिक विकृती, उद्ध्वस्त होत रहाणारी कुटुंबसंस्था, विवाह संस्थेचा मोड, मातृत्वाचा ऱ्हास, वात्सल्याचा नाश ही सारी प्राप्ती आहे नैतिक अराजकतेची; 'संगमसुख भलत्याला' या सार्वत्रिक होत जाणाऱ्या वृत्तीची !"[११]

नैतिक स्वैराचाराद्री, येऊ घातलेल्या 'नव्या नीती'ची ही डॉक्टरकृत फलश्रुती आहे !

हे निष्कर्ष काहीही असले तरी आजची विद्याविभूषित स्त्री घराच्या चार भिंतीच्या आत राहू शकणार नाही हेही तितकेच खरे आहे.

## जागृत झालेली स्त्री ! – पण कोणती ?

'आमची सुंदर सनातन कुटुंबसंस्था म्हणून जुन्या कुटुंबपद्धतीचे आणि तिच्या चार भिंतीतं कोंडल्या गेलेल्या स्त्री–जीवनाचे गोडवे गाणारे लोक अजूनही आपल्या समाजात आढळतात……त्या कुटुंबपद्धतीचे आयुष्य संपुष्टात आले आहे. आजच्या सुशिक्षित स्त्रीचा परलोकावर काडीइतकाही विश्वास उरला नाही, कर्तव्या इतकेच आपल्याला हक्कही आहेत याची जाणीव तिला अत्यंत तीव्रतेने झाली आहे हे त्यांनी विसरू नये. जागृत झालेले राष्ट्र ज्याप्रमाणे पारतंत्र्याचे जू झुगारून देताना प्राणाचीही पर्वा करीत नाही, त्या प्रमाणे जागृत झालेली स्त्री ही स्वतंत्र होताना जे कष्ट पडतील त्यांना तोंड द्यायला यापुढे कचरणार नाही. धर्म, रूढी, निसर्ग, कायदे आणि पुरुषांचे मन इतक्यांच्या एकवटलेल्या विरोधाशी तिला झुंज द्यायची आहे. दयेने प्रेरित झाल्यामुळे असो, प्रेमाने मोहून गेल्यामुळे असो, अथवा स्वार्थाने अंध झाल्यामुळे असो पुरुषाने स्त्रीला घराबाहेर पडू दिले नाही. कुटुंबासाठी जगणे हेच गीता सांगणाऱ्या कृष्णापासून गीतारहस्य लिहिणाऱ्या लोकमान्यांच्या काळात तिचे ध्येय मानण्यात आले.'[१२] परंतु, आजच्या काळात केवळ 'घर' हे तिचे कार्यक्षेत्र आहे असे तिला वाटत नाही. ती घरात कोंडून राहू इच्छित नाही तर समाजासाठी सुद्धा आपण जगलं पाहिजे असे तिला वाटू लागले आहे.

व्यक्तित्त्वाच्या विकासाची संधी आज प्रत्येकाला मिळाली पाहिजे. व्यक्तिविकासाने जाणिवांच्या कक्षा विस्तारतात. कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढते. नव्या स्त्रीच्या बाबतीतही ते अपरिहार्य आहे. म्हणूनच आपण समाजासाठी जगले पाहिजे असे तिला वाटते. 'कौटुंबिक कर्तव्या इतकीच, किंबहुना त्यापेक्षाही अधिक, सामाजिक कर्तव्ये मानवी जीवनात असतात त्यांची जाणीव तिला पुरेपूर झाली आहे. निव्वळ कुटुंबासाठी ती आता जगू इच्छित नाही. कुटुंबाइतकीच ती स्वत:साठी जगू इच्छिते. स्वतःइतकीच ती समाजासाठी जगण्याची नवी महत्त्वाकांक्षाही मनात फुलवीत आहे.'[१३]

आजची 'जागृत झालेली स्त्री' स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करीत आहे; यासाठी वाटेल त्या विरोधाला तोंड द्यायची तिची तयारी आहे. ती आता घरात कोंडून राहाणार नाही. असे खांडेकर येथे प्रतिपादन करतात. तर पांढरपेशा समाजतली कोणतीही स्त्री कोणत्याही कारणासाठी गृहत्याग करू शकणार नाही. असेही ते सांगतात.

'पांढरपेशा समाजातली कुठलीही स्त्री सहसहा गृहत्याग करू शकत नाहीं. कोंडलेली मांजरी आपल्याला छळणाऱ्याच्या नरडयावर एक वेळ उडी मारील. पण चोहींकडून कोंडमारा झालेली मध्यम वर्गातली स्त्री ? ती फक्त रडेल, तडफडेल ! अशा स्त्रीला स्वावलंबी होणे पूर्वीपेक्षा आता जास्त शक्य झाले आहे; हे खरे, पण केवळ स्वावलंबनाने स्त्रीचे जीवन पूर्ण होऊ शकत नाही. तिला स्वातंत्र्याइतकेच किंबहुना स्वातंत्र्याहूनही अधिक आकर्षण दोन गोष्टींबद्दल वाटते. प्रीती आणि वात्सल्य या त्या दोन भावना ! या दोन्ही भावनांची तृप्ती घरातच होण्याची शक्यता असते. अशा घराकडे पाठ फिरविणे–आपला पती सामाजिक दृष्टया गुन्हेगार आहे. या जाणिवेने आलेला अस्वस्थपणा दूर करण्याकरिता आयुष्यातल्या सर्व सुखांवर पाणी सोडायला तयार होणे–ही काही साधी गोष्ट नाही–सामान्य स्त्रीच्या हातून ती होणार नाही.'[१४]

खांडेकरांनी या ठिकाणी मांडलेले मतच अधिक हितावह आहे. स्त्री स्वातंत्र्यांच्या आणि समान हक्कांच्या भोंगळ कल्पना आमच्याकडे सध्या ठिकठिकाणी दिसून येतात. 'जे जे पुरुष करतो ते ते स्त्रीने केले पाहिजे, त्याच्यापेक्षा आपण कोणत्याही दृष्टीने कमी नाही. हे तिने सदैव सिद्ध करीत राहिले पाहिजे, अशा प्रकारच्या अट्टाहासाला समता मानण्याची प्रवृत्ती आपल्यात अद्यापिही ठिकठिकाणी आढळत आहे. पण समतेची ही विकृत कल्पना मला मान्य नाही.–'[१५] म्हणूनच स्त्रीने घर सोडण्याची आवश्यकता नाही. किंबहुना आकाशात हिंडणाऱ्या घारीचे लक्ष जसे आपल्या पिलाकडे, आपल्या 'घरा' कडे असते तसेच नव्या स्त्रीचेही असले पाहिजे. तेथेच तिला परिपूर्तीचा आनंदही मिळेल.

## घराचा केंद्रबिंदू कोण ?

आपल्याकडे निर्माण झालेले 'घर' हे जुने आहे. या घरातली स्त्री 'कुटुंबाचा आधार आहे. तिच्यामुळे घर उभे रहाते. आणि घर म्हणजे तरी काय ? एकटचा पुरुषामुळे घर होत नाही, एकटचा स्त्रीमुळे घर होत नाही, दोहोंच्यामुळेही होत नाही. घर होते पति-पत्नी व मुलेबाळे यांच्या एकत्र मेळाव्यामुळे. कुटुंबवत्सल मनुष्य झाडाखाली राहत असला तरी तेच त्याचे घर असे शास्त्रकारांनी मानले आहे.'[१६] हे ध्यानात घ्यायला हवे. कुटुंबाचा केंद्रबिंदू पतीही नाही. पत्नीही नाही. त्यांच्या सहजीवनातून निर्माण होणारे मूल, हा कुटुंबाचा केंद्रबिंदू आहे. हे लक्षात घेतले म्हणजे 'स्वातंत्र्या'च्या कल्पनांना 'संयमाचे' बंधन आपोआप येईल. स्त्री कितीही शिकली. ती कितीही ज्ञानसंपन्न, कीर्तीसंपन्नाची पत्नी असली तरी तिच्या जीवनाची परीपूर्ती ही 'माता' होण्यात आहे. असे इरावतीबाई कर्वेही आपल्या 'परिपूर्ती' या लेखात प्रतिपादन करतात. स्त्रीला घर सोडणे शक्य नाही त्याची आवश्यकताही नाही. अशा 'घरातही' तिला जीवन परिपूर्ततेचे समाधान मिळू शकेल. आणि स्वातंत्र्यासाठी तिला घर सोडलेच पाहिजे असे नाही. ती घरातही स्वतंत्र असू शकते. असे खांडेकरांना वाटते.

## स्त्री घरात स्वतंत्र की कार्यालयात ?

एका दृष्टीने विचार केला तर स्त्री आपल्या घरात स्वतंत्रच असते. 'सामान्य स्त्री आपल्या अगदी लहानशा का होईना घरकुलाची मालकीण असते. तिथे ती राणीचा अधिकार बिनदिक्कत गाजवू शकते......स्त्रीचे जग कितीही लहान असले, तरी ते तिच्या मालकीचे जग असते. त्या चिमण्या जगात ती मन मानेल तसा बदल घडवून आणू शकते...... सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्री आपल्या घरकुलात जे काम करीत असते, त्याचा अगदी थोडचा अंशाने का होईना तिच्या वैयक्तिक भावनांशी आणि निर्मितीच्या हौसेशी संबंध असतो.'[१७] घरामधेही तिला स्वतःचे वैशिष्टय दाखविता येते. या दृष्टीने ती घरामधे तशी स्वतंत्रच आहे.

आपल्या आवडी निवडीनुसार आपल्या कल्पनेने ती गृहकृत्य करण्यात आनंदी होते याचे कारण तिच्या नैसर्गिक भावनांत आहे. स्त्री-मनाचा विकास हा वेगळचा पद्धतीने होत असतो. ते मन निसर्गतःच पुरुष मनापेक्षा वेगळे असते.

## स्त्री मनाची घडण वेगळी असते

स्त्री मनाचा विकास पुरुषाच्या मनाच्या पद्धतीने होत नसतो. त्यात भिन्नता असते आणि तो विकास तसाच होणे आवश्यक आहे. 'बुद्धीत स्त्री पुरुषाची सहीसही बरोबरी करील. पण तिच्या भावना पुरुषापेक्षा नेहमीच थोडयाफार निरनिराळचा राहातील. निसर्गानेच तिला तशी घडविली आहे. यात तिचा कमी-

पणा मुळीच नाही. असला तर थोडा मोठेपणाच आहे. प्रीती आणि वात्सल्य यांना पुरुषाच्या आयुष्यात सुद्धा महत्त्वाचे स्थान आहे हे खरे. पण स्त्रीच्या जीवनाइतक्या पुरुषजीवनाला या भावना व्यापून टाकीत नाहीत. पुरुषमन पराक्रमावर दीर्घकाळ संतुष्ट राहू शकते. पण सर्व सामान्य स्त्री मनाचे समाधान केवळ पराक्रमाने होत नाही. पराक्रमात अनेकदा दुसऱ्यावर आक्रमण करण्याचा भाग येतो. कला निर्मिती, शास्त्र संशोधन, मानवसेवा वगैरे पराक्रमाचे काही उच्च आणि निरपेक्ष प्रकार आहेत हे खरे; पण या प्रकारात यश मिळविणारे पुरुष व्यवहारात यशस्वी ठरणाऱ्या पुरुषापेक्षा निराळ्या प्रवृत्तीचे असतात. त्यांच्या मनाचे स्त्री मनाशीच अधिक साम्य असते... परंतु सर्वसामान्य पुरुषाची प्रवृत्ती मात्र अशी त्यागी अथवा भावनिष्ठ नसते. सत्ता, कीर्ती संपत्ती यांच्यामागे तो धावात असतो.' [१८] स्त्री ही अधिक भावनाशील असते. 'भक्ती, त्याग वात्सल्य हे गुण स्त्रीला कोणी शिकवावे लागत नाहीत. ते तिच्या रक्तात सदैव नाचत असतात.' स्त्रीमन हे असे आहे.

साहजिकच, 'उद्याच्या नव्या जगात सुख आणि शांतता ह्याची गरज असेल तर मानव जातीच्या बुद्धिइतकाच तिच्या हृदयाचा विकास व्हायला हवा. तो विकास पुरुषांपेक्षा स्त्रियाच अधिक सत्वर आणि अधिक सुंदर रीतीने करू शकतील.' [१९] भाऊसाहेबांना अशी खात्री असल्यामुळे, असा विश्वास असल्यामुळेच त्यांनी उद्याच्या स्त्रीवर फार मोठी जबाबदारी सोपवली आहे. उद्याच्या कर्तृत्वसंपन्न, सुशील, भावनाशील, नेत्या स्त्रीचे चिंतन भाऊसाहेबांनी अत्यंत हृदयंगम केलेले आहे.

**उद्याची स्त्री**

शिक्षणाने संस्कारित झालेली उद्याची स्त्री ही अधिक कर्तृत्वसंपन्न, असेल. तीच समाजाचे नेतृत्व करू शकेल. तिचे वात्सल्य, प्रीती ही मानवताधर्म निर्माण करील, सामाजिक पावित्र्य तिच्यामुळेच सांभाळले जाईल असे भाऊसाहेबांना वाटते.

आजपर्यंत घरकुलात असणारी स्त्री आपल्या सुखदुःखांचा गोफ प्रीती आणि वात्सल्याने गुंफत होती. 'वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवनात तिची सारी सुखे प्रीती व वात्सल्य यांच्या विकासावर अवलंबून असतात; याच भावनांनी तिचे जीवन घडविले जाते. त्या सहजासहजी तिला दूर फेकून देता येत नाहीत. निसर्गाशी वैर करणे इतके सोपे नसते. साहजिकच बुद्धिमान व संयमी स्त्रीचा सामाजिक व्यवहाराशी संबंध आला की ती याच भावनांनी विकसित झालेल्या दृष्टीने जगाकडे पाहू शकेल..तिचे शरीर व त्याबरोबरच तिचे मन यांचे मुख्य कार्य वात्सल्याचा आविष्कार करणे हे आहे – मग ते वात्सल्य चार भिंतीच्या आत प्रकट होवो वा त्या भिंतीबाहेरच्या विशाल जगात व्यग्र होवो ! जिथे वात्सल्य जिवंत असते तेथे मानवताधर्माच्या कल्पना सुस्पष्ट होत जातात. अशा मनाला पाप–पुण्याची जाणीवही तीव्रतेने होते. समाजात हजारो लोक एखादी गोष्ट करतात म्हणून ती तत्त्वतः गलिच्छ नाही असे या मनाला कधीच वाटणार नाही. ज्या विशिष्ट भावनेने स्त्री प्राचीन काळापासून आपल्या शरीराच्या पावित्र्याला जपत आली

आहे. त्याच भावनेने या पुढे ती सामाजिक पावित्र्याला जपण्याचा प्रयत्न करील.'[२०]

सध्याची स्त्री सामाजिक पावित्र्याला जपण्याचा प्रयत्न करील त्याचप्रमाणे तिचे नेतृत्वही प्रभावी ठरण्याची शक्यता आहे.

आज साऱ्या जीवनातच बदल होत आहे. ते झपाट्याने बदलत आहे. सद्यस्थितीत काही रचनात्मक कार्याची आवश्यकता आहे पण असे रचनात्मक कार्य, त्याचे नेतृत्व स्त्रीच अधिक चांगल्या तऱ्हेने करील असे खांडेकर म्हणतात. ' या नव्या जीवन क्रांतीत पुरुषापेक्षा स्त्रीचे नेतृत्वच अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता आहे. पुरुष शूर आहे. पण कुठलीही नवी सृष्टी निव्वळ शौर्यातून आणि पांडित्यातून निर्माण होत नाही. ती त्यागातून आणि बुद्धिनिष्ठ भावनातूनच उगम पावते.'[२१] स्त्रीच्या ठिकाणी या भावना अधिक प्रभावी असल्याने तीच नवसृष्टी निर्माण करू शकेल. या नव सृष्टीत तिच्या नैसर्गिक भावनांचाही आविष्कार होऊ शकेल. तिचा मातृधर्म हा विशाल होईल. ती जगन्माता बनेल.

' सर्व धर्मात मातृधर्म श्रेष्ठ हे खोटे नाही. मग उद्याच्या स्त्रीला आपल्या अपत्यांची मर्यादा असलेला संकुचित मातृधर्म पाळून चालणार नाही. नवा विशाल मातृधर्म तिला आवाहन देत आहे. साऱ्या जगातील अनाथ नि अपंग लेकरांनी फोडलेला टाहो तिच्या कानावर पडत आहे. ढोंगी मुत्सद्द्यांच्या आणि पाशवी वीरांच्या पायाखाली चिरडली जाणारी मानवता आर्तस्वराने तिला हाक मारीत आहे. प्रेम, दया, वात्सल्य यांचे जगात क्षीण होत चाललेले आवाज तिला बोलावीत आहेत. हे सर्व करूण स्वर ऐकूनही उद्याची स्त्री आपल्या घरकुलात आपल्याच पिल्लांच्या किलबिलीत रमून जाईल असे कोण म्हणेल ? मातृधर्मापेक्षा श्रेष्ठ अशा मानवधर्माचे परिपालन करण्याकरता ती पुढे सरसावेल ! एक दिवस – तो दिवस लवकर उगवेल का ? ती जगन्माता होईल.'[२२]

खांडेकरांनी उद्याच्या स्त्रीचे चित्र हे असे उदात्त आणि विशाल रंगवून ' स्त्री 'विषयक चिंतनाला भरपूर खोली दिली आहे यात शंकाच नाही. स्त्री जीवनाच्या विविध पैलूंचे चित्रण करून स्त्री-जीवनाच्या विविध समस्यांवर चिंतन करून उद्याच्यां आदर्श स्त्रीचे उदात्त चित्र निर्माण केले असले तरी त्यांच्या या चिंतनाच्या मर्यादाही सहज ध्यानात येतात.

## खांडेकरांच्या चिंतनाच्या मर्यादा

खांडेकरांनी स्त्री-जीवनाच्या विविध पैलूंचे चिंतन केले आहे. तिच्या नैसर्गिक भावना, विवाह, मातृत्व, सांसारिक वादळे, स्त्री स्वातंत्र्य नवी स्त्री इत्यादि विविध पैलू त्यांच्या चिंतनाचे ,विषय बनले आहेत; आणि त्यांनी या सर्व

गोष्टींचा सखोलतेने विचार करून 'स्त्री ही जगन्माता व्हायला हवी' या उदात्त आणि विशाल विचारापर्यंत त्याची मर्यादा पोहचविली आहे. तथापि, बारकाईने विचार केला तर यात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे हे चिंतन समाजाच्या एकाच स्तरापुरते मर्यादित आहे. 'मध्यम वर्ग' हाच या सर्व चिंतनाचा केंद्र बिंदू आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. मध्यम वर्गातील स्त्री–जीवन हा समाजातल्या स्त्री जीवनाचा एक भाग आहे. कदाचित तो महत्त्वाचाही असेल पण म्हणून एकमेव म्हणता येणार नाही. या पेक्षा कितीतरी वेगळ्या प्रकारचे जीवन जगणाऱ्या स्त्रिया समाजात आहेत त्यांचेही प्रश्न तितकेच महत्त्वाचे आहेत, तथापि खांडेकरांच्या साहित्यात त्याचे चिंतन दिसत नाही म्हणूनच हे चिंतन सखोल असले तरी एकांगी आहे असे म्हणावे लागते.

खांडेकरांना गरिबांच्याबद्दल कळवळा, सहानुभूती आहे, त्यांचा उद्धार व्हावा आणि त्यातून त्यांचा उत्कर्ष व्हावा असे त्यांना मनापासून वाटते. किंबहुना, शिरोड्यात दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाजाच्या कणवेनेच त्यांना अंतर्मुख बनविले आणि लेखनाला प्रवृत्त केले असे भाऊसाहेब म्हणतात; पण त्यांचे प्रश्न प्रामुख्याने त्यांनी हाताळलेले दिसत नाहीत. शेतकरी स्त्रिया, शेतावर मजुरी करून कुटुंबाचा भार आपल्या शिरावर घेणाऱ्या स्त्रिया, कुणबी, ठाकर, कातकरी जमातीतील स्त्रिया कितीतरी भयानक आयुष्य जगत असतात. त्यातील काहींना दारुड्या नवऱ्याच्या व्यसनाला, त्याने विनाकारण केलेल्या मारहाणीला, काहींना भोवतालच्या 'पुरुषां'च्या विखारी नजरेला तोंड द्यावे लागते. काहींच्या बाबतीत घरधनी मुंबईसारख्या शहरी कामासाठी गेलेला असतो आणि त्यांना वर्षातले काही दिवस सोडले तर, वर्षानुवर्षे एकाकीपणात सारे दिवस अन् 'रात्रीही' 'आढ्याचे वासे मोजीत काढाव्या लागतात.–'[२३] या आणि या सारख्या कितीतरी प्रश्नाने खेडेगावातील या स्त्रियांचे आयुष्य अंधाराने व्यापले आहे. या समस्यांची दखल खांडेकरांनी घेतलेली दिसत नाही. कादंबरीत, कथेत यातले एखादे पात्र आले असले तरी ते या दुःखांना वाचा फोडायला अपुरे पडते असेच म्हटले पाहिजे.

## आणखीही काहीं 'उपेक्षितांच्या अंतरंगाला' साद नाहीं

समाजात उपरोक्त स्त्रियांच्या व्यतिरिक्त अन्यही स्त्रिया आहेत. समाज त्यांची उपेक्षा करतो. त्यांना सामाजिक प्रतिष्ठा तर मुळीच नाही. संभावित समाज त्यांना झुरळासारखे झटकून टाकतो. त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोनच मुळी अगदी वेगळा असतो; पण त्यांची म्हणूनही काही दुःखे असतील. काही यातना असतील. समाज सुसंस्कृत, प्रगतीशील बनवायचा असेल तर त्यांच्या समस्यांना स्पर्शकरणे आणि त्यावरही चिंतन होणे आवश्यक आहे.

देवदासींची प्रथा फार पूर्वीपासून होती. आजही आहे. वेश्या व्यवसायही फार पूर्वीपासून चालत आला आहे. या स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा कधीच लाभली नाही. लाभणार नाही. पूर्वी कदाचित धर्मबंधनाने बांधले गेलेले पुरुष हे अशा स्त्रियांच्याकडे कमी प्रमाणात जात असतील किंवा दिवसा ‘ प्रतिष्ठित ’ म्हणून मिरवणारे हे लोक त्यांच्याकडे ‘ अंधारात ’ जात असतील पण म्हणून या स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या यातना कमी असतील. किंवा ‘ त्यांचे जिणे चांगले होते ’ असे कधीच म्हणता येणार नाही. ‘ पेजेला देणार तो शेजेला घेणार ’ असेच जर त्यांचे जीवन व्यतीत होत असेल तर त्यांच्या अंतर्मनाच्या व्यथाही चिंतनाचा विषय बनणे आवश्यक होते. त्यांच्याच जोडीला तमाशातील नर्तिका ! आजकाल तमाशाप्रधान चित्रपटातून किंवा काही नाटकातून त्यांची दुःखे रेखाटलेली आढळतात पण खांडेकरांचे लक्ष या दुःखांच्याकडे गेलेले आढ़ळत नाही.

## स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीजीवन समस्या

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सारेच ‘ स्वतंत्र ’ झाले. हे ‘ स्वातंत्र्य ’ खेडोपाडी फारच जोपासले गेले, आणि आर्थिक टंचाईला तोंड देण्यासाठी, कुटुंब सावरण्यासाठी घराबाहेर पडून खेडेगावात गेलेल्या सुशिक्षित अथवा अशिक्षित स्त्रीला हे स्वातंत्र्य भयानक क्लेशकारक ठरू लागले. आज खेडेगावात परिचारिका, ग्राम सेविका, शिक्षिका अशा व्यवसायानिमित्त अनेक स्त्रियांना जावे लागते. पण या स्त्रिया खेडेगावात सुरक्षित रहातील याची खात्री देता येईल का ? आज कालच्या वेगवेगळ्या संस्था, समित्यांचे अध्यक्ष, त्यांचे सभासद, गावातील पोसलेले गुंड, यांच्या हातात त्या केंव्हा सापडतील हे सांगता येईल का ? त्यांना भोगाव्या लागणाऱ्या वेदना या अधिक तीव्रतर होत आहेत. जोपर्यंत स्त्रीकडे ‘ मादी ’ म्हणूनच पाहिले जाणार आहे तोपर्यंत त्या अशाच वाढणार आहेत. या मुक्या मनांच्या मुक्या वेदना खांडेकरांच्या चिंतनात कोठेही शब्दांकित झालेल्या नाहीत.

हे प्रश्न फक्त खेडेगावातच आहेत असे समजण्याचे कारण नाही. शहरातही ऑफिसे, कारखाने, खाजगी नोकऱ्या अशा अनेक ठिकाणच्या स्त्रियांना त्यांच्या अधिकाऱ्यांच्या वासनेला बळी पडावे लागते. यावर मागे मासिकात चर्चाही झाली होती. त्यांत अनेक स्त्रियांनी ‘ नोकरी करायची तर हे सोसले पाहिजे ’ असे अगतिक आणि हताश उद्‌गार काढले होते. (स्त्री–जीवनाच्या व्यथा हंस दिवाळी अंक १९७५ ) हे अगतिक, हताश उद्‌गारच त्यांची दुःखे बोलकी करीत नाहीत का ? त्यांची शल्ये सांगत नाहीत का ? स्वातंत्र्योत्तर काळातच या समस्या वाढल्या आहेत. दिवसेंदिवस वाढत आहेत.

याशिवाय कॉलेज कन्यकांचे प्रश्न, सुशिक्षित स्त्रियांना बुद्धिपुरस्सर वेश्या व्यवसायाला लावणे आणि भरपूर पैसा मिळवण्याचे एक साधन म्हणून त्यांनीही ते स्वखुशीने स्वीकारणे, श्रीमंत ' उच्चभ्रु ' स्त्रियांची आपल्या वासना पूर्तीसाठी परपुरुषांना पैसे देऊन त्यांची शय्या सोबत करणे, कुमारी मातांचा प्रश्न, अशा एक ना अनेक किती तरी भयानक स्त्री जीवन समस्यांना स्वातंत्र्योत्तर काळात जन्म मिळाला आहे. त्या जोपासल्या जात आहेत. त्यांवर चिंतन आणि त्या कमी कशा होतील, यावर विचार करणे आवश्यक आहे. ' ययाती ' त मानव हा सुखलोलूप झाला आहे. ' भोग आणखी भोग ' हे त्याच्या जीवनाचे सूत्र झाले आहे. हा विचार त्यांनी मांडला आहे. पण ' अर्थ ' आणि ' काम ' ह्या बोकाळलेल्या पुरुषार्थांच्या ' पराक्रमाला ' हे एवढे पैलू असतील याची कल्पना ' ययाति ' कादंबरी अथवा तिची पार्श्वभूमी वाचून निश्चितच येत नाही.

खांडेकरांनी कोणकोणत्या स्त्री–जीवन समस्यांचे चित्रण केले नाही याची यादी खूप वाढविता येईल. अर्थात, लेखकाने ' अमुक एक चिंतन का केले नाही ?' असे त्याला विचारता येणार नाही. ते योग्यही होणार नाही. त्यांनी ज्या मध्यम वर्गीय स्त्री जीवनाचे चिंतन केले आहे. ते सखोल, मार्मिक केले आहे. हे सुरुवातीलाच नमूद केलेच आहे. पण ते समाजाचे संपूर्ण चित्र नसल्याने, त्यांनी ज्या समस्यांना स्पर्श केला नाही त्यांचे स्वरूप स्पष्ट होण्याच्या दृष्टीने काही समस्यांचे दिगदर्शन केले आहे.

## मध्यमवर्गीय स्त्री-जीवन हाताळण्याची कारणे

खांडेकरांनी मध्यमवर्गीय स्त्री–जीवनावर चिंतन केले याचे कारण, एक तर असे असावे की, मध्यमवर्ग हा समाजाचा कणा आहे. असे भाऊसाहेबांना वाटते. यानेच संस्कृती संवर्धनाला पूर्वीपासून मदत केली आहे. असे त्यांचे मत आहे. तेव्हा या समाजातील स्त्रिया जर सुशिक्षित झाल्या, समाजासाठी घराबाहेर पडल्या आणि ' जगन्माता ' म्हणून त्यांनी समाजाकडे पाहिले तर त्यांच या दलित स्त्रियांचा उद्धार करू शकतील असे त्यांना वाटले असावे असे वाटते. म्हणून त्यांनी आपली दृष्टी या मध्यमवर्गीयांवरच केंद्रित केली असावी.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात खांडेकरांनी नवीन निर्माण झालेल्या समास्यावर विचार केला नाही किंवा त्या चित्रीत केल्या नाहीत यांचे आणखी एक कारण प्रा. म. ना. अदवंत यांनी दिले आहे. ते म्हणतात, ' त्यांचे सामाजिक मन जीवनातील प्रखर वास्तवाचे आव्हान स्वीकारू शकले नाही. ...' जीवनाकरिता कला ' या तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या खांडेकरांना स्वातंत्र्योत्तर काळातील खरे जीवन तितक्या तीव्रतेने आकलन होऊ शकले नाही.'[२४]

कारणे काहीही असोत. खांडेकरांनी जे स्त्री-जीवनाचे चिंतन केले आहे ते मध्यम वर्गीय स्त्रियांच्या पुरतेच मर्यादित असून, त्या कक्षेबाहेरच्या समस्या आणि स्वातंत्र्योत्तर काळातील नव्या स्त्री-जीवन समस्यावर त्यांनी चिंतन केले नाही. असेच म्हणावे लागेल.

२२८९५
निबंध २८७३

## संदर्भ-टीपा

१ जळलेला मोहोर पृ. ३३
२ खांडेकर व्यक्ती आणि साहित्य पृ. २६८
३ कल्पलता पृ. ८८, ८९
४ स्त्री जीवन व्यथा (लेख) डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे
५ स्त्री आणि पुरुष पृ. १२१
६ रंग आणि गंध पृ. ५१
७ संगम सुख भलत्याला (लेख) डॉ. प्र. न. जोशी पृ. १६८
८ क्रौंचवध पृ. २४
९ कित्ता- पृ. २४
१० स्त्री आणि पुरुष पृ. १९
११ संगम सुख भलत्याला (लेख) डॉ. प्र. न. जोशी पृ. १७२
१२ स्त्री आणि पुरुष पृ. १३
१३ कित्ता- पृ. १४
१४ कित्ता- पृ. १२८
१५ कित्ता- पृ. १३२
१६ संगम सुख भलत्याला (लेख) डॉ. प्र. न. जोशी पृ. १६५
१७ कल्पलता पृ. ६९, ७०
१८ स्त्री आणि पुरुष पृ. १३२
१९ कित्ता- पृ १९
२० कित्ता- पृ. १३३
२१ कित्ता- पृ. १२२
२२ कित्ता- पृ. १२१
२३ 'अंतरीचे बोल' - (लेख) केसरी दिवाळी अंक १९७५
२४ खांडेकर : व्यक्ती आणि साहित्य पृ. २७७

# ८

# कला आणि समाज–जीवन

## हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा

'कला आणि समाजजीवन' हा विषय अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. एके काळी 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' हा वाद महाराष्ट्रात गाजला होता. खांडेकरांचा पिंड ध्येयवादी ! समाजाच्या सुखदुःखांशी आपला काही संबंध नाही, अशी मनोवृत्ती त्यांचे ठिकाणी नाही. कलेने लोकमानसावर संस्कार होतात, त्यामुळे कलावंताला 'व्यापक जाणीव हवी'[१] असे त्यांना वाटते. त्यामुळे त्यांनी 'जीवनासाठी कला' या मताचाच हिरीरीने पुरस्कार केला' हे उघड आहे. 'कला व कलावंत' या विषयावर त्यांचे चिंतन शेकडो ठिकाणी प्रकट झाले आहे. त्याचा केवळ धावता परिचय करून घेणेच येथे शक्य आहे.

आता शिक्षणाचा प्रसार खूप झाला आहे. कवी कुसुमाग्रजांच्या शब्दांत सांगायचे झाले तर 'बहुवर्णातून सरस्वतीची पालखी फिरते आहे.' शिक्षणाचा संस्कार होताच लेखक, कवी, नाटककार यांचे भरपूर पीक आले आहे. लिहायला येते तो लेखक, अशी जणू व्याख्या झाली आहे. त्याहीपेक्षा साहित्य, नाट्य, चित्रपट या कला समजल्या जात असल्याने लेखक व अभिनेते आपणांस 'कलावंत' म्हणवतात ! कलावंत स्वतःकडे, समाजाकडे व आपल्या कलेकडे काही वेगळ्या दृष्टीने पाहात असतो. जणू काही सामान्य, क्षुद्र समाजाच्या सुखदुःखांशी, त्यांच्या आकांक्षांशी त्यांचा काही संबंध नसतो. इतकेच काय 'कलावंताला' सर्व साधारण 'मनुष्य' या नात्याने किमान गुण असण्याचीही त्यांना आवश्यकता वाटत नाही.

कलावंत होणे इतके सोपे आहे काय ? कलेच्या क्षेत्रात वावरतो तो कलावंत की काय ? आजपर्यंत कोणीही ज्या गोष्टींचा विचार केला नाही, ती गोष्ट खांडेकर तळमळीने सांगतात–

## लेखकावर संस्कार आवश्यक

' समुद्राच्या शिंपल्यात मोती तयार व्हावे त्याप्रमाणे वाचन, मनन, आचरण इत्यादिकांच्या संस्काराचे संमिश्रण होऊन लेखकांचे व्यक्तिमत्व घडत असते. हे व्यक्तिमत्व जितके व्यापक व उदात्त असेल तितके··· वाङ्मय सखोल, सहानुभूतीपूर्ण व सुंदर होते. कलादृष्टचा व्यक्तित्व अस्फुट ठेवणे निराळे व मुळीच व्यक्तिमत्व नसणे निराळे !' [२]

पण हा विचार कोण करीत आहे ? आपण सुशिक्षित झालो असू पण सुसंस्कृत झालो आहेत काय ? असा कोणी लेखक स्वतःच्या मनाला चुकून तरी सवाल करतो काय ?' ' उचलली लेखणी लावली कागदाला !' अशी सध्याच्या लेखकांची स्थिती नाही काय ? खांडेकर आग्रहपूर्वक सांगतात की, 'कलावंत साहित्यिकाने विचारवंत झाले पाहिजे असाच आजचा काळ आहे !' [३] लेखकाने स्वतःचे व्यक्तिमत्व श्रेष्ठ दर्जाचे घडवले नसेल तर तो लिहिणार काय !

साहित्य हे समाजाचे चित्रण आहे व चिंतनही आहे. पण हे चित्रण करणाऱ्या कोणत्या लेखकाचे ते दर्शन आहे ? भिकारड्या, वासनात वळवळणाऱ्या क्षुद्र व्यक्तीने घेतलेले समाजदर्शन व केलेले समाजचित्रण हे ' कला पदवीला पोहोचू शकेल काय ? कलावंत होण्यासाठी काही तपस्या, काही साधना लागते की नाही ?

' लघुकथेचे बहिरंग निर्दोष कसे करावे, हे होतकरू लेखकांना कळू शकेल. पण तिच्या आत्म्याचा विकास लेखकाच्या सर्वस्पर्शी व्यक्तित्वातून, त्याच्या काव्यात्मवृत्तीतून, सामान्य माणसांशी आणि सूक्ष्म सुखदुःखांशी समरस होण्याच्या त्याच्या सामर्थ्यातून, प्रकृतिधर्माशी सुसंगत अशा त्याच्या उत्कट जीवनाविषयक दृष्टिकोनातून होतो.' [४]

याचा अर्थ असा की, लेखकाला केवळ तंत्र माहीत असून उपयोगी नाही, तो संवेदनाशील असला पाहिजे व त्याचे काही जीवनविषयक तत्त्वज्ञान असले पाहिजे ! ' आजच्या जगात कलेला खऱ्याखुऱ्या जीवनाची–जीवनविषयक तत्त्वज्ञानाची–जोड अवश्य हवी !' [५] असा खांडेकरांचा आग्रह आहे.

–खांडेकर ' जीवन–विषयक तत्त्वज्ञानावर ' आवर्जून पुनः पुन्हा भर देतात–

'–अस्सल लघुकथा या सर्व पातळ्यांना स्वतःभोवती गिरक्या घेता घेता स्पर्श करते, पण तिचे नृत्य चालते ते मुख्यतः जीवनदर्शनाच्या पातळीवर !' [६]

'-समाजाच्या आत्मिक श्रद्धांशी आणि संस्कृतीच्या अंतरंगाशी ज्या गोष्टी सुसंगत नाहीत त्या केवळ कलेचा सुंदर जाळीदार बुरखा घेऊन आल्यामुळे स्वीकारणीय ठरतील, असे नाही. शतकानुशतके प्रिय आणि पूज्य मानली गेलेली मूल्ये केवळ कलेचे अनिर्बंध स्वातंत्र्य सिद्ध करण्याकरिता ज्यात पायदळी तुडविली जातात असे वाङ्मय समाजाला रूचणे व पचणे कठीण गेले तर त्यात नवल कसले ?' ७

परंतु आजच्या साहित्यिकांनी 'संस्कृती,' 'जीवन मूल्ये,' 'परंपरा' आदि कल्पना केव्हाच चोळामोळा करून केराच्या टोपलीत टाकल्या आहेत. ते लिहिता येते म्हणून लिहितात. साहित्याचा समाजावर परिणाम होतो, हेच त्यांना मान्य नाही. परंतु खांडेकरांना मात्र वाटते-

## कला : सामान्यांचे तत्त्वज्ञान

समाजावर कलेचा जबरदस्त प्रभाव असतो. सामान्य माणसे जीवनाचे आदर्श, जीवननिष्ठा कलेतून निवडतात. 'पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणे आपल्याकडेही ललित वाङ्मय हा सामान्य माणसाचा धर्म होऊ पाहत आहे. ललित कथा सामान्य मनुष्याच्या आयुष्यात तत्त्वज्ञानाच्या ग्रंथाची जागा घेत आहे. आजचा ललित-लेखक हा नुसता भूतकालाचा इतिहासकार किंवा वर्तमानकालाचा चित्रकार नाही, तो भविष्यकालाचा शिल्पकार आहे. रशियांतली क्रांती टॉलस्टॉयने शंभर वर्षे अलीकडे आणली, असे लेनिन म्हणत असे' ८

परंतु समाजाला घडविण्याची, समाजक्रांतीची जबाबदारी घ्यायला आजचा कलावंत तयार नाही. आजच्या कथा, कविता, नाटके वा चित्रपट कोणीकडे चालले आहेत ? खांडेकरांची तक्रार आहे की,

## साहित्याच्या बाह्यांगालाच महत्त्व दिले जाते

'वाङ्मयाच्या अंतरंगापेक्षा त्याच्या बहिरंगावरच संतुष्ट होण्याची चटक आपल्या वाचकांना लागली आहे-नव्हे. लावण्यात आली आहे. काव्याच्या अर्थापेक्षा गळ्याचा गोडवा जसा आम्हाला अधिक मोहिनी घालतो, त्याप्रमाणे काय सांगितले आहे यापेक्षा ते कसे सांगितले आहे यालाच आपण अधिक किंमत देऊ लागलो आहोत.

आजच्या साहित्यातून 'काय सांगितले जात आहे ?' खांडेकर म्हणतात-

## विकृत आणि अपवादात्मक जीवनाचे चित्रण

'आमच्या लेखकांनी विकृत आणि अपवादात्मक जीवनाचे चित्रण करण्याचाच विडा उचलला आहे की काय ? जे अनुभव मला किंवा माझ्यासारख्या लक्षावधी लोकांना जागेपणीच काय पण स्वप्नातसुद्धा येत नाहीत, ते यांच्या कथात कसे

अगदी ठासून भरलेले असतात! समाज चित्रें, पुरोगामी कथा, विचारप्रवर्तक गोष्टी या नावाखाली 'अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी'च्या आवृत्याच आम्ही अजूनही वाचीत बसायचे काय?' [१०]

आजचे लोकप्रिय वाङमय वाचून असे वाटते की, '-डोळे हे रागावण्याकरिता किंवा रडण्याकरिता नाहीत, फक्त प्रेमकटाक्ष टाकण्याकरिताच आहेत; ओठांचा संबंध अन्यायाची चीड येऊन बाहेर पडणाऱ्या उद्‌गारांपेक्षा चुंबनाशीच अधिक आहे, हातांचा उपयोग एखाद्या ध्येयाचे निशाण मिरविण्याकरिता किंवा त्यासाठी लढण्याकरिता नसून आलिंगन देणे व घेणे हाच आहे, अशी आजच्या लोकप्रिय वाङमयावरून एखाद्याची समजूत झाली तर तो सारा दोष त्याच्या विकृत दृष्टीचाच आहे, असे म्हणता येईल काय?' [११]

म्हणून खांडेकरांनी 'डोळे, ओठ व हात' यांचे जीवनातील अन्य कार्यही चित्रित केले. त्यांचा साहित्याकडे पहाण्याचा दृष्टिकोनच भिन्न आहे, हेच त्याचे कारण! 'मानवी अंतःकेरणातल्या सुप्त भावनांना चिरंतन आवाहन द्यायला, मनुष्याचे उदात्त विचार उचंबळून टाकायला किंवा सामान्य व्यक्तीच्या पुढे एक नवी ध्येयसृष्टी नाचत ठेवायला…' [१२] हवी आहे, असे त्यांना मनोमन वाटत होते.

'मानवी अंत:करणातल्या सुप्त भावनांना आवाहन' देण्याची कल्पना साहित्यिकांनाही मान्य आहे. पण त्यांचे म्हणणे साधे, सरळ आहे— मानवी अंत:करणात ज्या सुप्त भावनांना आवाहन करताच केवळ 'उदात्तताच उचंबळून' वर येईल, याची खात्री नाही. मानवाच्या सुप्त वा अबोध मनाच्या स्तरावरील सूक्ष्म विकारतरंग टिपणे व त्यातून मानवी मनाचा शोध घेणे हेच कार्य आजचे साहित्यिककरीत आहेत. मानवाचे मनच विकृत नि विकारांनी भरलेले आहे. साहित्य हे समाजाचे चित्रण असल्याने त्यातही आपोआपच विकारवशता व विकृती येणे अपरिहार्य ठरले. केवळ उदात्ततेची, ध्येयवादाची चित्रणे आवास्तव आहेत. आजचे साहित्य वास्तववाद मांडते. आजचे साहित्य किळसवाणे वाटत असेल-पण मानवी मन व जीवनच तसे आहे, त्याला कोण काय करणार?

भाऊसाहेबांना हा विचार काही नवीन नाही; आणि निरूत्तर करणाराही नाही. ते म्हणतात-

## वास्तववादाची धडपडही अयशस्वी झाली आहे

हे ध्यानी घ्या. 'पाश्चात्य वाङमयातून परिचित झालेल्या लैंगिक समस्यांच्या चित्रणात आणि तिकडल्या तशा प्रचारच्या वाङमयाच्या अनुकरणात ही वास्तवता पुष्कळदा रमते…मनुष्यातल्या देवत्वाला स्थानी-अस्थानी प्राधान्य देणारी जुन्या

आदर्शवाद्यांची धडपड जशी अयशस्वी ठरली. तशीच मनुष्यातल्या पशुत्वावर हरघडी जोर देणारी ही वास्तववादाची धडपडही अयशस्वी झाली तर त्यात नवल नाही ···' 'याचे कारण उघड आहे. मनुष्य हा मनुष्य आहे. तो जसा देव नाही, तसा पशूही नाही– (मनुष्याचे ठिकाणी आत्मा आहे.) – शरीर आणि आत्मा यांचा त्याच्या ठिकाणी चाललेला झगडा सनातन आहे···तरी ते त्याचा आत्मा नष्ट करू शकत नाही···जी वास्तवता मनुष्यातल्या या चिरंतन स्फुल्लिंगाकडे दुर्लक्ष करते, तिच्या कलात्मक सौंदर्याचे कितीही आकर्षण वाटले तरी वाचक तिच्याशी समरस होऊ शकत नाही. कारण मूर्तिभंजकही मनातून जसा कळत न कळत कुठल्यातरी ध्येयमूर्तीचा पूजक असतो तसा पशुत्वाकडे झुकलेला मनुष्यही अंतर्मनात देवत्वाचाच उपासक असतो.'[१३]

म्हणून 'व्यक्ती घ्या अगर कलाकृती घ्या दोन्हीतही मी शरीरापेक्षा आत्म्याचे महत्त्व शतपटीने अधिक मानतो. कुरूप बहिरंग पुरवले पण निर्जीव अथवा विकृत अंतरंग नको, हा या बाबतीतला माझा आवडता दंडक आहे' असे खांडेकर आग्रहपूर्वक सांगतात.[१४] त्यामुळेच खांडेकरांनी 'आत्म्याचे महत्त्व' पटविण्यासाठी सहेतुक ध्येयवादी लेखन केले आणि––

### कलात्मक सहेतुकता त्याज्य नाही

असे निर्भयपणे प्रतिपादन केले. 'ध्येयवादी ध्येयवादी असा आरडाओरडा करून नव्या प्रकारच्या वाङमयाला धोपटू पाहणाऱ्या या लोकांचे खरे दुखणे वेगळेच आहे. त्यांना ललित वाङमयाचे फक्त स्वप्नाळू स्वरूपच आवडते. खऱ्या–खुऱ्या कठोर जीवनाचा घटकाभर विसर पाडणे हाच असल्या वाङमयाचा आद्य हेतू मानून ते कुठल्याही कलाकृतीकडे पाहात असतात. प्रेमरसाचीच गोडी काय ती अवीट असते असे म्हणणाऱ्या या रसिकांची आनंदाची कल्पना सर्वस्पर्शी आहे, असे कोण म्हणू शकेल ? वाङमयाचा आस्वाद घेताना प्रणयकथे इतकीच करुणकथाही मन रमवू शकते आणि विनोदा इतकाच उद्‌बोधनाचाही आनंद रसिकांना अविस्मरणीय वाटतो, याविषयी अजूनही जी मंडळी साशंक आहेत त्यांचे समाधान विधाता सुद्धा करू शकणार नाही. मात्र कलात्मक सहेतुकता आणि धोपटमार्गी बोधवाद यात काहीच अंतर नाही अशी त्यांनी कितीही सोयीस्कर समजूत करून घेतली तरी इब्सेनपासून––सिंक्लेअरपर्यंतच्या अनेक श्रेष्ठ साहित्यकारांचे वाङमय त्यांच्या संकुचित आनंदवादाचा फोलपणा सिद्ध करण्याला समर्थ आहे, हे त्यांनी विसरू नये.'[१५]

'ललित वाङमयाचा आद्य हेतू' याच नावाचा प्रा. फडके ना. सी. यांचा एक निबंध आहे. या निबंधावर बहुधा खांडेकरांचा रोख असावा. त्या निबंधातील

शब्द ‘ वाङमयाचा आद्य हेतू ’ व पुरस्कारलेला ‘ आनंदवाद ’ यावर खांडेकरांनी टीकास्त्र सोडले आहे. त्या निबंधात प्रा. फडके यांनी कशाला आनंद म्हटले आहे, त्याचाही विचार करायला हवा —

समजा रस्त्याने आपण जात आहो एक कुत्रा आपल्या मागे लागला. आपण भीतीने पळालो. नंतर ही घटना आपण आपल्या मित्राला सांगायला लागलो. तर भीतीचे भाव मुखावर प्रकट करू. कुत्रा प्रत्यक्ष नसताही आता या भावनेच्या अविष्काराचे प्रयोजन काय ? अशा तऱ्हेच्या ‘ उपयोग निरपेक्ष भावना जागृतीने आनंद होतो ! ’ भावनेचा वा विकाराचा पुनःप्रत्यय, हे या आनंदाचे स्वरूप आहे, असा त्याचा अर्थ होय.

प्रा. फडके यांच्या विचारात फार मोठा दोष आहे. तो हा की, विकार व रस यातील फरक ते ‘ उपयुक्तता व उपयोग निरपेक्षता ’ यावर करीत आहेत. जणू काही ‘ उपयोग निरपेक्ष विकार–जागृती म्हणजे रस, अशी त्यांची व्याख्या आहे. रसाची ही कल्पना कितपत शास्त्रीय आहे ? कारण या रस–कल्पनेतूनच ‘ कलावंत म्हणविणारे लोक किती आत्मवंचक असतात, सौंदर्यपूजेसारख्या गोंडस दिसणाऱ्या भावनेचे सोंग पांघरून आपल्या वासनेचे चोजले पुरविण्याची प्रवृत्ती त्यांच्यात किती उद्दामपणे वास करू शकते ……[१६] याची कल्पना येईल.

समाजाला हे आवडते आहे, म्हणूनही केवळ विकार चाळवणारे वाङमय लिहिले जाते. लोक गर्दी करतात, वाचतात, पाहतात, तेव्हा समाजातील काही ढुढ्ढाचार्यांनी ‘ हे वाईट आहे ’ व ‘ हे बंद केले पाहिजे ’ असे सांगणे योग्य होणार नाही. परंतु

## लोकराधन हा कलेचा शाप आहे

असे खांडेकरांचे त्यावर म्हणणे आहे. ‘ कलावंत हा लोकांचा गुलाम नाही. तो स्वतंत्र आहे. तो सत्याचा साथी आहे, स्वतःच्या आत्म्याचा प्रामाणिक साथीदार आहे. लोकांच्या लहरींच्या तालावर तो नाचू लागला की त्यांच्या कलेचा अधःपाता होतो. हळूहळू जीवनाकडे भेदक आणि प्रामाणिक दृष्टीने पाहण्याची त्याची शक्तीच नाहीशी होते. लोकांच्या अंध आवडी–निवडी, त्यांच्या संकुचित कल्पना आणि आकांक्षा, अज्ञानामुळे त्यांना आवडणारी अर्धसत्ये, इत्यादिकांची कळत न कळत तो पोपटपंची करू लागतो. मानवी जीवनाचा श्रेष्ठ मार्गदर्शक, हे जे त्याचे स्वरूप आहे. ते साहजिकच लोप पावते. लोकाराधन हा कलेचा शाप आहे.—’[१७]

खांडेकर ‘ मागणी तसा पुरवठा ’ या धंदेवाईक दृष्टीच्या विरुद्ध आहेत. ललित लेखकाच्या अंतःकरणातही ‘ नवी समाजरचना करण्याचे ध्येय ’ हवे.

## साहित्य हे समाज नौकेचे सुकाणू होय

हे साहित्यिकांनी विसरू नये.

'ललित लेखकाला समाजाकडे पाहण्याची शास्त्रदृष्टी हवी असेल तर मार्क्स अर्थशास्त्राच्या प्रोफेसरांनी वाचावा आणि फ्राइड डॉक्टरांनी पाहावा असे म्हणून त्यांचे चालणार नाही. ललित साहित्य हे काही झाले तरी समाजनौकेचे सुकाणू आहे. या जागेची जबाबदारी न जाणणे म्हणजे समाजद्रोह करण्यासारखेच नाही काय ?' [१८]

म्हणून साहित्यिकांनी 'नवी समाजरचना करण्याची प्रबळ इच्छा' अंतः–करणात बाळगावी, असे भाऊसाहेब तळमळीने सुचवतात.[१९]

कला केवळ 'आनंद' देते. समाजाची नीती घडवणे वा बिघडविण्याचे कार्य ती करू शकत नाही, असे मत वारंवार मांडण्यात येते, परंतु खांडेकरांना हे मत मान्य नाही. 'समाजाच्या मार्गदर्शनाची जबाबदारी आपल्यावर आहे हे जाणून सौंदर्य व सत्य यांचे सुरस संमिश्रण करणारे शब्दसृष्टीचे ईश्वर' [२०] समाजाच्या भावविश्वाला घडवू शकत नाहीत काय ?

## साहित्याचा समाजावर परिणाम होतो

लेखनकला ही इतर कलांची बहीण खरीच ! पण त्या मुक्या तर ही बोलकी. इतर कलांची सौंदर्यशक्ती हिच्यात असतेच पण या सौंदर्याला बोलता येत असल्यामुळे ते विलक्षण परिणाम करू शकते. कलेच्या नावाखाली ज्यांना आपल्या उथळ व विलासी मनाची प्रतिबिंबेच रेखाटायची असतात, त्यांनी वाङ्मयाचा समाजावर काडीमात्रही परिणाम होत नाही, असे म्हणावे ! पण राजाच्या काय किंवा रूढीच्या काय, दोन्ही सिंहासनांना मोठ्या तोफांपेक्षाही लेखकाच्या लेखण्यांची भीती अधिक वाटते. त्यातही कथा लेखकासारख्या प्रतिसृष्टी लेखन करणाऱ्या कलावंतांचे भय तर अधिकच ! संजीवनी मंत्र अगर हलाहल विष यांच्याप्रमाणे कथा वाङ्मयाचा क्षणार्धात दिसणारा परिणाम समाजावर होत नसेल. पण समाजाच्या भावनांशी त्याचा नित्य संबंध येत असल्यामुळे कलावधीने का होईना तो परिणाम जाणवतोच !' [२१]

खांडेकरांचे हे मत चांगलेच वादग्रस्त झाले आहे. कलावंतांना कोणतीही सामाजिक जबाबदारी नको असते.

## काही शंका, काही समस्या

एका कलावंताची दूरचित्रवाणीवर एक मुलाखत घेतली होती. एकंदर मुलाखतीबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. ती सुंदरच झाली होती. पण या

मुलाखतीच्या ओघात त्यांनी व्यक्त केलेल्या काही विधानांची चर्चा होणे या संदर्भात मला आवश्यक वाटते.

त्या कलावंतांनी काही मिनिटांच्या अंतराअंतराने तीन विधाने केली. ती विधाने जवळ-जवळ आणली तर विसंगत वाटतात, वैचारिक गोंधळ निर्माण करतात–निदानपक्षी काही शंका अवश्य उपस्थित करतात. त्यांनी जी विधाने केली ती त्यांच्या म्हणण्याचा विपर्यास न करता माझ्या भाषेत अशी सांगता येतील–

(१) 'सेन्सॉरबोर्ड असावं असं मला वाटत नाही. ते कोणत्याही स्वरूपाचं नसावं. कोणाही एका व्यक्तीला वा संस्थेला–मग ती संस्था सरकारी असली तरी —तिला तो अधिकार आहे, असं मला वाटत नाही. कलावंतांना लेखनाचं आणि आविष्काराचं पूर्ण स्वातंत्र्य हवं. प्रेक्षक आणि कलावंत यांच्यामध्ये कोणीही लुडबूड करू नये. एखादी कलाकृती आवडली नाही तर ती बंद व्हावी असं प्रेक्षकांना वाटत असेल, तर त्यांनी ती न पाहाणं, तिकडं न जाणं हा मार्ग आहे !'

(२) 'व्यावसायिक रंगभूमीवर सध्या भांडवलदारांचा मोठा अधिकार चालतो, ही गोष्ट खरी आहे. या भांडवलदारांना कलेचं मोठं प्रेम असतं असं मुळीच नाही. उद्या जर त्यांना असे वाटलं की, रंगभूमीपेक्षा साबणविक्रीमध्ये अधिक पैसा मिळण्यासारखा आहे, तर ते हा व्यवसाय सोडून साबण विकायला लागतील !'

३) 'नाट्यकला हे एक अत्यंत प्रभावी असं समाजक्रांतीचं साधन आहे, असं मी मानतो. ही समाजक्रांती सांस्कृतिक स्वरूपाची असते. जे लोक केवळ राजकारण हेच समाजक्रांतीचं साधन मानतात, त्यांचे मत अपूर्ण आहे. समाजक्रांती ही राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक तिन्ही क्षेत्रात झाल्यावाचून पूर्ण होऊ शकत नाही. सांस्कृतिक क्रांती घडवण्याचं कार्य नाट्यकला करते. समाजाच्या अंतरंगाची नवी ठेवण घडवणं हे कार्य ती करते.'

### कोणती क्रांती हवी ?

आता मला असे म्हणायचे आहे की, नाट्यकला ही 'सामाजिक क्रांतीचं प्रभावी साधन' मानत असतील तर त्या कलावंताला–लेखकाला–सामाजिक क्रांती कोणत्या स्वरूपात हवी आहे, यांची स्पष्ट जाणीव हवी की नको ? आज जी नाटके रंगभूमीवर येत आहेत, त्यातून सामाजिक अंतरंग कोणत्या स्वरूपाचे घडेल, असे या कलावंतांना वाटते ? आपली कला ही सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन आहे, या जाणीवेने व जबाबदारीने कला प्रेक्षकांपुढे ठेवली जाते काय ?

मला असे वाटते की, कलावंत म्हणवून घेणाऱ्या साऱ्यांनी त्यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक क्रांतीचे स्वरूप स्पष्ट करावे आणि आजची रंगभूमी (अर्थात इतर कलाही) त्या क्रांतीकडे कशी जात आहेत, तेही स्पष्ट करावे.

दुसरी गोष्ट अशी की, आज व्यावसायिक रंगभूमी जर भांडवलदारांच्या हाती आहे, तर कलावंतांनी स्वतःच्या मुक्त आविष्काराच्या फोल घोषणा कशाला द्याव्या ? प्रेक्षकांनी एखादा खेळ चालू दिला नाही, म्हणून ठणाणा करणारे व कलावंतांना ‘ स्वातंत्र्य हवं ’ ‘ सेन्सारबोर्ड कोणत्याही स्वरूपात नको ’ म्हणणारे तथाकथित कलावंत भांडवलदारांच्या इच्छांचे, वासनाचे आणि गल्लाभरू कला पेश करणाऱ्या वृत्तीचे गुलाम नाहीत काय ? या भांडवलदारांना ‘ साबण विक्रीपेक्षा ’ अधिक फायदा ज्या कलाकृतीने मिळेल तेच ते करायला लावणार ! त्यांना सामाजिक क्रांतीचे काय महत्त्व आहे. ?

अशा स्थितीत प्रेक्षक वा जाणकार यांच्या मनांपेक्षा कलावंतही धंदा अधिक पाहातात, असे म्हटले तर बिघडले कोठे ? बरे, सेन्सारबोर्ड वा व्यक्ती यांची गुलामगिरी नको म्हणणारे कलावंत या भांडवलदारांची खेळणी आहेत, हे पर्यायाने मान्य करीत आहेत.

तेव्हा बेजबाबदार भांडवलदार व गुलाम कलावंत यांच्या युतीने सादर केलेले नाट्यप्रयोग जी सामाजिक क्रांती करतील, ती योग्य दिशेने जाईल, असे मानता येईल काय ? त्यावर कोणता उपाय आहे ? सध्यातरी सेन्सारबोर्ड हाच उपाय बरा वाटतो.

## विचारवंतांची जबाबदारी

तिसरी गोष्ट अशी की, प्रेक्षक व कलावंत यांच्यामध्ये कोणीही लुडबूड करू नये, असे कलावंतांना वाटते. मला वाटते की, सामान्य प्रेक्षकांना घडत असलेल्या सामाजिक क्रांतीचं विकृत स्वरूप जाणवत नाही, ते विचारवंतांना जाणवतं तेव्हा या क्रांतीच्या विकृतीकरणाला आळा घालण्याची विचारवंतांची जबाबदारी आहेच. तो आळा घालण्याचाकोणता उपाय हे सुचवू शकतील ?’

एका कलावंताने मांडलेले नाट्यकलेबद्दलचे मत हे ‘ कलावंत व कला ’ यांचे प्रतिनिधित्व करतात, म्हणून या विषयाचा ऊहापोह करणे आवश्यक वाटले.

तेव्हा ‘ ललितकलांचा समाजावर परिणाम होतो ’ म्हणून ‘ कलावंताला स्वतःच्या जबाबदारीची जाणीव हवी ’ हे खांडेकरांचे मत योग्यच आहे. याहीपेक्षा पुढे जाऊन खांडेकरांना वाटते की, सध्याच्या कलेला मर्यादा पडल्या आहेत, त्याचाही विचार करणे आवश्यक आहे.

## काही रसांची चित्रणेच नाहीत

'शृंगार आणि हास्य याहून अधिक व्यापक स्वरूपाचे रस तीन आहेत-- करुण, वीर, वत्सल या तिन्ही रसांचा व्यक्ति–जीवनाशी निकटचा संबंध असला तरी सामाजिक रस या दृष्टीने त्यांचे महत्त्व आज शतपटीने अधिक आहे. पण हे रस आपल्या वाङमयात कितीसे आळविले जात आहेत ?'[२३]

खांडेकरांनी वीर, वात्सल्य आणि करुण रसांची सामाजिक दृष्टीने आवश्यकता प्रतिपादन केली आहे. याचा अर्थ असा नव्हे की, त्यांना शृंगाराचे वावडे आहे. शृंगारही हवा.

## कशा प्रकारचा शृंगाररस हवा आहे ?

'आज समाजाला शृंगार हवा आहे, पण तो भूल म्हणून नको आहे, गुंगी आणणारे मद्य म्हणून नको आहे ! दमल्या–भागल्या जीवनाला ताजेतवाने करणारे निर्मळ पाणी म्हणून तो हवा आहे. आजच्या समाजाला मोहांध करणाऱ्या कामकथा नको आहेत. त्यांच्या उघडलेल्या डोळ्यांना जीवनाचे सत्यस्वरूप दाखविणाऱ्या प्रेमकथा हव्या आहेत ! ज्या प्रीतीमध्ये पंचमहाभूतांची शक्ती साठवलेली असते तिचे दर्शन घ्यायला तो उत्सुक झाला आहे. प्रेम हा रोग नाही, ते औषध आहे. –अगदी गोड औषध आहे……इंद्रधनुष्याप्रमाणे प्रीतीमध्ये जे विविध रंग आहेत त्यांचे चित्रण आजच्या आपल्या वाङमयात विपुलतेने होऊ लागले, प्रणयाइतकेच प्रपंचकथेलाही जर कलाकारांनी महत्त्व दिले, प्रीतीचा उगम शरीरिक आकर्षणात असला तरी तिचा विस्तार मनामनांच्या मिळणीनेच होतो. वेलीला फूल यावे त्याप्रमाणे उपभोगातूनही भक्ती उदय पावू शकते इत्यादी जीवनातले खोल अनुभव जर आमच्या कलावंतांनीही आत्मीयतेने चित्रित केले तर ते काय वाचकांना आवडणार नाहीत ?'[२४]

…'परंतु आज ज्या पद्धीतीने हे दोन रस (शृंगार आणि हास्य) आळवले जात आहेत त्या पद्धतीत आणि दुःख विसरण्याकरता दारूचा प्याला तोंडाला लावणाऱ्या बुद्धिमान मनुष्याच्या वर्तनात काय अंतर आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात–मग ते प्रीतीचे असो, कीर्तीचे असो, कर्तृत्वाचे असो अथवा पैशाचे असो, मध्यमवर्ग पराभूत होऊन माघार घेत आहे, या पराभवाचे शल्य कोठल्या तरी उन्मादात विसरून जावे अशी तो धडपड करीत आहे.–'[२५]

## कामकथा म्हणजे शृंगारकथा नव्हेत !

'केवळ इंद्रियजन्य सुखाची आठवण करून देणारी आणि गुप्तसुप्त इच्छेची पूर्ती करून आनंद देण्यास प्रवृत्त झालेली शृंगारिक वर्णने ही खरोखर शृंगाररस

निर्माण करणारी नसून रसोत्पत्ती करण्याच्या मिषाने प्रच्छन्नतेने इंद्रियसुख देणारी साधने आहेत··· प्रच्छन्नतेने केवळ इच्छापूर्ती करू पाहणारी वर्णने, गाणी चित्रे वगैरे वगैरे अतृप्त जीवास पुरे वाटत असतील, त्यांना बाजारभाव असेल पण ती कलादृष्टया मूल्यवान, आदरणीय व शिष्टसंमत होऊ शकणार नाहीत.' [२६]

काही वर्षांपूर्वी श्री. श्री. के. क्षीरसागर यांनी मराठी वाङमयात 'शृंगार कथांची उणीव' आहे, असे लिहिले होते.

## रस-निर्मिती व विकारजागृती यातील फरक स्पष्ट व्हावा

या बाबत मला असे वाटते की, साहित्यिकांनी व टीकाकारांनी रसनिर्मिती व विकारजागृती यातील फरक स्पष्ट करणे आवश्यक आहे. विकार विषवत तर रस अमृत आहे ! पण विकार केव्हा व रस केव्हा म्हणावे ? कामविकार की शृंगारस ? क्रोधविकार की रौद्ररस ? त्याचे निकष कोणते ? लक्षणे कोणती ? याचा मूलभुत विचार फारसा झालेला दिसत नाही. प्रा. फडके यांचा 'उपयुक्तता निरपेक्षतेचा सिद्धान्त' निरुपयोगी आहे. डोळ्यासमोर केवळ साहित्य वा अभिनय ठेवून त्यावरून 'बसवलेली' ही व्याख्या चांगलीच सदोष आहे. ज्ञानेश्वरीत ही ओवी आहे-

...'स्वप्नी प्रियापुढे तरुणांगी !
आलिंगलेवीण आलिंगी ! सकामु करी ।।...

आता उपयोग निरपेक्षतेच्या सिद्धान्ताने हा 'शृंगाररस' म्हणावयास हवा ! –पण होईल काय !

अशी स्थिती 'रस' व 'विकार' या बद्दलच्या कल्पना स्वच्छ नसल्याने झाली आहे. 'कोणी एक कांजी प्याला. मग परिणाम पुसो लागला, आमृताचा !' तसा परिणाम कसा दिसणार ?

आणि ही 'कांजी' ही बहुधा 'इंपोर्टेड' असते.

भाऊसाहेब खांडेकर म्हणतात–

## साहित्याने स्वत्व सोडू नये

'एक गोष्ट पुनः एकदा आवर्जून सांगावीशी वाटते–उठल्या सुटल्या आपण परदेशी वाङमयाच्या कसोटया आपल्या वाङमयाला लावतो, ते थिटे आहे, ते किरटे आहे, ते हिणकस आहे, अशा हाकाटया करीत सुटतो. पण कोठलेही वाङमय हे केवळ लेखकाच्या प्रतिभाबलावर अवलंबून असत नाही. ते परंपरागत साहित्य मूल्यांवर आणि सर्व संचित सामाजिक संस्कारांचा वारसा घेऊन येते......आपले

संगीत आणि पाश्चात्य संगीत यांत जसे अंतर आहे तसे आपले साहित्य आणि पाश्चात्य साहित्य यांतही आहे. दोन्हींच्या परंपरा फार भिन्न आहेत. रवीन्द्रांच्या कथेने पुष्कळ नवे स्वीकारले पण ते आपला वारसा न सोडता, स्वत्व न गमावता.[२६]

खांडेकरांनी पाश्चात्य संगीत व भारतीय संगीत भिन्न आहे तद्वत साहित्यही भिन्न हवे, असे म्हटले आहे. ज्या समाजजीवनातून साहित्य निर्माण होते, ते समाज जीवन, तेथल्या समस्या, त्या त्या समाजाचे संस्कार, परंपरा, जीवनविश्व, तत्त्वज्ञान सारेच भिन्न असते. 'साहित्यिकाचे जीवनविषयक तत्त्वज्ञान' त्याच्या सामाजिक परिस्थितीवरून ठरते, असे लोक समजतात. पण ते तितकेसे खरे नाही. जीवन–विषयक तत्त्वज्ञान संस्कार व तपस्या यांतून तयार होते. हे संस्कार अनेकविध असतात. कौटुंबिक वातावरण व वारसा, सामाजिक वातावरण व इतिहास व संस्कृती, यांचा वारसा, त्या व्यक्तींचे वाचन, मनाची व बुद्धीची ठेवण, आवडी–निवडी, आणि यम–नियम या सर्वांचा संकलित परिणाम होऊन व्यक्तिमत्व घडत असते. 'अहं'ची घटना ही अशी प्रत्येकाची स्वतंत्र आहे. म्हणूनच व्यक्ती तितकी दर्शने !

'दर्शन' शब्दाने दोन अर्थ सूचित होतात. ते व्यक्तीने घेतलेले दर्शन आहे, तसेच व्यक्तीचे दर्शन–तत्त्वज्ञान–आहे ! म्हणून खांडेकर म्हणतात की, जगाचे दर्शन घेऊन कलेच्या माध्यमातून मांडू इच्छिणाऱ्या लेखकाने आधी स्वतःचे व्यक्तिमत्व घडवले पाहिजे. साहित्यिक स्वतः तपःपूत हवा.

साहित्य ही कला आहे. सर्वच कला योगसाधना आहेत, हें ध्यानी घेतले पाहिजे.

## भारतीय कला-विषयक तत्त्वज्ञान

भारतीय कलाविषयक तत्त्वज्ञान व पाश्चात्य कलाविषयक तत्त्वज्ञान यात मूलभूत फरक आहे.

रंग, रेषा, आकृती, संगती यांपेक्षा भारतीय कलावंतांना आणखी काही सूचित करावयाचे असते. सौंदर्याचे नियम हे लयबद्धतेवर आधारलेले असतात. शिल्पकला, नृत्यकला, संगीतकला या ललितकलांतील सौंदर्य हे लय–तत्त्वावर अधिष्ठित असते. अर्थातच ललित साहित्याचेही अधिष्ठान लय तत्त्वच ! परंतु भारतीय शिल्प, नृत्य वा संगीत केवळ लयबद्ध सौंदर्याकृती निर्माण करीत नाहीत, तर या लय-बद्ध सुंदर आकृतीतून या काही गूढ आणि उदात्त अशी लय बद्ध भावमूर्तीही सूचित करतात. किंबहुना अशा उदात्त भावमूर्ती निर्माण करण्या–साठीच आमची ललितकला कटिबद्ध झाली आहें. कर्मसौंदर्य, शीलसौंदर्य, भाव–सौंदर्य आणि प्रतिभा सौंदर्य यांच्या उदात्त आकृती निर्माण करण्याकरिता कला

आहे. विसंगत आणि विकृत अशा भावनांच्या जीवनांतून आणि संघर्षातून एखादी उदात्त लयबद्ध मूर्ती निर्माण करणे म्हणजे कला. घटना, प्रसंग, कृती, संवाद ही सर्व मानवी जीवनाची बाह्य दर्शने आहेत. या सर्वांतून व्यक्त होते ते अंतर्जीवन ! या अंतजीवनाची लयबद्ध आकृती साकार करणे भारतीय कलावंतांनी आपले ध्येय मानले आहे. अंतर्जीवनाची अशी आकृती निर्माण करणे हे कलावंताच्या प्रतिभेवर जसे अवलंबून असते तसेच ते कलावंताच्या व्यक्तिमत्त्वावरही अवलंबून असते.

कलेच्या क्षेत्रात विशिष्ट तंत्र म्हणजे सर्वस्व नव्हे ; त्याचप्रमाणे सौंदर्य म्हणजेही सर्वस्व नव्हे ! कला म्हणजे केवळ तांत्रिकता नाही, सौंदर्याची आकृती नाही, किंवा केवळ सौंदर्याचा शोध वा सौंदर्याची अभिव्यक्तीही नाही.

रसिकतेतेने आणि प्रभुत्वपूर्ण निर्माण क्षमतेने अभिव्यक्त झालेला जाणिवेचा आत्माविष्कार म्हणजे कला होय. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर असे सांगता येईल की, कलेत केवळ सौंदर्याची मूल्ये नसतात; तर जीवनमूल्ये, भावमूल्ये आणि आत्ममूल्येही कलेत असतात ! म्हणूनच म्हणतात की कला आत्म्यासाठी आहे. मानवाची अस्मिता आणि आत्मा जे जे संपादन करण्यासाठी धडपडत आहे त्यांची सौंदर्याच्या माध्यमातून अभिव्यक्ती होणे म्हणजे कला !

म्हणूनच चित्र, शिल्प, गायन, साहित्य या सर्व कला भारतात आध्यात्मिक साधना मानल्या गेल्या. संपूर्ण जीवनकर्म हीच साधना ! शिल्पकलेचा विषय समाधी ! नृत्याचा विषय भक्ती, संगीताचा विषय ॐकार साधना आणि साहित्याचा विषय सगुणाच्या माध्यमातून निर्गुणोपासना हा होय.

हे रहस्य ओळखल्यावाचून भारतीय पद्धतीने कलेची उपासना करता येणेच शक्य नाही.

## सर्व कलांची परिणती जीवनकलेत होणे आवश्यक

दिशाहीन, उद्दिष्टहीन, विकारांची वादळें व आंदोलने व त्यावर हिंदुळणारी दिशाहीन व ध्येयहीन अगतिक जीवने चितारणें कलादृष्टया इष्ट ठरणार नाही.

' विविध कलांचा जन्म जीवनाचा अर्थ समजावून घेणें व इतरांना समजावून देणे यासाठीच असल्यामुळे जीवनाला विरोधी अशी कलाच संभवत नाही

कोणतीही कला घेतली तरी तिच्या द्वारे जड द्रव्यावर मानवी ध्येयकल्पनांचे प्रभुत्व स्थापन होऊन आत्मानंदाचा आस्वाद घेण्याची सोय झाल्याचे आढळून येते. कलावंताच्या मनात असलेले सौंदर्य पाषाणातून, आकृतिवर्णातून, शब्दांतून अथवा सुरातून प्रकट होत असते ..… संगीतात बदसूर निघू नयें म्हणून जपतात, त्याचप्रमाणे किंबहुना त्याहूनही अधिक, जीवनात बदसूर निघू नये म्हणून जपणे

अगत्याचे नाही काय ?......वाङमय रसात्मक असते त्यापेक्षा जीवित अधिक रसात्मक झाले पाहिजे. या दृष्टीने आपल्या सर्व इंद्रियांनी सत्य–शिव-सुंदराचे पूजन करणारे संत हेच मोठे कलावान होत यात शंका नाही. सर्व कलांची परिणती या जीवनकलेतच व्हावयास पाहिजे.'[२७]

म्हणून तर श्रीमती दुर्गा भागवत यांनी कऱ्हाडच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून उद्‌गार काढले– ' विचारांतील विसंवाद व विसंगती दाखवणे आणि जीवनदृष्टी विकसित करणे हे लेखकाचे कार्य आहे.'[२८]

परंतु ' जीवनदृष्टी विकसित ' करण्याचेच कार्य निष्ठेनें अन् तळमळीने खांडेकर करीत आले म्हणूनच काही पंडितांना खटकते ! –– प्रा. म. ना. अदवंतांनी म्हटले, ' अशी भाष्ये त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान स्पष्ट करतात,–ती अतिशय वाचनीय असतात. पण ती वाचत असताना Thinker खांडेकरांचा वरचष्मा कलावंत खांडेकरांवर सतत असल्याची जाणीव मात्र अस्वस्थ करते.'[२९]

काय गंमत आहे पहा–अतिशय वाचनीय सामाजिक तत्त्वज्ञान असले, खांडेकर thinker असले तरी कलावंत फिका पडतो, ही गोष्ट विद्वानांना अस्वस्थ करते ! कलावंतांचे हे अतिरिक्त स्तोम माजले आहे, असे आम्हांस स्पष्ट वाटते. अखेरीस ग्रंथ हवेतच कशाला ? ग्रंथ–वाचन हे काय केवळ करमणुकीचे साधन आहे ? त्याने भावविश्वाची नवी घडण करायची नसते ?

## करमणूक आणि आनंद यात फरक आहे

बऱ्याच वेळा चांगले विचारवंतही करमणूक व आनंद यांत फरक करीत नाहीत, असे दिसते. एका विद्वान प्राध्यापकाने एका व्याख्यानात ' चहा पिण्याचा, बटाटेवडे खाण्याचा आनंद, गुप्तहेरकथा वाचण्याचा आनंद व ज्ञानेश्वरी वाचण्याचा आनंद एकाच मापाने मोजले होते ! त्याने म्हटले, ' कुणाला बटाटावडे खावेसे वाटतील, कुणी गुप्त हेर कथा वाचेल, कुणी ज्ञानेश्वरी ! प्रत्येकाला ' आनंद ' मिळतो ! त्यात काय फरक आहे ?

हीच स्थिती अनेकांची झालेली दिसते ! आनंदाच्या परी असतात नि सर्व परी एकाच पायरीवर नसतात हे कलावंतांनी अजून ओळखलेले दिसत नाही. आनंदाच्या परी असतात नि प्रत्येकाची व्यक्तिमत्वाची घडण ज्या रीतीने झालेली असेल त्या रीतीनेच तो त्या त्या आनंदाचा आस्वाद देऊ शकतो. ' सारे कलावंत ' व ' सारे रसिक ' हे समान नसतात, हे ध्यानी घेतले पाहिजे.

रसिकांची विविध पातळी ध्यानी येणे सोपे आहे. एखाद्या नाटकातील, चित्रपटातील वा जाहीर व्याख्यानातील विविध विनोदाचे प्रसंग सर्व रसिकांना

समान रीतीने हास्य – रसात डुबवीत नाहीत. काही विनोद काहींनाच गुदगुल्या करतात ! एवढेच नव्हे तर एकाला हसविणारा विनोद दुसऱ्याला खटकतो ! तेव्हा कलेने आनंद द्यावयाचा आहे, तो कोणत्या पातळीवरील ? आणि कुणाला ?

याचाच अर्थ असा की, कलावंतांची करमणूक आनंदाच्या आकर्षक माध्यमातून रसिकाचे व्यक्तिमत्त्व उंचावू इच्छिते ! जर कलेने व्यक्तिमत्त्वाची नवी सौंदर्यपूर्ण भावमूर्ती निर्माण केली नाही, तर कला व करमणूक सारख्याच म्हणाव्या लागतील ! एखादा वेळ जात नाही म्हणून सिगरेट फुंकीत बसतो ! दुसरा कादंबरी वाचतो ! तिसरा दारू पितो ! तिघेही सारखेच ! तिघांनाहीं 'आनंद' हवा ! आनंदाचे माध्यम प्रत्येकाचे वेगळे आहे, इतकेच ! लो. टिळक फावल्या वेळात गणिते सोडवीत, फावल्या वेळातील ती त्यांची करमणूक होती ! एखादा चित्रे काढील, गायन करील ! परंतु या करमणूकींचा आनंद व बटाटेवडे नि रहस्यकथा वाचण्यातील आनंद एकाच पातळीवर आहेत काय ?

तेव्हा कलेच्या क्षेत्रात वावरणारे सारे कलावंत समजणे व कलेच्या सोंगात अवतरली म्हणून कला समजणे अयोग्य आहे, कलावंताने–मग तो लेखक, कवी, नृत्यकार, अभिनेता कुणीही असो–प्रथमतः श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व घडविले पाहिजे. आपली हीनता, पशुता सोडली पाहिजे ! नंतरच कलेच्या क्षेत्रात उतरले पाहिजे. नाही तर आज 'तीर्थांची' जी स्थिती झाली आहे, तीच याही कला–तीर्थाची स्थिती झाल्याविना राहणार नाही. किंबहुना 'झाली आहेच' असे म्हणायलाही हरकत नाही.

समाजाची जडण–घडण करण्याचे कार्य अंगाबाहेर टाकू इच्छिणाऱ्या, किंबहुना सोयिस्कर रीत्या ललित वाङ्मयाने समाजाची नीती घडत वा बिघडत नाही, म्हणणाऱ्या पंडितांनी माननीय दुर्गा भागवत यांचे हे मत अवश्य विचारात घ्यावे– [३०]

## ग्रंथ हे समाजमुख

राजवाडेच काय ते ग्रंथांचं कार्य निःसंदिग्धपणे सांगून गेले. एकाच वाक्यात त्यांनी सांगितलं की, 'ग्रंथसंग्रह हे समाजमुख आहे.' सूत्रासारखंच हे वाक्य आहे. नेत्राइतकंच विश्वव्यापकही आहे. ग्रंथ हे समाजमुख आहे असं ते म्हणतात, तेव्हां त्यांना समाजाचं निरोगीपण, तृप्तभाव, विचारक्षमता आणि रसरशीतपणा अभिप्रेत असतो. ग्रंथ हे आपले गुरु आहेत, हे अनेकांनी सांगितलं. ग्रंथ हे मित्र आहेत, हे वाक्यही आता शिळं झाले आहे. पण 'ग्रंथ हे समाजमुख आहे' ही उक्ती कधी कालबाह्य ठरणार नाही. कारण राजवाडेच त्याचं स्पष्टीकरण करतात की, 'ग्रंथ

वाचल्यानें मनुष्य विचार करू लागतो. विचारांचा खल झाल्यावर आचार बनतात व नंतर समाजाचे पाऊल पुढे पडते.'

## आणि मा, यशवंतराव चव्हाण यांनी साहित्यिकांकडून अपेक्षा केली

'सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने ललित सामाजिकताही अत्यंत महत्त्वाची आहे. कलाबाह्य निकष लावून हेतुवादी साहित्य श्रेष्ठ ठरवावे अशा मताचा मी नाही. पण समाजाच्या प्रबोधनासाठी, त्याचा भावपिंड घडविण्यासाठी ललित साहित्याचा निश्चित उपयोग होतो. समाजक्रांतीविषयी अनुकूल मनोभूमि तयार करावयाची असेल तर प्रस्थापित समाजातील विसंगती, अंतर्विरोध आणि त्यामुळे निर्माण होणारी कोंडी यांच्या कलात्मक आविष्कारांतून समाजावर संस्कार करता येतात. उपहास किंवा विनोद ही शस्त्रें साहित्यिक शस्त्रक्रियेत समाजपरिवर्तनासाठी वापरली गेली आहेत. हे जगांतील सर्व साहित्याच्या इतिहासाने सिद्ध केले आहे. मला वाटते आता जे आपले सामाजिक प्रश्न आहेत, ते सर्व पुनर्रचनेचे प्रश्न आहेत. त्याचे संशोधन करून प्रकट चर्चा व चिंतन करणारे समाजचिंतक आणि त्यातील तत्त्वाचा व समाजक्रांतीचा ध्यास घेतलेले समर्थ ललित लेखक या दोघांचेही कार्य एकमेकांस पूरक आहे. या प्रयत्नांची गरज आहे. मला वाटते ही अपेक्षा मराठी साहित्यिकांकडून करणे गैर होणार नाही.'

म्हणून समाजनिरपेक्ष कलेचा विचार करता येणार नाही, असा खांडेकरांचा प्रथमपासूनचा आग्रह आहे. आणि––

## सामाजिक विचारांची जाणीव हवी

कोणतीही कला सामाजिक प्रश्नात गुंतली की ती संपते हा गैरसमज असून सामाजिक विचारांचे लागेबांधे कलेला कधीच तोडता येणार नाहीत. इतकी ती त्यांच्याशी निगडित असते.' असे विचार ख्यातनाम साहित्यिक श्री. वि. स. तथा भाऊसाहेब खांडेकर यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून बोलतांना ही व्यक्त केले.[३१]

तेव्हा केवळ 'कलावंत' म्हणवून घेऊन कसलीही जबाबदारी स्वीकारू न इच्छिणाऱ्या विद्वानांनी आपल्या विचारांचे पुन्हा मूल्यमापन करणे अगत्याचे आहे.

## संदर्भ-टीपा

या विषयावरील चिंतन प्रामुख्याने 'अभिषेक' या ग्रंथावरून स्वीकारले आहे. तेव्हा केवळ पृष्ठांक दिला असेल तर 'अभिषेकचाच' समजावा. अन्य अवतरणांचे स्थल–निर्देश केले आहेतच.

१ अभिषेक : पृ. १७२
२ पृ. ३१
३ पृ. ८९
४ पाच कथाकार : पृ. ४६–४७
५ पृ. ९३
६ रेषा आणि रंग पृ. २६६
७ पृ. २९०-९१
८ पृ. १७६
९ पृ. १५४
१० पृ. १६०
११ पृ. १५५
१२ पृ. १५४
१३ पृ. २९३
१४ पृ. १४०
१५ पहिले प्रेम पृ. १६
१६ दोन ध्रुव – पृ. २२/२३
१७ जळलेला मोहोर – पृ. ३५ ( डॉ. साने यांचे पत्र )
१८ पृ. ९७
१९ पृ. ९८
२० पृ. ५२
२१ पृ. २९–३०
२३ पृ. १६९
२४/२५ पृ. १६८
२५ रेषा आणि रंग ( वाङ्मयीन महात्मता : प्रस्तावना ) पृ. ६२
२६ रेषा आणि रंग : पार्श्वभूमी : पृ. २८१
२७ पत्री : ( कवि साने गुरुजी ) प्रस्तावना : आचार्य स. ज. भागवत.
२८ केसरी – ७ डिसेंबर ७५
२९ खांडेकरांचे कथाविश्व : खाडेकर व्यक्ति आणि साहित्य : पृ. २७६
३० कऱ्हाड साहित्य संमेलन : केसरी : ७ डिसेंबर ७५
३१ केसरी–कऱ्हाड साहित्य संमेलन : ७ डिसेंबर १९७५

## संदर्भ ग्रंथ

(१) अश्रू, वि. स. खांडेकर, पुणे, १९५४
(२) अग्निनृत्य (संपा.) वि. स. खांडेकर, पुणे, १९४७
(३) अभिषेक, वि. स. खांडेकर, आ. १. पुणे १९६३
(४) अमृतवेल, वि. स. खांडेकर, आ. १, पुणे
(५) आगरकर व्यक्ति आणि विचार, – वि. स. खांडेकर
(६) उल्का, वि. स. खांडेकर, आ. ४, पुणे १९५४
(७) कल्पलता, वि. स. खांडेकर, आ. १ पुणे, १९४५
(८) क्रौंचवध, वि. स. खांडेकर, आ. ४, १९५७
(९) खांडेकर व्यक्ति आणि साहित्य, डॉ. एस्. एस्. भोसले, मोघे प्रकाशन पुणे, आ. १, १९७५
(१०) जळलेला मोहोर, वि. स. खांडेकर, आ. ३ पुणे, १९६२
(११) ढगाआडचं चांदणं, वि. स. खांडेकर, पुणे १९७२
(१२) ते दिवस ती माणसे, वि. स. खांडेकर, पुणे १९६१
(१३) दोन ध्रुव, वि. स. खांडेकर, आ. ५ पुणे, १९६१
(१४) धर्माचे विज्ञान आणि तत्त्वज्ञान, स्वामी विवेकानंद, रामकृष्ण आश्रम, नागपूर, १९६४
(१५) पहिले प्रेम, वि स. खांडेकर, आ. ४, १९५९
(१६) पाच कथाकार, (संपा.) वि. स. खांडेकर, कॉन्टिनेंटल प्रकाशन, आ. ४, १९६४
(१७) पांढरे ढग, वि. स. खांडेकर, पुणे, आ. ४, १९६३
(१८) फुले आणि काटे, वि. स. खांडेकर, पुणे आ. १, १९४४
(१९) मंझधार, वि. स. खांडेकर, पुणे आ. १, १९५९
(२०) ययाती, वि. स. खांडेकर, पुणे आ. ४
(२१) रागिणी (संपा.) वि. स. खांडेकर, पुणे आ. १ १९५९
(२२) रिकामा देव्हारा, वि. स. खांडेकर, कोल्हापूर आ. ३, १९६१
(२३) रेषा आणि रंग, वि. स. खांडेकर, पुणे आ. १, १९६१
(२४) रंग आणि गंध, वि. स. खाडेकर, पुणे आ. १, १९६१
(२५) वेचलेली फुले (अनु. व विवेचक) वि. स. खांडेकर, आ. १, १९४८
(२६) सुशीलेचा देव (संपा.), वि. स. खांडेकर, वर्षा प्रकाशन, आ. १, १९५३
(२७) स्त्री आणि पुरुष, वि. स. खांडेकर, पुणे, आ. ४, १९६२
(२८) हरा चंपा (हिंदी) वि. स. खांडेकर, पुणे १९५७
(२९) पत्री (कवि साने गुरुजी) प्रस्तावना – आचार्य स. ज. भागवत

## लेख

(१) एक लेखक आणि एक खेडे – वि. स. खांडेकर, मौज दिवाळी अंक १९७१

(२) दैनिक ' लोकमान्य ' दि. २४–६–७४ (खांडेकर)

(३) स्वातंत्र्यवीर सावरकरांचे क्रांतिकार्य, – डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे

(४) समृद्धीचा शाप, डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, केसरी दिवाळी अंक १९६८

(५) संगम सुख भलत्याला, डॉ. प्र. न. जोशी, केसरी दिवाळी अंक १९६९

(६) स्त्री-जीवन व्यथा – डॉ पु. ग. सहस्त्रबुद्धे, हंस दिवाळी अंक १९७५

(७) कऱ्हाड साहित्य संमेलन, केसरी, ७ डिसेंबर १९७५

२२६१५
निबंध
२०७३

REFBK-0022615